# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# इतिहास : त्याचे सिद्धांत आणि पद्धती

## (History : Its Method and Practice)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

**एम. ए. भाग-१ : सत्र-१**
**इतिहास**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२३
एम. ए. भाग - १ करिता (इतिहास : त्याचे सिद्धांत आणि पद्धती)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89345-61-2

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिति


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : इतिहास** ■

अध्यक्ष - **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी ॲण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर

- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

दूर शिक्षण (Distance Education) ही संकल्पना आज घडीला भारतीय शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाच्या स्थानी आहे. या पद्धतीच्या शिक्षणाची गरज फार मोठी आहे. शिवाजी विद्यापीठाने जून, २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण योजनेची सुरवात केली आहे. आज बहिःस्थ विद्यार्थ्यांची संख्या वाढताना दिसत आहे. दूर शिक्षण योजनेअंतर्गत एम. ए., इतिहास, भाग-१, सेमिस्टर-१, ''इतिहास : त्याचे सिद्धांत आणि पद्धती'' (History : Its Method and Practice) या विषयाचे लिखाण पूर्ण केले आहे.

या पुस्तकात एकूण चार घटक आहेत. पहिल्या घटकात साधनांच्या स्वरूपाविषयी चर्चा केली आहे. दुसऱ्या घटकात इतिहास लेखनाची प्रक्रिया समजावून सांगितली आहे. तिसऱ्या घटकामध्ये इतिहासलेखनाचे सादरीकरण केले आहे. चौथ्या घटकामध्ये इतिहासलेखन परंपरा याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

इतिहास : त्याचे सिद्धांत आणि पद्धती या विषयातील सदरचे चार घटक वेगवेगळ्या अभ्यासकांनी लिहिले आहेत. हे घटक पूर्ण व्हावेत म्हणून आम्ही सर्व प्रयत्न कसोशीने केले आहेत. विद्यार्थी आणि अभ्यासक या पुस्तकाचे स्वागत करतीलच. या लिखाणात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या आणि अभ्यासकांकडून येणाऱ्या सूचनांचा पुढील आवृत्तीमध्ये विचार केला जाईल.

शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण योजनेअंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मिती करण्यासाठी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन व मौलिक सहकार्य लाभले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, आणि या ग्रंथात लेखन केलेल्या प्राध्यापकांचे तसेच दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**डॉ. एस. एम. चव्हाण**
आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
सर्व्हे नं. १३२/१२, सरस्वती नगर,
गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) सी. एम. नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल,
व्हाया निपाणी, जि. कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक


| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | १ |
| **डॉ. प्रमोद ओलेकर**<br>आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली | २ |
| **डॉ. मुफिद मुजावर**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३, ४ |

### ■ संपादक ■

**डॉ. एस. एम. चव्हाण**
आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज,
सर्व्हे नं. १३२/१२, सरस्वती नगर,
गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) सी. एम. नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल,
व्हाया निपाणी, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | साधनांचे स्वरूप | १ |
| २. | इतिहास लिहिण्याची प्रक्रिया | ७६ |
| ३. | सादरीकरण | ११० |
| ४. | इतिहासलेखन परंपरा | १२९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# साधनांचे स्वरूप

[Nature of Sources (Data)]


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ वाङ्मययीन व पुरातत्वीय साधने: (Literary and Archaeological)

  १.२.२ साधनांचे संकलन: पुराभिलेखीय साधने, सर्वेक्षण, प्रश्नावली, वर्तमानपत्रे व इंटरनेट (Data collection: Archives/ Record Office, Survey, Questionnaires, Newspapers, Internet)

  १.२.३ मौखिक साधने आणि मुलाखत तंत्र: (Oral Sources and Interview Techniques)

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके


## १.० उद्दिष्टे:

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- ऐतिहासिक संदर्भ साधनांचे वर्गीकरण करता येईल.
- लिखित संदर्भ साधनांचे प्रकार व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- पुरातत्वीय संदर्भ साधनांचे प्रकार व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- संदर्भ साधने कोणत्या पद्धतीने प्राप्त करता येतील याचे ज्ञान होईल.
- इतिहास लेखनाचे साधन म्हणून सर्वेक्षण, प्रश्नावली याची पद्धती काय आहे ते समजून घेता येईल.
- मौखिक इतिहास म्हणजे काय? ते स्पष्ट करता येईल.
- इतिहास लेखनाचे एक माध्यम म्हणून मुलाखत तंत्राचे आकलन होईल.

## १.१ प्रस्तावना:

इतिहासलेखन प्रक्रियेत संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संदर्भ साधनांच्या आधाराशिवाय लिहिलेल्या कोणत्याही इतिहास ग्रंथाला 'इतिहास' ही संज्ञा प्राप्त होऊ शकत नाही. कोणत्याही राष्ट्राचा अथवा कोणत्याही कालखंडाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास लिहिण्यासाठी पुरावा म्हणून संदर्भ साधनांचा आधार द्यावा लागतो. इतिहास लेखनासाठी वापरलेल्या पुराव्यांना साधन, पुरावा अथवा संदर्भ असे म्हणतात. एखादा लेखक स्वतःच्या कल्पना शक्तीच्या जोरावर ललित लेखन करू शकतो. कारण तिथे सत्य घटनांचा प्रश्न नसतो. इतिहासलेखनास मात्र हा नियम लागू होत नाही. कारण 'इतिहासलेखन म्हणजे मानवी जीवनात घडून गेलेल्या सत्य घटना असतात.' कल्पनाशक्तीच्या जोरावर त्या लिहिल्या जाऊ शकत नाहीत अथवा लिहिल्यास तो इतिहास होऊ शकत नाही. एखादी घटना जशी घडली तशीच लिहिण्यासाठी पुरावा द्यावा लागतो. म्हणून इतिहासलेखनात संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

इतिहासलेखन संपूर्णतः भूतकालीन अवशेष व साधनांच्यावर आधारित असते. कारण इतिहास या वर्ण्य विषयाचा संबंध भूतकाळाशी असतो. इतिहासामधून म्हणजेच संदर्भ साधनांमधून आपणास भूतकालीन घडामोडीची सुसंगतवार माहिती मिळते. ऐतिहासिक संशोधनांचे मूल्य त्या संशोधकाने कोणत्या प्रकारची साधने वापरली आहेत त्याच्यावर अवलंबून असते. अस्सल/प्राथमिक साधने हीच इतिहासलेखनांची पायाभूत साधने असतात. म्हणून इतिहासामध्ये "No Documents, No History' असे म्हटले जाते. संदर्भ साधनाशिवाय इतिहास म्हणजे एक प्रकारची कथा असे मानले जाते. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये आपण इतिहासलेखनासाठी आवश्यक वाङ्मययीन व पुरातत्वीय साधने, साधंनांचे प्रकार, स्वरूप, इत्यादी संबंधी अभ्यास करणार आहोत. त्याच बरोबर सदर घटकामध्ये साधनांचे संकलन कशा प्रकारे करतात, त्यामध्ये पुराभिलेखीय साधने कोणती, सर्वेक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती, वर्तमानपत्रे व इंटरनेटचा वापर संशोधनात कशा प्रकारे करावा इत्यादी पद्धती संदर्भात माहिती घेणार आहोत. याशिवाय इतिहासलेखनात मौखिक साधने कशी उपयुक्त आहेत, त्याचा संदर्भ आणि महत्व आणि मुलाखत पद्धती या संबंधी या घटकात चर्चा करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन:

**संदर्भ साधन अथवा पुरावा म्हणजे काय?**

ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ ज्याच्या आधारे काढता येतो अथवा ज्यांच्यामधून इतिहास लेखनासाठी उपयुक्त सत्य माहिती मिळते अशा वस्तू अथवा वास्तू, लिखित अथवा अलिखित साधनांना सर्वसाधारणपणे इतिहासाचा पुरावा किंवा संदर्भ साधन असे म्हटले जाते. इतिहासलेखनशास्त्राच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक लेखणास पुरावा किंवा संदर्भ देणे महत्त्वाचे असते. प्रो. मायकेल स्टॅनफोर्ड यांनी म्हटल्याप्रमाणे ऐतिहासिक घटिते पुरावा निर्माण करतात व हेच पुरावे ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात. पुराव्याशिवाय लिहिलेले अथवा बोललेला इतिहास असत नाही. कोणत्याही इतिहासकालीन घटना किंवा गोष्टींचा पुरावा देणाऱ्या

वस्तूला साधारणपणे 'इतिहासाचे साधन' असे म्हणतात. साधन या शब्दाला कागदपत्रे हा पर्यायी शब्द आहे. साधन म्हणजे नेमके कशाला म्हणावे या संबंधी तीन महत्वाच्या व्याख्या Shorter Oxford English Dictionary मध्ये खालील प्रमाणे आहेत.

१) ज्यामधून पुरावा आहे असे दिसून येते ते साधन.

२) ज्यामधून सहजासहजी पुरावा दृष्टीस पडतो ते साधन.

३) ज्याचा निर्णय देता येईल किंवा जाणून घेता येईल असे कोणतेही साधन.

वरील तीन महत्वाच्या विधानावरून साधनांच्या व्याख्येसंदर्भात असे म्हणता येईल की, इतिहास लेखनासाठी साधने महत्वाची आहेत. कोणत्याही शास्त्राचा मुख्य आधार साधने अथवा पुरावा असतो. पुराव्या शिवाय कोणतीही गोष्ट सिद्ध करता येत नाही. विश्वसनीय संदर्भ साधने व त्या साधनांच्यासाठी वापरात आणलेली शास्त्रशुद्ध मूल्यमापन पद्धती या दोन बाबी इतिहास लेखनासाठी महत्वाच्या आहेत. थुसिडीडीज यांने संदर्भ साधनांचे महत्व विशद करताना म्हंटले आहे की, ऐतिहासिक घटनांचे खरेखुरे, तंतोतंत वर्णन करणे महत्वाचे आहे. त्यासाठी योग्य साधने जमविणे आवश्यक आहे. अशा घटना जमिवल्या पाहिजेत की, त्यापासून भविष्यात मानवाला काही धडा मिळू शकेल. थोडक्यात साधन अथवा पुरावा म्हणजे काय हे स्पष्ट करताना असे म्हणता येईल की, गतकालीन घटनांचे, वाटचालीचे, समाजजीवनाचे, संस्कृतीचे, कला अभिव्यक्तीचे असंख्य धागेदोरे, पुरावे या गतकाळाच्या पाऊलखुणा म्हणजेच इतिहासाची साधने होत.

**साधनांचे स्वरूप:**

ऐतिहासिक साधनांचे स्वरूप भिन्न प्रकारचे असून ते कालपरत्वे बदलत गेलेले दिसते. उदा. अश्मयुगीन इतिहासाची साधने वस्तु किंवा वास्तु स्वरुपात आढळतात तर मध्ययुगीन अथवा आधुनिक काळातील साधने लिखित स्वरुपात मिळतात. इतिहासाची व्याप्ती जस-जशी वाढत जाते तस-तसे साधनांचे स्वरूपही बदलत जाते. मानव अथवा मानवी संस्कृतीचा झालेला आहे. मानवी विकासाची ही स्थित्यंतरे विविध टप्प्यात झालेली आहेत. या विविध स्थित्यंतराचा व टप्प्यांचा अभ्यास करण्यासाठी विविध स्वरूपाची साधने इतिहास लेखनासाठी महत्वाची आहेत.

कालपरत्वे ऐतिहासिक साधनांच्या स्वरुपात बदल व विकास झालेला दिसतो. पुरातत्वीय वस्तू किंवा वास्तू, विविध कलाकृती, कागदपत्रे, वाङ:मय, नाणी, शस्त्रास्त्रे अशी अनेक विविध साधने काळानुरूप सापडतात. इतिहासाच्या साधनांचे स्वरूपानुसार वर्गीकरण केले जाते. साधनांच्या स्वरूपानुसार प्रामुख्याने तीन विभागात वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे,

१) लिखित साधने

२) भौतिक अथवा पुरातत्वीय साधने

३) मौखिक साधने

याशिवाय इतिहासाच्या अभ्यासासाठी कालखंडानुसार पुढील प्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१) प्राचीन कालखंड

२) मध्ययुगीन कालखंड

३) आधुनिक कालखंड

**कालखंडानुसार साधनांचे स्वरूप**

| प्राचीन कालखंड | मध्ययुगीन कालखंड | आधुनिक कालखंड |
|---|---|---|
| दगडी हत्यारे | ताम्रपट | शासकीय दस्तऐवज |
| प्राणी/मानवी सांगाडे | हस्तलिखिते | खाजगी पत्रव्यवहार |
| मातीची भांडी | दरबारी कागदपत्रे | आत्मचरित्र |
| दगडी अवजारे | इतिवृत | आठवणी |
| धातूची अवजारे/शस्त्रास्त्रे | प्रवास वर्णने | अहवाल |
| धातूची भांडी | आज्ञापत्रे | सर्वेक्षण |
| खेळणी/मनोरंजन साधने | जमाखर्च कागदपत्रे | वर्तमानपत्रे |
| अलंकार/आभूषणे | चरित्र ग्रंथ | भाषण संग्रह |
| विविध प्रकारचे मणी | निवाडा पत्रे | गुप्त अहवाल |
| नाणी | बातमी पत्रे (अखबरात) | नियतकालिक |
| इमारती/नगराचे अवशेष | आत्मवृते | मुलाखती |
| गुहाचित्रे | रोजनिशी | प्रश्नावली |
| शिलालेख | तवारीखा | संसदीय कागदपत्रे |
| ताम्रपट | बखरी | इतिवृते |
| प्राचीन शिल्पाकृती | शकावल्या | प्रवासवर्णने |
| वेद वाड:मय | करीने | नाणी |
| महाकाव्ये | महजर | परकीय कागदपत्रे |
| स्मृतीशिळा | वंशावळी | चरित्र ग्रंथ |
| पुराणे | कुळकुटी | टी. व्ही बातमीपत्रे |
| बौद्ध वाड:मय | धार्मिक साहित्य | रेडिओ बातमीपत्रे |

| | | |
|---|---|---|
| जैन वाड:मय | खाजगी पत्रव्यवहार | साप्ताहिके |
| संगम साहित्य | प्रांतिक साहित्य | कादंबरी |
| प्रवासवर्णने | लोक साहित्य | लोक साहित्य |
| लेण्या/गुहा मंदिरे | मंदिरे /मठ/चर्च/मशिदी | मौखिक साहित्य |
| चैत्यगृह/विहार | स्मारके/वाडे | |
| मूर्तिशिल्पे | परकीय कागदपत्रे | |

### **१.२.१ वाङ्मययीन व पुरातत्वीय साधने:** (Literary and Archaeological)

#### **अ) वाङ्मययीन साधने:**

मानवास लेखन कला अवगत होण्यापूर्वी तो आपल्या जीवनातील काही प्रसंग व आपल्या भावना चित्रस्वरुपात व्यक्त करित होता. हे जगामध्ये विविध ठिकाणी सापडलेल्या गुहा चित्रावरून स्पष्ट होते. मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबर लेखन कला अवगत केली. ही लेखन कला विविध लिप्या व भाषामध्ये विकसित झाली व वाढली. बौध्दिकदृष्या सक्षम झालेल्या मानवाने आपल्या लेखन कलेच्या जोरावर विपूल साहित्याची निर्मिती केली. तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, रुढी, परंपरा, आचार-विचार व आहार-विहार इत्यादी संबंधी लिखाण केले या साहित्याच्या माध्यमातून आपण गतकाळीन घटना व इतिहासावर प्रकाश टाकू शकतो. प्राचीन ते आधुनिक काळातील विविध स्वरुपाच्या लिखित कागदपत्रात अथवा वाङ्मयास लिखित संदर्भ साधन असे म्हणतात.

इतिहासलेखन प्रक्रियेत लिखित संदर्भ साधनांचे महत्व अनन्य साधारण आहे. लिखित ऐतिहासिक साधनांच्या आधारावरच इतिहासाची रचना अवलंबून असते. इतिहासाची ही साधने आपणास दोन स्वरुपात प्राप्त होतात किंवा केली जातात. १) लिखित संदर्भ साधने २) अलिखित संदर्भ साधने लिखित संदर्भ साधनांचे पुन्हा प्राथमिक व दुय्यम साधने असे उपप्रकार पडतात. परंतु इतिहास लेखन प्रक्रियेत लिखित अलिखित किंवा प्राथमिक दुय्यम साधने परिपूर्ण इतिहासासाठी कमी - अधिक प्रमाणात तितकीच महत्वाची असतात. आपणास या उपघटकात लिखित प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा अभ्यास करावयाचा आहे.

#### **लिखित प्राथमिक साधने:**

इतिहास लेखनशास्त्राच्या दृष्टीकोणातून प्राथमिक संदर्भ साधनास अतिशय महत्वाचे स्थान आहे. प्राथमिक संदर्भ साधन म्हणजे एखादी घटना घडत असताना लेखन कर्ता त्या घटनेत सहभागी असतो. किंवा त्याने ती घटना प्रत्यक्ष पाहिलेली असते की ज्याचा तो साक्षीदार असतो. त्या साक्षीदाराने लिहून ठेवलेल्या साहित्यास प्राथमिक संदर्भ साधन असे म्हणतात. घटना घडत असताना निर्माण झालेली साधने किंवा त्या घटनेच्यानंतर काही काळानंतर लिहिली गेलेली हस्तलिखिते किंवा ग्रंथ यांना प्राथमिक संदर्भ साधन असे म्हणतात. हस्तलिखिते किंवा ग्रंथ यांना प्राथमिक संदर्भ साधने ही जरी इतिहास लेखनाचा पाया जरी असली तरी ती विखूरलेली व त्रोटक स्वरूपाची असतात. ऑनी मॉर्विक यांनी म्हटल्या प्रमाणे ती साधने कच्या माला

सारखी असतात. की ज्या कच्च्या मालावर प्रक्रिया केल्यावर ज्याप्रमाणे एखादी वस्तू तयार होते. त्याप्रमाणे या साधनांच्यावर इतिहासकार भाष्य अथवा विवेचन करुन ऐतिहासिक घटनेला इतिहासाचे मूर्त रुप देत असतो.

प्रा. कार्ल गुस्तावसन यांनी आपल्या "The Preface to History'' या ग्रंथात प्राथमिक संदर्भ साधनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, केवळ एका ठिकाणी सापडणारी, त्याखेरीज इतरत्र न सापडणारी मुळ स्वरुपातील, त्यात कोणताही बदल न झालेली किंवा त्यावर कोणतीही प्रक्रिया न झालेली समकालीन साधने म्हणजे मूळ किंवा प्राथमिक साधने होय. उदा. पानिपतच्या तिसऱ्या युध्दाच्या वेळी उपस्थित असलेली माहिती किंवा महादेव देसाई यांनी महात्मा गांधीच्या चळवळी विषयी केलेले लिखाण. प्रा. आर्गर मार्विक यांनीही प्राथमिक संदर्भ साधनांची व्याख्या करताना म्हटले आहे की, एकाच माणसाच्या हस्ताक्षरात जो व्यवहार घटला त्याची माहिती देणारे जी कागदपत्रे असतात किंवा एखाद्या माणसाने दुसऱ्या माणसाला विश्वासाने सांगितल्यामुळे जे लिहून ठेवलले असते किंवा सामुदायिक निर्णय तेव्हा घेतलेला असतो, काही प्रश्नांची अशा कागदपत्रामध्ये उत्तरे दिलेली असतात. तसेच एखाद्या प्रकरणामध्ये सरकारचे अंतिम धोरण सांगितले जाते. अशा कागदपत्रांना प्राथमिक साधने असे म्हणतात.

डॉ. शांता कोठेकर यांनी 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' या आपल्या ग्रंथात प्राथमिक संदर्भ साधने कशाला म्हणावीत या संदर्भात खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

१. संशोधक ज्या काळातील विषयाचा अभ्यास करीत असेल त्या काळातील समकालीन साधने ही अस्सल दर्जाची असतात.

२. संशोधक एखाद्या घटनेचा किंवा प्रसंगाचा अभ्यास करीत असेल तर त्या घटनेत सहभाग असलेल्या व्यक्तीची त्या संबंधीची कागदपत्रे मूळ साधनात मोडतात.

३. प्रत्यक्ष घटनेत सहभागी नसलेली, परंतु प्रत्यक्ष घटना डोळ्यांनी पाहिलेल्या व्यक्तिनी लिहून ठेवलेली कागदपत्रे.

४. एखाद्या व्यक्तीने लिहून ठेवलेले आत्मवृत्त व दिनवृत्त इत्यादी.

५. एखाद्या व्यक्तीने समकालीन व्यक्ती संबंधी केलेले लिखाण.

६. समकालीन वस्तुरुप साधने, उदा. इमारती, स्थापत्य, मंदिरे, पुराणवशेष, मूर्ती, नाणी इत्यादी. समकालीन कागदपत्राच्यामधून त्या त्या घटनेविषयी किंवा व्यक्तीबद्दल विश्वसनीय माहिती प्राथमिक संदर्भ साधनामधून मिळत असल्यामुळे प्राथमिक संदर्भ साधताना मूलभूत साधने असे म्हणतात.

**१) समकालीन कागदपत्रे :**

इतिहासलेखनाच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात समकालीन कागदपत्रे अतिशय महत्वाची असतात. समकालीन कागदपत्राच्या साहयाने त्या काळातील वस्तुस्थितीवर प्रकाश टाकण्यास मदत

होते. ही कागदपत्रे अतिशय स्पष्ठ व महत्वाची बिनचूक माहिती देणारी असतात. समकालीन कागदपत्रामधून राजकीय, सामाजिक व समकालीन इतर महत्वाच्या घडामोडीसंबंधी असंख्य बाबींचा समावेश यामध्ये असतो. उदा. रोजनिशी, मुल्यपत्रे, पत्रव्यवहार, वृत्तपत्रे इत्यादी समकालीन कागदपत्राच्या संदर्भात प्रो. गॉसचॉक असे म्हणतात की, एखाद्या घटनेसंबंधी सूचना देण्याच्या उद्देशाने अथवा घटनेमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तीस स्मरण करून देण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या कागदपत्रात समकालीन कागदपत्रे असे म्हणतात. उदा. कोर्टामधील कागदपत्रे, रेडिओ, वृत्तवाहिनीवरील चर्चा इत्यादी विविध राज्यकर्त्यानी एकमेकांना केलेला पत्रव्यवहार देखील समकालीन कागदपत्रामध्ये येतो. उदा. कॅप्टन बॉडरनगे पाठविलेली ङलेटर्स फ्रॉम दि मराठा कॅम्पफ

**अ) सरकारी कागदपत्रे:**

सरकारी कागदपत्रे म्हणजे प्रशासकीय दृष्टीकोनातून केलेला पत्रव्यवहार समाविष्ठ असतो. यामध्ये प्रशासकीय जमीन महसून विषयक कागदपत्रे, मांडलिक राज्यकर्त्याकडून मिळालेल्या खंडणीच्या व्यवहारासंबंधी कागदपत्रे, कर्ज रोखे, सनदा, इनामपत्रे, शाही फर्माने तसेच आधुनिक सरकारी कागदपत्रामध्ये सरकारतर्फे प्रसिध्द केली जाणारी खानेसुमारीची आकडेवारी, विविध खात्याचे अहवाल, आर्थिक सर्वेक्षण अहवाल, प्रत्येक राज्याच्या विधानसभा व विधान परिषदेची इतिवृत्त, लोकसभा व राज्यसभेची इतिवृत्त, गृहखात्याचे अहवाल इत्यादी.

भारतामध्ये १७ व्या शतकापासूनच्या सर्वच सरकारी कागदपत्राचे जतन शासकीय पुराभिलेखागारातून केलेले आहे. याशिवाय अनेक इतिहास संशोधकांनी मराठाकालीन खाजगी परंतु सरकारी कागदपत्राचे संकलन व संपादन केलेले आहे उदा. रियासत गो. स. सरदेसाई यांनी संपादीत केलेले पेशवे दप्तराचे ४५ खंड, वि. का. राजवाडे यांनी संपादीत केलेली मराठ्यांच्या इतिहासाची साधने, २२ खंड व ग. चि. वाड यांनीही १३ खंडांचे संपादन केलेले आहे. भारतामध्ये ज्या परकीय व्यापारी कंपन्या आलेल्या होत्या त्यांनीही आपल्या मायदेशी राज्यकारभारा संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराचा समावेश होतो. ब्रिटिशानी केंद्रीय पुराभिलेखागारांची निर्मिती करून सरकारी कागदपत्रे व दप्तर सांभाळण्याचा प्रयत्न केला व सरकारी कागदपत्राच्या संदर्भात गुप्ततेचा कायदा ही केलेला आहे. ब्रिटिश काळापासूनची सरकारी कागदपत्रे भारतातील सर्व पुराभिलेखागारांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

**ब) गुप्त पत्रव्यवहार:**

गुप्त पत्रव्यवहाराला इतिहासलेखनामध्ये खूप महत्वाचे स्थान आहे. राजकीय व लष्करी इतिहासाच्या मांडणीसाठी गुप्त पत्रव्यवहार अनेक घटनावर प्रकाश टाकण्यास साह्यभूत ठरतो. गुप्तपत्रव्यवहार हा अधिकारी वर्ग व सरकार अथवा राज्यकर्ते यांच्याशी संबंधीत असतो. याशिवाय खाजगी गुप्त व्यवहारांचाही समावेश असतो. लष्करामध्ये अशाप्रकारचा गुप्त पत्रव्यवहार खूप मोठ्या प्रमाणावर होत असतो. उच्च लष्करी अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, पोलिसाचे गोपनीय अहवाल, उच्चश्रेणीतील सरकारी अधिकाऱ्यांचे अहवाल, कनिष्ठ अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना पाठवलेली गोपनीय निरीक्षणे व अहवाल, इत्यादी यामध्ये समावेश

होतो. ज्यांनी ही पत्रे किंवा अहवाल लिहिलेले असतात. त्या व्यक्ती व ज्यांनी ही पत्रे पाठवलेली असतात. त्या दोन्ही व्यक्ती एकमेकांच्या विश्वासातील असतात. उदा. सन १८५७ च्या उठावाच्या अगोदर व उठाव चालू असताना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जो गुप्त पत्रव्यवहार इंग्लंडमधील अधिकाऱ्यांशी केलेला होता त्यामधून १९५७ च्या उठावासंबंधी घटनावर अधिक प्रकाश पडतो. ब्रिटिश काळापासूनच्या भारतातील गुप्तवार्ता विभागाच्या डायऱ्या आज उपलब्ध आहेत. यामधील नोंदीही गुप्त स्वरुपाच्याच आहेत. या डायऱ्याच्या मधून भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर वेगळ्या दृष्टीकोनातून प्रकाश पडतो.

**क) सार्वजनिक सरकारी कागदपत्रे:**

सार्वजनिक कागदपत्रे म्हणजे सरकारच्या वतीने प्रसिध्द होणारी कागदपत्रे होय. उदा. हुकुमनामा किंवा जाहीरनामा इत्यादी स्वरुपाची कागदपत्रे सार्वजनिक कागदपत्रात मोडतात. गुप्त कागदपत्राच्या पेक्षा सार्वजनिक कागदपत्रे भिन्न स्वरूपाची असतात. उदा. मुघलकालीन अकबरात ही सार्वजनिक कागदपत्रात मोडतात.

**२) खाजगी कागदपत्रे:**

एखाद्या राजकीय व्यक्तीने, लष्करी अधिकाऱ्याने, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी खाजगीत केलेल्या नोंदीचा समावेश खाजगी कागदपत्रामध्ये होतो. या कागदपत्राच्या मध्ये व्यक्तीगत जीवनापासून सार्वजनिक क्षेत्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक घटनांचा समावेश असतो. असा पत्रव्यवहार काही वर्षा नंतर अथवा दशकांच्या नंतर उजेडात येतो किंवा प्रकाशित केला जातो. यामधून इतिहास लेखनास महत्वाची माहिती मिळते. ही कागदपत्रे एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनावर प्रकाश टाकू शकतात. परंतु त्याचबरोबर समकालीन इतर अनेक घटनावर प्रकाश टाकते. खाजगी कागदपत्राच्या मधून आलेली माहिती एकांगी, पक्षपाती व पूर्वग्रहदूषित असू शकते. त्यामुळे इतिहास संशोधकांनी अशा कागदपत्राची खातरजमा करून लिखाण करावे. अनेक मोठमोठ्या व्यक्तीचा खाजगी पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे उदा. बाळासाहेब खेर, शकंरराव देव, महात्मा गांधी, भूलाभाई देसाई, यशवंतराव चव्हाण, सरदार वल्लभाई पटेल, जी. के. गोखले, ना. वि. गाडगीळ, शंकरराव मोरे, आचार्य आत्रे. अशा कितीतरी व्यक्तींचा पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे.

**ब) रोजनिशी अथवा डायऱ्या:**

रोजनिशी अथवा डायरी हे इतिहासलेखनासाठी महत्वाचे साधन ठरू शकते. अनेक इतिहास प्रसिध्द व्यक्तीनी आपल्या रोजनिशी अथवा डायऱ्या लिहून ठेवलेल्या आहेत. या डायऱ्यामधून त्या व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील घडामोडीची नोंद केलेली असते. उदा. ग. चि. वाड यांनी पेशव्यांच्या रोजनिशी संपादीत केलेल्या आहेत. या डायरीवरुन तत्कालिन सामाजिक, आर्थिक व राजकीय धोरणावर प्रकाश पडतो. काही प्रसंगी रोजनिशीतील माहिती अर्धवट, अपूर्ण किंवा अतिशयोक्तीपूर्ण किंवा खोटीही असू शकते.

**क) आठवणी किंवा आत्मवृत्ते:**

राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, लष्करी प्रशासकीय जीवनात काम करणाऱ्या जगातील अनेक श्रेष्ठ व्यक्तींनी आपल्या आठवणी अथवा आत्मवृत्ते लिहिलेली आहेत. त्यांच्या लिखाणामधून

ही तत्कालीन अनेक घटनांवर प्रकाश टाकण्यास मदत होते. मध्ययुगीन कालखंडात 'तुझुक-ए-बाबरी' (बाबरनामा) हा ग्रंथ खुद्द बाबराने आत्मचरित्रावर लिहिला त्याचबरोबर 'तुझुक-ए-जहाँगिरी' हे आत्मचरित्र स्वत: जहाँगिराने लिहिले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आठवणी प्रा. गो. मा. पवार यांनी संपादीत केलेल्या आहेत. महात्मा गांधी यांनी 'माझे सत्याचे प्रयोग' प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांचे 'माझी जीवनगाथा', सेतुमाधवराव पगडी यांचे 'जीवन सेतु', माधवराव बागल यांचे 'जीवन प्रवाह' अशी आत्मवृत्ते आज प्रकाशित आहेत. या आठवणी किंवा आत्मावृत्तातून समकालीन विविध घटनावर दृष्टीक्षेप पडतो.

**३) राजकीय तह/करार :**

राजकीय तह किंवा करारनामे हे इतिहासाचे अत्यंत महत्वाचे अस्सल साधन आहे. तह किंवा करारनामा अनेक कलमाचा असतो. प्राचीनकाळापासून जगाच्या इतिहासात तह किंवा करारनामा करण्याची प्रथा अस्तित्वात होती. मध्ययुगीन कालखंडापासूनचे विविध राजवटीतील अनेक तह व करारनामे अजूनही उपलब्ध आहेत. या कागदपत्राच्यामधून तत्कालीन राजकीय व लष्करी जीवनावर प्रकाश पडतो. उदा. ग.चि. वाड यांनी पेशवेकालीन करार व तहनामे संपादीत केलेले आहेत. तह व करारपत्रे यामधून तत्कालीन राजकीय परिस्थिती, राजे त्यांच्या राज्याच्या सिमा व तहातील कलमावरून त्या तहाचे कशाप्रकारे परिणाम झाला याविषयी माहिती मिळते.

**४) प्रवास वर्णने:**

प्राचीन काळापासून भारतात येऊन गेलेल्या परकीय प्रवाशांनी लिहिलेली प्रवासवर्णने ही प्राथमिक संदर्भ साधन मानले जाते. प्राचीन भारताचा अभ्यास करताना मेगॅस्थेनिसचे मइंडिकाफ एका अनामिक प्रवाशाने लिहिले 'पेरिप्लस ऑफ दि इथ्रायन सी, टॉलेमीचा भारताचा भुगोल इत्यादी लिखाण महत्वाची माहिती देतात. चिनी प्रवासी युआॅन च्वांग यांचे 'तांतागसियुली', इत्सिगचे प्रवासवर्णन प्राचीन भारतातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती देतात.

मध्ययुगीन काळात आलेला मोरोक्कन प्रवासी इब्न बतुता यांने लिहिलेले 'किताब-उल-रहेला', पर्शियन वकिल अब्दुर रझाक, फ्रान्सचा प्रवासी जॉन ऑफ ऑटे कोर्विनो मार्को पोलो, निकोलो कोटी, रशियन व्यापारी अयन्सिसन निकीतीन व इटलीया लुडोव्होको दी वथेगा इत्यादी. पोर्तुगालचा बार्बोसा व डोमिगोज पीस, इग्लंडमधून आलेले कॅप्टन हॉकीन्स, सर थॉमस रो, फ्रान्समधून आलेला फ्रान्सिस बर्नियर, थेवेनॉट, अॅबे कॅरे, ड्रेवेनिथर फ्रॉन्सिस मॉटिन व जॉन फ्रायर इत्यादीची प्रवास वर्णने मध्ययुगीन भारताच्या संदर्भात बहुमोल माहिती देतात. या प्रवास वर्णनामध्ये त्यांची भाषिक अडचण असो अथवा त्यांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोण असो काही प्रमाणात चूकीची माहितीही आलेली दिसते. त्या संदर्भात इतिहास अभ्यासकानी ती माहिती तपासून घेतली पाहिजे.

**५) जमाखर्चाच्या नोंदी :**

कोणत्याही राजवटीतील व प्रशासनातील जमाखर्च हा इतिहासलेखन शास्त्राच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचा पुरावा मानला जातो. जमाखर्चाच्या नोंदी म्हणजे त्या राज्याचा आर्थिक आरसा मानल्या जातात.

याच्या माध्यमातून उत्पन्नाच्या बाजू व खर्चाच्या बाजू या संदर्भात माहिती मिळते. जसे की, पेशवेकालीन जमाखर्चाच्या नोंदीवरून पेशवे श्रावणमासामध्ये किती मोठ्या प्रमाणात ब्राह्मणांना दान व ब्राह्मण भोजन करत होते यावर प्रकाश पडतो. मुघलकालीन जमाखर्चाच्या नोंदीवरून थॉमस एडवर्ड यांने "Revenue Resources of the Mughal empire from 1593 to 1707' हा उत्कृष्ठ ग्रंथ लिहिलेला आहे.

**ब) दुय्यम संदर्भ साधने:**

इतिहासलेखनास सोपस्करपणा यावा व संदर्भसाधनांची उपयुक्तता आधोरेखित करण्याच्या दृष्टीने इतिहासाच्या साधनांचे प्राथमिक व् दुय्यम अशा दोन प्रमुख विभागात वर्गीकरण केले जाते. यामध्ये 'प्राथमिक' म्हणजे अधिक दर्जेदार व 'दुय्यम' साधनांनाही महत्व आहे. 'दुय्यम' हा शब्द त्या साधनाचे मुल्य अथवा दर्जा दर्शवित नाही. परंतु ज्यांनी ती घटना पाहिलेली असते त्यांनी ती काही काळाने दुसऱ्याला सांगितलेली असते व त्यांनी त्या घटनेचा वृत्तांत लिहून ठेवलेला असतो. म्हणजेच त्या घटनेचा लेखनकर्ता प्रत्यक्ष साक्षीदार नसतो, परंतु त्यांने ती लिहून ठेवलेली असते. एखादी घटना घडून गेल्यानंतर काही काळानंतर स्मृतीच्या आधारे लिखाण केलेले असते त्यामुळे त्यात चूका होण्याची बरीच शक्यता असते. एखादया व्यक्तीची स्मरणशक्ती कितीही चांगली असली तरी 'केवळ ऐकीव माहितीच्या आधारे केलेल्या लिखाणात ती पूर्णपणे जशीची तशी सत्यता येण्याची शक्यता फारच कमी असते. यामुळे या लिखित साधनाला दुय्यम संदर्भ साधन असे म्हटले जाते.

वास्तविक पाहता प्राथमिक साधनावरच दुय्यम साधने अवलंबून असतात. त्यामुळे दर्जाच्या दृष्टीकोणातून ती दुय्यम ठरत असली तरी त्याचीही विश्वासार्हता प्राथमिक साधनांच्या सारखीच असते. कीथ जेन्किन्स दुय्यम संदर्भ साधना संदर्भात असे म्हणतात की, ''दुय्यम साधनातून कधी-कधी इतकी मूळ स्वरुपाची माहिती मिळते की त्यामुळे प्राथमिक व मूळ साधनामधील भेद गळून पडतो'' ऑर्थर मार्विक यांनीही दुय्यम संदर्भ साधनांची समर्पकता स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''प्राथमिक साधन हा कच्चा माल असून तो सामान्य वाचकापेक्षा संशोधकाला अधिक मोलाचा असतो; दुय्यम साधन हे मूळ साधनावर आधारलेले असले तरी असे ग्रंथ सुसंगत माहिती देणारे असल्यामुळे, बुद्धिमान, सामान्य वाचकाला तसेच संशोधकालाही मोलाचे ठरतात.''

**दुय्यम संदर्भ साधने:**

बखरी

↓

कुळकटी

↓

बाडे

↓

वंशवेली

↓

न्यायनिवाड्याची कागदपत्रे

↓

शकावल्या

↓

चरित्रग्रंथ

↓

करिने

↓

महजर

↓

प्राचीन व मध्ययुगीन साहित्य

वरील साधनांना दुय्यम साधने म्हणण्याची प्रमुख दोन कारणे आहेत.

१. दुय्यम साधनांच्या मधून संबधित लेखकाने स्वतःचे मत मांडले असण्याची शक्यता असते.

२. संशोधकाने वापरलेल्या मूळ साधनांचा अर्थ आपल्य मतानुसार व विचार सरणीनुसार लावण्याची शक्यता असते.

दुय्यम संदर्भ साधने जरी दर्जाने दुय्यम असली तरीही त्यांचे इतिहास लेखनामध्ये महत्व हे आहेच. ते पुढील प्रमाणे

१. अभ्यास विषयाचे साकल्याने ज्ञान होण्यासाठी व विषयाची प्राथमिक चौकट तयार करण्यासाठी

२. अशा संदर्भ साधनापासून संदर्भ ग्रंथाची यादी तयार करणे सोपे जाते.

३. आपल्या विषयाला अनुकुल आशा अवतरणासाठी व उपलब्ध माहितीत असलेल्या उणिवांची पूर्तता करण्यासाठी संशोधकास एखाद्या विषयावर नव्याने भाष्य करण्यासाठी अथवा नव्याने कारणमीमांसा करण्यासाठी दुय्यम साधनाचा उपयोग अधिक प्रमाणात होतो. प्रा. गॉसचॉक यांनी दुय्यम साधने शास्त्रीय परीक्षणावर टिकली पाहिजेत असे मत व्यक्त केले आहे व दुय्यम संदर्भ साधनाबाबत संशोधकाने खालील बाबीचा विचार करण्यावर भर दिलेला आहे.

१. त्यामध्ये संबधित विषयाला अनुसरुन माहिती असणे आवश्यक आहे.

२. दुय्यम साधनांच्या माध्यमातून प्राथमिक साधनांतील वस्तूनिष्ठतेचा पडताळा टीकात्मक पध्दतीने सिध्द झाला पाहिजे.

३. दुय्यम साधने प्राथमिक साधनांना पूरक असली पाहिजे.

प्राथमिक साधनांचे न पटविलेले संदर्भरहीत निर्देश ज्ञानात भर न घालता संभ्रम निर्माण करतात. तर दुय्यम ग्रंथातील एखादाच समर्पक पुरावा लिखाणाला नवी दिशा देण्यास उपयुक्त ठरतो. त्यामुळे कोणत्याही साधनांचा कसा व किती वापर करावयाचा हे संशोधकाने ठरवायचे असते. कारण प्रा. ई. एच. कार यांनी आपल्या “What Is History’ या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे ‘‘घटिते स्वतः बोलत नाहीत, तर त्यांना बोलते करणारा इतिहासकार असतो’’ त्यामुळे मूळ साधनाच्यावर लिहिलेले ग्रंथ कितीही विद्वतापूर्ण असले तरी ते दुय्यम साधनच मानले जाते. उदा. सर जदुनाथ सरकार, डॉ. एस. आर. शर्मा, प्रो. इरफान हबीब, डॉ. एस. एन. सेन व डॉ. अ. श. कुलकर्णी यांच्या सारख्या प्रज्ञावंत संशोधकांनी प्राथमिक अस्सल साधनांच्यावर आधारीत ग्रंथ दुय्यम संदर्भ साधनच मानले जाते.

**१) बखरी:**

बखर हा एक वाङ्:मय प्रकार मानला जातो, त्यामुळे बखरीला दुय्यम संदर्भ साधन म्हणून गणले जाते. म्हणजे गद्यात लिहिलेला ऐतिहासिक वृत्तांत असतो की ज्यामध्ये वीर पुरुषांचा गौरव सांगणारा इतिहास असतो शिवाय करीना, हकीकत, कैफियत, आत्मवृत्त व ऐतिहासिक घटनांच्या संदर्भातील अख्यायिकांचा अंतर्भाव असतो. वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ४ बखरीचे वर्गीकरण तीन प्रकारात केलेले आहे.

**१) समकालीन बखरी:**

विश्वसनीयतेच्या संदर्भात या प्रकारातील बखरीना इतिहास लेखनात महत्वाचे स्थान आहे. परंतु या विश्वसनीयतेलाही काही मर्यादा असतात. अस्सल कागदपत्रांच्या अभावी या बखरीवरं विश्वास ठेवण्यास हरकत नाही. उदा. कृष्णाजी अनंत सभासदकृत-शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर १६९७) चित्रगुप्तकृत - शिवाजी महाराजांची बखर (चित्रगुप्त बखर १७५९) खर्ज्याच्या स्वारीला बखर, ९१ कलमीची (१७०२ ) इत्यादी.

**२) कर्णोपकर्णी ऐकलेल्या हकीकतीची बाडे:**

या प्रकारातील बखरीचे लिखाण ऐकीव व सांगीवाणीच्या माहितीवर आधारीत असते. उदा. पेशव्याची बखर, (१८१८) गायकवाडांची हकीकत, गोविंदपंत बुंदेल्याची बखर (१८१८)

**३) पूर्वीच्या जून्या टिपणीची बखर:**

या प्रकारच्या बखरीतील लिखाण पूर्वीच्या जून्या बखरीतील व टिपणातील माहिती जशीच्या तशी किंवा थोडेफार बदल करून लिहिलेली असते. उदा. चिटणीसकृत शिवछत्रपतीचे सप्त प्रकरणात्मक चरित्र (चिटणीसंबखर-१८१०) शिवदिग्विजय (१८१९) श्री शिवप्रताप (१८२९) इत्यादी.

याशिवाय बखरीची ऐतिहांसिक कालखंडाच्या दृष्टीने देखील वर्गवारी केली जाते.

१. शिवपूर्वकालीन बखरी उदा. सिंधवादी यादवाच्या बखरी, हेमाडपंती बखरी, राक्षसतागडीची बखर

२. शिवकालीन बखरी उदा. सभासद बखर

३. पेशवेकालीन बखरी उदा. पेशव्यांची बखर, पानिपत बखर

बखरी इतिहासलेखनासाठी दुय्यम प्रकारचे संदर्भ साधन जरी असले तरी बखरीचे लिखाण घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षानी केलेले आहे. परंपरागत पध्दतीने आलेल्या माहितीचा समावेश बखरीमध्ये समाविष्ट असल्याने बखरी माहितीवर किती विश्वास ठेवायचा हे संशोधकाने निश्चित केले पाहिजे. कारण बखरीमध्ये खालील प्रकारच्या उणीव आढळतात.

१. बखरकारांनी फक्त परंपरेने आलेली माहिती संकलीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२. बखरकारांनी कोणतेही अस्सल साधन पाहिलेले दिसत नाही.

३. बखरीतील विवेचन पध्दती ही पौराणिक स्वरुपाची आहे.

४. अतिशयोक्तीची पुराण परंपरा बखरकारांनी पुढे चालवलेली दिसते.

५. बखरीमध्ये प्रामुख्याने चरित्रलेखन व प्रसंगवर्णनावर भर दिलेला दिसतो.

६. बखरकारांनी काळ, वेध, व्यक्ती व स्थळ यांचा विपर्यास केलेला आहे..

बखरीच्या संदर्भात वि. का. राजवाडे म्हणतात, की, ''बखरी बऱ्याच विश्वसनीय असतात असे जरी म्हटले असले, तरी त्यांच्या विश्वसनीयतेला काही मर्यादाही आहेत. अस्सल कागदपत्रे मिळाली असता यातील खुलासेवार मजकुरात वरील तफावत दिसून येते असे आढळून आले आहे. तरी अस्सल कागदपत्रांच्या अभावी या बखरीवर बराच विश्वास ठेवण्यास हरकत नाही.''

## २) कुळकटी:

कुळकटी म्हणजे कुळांचा किंवा घराण्यांचा इतिहास होय. मध्ययुगीन कालखंडात कुळांचा इतिहास लिहिण्याची प्रथा होती. अनेक कुळांचा इतिहास त्या काळात लिहिला गेलेला आहे. या कुळकटीचा उपयोग इतिहास लेखनासाठी होतो. कुळकटीच्या माध्यमातून कुळाचा विस्तार कसा झाला. नाते संबंध कोणाशी आले, त्या कुळाची घसरण कोणत्या कारणामुळे झाली इत्यादी माहिती यामधून प्राप्त होते कुळकटीच्या माध्यामातून तत्कालीन सामाजिक व धार्मिक विषयावर देखील प्रकाश टाकण्यास मदत होते. म्हणून बखरीपेक्षा कुळकटी अधिक प्रमाणात ग्राह्य मानली जाते. आठवले, गोखले, घोरपडे, पटवर्धन, गुणे, हिंगणे, पेठे, चंद्रचूड, रास्ते व पुरंदरे इत्यादी घराण्याच्या कुळकटी प्रकाशित झालेल्या आहेत. कुळकटी इतिहास प्रसिध्द घराण्यांपुरत्याच मर्यादीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य घराण्यावरं यातून काहीही प्रकाश पडत नाही.

## ३) बाडे:

एखाद्या कुटूंबाशी हस्तलिखित स्वरुपात लिहून ठेवलेली माहिती म्हणजे बाड होय. मध्यकाळात छापण्याची कला अस्तित्वात नसल्याने महत्वाच्या कागदपत्रांच्या नक्कला करुन त्या सांभाळून ठेवल्या जात. अशा कागदपत्रांना बाड अथवा बाडे असे म्हणतात. बाडाच्या माध्यमातून देवादिक, राजे, बादशाहा यांच्या कारकींदीची कालगणती, निवडक ऐतिहासिक प्रसंग तिथी, शके संबंधी माहिती मिळते. दुय्यम स्वरुपातील या साधनाचा वापर करुन ऐतिहासिक घराण्यावर, त्या घराण्यातील पराक्रमी व्यक्तीच्या चरित्रावर व समकालीन सत्ताधिशांच्यावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

## ४) वंशवेल/वंशावळी:

कुळकटीप्रमाणेच ऐतिहासिक घराण्यांचा वंशवृक्ष तयार करण्यांची प्रथा मध्ययुगीन काळात अस्तित्वात होती. एखादया वंशाचा वंशवेलीचा क्रम डावीकडून उजवीकडे लिहिण्याचा असतो. परंतु शिवकालीन बऱ्याच वंशवेली उजवीकडून डावीकडे लिहिलेल्या आढळतात. मोठमोठ्या नामांकित घराण्यांच्या वंशावळीना अगदी ब्रह्मापासून सुरुवात केलेल्या आढळतात. यामधील पहिला क्रम हा पुराणावरुन घेतलेला असतो. वंशवेलीतून प्रत्येक व्यक्तीची किंवा त्यातील मुख्य व कतृत्वान व्यक्तीचा जन्म किंवा मृत्यूच्या तारखा देण्यात येत असत. अनेक उदाहरणामध्ये वंशावळी अपूर्ण असलेल्या दिसतात. वंशवेलीचा अभ्यास करुन एखादया घराण्याचा विस्तार कुठपर्यंत झालेला होता किंवा त्या घराण्यातील व्यक्ती कोणत्या व्यक्तीस अथवा राजास समकालीन होती. यावर प्रकाश टाकता येतो. वंशवेलीवरून समकालीन व्यक्तीचा अभ्यास करून तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. गो. स. सरदेसाई यांनी मुसलमान रियासतीचे दोन खंड व मराठी रियासतीचे ८ खंड यामध्ये खूप मोठ्या संख्येने विविध घराण्यांच्या वंशवेली दिलेल्या आहेत.

## ५) न्याय निवाड्याची कागदपत्रे:

करीने, महजर, तकरीरा व पुरशिसे इत्यादी साधने न्याय मिळविण्याच्या अथवा देण्याच्या उद्देशाने तयार केलेली असतात. यातील मजकूर साधार लिहिण्याची खबरदारी घेतलेली दिसते. यामधील मजकुराची

कालमर्यादा ही अनेक वर्षाची अगर अनेक पिढ्याची असू शकते त्यामुळे यातून प्राथमिक किंवा संपूर्ण व एकत्रित माहिती मिळेलच असे मात्र नाही. न्यायनिवाड्या संदर्भात करीने व महजर मधून न्याय व्यवस्थेसंबंधी माहिती मिळते.

**अ) करीने:**

एखाद्या घराण्याच्या मालकीच्या जमीनीबद्दलची किंवा वतनाबद्दल माहिती देणारी कागदपत्रे म्हणजे मकरीनेफ होय. करीन्यामध्ये जी माहिती दिलेली असेल त्यांच्या खरे-खोटेपणाबद्दल पंचायतीमध्ये कागदपत्रे दाखल करीत. करीना सादर केल्यानंतर कामदार किंवा गोतपंचायत एकत्र बसून चौकशी करीत व नंतर करीन्याचे एक वैशिष्टये म्हणजे आधीच्या पिढीने जसे सादर केलेले असेल त्याची नक्कल करून ती माहिती जशीच्या तशी सादर केली जात असे करीन्यामधून तत्कालीन जमिनी संदर्भात माहिती मिळवण्यास मदत होते. जमिनचे क्षेत्र, वर्गवारी, महसूल आकारणी, जमीन धारणेचा प्रकार इत्यादी संबंधीवर प्रकाश टाकण्यास मकरीनेफ महत्वाचे साधन ठरतात.

**ब) महजर:**

महजर म्हणजे न्याय निवाड्याची कागदपत्रे, गोतसभेत न्यायनिवाड्या संदर्भात झालेली चर्चा व गोतसभेच्या अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय यासंबंधीची माहिती व त्यासंबधीचे साक्षीदार, अधिकारी यांच्या सह्या व हुद्याची नोंद असलेल्या कागदपत्राची नक्कल महजर मध्ये असते. गोतसभेत चर्चा होऊन त्यांची नोंद महजर मध्ये केली जात व महजरमध्ये नोंद झाली म्हणजे वाद संपला असे म्हणत. एखाद्या न्यायनिवाड्यासंदर्भात जो साक्षी पुरावा सादर केला जात असे. अशा कागदपत्रातून मध्ययुगीन न्यायव्यवस्थेवर, न्यायनिवाड्याची पध्दत, न्याय देणाऱ्याचा हुद्दा व न्यायनिवाड्याचे स्वरूप यावर प्रकाश टाकण्यात मदत होते. गणेश चिमणाजी वाड यांनी न्यायदान विषयक जे निवाडे संपादीत केलेले आहेत. (वाड डायरी, १३ वा खंड)

**६) शकावल्या:**

शकावल्यामध्ये एखाद्या महत्वाच्या घराण्या संदर्भात घडलेल्या घडामोडीची तिथी, वार, शके यानुसार नोंद केलेली असते. यालाच जंत्री किंवा शकावली असे म्हणतात. एखाद्या घराण्यासंदर्भात किंवा व्यक्ती चरित्रा संदर्भात महत्त्वाची माहिती यामधून मिळते. शकावल्याचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

१. पौराणिक परंपरेचा प्रभाव असलेल्या शकावल्या.

२. राजकीय घडामोडी संदर्भातील शकावल्या.

याशिवाय कालखंडानुसार देखील शकावल्यांचे दोन प्रकारात विभाजन केले जाते.

१. शिवकालीन शकावल्या

२. शाहू छत्रपतीच्या बाजूच्या शकावल्या.

शकावल्यांमध्ये दररोजच्या खर्चापासून ते राज्यव्यवस्थेपर्यंत अनेक गोष्टीचा उल्लेख असतो. मराठाकालीन अनेक शकावल्या आज उपलब्ध आहेत. यामध्ये जेथे शकावली, शिवापूर दप्तरातील शकावली, व सहा कलमी शिवापूरकर देशपांडे बखरीतील शकावली, गदाधर प्रल्हाद शकावली, घोडेगावकर व सहा कलमी शकावली या शकावल्या नसून ती टिपणे आहेत. जेधे शकावली भारत इतिहास संशोधन मंडळाच्या चतुर्थ अहवालात प्रसिध्द केलेली आहे. जेधे शकावली सर नदुनाथ सरकार यांनी इंग्रजीत भाषांतरीत केलेली आहे. शकावल्यांची वर्णन पध्दती पौराणिक कथेसारखी असते संशोधकाने यांचा वापर जपून केल्यास उत्कृष्ठ स्वरूपाचे संशोधन होण्यास मदत होते.

**७) चरित्र ग्रंथ:**

इतिहासलेखनात चरित्र ग्रंथ दुय्यम संदर्भ साधन म्हणून वापरले जातात. चरित्रग्रंथ एखादी व्यक्ती जीवंत असताना किंवा त्यांच्या मृत्यू नंतर लगेच लिहिलेले असतात. चरित्रग्रंथ आत्मचरित्रापेक्षा वेगळे असतात. आत्मचरित्र ही स्वत: लिहिलेले असतात व चरित्रग्रंथ हे दुसऱ्या व्यक्तीनी लिहिलेले असतात. प्राचीन कालखंडात चरित्र लेखनांची परंपरा आपल्याकडे फारसी प्रचलित नव्हती. विशाखा दत्ताने रचलेले 'बुध्दचरित्र' बाणभट्टाचे 'हर्षचरित्र' पहावयास मिळतात. मध्यपूर्व व मध्ययुगीन कालखंडात अरबी, तुर्की, फार्शी भाषेत चरित्र ग्रंथ लिहिले गेले. उदा. तारीखे रशीदी, हुमायुनामा, अकबरनामा, शहाजानांमा, परमानंदाचे शिवभारत, मराठा काळात लिहिलेल्या अनेक प्रकारच्या बखरी हे एक प्रकारचे चरित्रग्रंथच आहेत. आधूनिक काळात अनेक व्यक्तीवर हाजारो चरित्र ग्रंथ समकालीनानी लिहिले आहेत. उदा. डॉ. बी. आर. आंबेडकरांचे चरित्र.

**८) प्राचीन व मध्ययुगीन वाङःमय साहित्य:**

भारतातील विविध राजघराण्यातील सत्ताधिशांनी प्राचीन काळापासून अनेक विद्ववानांना व साहित्यिकांना राजाश्रय दिलेला दिसतो. या विद्वानांनी संस्कृत, प्राकृत, मराठी, हिंदी, कन्नड, तेलगु, तामिळ अशा अनेक भाषामध्ये विविध प्रकारची काव्ये, कथा, नाटके, कादंबऱ्या इत्यादी लेखन केले. या वाङःमयीन अभिव्यक्तीच्या मांडणीवर अथवा वर्णनावर तत्कालीन समाजाचा प्रभाव पडलेला दिसतो. उदा. विशाखा दत्ताचे 'मुद्राराक्षस' व 'देवीचंद्रगुप्तम' भासाचे 'स्वप्नवासवदस्त', कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र', श्रीहर्षाचे 'रत्नावली' व 'प्रियदर्शिका' ही नाटके इतिहासाचे साधन म्हणून महत्वाचे आहे. दक्षिण भारताच्या इतिहासाला उपयुक्त ठरणारे तमिळ साहित्य की जे 'संगम साहित्य' म्हणून ओळखले जाते. पांड्य, चोल, चेर इत्यादी राजवटीच्या कालखंडातील आदान गुरु, कुरदोगे, परिपाडल, रेगुत्तर, भट्टीरण, पदीदुयन्तु, कलितोगे व पुरूनारुल इत्यादी आठ संग्रहाचा समावेश आहे. याशिवाय 'इंलोगो' या कवीने लिहिलेले 'शिलपादीकारम' हे महाकाव्य, याशिवाय संगम साहित्यामधील 'मणिमेखला' हे महाकाव्य, व 'जीवकचिंतामणी' इत्यादी संगम साहित्यातील शेवटी दिलेल्या टिपणीवरून त्या काळातील राजांच्या वंशावळीवर प्रकाश टाकता येतो. या साहित्याच्या मदतीने दक्षिण भारतातील प्रशासन व्यवस्थेवर प्रकाश

टाकता येतो. या काळातील युध्दपध्दती, करपध्दती, अन्नधान्य, शेती, व्यापार, उद्योग चलन व्यवस्था इत्यादी संबंधी माहिती मिळते.

मध्ययुगीन कालखंडातीलही ललित साहित्य उपलब्ध आहे. अकबराच्या दरबारातील महेश ठाकूर यांचे 'अर्वदेशवृत्तांत', पद्मसुंदरचे 'अकबरशाही शृंगार', 'दर्पण', देविमल यांचे 'हिरा सौभाग्य', जगन्नाथ पंडिताचे 'जगदाधारण', 'भामिनी विलास', 'राजागंगाधर' इत्यादी काव्ये. याशिवाय मुघल काळातील हिंदी, बंगाली, ओरिसा, गुजराती या भाषेतील अनेक प्रकारचे वाडःमय उपलब्ध आहे. या साहित्यामधून तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**ब) पुरातत्वीय साधने:**

लिखित साधंनांच्या बरोबर शिलालेख, ताम्रपट, स्तंभालेख, नाणी, मूर्ती, भांडी, चित्रे, इमारतीचे अवशेष व भिंतीचित्रे यासारखी भौतिक साधने इतिहासलेखणासाठी उपयुक्त ठरतात. संस्कृतीच्या या विविध साधंनाच्यावरून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. १८ व्या शतकात सर विल्यम जोन्स यांनी भारतात पुराणवस्तू संशोधनाची सुरुवात करून संशोधकांना इतिहासाचा अमूल्य ठेवा उपलब्ध करून दिला. लिखित साधनांच्या तुलनेने पुरातत्त्वीय साधने तुलनेने कमी आढळतात. हे जरी खरे असले तरी ही साधने वाङ्मयीन साधनापेक्षाही विश्वासार्ह असतात आणि आहेत. या साधनांमधून प्राप्त झालेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याने याच्या मदतीने इतिहासाचे विश्लेषण करणे सोपे जाते. या कालखंडातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, राजवाडे व गढ्या, किल्ले, शस्त्रास्त्रे, वस्त्रे, अलंकार, चित्रे, नकाशे व काष्ठशिल्प इत्यादींचा प्रामुख्याने पुरातत्त्वीय साधनांमध्ये समावेश होतो.

इतिहासलेखनासाठी अलिखित म्हणजे पुरातत्वीय साधनांना पुरावा म्हणून विशेष महत्वाचे स्थान आहे. कारण लिखित साधनांच्यामध्ये फेरफार अथवा बदल केला जावू शकतो. मात्र पुरातत्वीय साधनांमध्ये ते शक्य नसते. लिखित साधनांच्या प्रमाणे ही साधने जरी बोलकी नसली तरी लिखित साधनांच्यामध्ये जी पोकळी किंवा उणीव राहीलेली असते ती भरून काढण्यासाठी अथवा ज्या काळातील अथवा घटनेशी संबंधीत लिखित साधने उपलब्ध होवू शकत नाहीत त्यावर प्रकाश टाकण्यासाठी पुरातत्वीय साधने विशेष महत्वाची असतात. समकालीन घटना व वाटचालीचा तो पुरावा असतो.

इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक कालखंडाच्या संदर्भात पुरातत्वीय साधने महत्वाची ठरतात. या पुरातत्वीय साधनांना 'भौतिक' साधने असेही संबोधले जाते. पुरातत्वीय साधने प्रत्यक्ष घटना स्थळावर किंवा विविध ठिकाणच्या संग्रहालयामध्ये संवर्धीत केलेली आपणास पहावयास मिळतात. पुरातत्वीय साधने समकालीन असल्याने ती अधिक विश्वसनीय व उपयुक्त मानली जातात. उत्खननात सापडणारे अवशेष एखादी वस्ती, गाव, नगर, किल्ल्याचे अवशेष, मंदिराचे अवशेष इत्यादी स्वरुपातील असतात. पुरातत्वीय साधने म्हणजे पुरावे एकतर जमिनीवर उपलब्ध असतात अथवा जमिनीच्या खाली गाडलेल्या अवस्थेत असतात आणि ते उत्खननात सापडतात. याशिवाय नदीच्या पात्रात अथवा नदीच्या खोऱ्यातदेखील पुरातत्वीय अवशेष सापडतात. अशा अवशेषांचा अभ्यास पुरातत्वशास्त्रात केला जातो

## अ) पुरातत्व/ पुरातत्वशास्त्र म्हणजे काय:

इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक काळाच्या इतिहासलेखनासाठीची माहिती अथवा साधने यांच्या माध्यमातून प्राप्त होतात. अतिप्राचीन ते मध्ययुगीन काळातील काही माहिती लिखित स्वरूपात प्राप्त होत नाही. शास्त्राचा आधार घेवून समकालीन विविध वस्तू व अवशेषांचा अभ्यास करुन इतिहासलेखन केले जाते. स्थूलमानाने 'पुरातत्वशास्त्र' म्हणजे 'मानवाच्या उत्पत्तीचे विश्लेषण' असा अर्थ होतो. हजारो वर्षापूर्वी विविध कारणांच्यामुळे मानवी संस्कृती स्थलांतरीत झाल्या, काळाच्या ओघात नष्ट झाल्या अथवा गाडल्या गेल्या. त्यांच्या बरोबर त्यांनी निर्माण केलेल्या भौतिक वस्तूसुध्दा काळाच्या ओघात गडप झाल्या. पुरातत्वशास्त्रामध्ये या प्राचीन संस्कृतीचा शोध घेणे, उत्खनन करुन पुरातत्वीय वस्तूचे संकलन करणे व प्राप्त पुरातत्वीय वस्तूच्यांवर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करुन मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाचे व विकासाचे एक साधन म्हणून त्याचे जतन करण्याचे कार्य केले जाते. पुरातत्वशास्त्रात तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय घटकांचा अभ्यास केला जातो. उत्खनन झालेल्या प्रदेशातून किंवा ठिकाणामधून ज्या वस्तू प्राप्त होतात त्या वस्तूना 'पुरातत्वीय वस्तू' (Archaeological Artifacts) असे म्हणतात. गॅहम क्लार्क या पुरातत्व इतिहास संशोधकाने आपल्या "Archaeology and Society" या ग्रंथामध्ये पुरातत्वीय वस्तूचे महत्व विशद करताना असे म्हटले आहे की, ''भूतकाळातील मानवी जीवनाची जडण-घडण जाणण्यासाठी केलेला अवशेषांचा पध्दतशीर व शास्त्रीय अभ्यास म्हणजे पुरातत्व होय''. तर "Archaeology in the field' या ग्रंथात ''मानवी सभ्यतेला भूतकाळातील स्वरुपाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे पुरातत्व'' अशी व्याख्या केलेली आहे. सर मार्टिमर व्हीलर यांच्या मते ''पुराणावशेषांचे उत्खनन करणारा हा केवळ वस्तूचे उत्खनन करत नसतो तर तो भूतकाळातील लोकांचे, लोकजीवनाचे उत्खनन करीत असतो'' असे नमूद करतात.

भारतामध्ये पुरातत्वशास्त्राचा अभ्यास १८ व्या शतकामध्ये सुरु झाला. सन १७८४ मध्ये एशियाटीक सोसायटीची स्थापना झाली. या सोसायटीच्या माध्यमातून युरोपीय अभ्यासकांनी प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासास चालना दिली. भारतामधील पुरातत्वशास्त्रास चालना देण्यामध्ये सर विल्यम जोन्स, जॉन मार्शल, अलेक्झांडर कनिंगहॅम, जेम्स बर्जेस, लॉर्ड कर्झन, सर मार्टिमर व्हीलर इत्यादी ब्रिटिश तर राखालदास बॅनर्जी व माधवस्वरुप वत्स या भारतीय संशोधकानी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. आलेक्झांडर कनिगहॅम यांना 'भारतीय पुरातत्व संशोधनाचे जनक' म्हणून संबोधले जाते. लॉर्ड कॅनिग यांच्या काळात सन १८६१ मध्ये 'भारतीय पुरातत्व सर्वेक्षण' खात्याची स्थापना झाली. (Archaeological Survey of India)

ब) परातत्वीय साधनांचे प्रामुख्याने दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते

अ) पुरातत्वीय वस्तू:

ब) पुरातत्वीय वास्तू:

अभ्यासाच्या दृष्टीकोणातून जरी वरीलप्रमाणे दोन प्रकारात वर्गीकरण केले जात असले तरी खालील प्रमाणे पुरातत्वीय साधने आढळून येतात.

**पुरातत्वीय साधने**

↓

- अ) पुराणवस्तू (उत्खनित अवशेष)
  - वस्तू अवशेष
    ↓ अलंकार/आभूषणे
    ↓ धातू व मातीची भांडी
    ↓ शस्त्रास्त्रे
    ↓ शेतीची अवजारे
    ↓ वजन/मापे
    ↓ नाणी व मुद्रा
    ↓ मानवी/ प्राण्याचे सांगाडे
    ↓ मुर्त्या
  - वास्तू अवशेष
    ↓ स्मारके
    ↓ धार्मिक स्थळे/ मंदिरे
    ↓ वाडे
    ↓ किल्ले
    ↓ नागरांचे अवशेष
    ↓ स्तूप/ विहार
    ↓ लेण्या, गुहा
    ↓ शिल्पावशेष/स्मृतीशिला
- ब) आलेख (अभिलेख)
  - शिलालेख
    - प्रस्तरलेख
    - स्तंभालेख
    - गुहालेख
  - ताम्रपट

पुरातत्वीय वस्तू अथवा वास्तूच्या स्वरुपात जी साधने उपलब्ध होतात त्याच्यामधून इतिहासाच्या पाऊलखुणा आढळतात. या वस्तू अथवा वास्तूच्या माध्यमातून अभ्यासकास तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकणे शक्य होते. यामधील काही प्रमुख साधनाचा या ठिकाणी अभ्यास करावयाचा आहे.

## १) पुराणवस्तू/ उत्खनित अवशेष:

मानवी संस्कृती व मानवी विकासाचे भूतकालीन अवशेष असतात त्याला उत्खनित अवशेष असे म्हणतात. मानवी जीवनातील विविध प्रकारच्या नित्योपयोगाच्या वस्तू म्हणजे गतकालीन समाज जीवनाचा एकप्रकारे आरसा असतो. ज्या वस्तूच्या माध्यमातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचे चित्र प्रतिबिंबीत झालेले असते. ज्या ठिकाणी उत्खनन होते त्या उत्खननामध्ये तत्कालिन संस्कृती अथवा वसाहतीचे विविध थर आढळतात. या थरांच्यामध्ये विविध प्रकारच्या मानवी वापरातील वस्तू आढळतात. यामध्ये भांडी, खापरे, अलंकार, शस्त्रास्त्रे, खेळणी, मणी, कलाकुसरीच्या वस्तू, मानवी सांगाडे, विविध प्राण्याचे सांगाडे, धार्मिक साहित्य, मुर्त्या अशा कितीतरी प्राप्त वस्तूच्यावरून त्या थरांचा कालखंड निश्चित करता येतो. तत्कालीन संस्कृतीचे आकलन होण्यास मदत होते. उत्खननात प्राप्त मानवी व प्राण्याचे सांगाडे यावर रासायनिक प्रक्रिया कार्बन १४ व रेडिओ कार्बन रासायनिक प्रक्रिया करून त्यांचा काळ, वय, वंश त्यांच्या मृत्यूचे कारण, प्राण्याचे प्रकार इत्यादी अवगत होण्यास मदत होते.

उत्खनीत अवशेषामध्ये प्राप्त झालेली मातीची भांडी अथवा खापरे अतिशय महत्वाची असतात. असे म्हटले जाते की, मातीची खापरे ही पुरातत्व विद्येची मुळाक्षरे आहेत. मातीची भांडी मानव हजारो वर्षापासून वापरत आहे, परंतु ते बनविण्याचे तंत्रज्ञान प्रत्येक देशात वेगवेगळे असलेले आढळते. या मातीच्या भांड्यावरून व त्यावरील चित्रकलाकृतीवरून तत्कालीन मानवी संस्कृती, जीवनमान, व्यवसाय, कलात्मक जीवन, इत्यादीवर प्रकाश पडतो.

शेतीची अवजारे, शिकारीसाठी वापरली जाणारी हत्यारे व युध्दातील विविध शस्त्रास्त्रे यावरून तत्कालिन कृषक जीवन कशाप्रकारे होते, तो कशाप्रकारची शेती करित असावा किंवा शेतीचे तंत्रज्ञान काय असावे या संबंधी माहिती मिळते. शिकारीच्या हत्यारावरुन आदिम अवस्थेपासून मानवी जीवनात झालेला बदल शिकारीच्या पध्दती व हत्यारावरून तो कशाप्रकारे व कोणत्या प्राण्याची शिकार करीत असावा या संबंधी माहिती मिळते. विविध प्रकारची हत्यारे व शस्त्रास्त्रामधून धातू व तंत्रज्ञानात झालेला बदल अभ्यासण्यास मदत होते.

उत्खनीत अवशेषामध्ये दैनंदिन वापरातल्या असंख्य वस्तू प्राप्त होतात. यामध्ये सौंदर्य प्रसाधने, धान्याचे कण, बांगड्या, अलंकार, खेळणी इत्यादी स्वरूपाच्या अनेक वस्तू आढळून येतात. दैनंदिन वापरातल्या वस्तूतून सामान्य माणसाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. सामान्य माणसापासून ते राजे-रजवाड्यापर्यंतच्या वस्तू उत्खननातून प्राप्त होतात. मुलाच्या खेळण्यावरून तत्कालीन दळणवळणाच्या साधनाची कल्पना येवू शकते. विविध प्रकारच्या अलंकारातून त्या-त्या काळातील कलात्मकता कळते, शिवाय ते अलंकार विशिष्ट काळाचा निर्देश करणारे असतात. कारण कलाकुसरीचाही विशिष्ट काळातील एक पोत असतो, यामधून तत्कालिन सांस्कृतिक इतिहास कळतो.

## २) वास्तू अवशेष:

प्राचीनकाळापासून भारतामध्ये विविध प्रकारचे स्थापत्य विकसित झालेले दिसते. हजारो वर्षाच्या वाटचालीतले हे स्थापत्य अवशेष आज उद्धवस्त अवस्थेत किंवा क्वचित प्रसंगी सुस्थित आढळतात. स्तूप, विहार, लेणी. मंदिरे, नगरे, मशिदी, किल्ले, राजवाडे, वाडे, गढया इत्यादी अवशेष काळाच्या ओघात नामशेष झाले किंवा गाडले गेले अथवा परकीय आक्रमणामुळे व पर्यावरणीय आपत्तीमुळे उद्ध्वस्थ झाले. भारतात विविध ठिकाणी उत्खनने झालेली आहेत. तक्षशिला, कालीबंगल, नालंदा, लोथल, नागार्जुन का माम तर जो दायमाबाद इत्यादी ठिकाणांमधून प्राचीन संस्कृतिचे वास्तू अवशेष प्राप्त झालेले आहेत.

भारतातील विविध स्थापत्य कलांचा विकास लेण्यामधून झाला. बिहार, चैत्यगृहे, गुहा मंदिर हे लेण्याचे उपप्रकार आहेत. अजिंठा, वेरुळ, कार्ले, भाजे, पितळखोरे, नाशिक, धारापुरी, औरंगाबाद, बाधा, बादामी, उदयगिरी, हातिगुंफा इत्यादी असंख्य लेण्या आज अस्तित्वात आहेत. विविध कालखंडातील राजघराण्यांच्या राजाश्रयाने निर्माण झालेल्या लेण्या व बिहार यांच्यावर त्या-त्या राजाने ज्या धर्माला राजमान्यता दिली त्याचा प्रभाव आढळतो. लुबिणी, राजगृह, कुशिनगर, श्रावस्ती, वैशाली, गया, सारनाथ, नालंदा, साची, भारहूत व अमरावती इत्यादी ठिकाणचे स्तुप बौध्द धर्माबद्दलची माहिती देतात. प्राचीन गुहा शिल्पातून मंदिरस्थापत्यशैलीचा उदय झाला व त्यानंतर मोठया संख्येने विविध पंथीयांची व धर्माची मंदिरे बांधण्यात आली. ऐहोळ, पट्टडकल, वेरूळ इत्यादी ठिकाणची मंदिरे भारतातील अतिप्राचीन मंदिरे मानली जातात. गुप्त काळाच्या नंतर भारतात मंदिराच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसते. गुप्त, प्रतिहार, पाल, चालुक्य, राष्ट्रकूट, पल्लव, चोल, पांडय, यादव व होयसळ इत्यादी राज्यकर्त्याच्या काळात मंदिर स्थापनेस चालना मिळाली. हेमाडपंथी, ओडिसी, द्रविडी शैलीची मंदिरे या काळात अस्तित्वात आली. या मंदिरांच्यामधून धार्मिक इतिहासबरोबर स्थापत्य कलेचा अभ्यास करण्यास हे महत्वाचे साधन आहे. प्राचीन भारतीय कलावस्तू किंवा वास्तुशिल्पे ही प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाची होती. धर्म किंवा धर्मोपदेशक हे समाजाचे आधारस्तंभ मानले गेलेले असल्याने एखाद्या विशिष्ट काळात ज्या धर्माचे प्राबल्य असेल त्याला त्या पंथाचे नाव देण्याची प्रथा सुरु झाली. यातून बौध्द, जैन, शैव, वैष्णव, शाक्त इत्यादी बरोबर ज्या कलेवर परकीय आक्रमणांचा प्रभाव पडला त्या काळामधून धार्मिक, कथा, समजूती, परंपरा, आचार, विचार, रुढी इत्यादी अभ्यास करण्यासाठीचे महत्वाचे आहे.

मुघल कालखंडातील इतिहासाचे आणखी एक महत्त्वाचे भौतिक साधन म्हणजे विविध राजवाडे व गढ्या आणि किल्ले हे आहे. या पुरातत्त्वीय साधनाच्या माध्यमातून मुघल स्थापत्य कलेचा इतिहास जाणून घेणे सोपे होते. मुघल बादशाहाना स्थापत्य कलेची आवड असल्याने त्यांनी इतर वस्तूंबरोबरच राजवाडे, गठ्यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर केली. शेरशहाने बांधलेला पुराणा किल्ला, अकबराच्या काळात बांधलेला आग्र्याचा किल्ला, लाहोरचा किल्ला, याशिवायत्याने अजमेर, मेरठ, कटक, इत्यादी ठिकाणी किल्ले बांधलेले आहेत. शाहाजहांनच्या काळात बांधलेला लाल किल्ला जग प्रसिद्ध आहे. निजामशाही व आदिलशाही कालखंडातील अनेक किल्ले आज दक्षिण भारतात आपले अस्थित्व टिकवून आहेत. छत्रपती

शिवाजी महाराजांनी आपल्या किल्ल्यांच्या बळावरच मुघल आणि अदिलशाहा सारख्या शत्रूंना नामोहरण केले आहे.

मुघल बादशाहाबरोबर राजपूत राजांनीही भव्य राजवाडे बांधले. या राजवाड्याच्या भोवती संरक्षणासाठी तटबंदी व खंदकाच्या सोयी करून ठेवलेल्या असत. या राजवाड्यामध्ये राजकुमार व राजकुमारीची दालने, राजांचे महाल, राणी महाल, दास व दासी यांच्या निवासाची सोय असे. उदा. दिल्ली, आग्रा, शहाजहानबाद, फत्तेपूर, सिक्री, जयपूर, जोधपूर, इत्यादी ठिकाणी निवास व संरक्षणासाठी अनेक गढ्यांची बांधकामे केलेली होती. या साधनावरून तत्कालीन राजकीय व लष्करी स्थितीची माहिती आणि संशोधन करू शकतो. आजही भारताच्या कानाकोपऱ्यात मुघल कालखंडातील या वस्तूंचे भग्न अवशेषरूपाने शेकडो वर्षे ऊन, वारा व पाऊस यांचा मारा सहन करूनही अस्तित्व टिकवून आहेत. वरील सर्व पुरातत्त्वीय साधने मुघल इतिहासाची महत्त्वाची साधने असून त्याच्या माध्यमातून तत्कालीन स्थापत्यशास्त्रीय इतिहास जाणून घेणे सोपे होते. मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम आक्रमकांच्यानंतर भारतीय वास्तूकलेमध्ये झालेला बदल, छत्रपती शिवाजी महारजांच्याकाळात दुर्गस्थापत्य क्षेत्रात झालेली क्रांती यांचा अभ्यास करण्यासाठी या वास्तू अवशेषांचे महत्वाचे स्थान आहे. स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ठ नमुना असलेले हे किल्ले आजही अस्तित्वात आहेत. या अवशेषावरून संशोधक विविध कालखंडातील आणि राज्यकर्त्यांची दुर्गनिती अभ्यासू शकतो. मुघल कालखंडातील जाळीकाम, नक्षीकाम यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. मुघल कालीन राजमहाल अशा पद्धतीच्या नक्षीकामांनी सुशोभित करण्यात येत असत. या नक्षीकामांमध्ये पानाफुलांची नक्षी प्रामुख्याने कोरली जात. विविध राजवाड्यांवर, किल्ल्यांवर व सरदारांच्या घरांवर अनेक प्रकारची काष्ठशिल्पे कोरलेली असत आजही त्यातील अवशेष पाहावयास मिळतात.

मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम आक्रमकांच्यानंतर भारतीय वास्तूकलेमध्ये झालेला बदल व शिवकाळात दुर्गस्थापत्य क्षेत्रात झालेली क्रांती यांचा अभ्यास करण्यासदेखील प्राचीन वास्तू अवशेष महत्वाचे आहेत. शिवाजी महाराजांनी जलदुर्ग, गिरीदुर्ग व भूईकोट या प्रकारातील किल्ले बांधले. स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना असलेले हे किल्ले आजही अस्तित्वात आहेत. या अवशेषावरून आपण शिवाजी महाराजाची दुर्गनिती अभ्यासू शकतो.

**२) शिल्पावशेषः**

प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आलेल्या मूर्ती, कला अवशेष, चित्रकलेला पाश्चात्य अभ्यासकांनी इतिहासाचे एक साधन म्हणून पाहिलेले आहे. या अवशेषावरून त्यांनी भारतीय कला परंपरांचा इतिहास शोधला. कलेची वैशिष्टये जगासमोर आणली. शिल्पावशेषांच्या माध्यमातुन इतिहास, मुर्तीशास्त्र, कला, अभिव्यक्ती इत्यादी ची समीक्षा या अवशेषाच्या माध्यमातूनच केलेली आहे. इतिहासाचे एक साधन म्हणून या शिल्पावशेषाला महत्त्व आहे. शिल्पावशेषात मूर्तिशास्त्राचा चित्रपरंपरेचा अभ्यास केला. त्यातन सामान्य जीवन, केशभूषा पध्दती, वेशभूषा पध्दती, अलंकारभूषणे, वापरात असलेली निरनिराळी वारे इत्यादी अभ्यास व त्याचे प्रार्यासास सिध्द केलेले आहे. अभिव्यक्तीची अनेक माध्यमे आहेत. यामधील शिल्पकला हे

ही एक आहे. या कालाभिव्यक्तिमा तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब सहजपणे उतरलेले दिसते. त्या दृष्टीकोणातून शिल्पकला किंवा त्याचे अवशेष तत्कालीन समाजाच्या व्यवहाराचे महत्वपूर्ण पुरावे ठरतात. या पुराव्याच्या माध्यमातून तत्कालीन समाजजीवनाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. चित्र रेखाटणे किंवा दैनंदिन जीवनातील प्रसंग दगडावर कोरून ठेवणे ही मानवी प्रवृत्ती संपूर्ण जगभर पहावयास मिळते. म्हणूनच हे अवशेष विस्मरणीय व अस्सल दर्जाचा पुरावा मानला जातो.

**३) आलेख/अभिलेख:**

प्राचीन काळी लिहिलेला अथवा कोरलेला मजकूर म्हणजे अभिलेख अथवा पुराभिलेख पुरातत्वीय साधनांच्यामध्ये अत्यंत महत्वाचे व अविनाशी साधन म्हणून याचा उल्लेख केला जातो. ताम्रपट, स्तंभलेख, गुहालेख, प्रस्तरलेख इत्यादी प्रकार यामध्ये आढळतात. इतिहासलेखन व पुर्नलेखनासाठी अतिशय उपयुक्त व विश्वसनीय साधन म्हणून याचा उपयोग होतो. कारण शिलालेख अथवा ताम्रपटावरील नोंदी स्पष्टपणे व निःसंदिग्धपणे कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. या लेखाच्यामधून धर्माज्ञा, धर्मोपदेश, राजज्ञा, राज्यकृत्ये, राजसूती, आज्ञापत्रे, बतनपत्रे, नीतीतत्वे, पदव्या, वंशावळी इत्यादी संबंधी माहिती कोरलेली आढळते. सदर विषयाच्या अनुशंगाने संशोधकास तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**४) शिलालेख व स्तंभालेख:**

प्रारंभीच्या काळातील शिलालेख छोट्या शिळा, स्तंभ किंवा लेण्यामधून कोरलेले दिसून येतात. सम्राट अशोकाच्या काळात स्तंभालेखाचा उपयोग खूप मोठ्या प्रमाणात झाला. किंबहुना हे शिलालेख अथवा स्तंभलेख म्हणजे मौर्यकालीन इतिहासचे सर्वोत्तम साधन मानले जाते. मौर्य, गुप्त, सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, शिलाहार व यादव इत्यादी राजघराण्यांचा मोठा इतिहास आपणास या शिलालेखांच्या माध्यमातून कळतो. सम्राट अशोक, राजा खारबेल, सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी, चालुक्य सम्राट द्वितीय पुलकेशी इत्यादी कार्यावर या शिलालेखांच्या माध्यमातुन प्रकाश पडलेला आहे. गुप्तकाळापूर्वी उभारलेल्या छोट्या-मोठ्या स्तंभालेखाची संख्या १५०० पेक्षा अधिक आहे. गुप्त काळानंतर उभारलेल्या किंवा कोरलेल्या स्तंभलेखांची भाषा बहुतांशी संस्कृत आहे. विविध प्रसंगी राजे-महाराजे अशा प्रकारचे शिलालेख कोरत असत. यामध्ये स्तंभलेख, प्रस्तरलेख, लघुप्रस्तर व गुहालेखांचा समावेश होतो. ग्रंथाच्या तुलनेत शिलालेख प्रामुख्याने ब्राह्मी व खरोष्टी लिपीतील आहेत. सन १७८४ मध्ये सुरु झालेल्या एशियाटीक सोसायटीने प्राचीन भारतीय शिलालेख ताम्रपट व जुनी हस्तलिखिते याचा अभ्यास करण्यासाठी सन १७८८ मध्ये 'एशियाटीक रिसर्चेस' नावाचे नियतकालिक सुरु केले. ब्रिटीश अधिकारी जेम्स प्रिन्सेस यांनी 'ब्राम्ही' व 'खरोष्टी' लिपीचा अभ्यास करुन शिलालेख वाचण्यास सुरुवात केली. शिलालेख अथवा स्तंभालेखांच्या खालील विषयास अनुसरुन काही शिलालेख आढळतात.

१. व्यापारी स्वरुपाचे शिलालेखः उदा. मंदसोर येथील राताकुमारगुरव बघुवर्मन यांचा शिलालेख १२. धार्मिक स्वरुपाचे शिलालेख : उदा. सम्राट अशोकाचे शिलालेख

३. दानात्मक स्वरूपाचे अथवा अर्पण स्वरूपाचे उदा. कान्हेरीगुंफा, नाशिक, कार्ले, भाजे इत्यादी ठिक शिलालेख.

४. प्रशासकीय स्वरूपाचे शिलालेख : उदा. सम्राट अशोकाचे कलिंग येथील शिलालेख

५. राजांच्या स्तूतीपर आलेख : उदा. जुनागड व मिसारी येथील दगडी स्तंभावर कोरलेला स्कंदा शिलालेख अलाहाबाद येथील समुद्रगुप्ताचा स्तंभालेख, मंदसोर येथील राजा यशोवर्धन यांचा शिलालेख व हाथीगुफा येथील राजा खारवेलचा शिलालेख इत्यादी.

प्रा. ई. जे. रैप्सन शिलालेखाचे महत्त्व विशद करताना म्हणतात की, शिलालेखातून आपल्या देशाची समकालीन, राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती संबंधी विश्वसनीय माहिती मिळते.

प्राचीन भारताच्या तुलनेत मध्ययुगीन कालखंडात आढळणाऱ्या शिलालेखांचे प्रमाण फारच कमी आहे. सदरचे शिलालेख किल्ले, राजवाडे, पडक्या इमारती, कबरी आणि देवालयावर आढळतात. शिलालेखावरून सुलतानांची नावे, कालखंड, राज्याच्या सीमा इत्यादींची संबंधी माहिती मिळते. यामधून तत्कालीन प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक, आर्थिक इतिहासाशी संबंधीत माहिती प्राप्त होते.

सुलतानशाही व विजयनगरकाळाशी संबंधित शिलालेखांचा अभ्यास खालील ग्रंथांच्यामधून झालेला आहे. डॉ. अली असगर हिकमत इशिराजी यांनी संपादित केलेले 'एपिग्राफिया इंडो-मुस्लामिका' (Epigraphia Indo-Muslemia) मध्ये ऐतिहासिक स्मारकावरील फार्शी शिलालेख पाहावयास मिळतात. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याने प्रकाशित केलेले 'एपिग्राफिया इंडिका' (Epigraphia Indica) हेही महत्वाचे साधन असून बेंजामिन लुईस राईस यांनी संपादित केलेले 'एपिग्राफिया कर्नाटिका'(Epigraphia Karnatica) हे ही महत्वाचे साधन आहे, याचे १२ खंड असून यामध्ये १००० शिलालेख प्रसिद्ध केलेले आहेत. कोंडबीडूचे रेड्डी, तेलगू चोल, तेलग पल्लव, वेलांदडू चोल यांचे शिलालेख व ताम्रपटही महत्त्वाचे असून ते 'एपिग्राफिया इंडिका', 'द इंडियन अॅन्टीक्वेरी', 'आंध्र पत्रिका' आणि 'जर्नल ऑफ तेलगू अॅकॅडमी' मधून प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. काही शिलालेख व ताम्रपट मॅकेन्झी संग्रह आणि सी. पी. ब्राऊनच्या 'लोकल रेकॉर्ड' मध्येही समाविष्ट करण्यात आलेले आहेत. मल्याळममधील शिलालेख 'त्रावणकोर आर्किलॉजिकल सिरीज', 'राम वर्मा रिसर्च इन्स्टिट्यूट बुलेटीन', 'केरळ, सोसायटी पेपर्स', 'साऊथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स', 'इंडियन अॅटिक्वेरी', 'एपिग्राफिया इंडिका', 'इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टरली अॅन्युयल रिपोर्टस् ऑफ साऊथ इंडियन एपिग्राफी' यामधून प्रकाशित व संग्रहित करण्यात आलेले आहेत.

शिलालेखांच्यामधून सामाजिक व आर्थिक इतिहासाविषयी बरीच माहिती मिळते. जमीन महसूल, कर आकारणीची पद्धत, व्यवसाय करांची माहिती, मालाच्या जलवाहतुकीवरील कर, पाण्यांवरील कर, व्यापारी संघांची माहिती, विविध जाती आणि जमाती, निरनिराळे धार्मिक उत्सव, समारंभ अशा विविध गोष्टींची माहिती मिळते. वा. सी. बेंद्रे यांनी 'A Story of Muslim Inscriptions' हा ग्रंथ लिहिला असून ग्रंथामध्ये मध्ययुगीन भारतातील उपलब्ध आलेख, शिलालेख, ताम्रपट यांची टिपणासह क्रमबद्ध माहिती देण्यात आली आहे.

राजस्थानमधील १५ व्या शतकातील कुंभलगड शिलालेखांमधून तत्कालीन गावे, किल्ले, आश्रमसंस्था, तुलादान, पाठशाळा, शिवरात्री व वसंतोत्सव यासारख्या गोष्टींबद्दल माहिती मिळते. तेलंगणामधील वारंगळ जिल्ह्यातील हनमकोंडा येथील तेलगू भाषेतील हजार खांबांचा शिलालेख, गणपती देव याचा मोटुपल्ली काकतीय शिलालेखातून मध्ययुगीन आंध्र प्रदेश, सागरी व्यापार व आर्थिक बाबींची माहिती मिळते. केरळमधील मंदिरांमध्ये अनेक शिलालेख आढळतात. या आलेखामधून विविध आर्थिक बाबींवर प्रकाश पडतो. या शिलालेखांच्या आधारे केरळमधील सरंजामशाहीचा उदय व विस्तार याचा अभ्यास प्रा. एलामकुलम पी. एन. कुंजन पिल्ळई यांनी केला आहे. जमीन मालमत्ता व राजकीय सत्ता यावरील ब्राह्मणांचे वर्चस्व, समाजव्यवस्था आणि सोन्याऐवजी नाण्यांचा वाढता उपयोग याची माहिती या आलेखातून मिळते.

**५) ताम्रपट/अभिलेख:**

शिलालेखाप्रमाणे ताम्रपटसुध्दा अत्यंत विश्वसनीय साधन मानले जाते. मानवी जीवनात जसा धातुचा वापर होऊ लागला. तेव्हापासून तांब्याचा वापर ताम्रपट तयार करण्यासाठी होऊ लागलेला दिसतो. तांब्याच्या जाड पत्र्यावर अक्षरे कोरून ताम्रपट तयार केला जातो. शिलालेखांच्या तुलनेत ताम्रपटाची संख्या अधिक आहे. ताम्रपटाचा वापर मुख्यत्वे दानपत्रे व जमीन विषयक हकपत्रे यासाठी केलेला दिसतो. सामान्यतः एक ताम्रपट एकाच विषयासाठी वापरण्याचा प्रघात दिसतो. याशिवाय राजघराण्यांच्या वंशावळी, राज्यविस्तार, धोरण पराक्रम, राज्यारोहण इत्यादी प्रसंगाचे वर्णन करण्यासाठी ताम्रपटांचा वापर होत असल्याचे दिसते. गुप्त, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार व यादव कालीन ताम्रपट आढळतात. वाकाटक घराण्याचा इतिहास केवळ ताम्रपटामधून आढळतो. विविध राजवटीतील अनेक विद्ववान लोकांना, धर्मसंस्थांना, विद्यापीठांना देणग्या अथवा जमीनदान दिलेल्या आहेत. राजांनी केलेल्या दानांची नोंद ठेवणे हा जरी ताम्रपटाचा प्रमुख उद्देश असला तरी अशा ताम्रपटातून तत्कालीन राजे, राजघराणी, त्यांचा काळ, दान देणाऱ्या, घेणाऱ्या व्यक्तीची नावे, राज्याच्या चतु सीमाबरोबरच सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय माहिती मिळवण्याचे महत्वाचे साधन आहे.

चिनी प्रवाशी फाहीयान यांने बौद्ध मठामध्ये अनेक ताम्रपट पाहिले की ज्याच्यावरती जमीन दान दिल्याचा उल्लेख होता, त्यामध्ये काही बुद्ध कालीन होते. सुएनत्संग या दुसऱ्या चिनी प्रवाशाने कनिष्काने बोलवलेल्या सभेमध्ये बोलण्यासाठी केलेले भाषण तीन ताम्रपटाच्यावरती कोरलेले होते असा उल्लेख करतो. नंतर या ताम्रपटांना दगडी पेट्यांमध्ये ठेवून त्यावर स्तूप बांधण्यात आले. शिलालेख किंवा ताम्रपटांचा इतिहास लेखनांच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास संदर्भ साधन म्हणून त्याचे महत्व अनन्य साधारण आहे. यातील नोंदी सविस्तर असतात. धार्मिक लेख किंव दानपत्रे ही राजकीय इतिहास लेखनास पूरक ठरतात. या ताम्रपटाच्यामधून तत्कालिन, तिथी, वार, नक्षत्र, वर्ष इत्यादीचा संदर्भ असल्याने संबंधित मजकुराची कालनिश्चिती करण्यात मदत होते.

ताम्रपटावरील नोंदी स्पष्टपणे व नि:सदिग्धपणे कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. या लेखाच्यामधून धर्माज्ञा, धर्मोपदेश, राजज्ञा, राज्यकृत्ये, राजसूती, आज्ञापत्रे, वतनपत्रे, नीतीतत्वे, पदव्या,

वंशावळी इत्यादी संबंधी माहिती कोरलेली आढळते. विजयनगर साम्राज्याची माहिती मिळविण्यासाठी तर शिलालेख, ताम्रपट व नाणी हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. विजयनगर काळात चार प्रकारचे आलेख होते. 'शासनम्', 'जयपत्रम्', 'आज्ञापत्रम्' आणि 'प्रज्ञापत्रम्'. साधारणत: जमीन दान देण्यासाठी शासनम् दिले जात असे. यांची नोंद दगडांवर, भिंतीवर अथवा ताम्रपटावर केली जात असे. कायदेशीर बाबींमध्ये दिलेले निर्णय जयपत्रम्मध्ये, सरकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या राजाज्ञा आज्ञापत्रममध्ये, प्रज्ञापत्रममध्ये राजाचे जाहीरनामे, तर ताम्रपटात केलेल्या दानधर्माचा उल्लेख आढळतो. ताम्रपटात दान देणाऱ्याचे नाव, ठिकाण, त्याची वंशावळ, दानाचे स्वरूप, दान घेणाऱ्या व्यक्तीचे नाव इत्यादीचा उल्लेख आढळतो. प्राचीन भारताच्या तुलनेत सुलतानशाहीमधील ताम्रपट फार कमी संख्येने आढळतात.

**६) नाणी:**

पुरातत्वीय वस्तुमध्ये अधिक खात्रीशीर व विश्वसनीय साधन म्हणून नाण्यांचा अथवा विविध मुद्रांचा उल्लेख केला जातो. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या इतिहास लेखनासाठी 'नाणी' महत्वाची भूमिका बजावतात. समकालीन विविध राजकीय राजवटीचा पुरावा म्हणून नाणी इतिहासलेखनात साधन म्हणून वापरली जातात. सन १२ व्या शतकात काल्हणाने आपल्या 'राजतरंगिणी' मध्ये नाण्याचा वापर इतिहासाचे साधन म्हणून सर्वप्रथम केला. 'नाणकशास्त्रात' नाण्याचा शास्त्रशुध्द अभ्यास केला जातो. सन १७९० मध्ये भारतीय नाण्यांचे अध्ययन करण्यास सुरवात झाली. सन १८२४ मध्ये कर्नल टॉड ह्याने नाण्यांविषयी एक लेख प्रकाशित केला. कर्नल व्हेन्चुरा व चार्लस मॅसन यांनी अनेक नाणी जमा केली. सन १८३७ साली विल्सन ह्याने भारतीय नाण्यांची एक यादी केली तर कर्नल टॉमसने सन १८५८ मध्ये जॉन प्रिन्सेपचे 'एसेज ऑन इंडियन अँटिक्विटिक्स' संपादित करून भारतीय नाणकशास्त्रात मोलाची भर घातली. अलेक्झांडर कनिंगहॅम ह्याने नाणकशास्त्राचा पाया घातला. सन १८८६ मध्ये एलियटचा 'कॉइन्स ऑफ सदर्न इंडिया' व सन १८९७ मध्ये रॅपसनचा 'इंडियन कॉइन्स' हे ग्रंथ प्रकाशित झाले. भारतामध्ये सन १७८४ मध्ये स्थापन झालेल्या एशियाटीक सोसायटी ऑफ बेंगाल या संस्थेने भारतीय नाणकशास्त्राचा पाया घातला. यानंतर भारतीय नाण्यावर संशोधन सुरु झाले. यापैकी इलिटने 'द कॉइन्स ऑफ सदर्न इंडिया' हे भारतीय नाण्यावरील पहिले पुस्तक लिहिले. भारतीय संशोधकांच्या पैकी सी. आ. सिंघल, प्रो. ए. एस. आळतेकर, डॉ. के. पी. जायस्वाल, वि. वा. मिराशी, डॉ. परमेश्वरीलाल गुप्ता, डॉ. डी. डी. कोसंबी यांनी नाणकशास्त्रावर अभ्यास केला आहे.

भारतामध्ये 'आहत नाणी' (Punch Marked Coins) कुशाण, सातवाहन, गुप्त, सुलतान, मुघल, मराठा व ब्रिटिश याशिवाय विविध प्रांतातील छोट्या-मोठ्या सत्ताधिशांची तांब्याची, रुप्याची, सोने, चांदी, पितळ इत्यादी प्रकारातील नाणी सापडतात. प्राचीन भारताचा विचार केल्यास अनेक राजांचे अस्तित्व केवळ त्यांच्या नाण्यामुळे सिध्द झालेले आहे. इण्डो-ग्रीक, शक, पर्शियन, कुषाण, क्षत्रप इत्यादी राजवंशाची ओळख किंवा काहीसा इतिहास त्याच्या नाण्यामुळे समोर आलेला आहे. प्राचीन भारतीय नाण्याचे वैशिष्टये म्हणजे जो राजा गादीवर आला त्याच्या नावाबरोबर तो कोणाच्या नंतर गादीवर आला. त्यांचे नाव कोरलेले

आढळते. नाण्यावर राजाचे नाव, वडिलाचे अथवा आईचे नाव त्यांची बिरुदे छापली गेली असल्याने प्राचीन भारतीय राज्याची काळानुरूप सुसंगती लावणे सोप गेलेले आहे.

ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मुस्लिम राज्यकर्त्यांच्या नाण्यांचा अभ्यास केलेला. यामध्ये जे. डब्ल्यू लेड्ले, हेन्री टॉमस कोलब्रुक यांनी बंगालमधील सुलतानांच्या नाण्यांचा अभ्यास केलेला आहे. विल्सन व रॉजर्स यांनी आदिलशाही सुलतान आणि मलबारचे मुस्लिम राजे यांच्या नाण्यांविषयी संशोधन प्रकाशित केले. जी. पी. टेलर ह्याने गुजराथमधील सुलतान, कॉडरिंग्टन व गिब्ज बहामनी सुलतानांच्या नाण्यांचा अभ्यास केला आहे. सी. जे. रॉजर्स, के. एन्. दीक्षित, राजेंद्रलाल मित्र, सी. आर्. सिंघल, व्ही. एस्. अग्रवाल, आर्. बर्न, एच. ए. शेखानी, एम्. ए. वलीखान, पी. एम्. जोशी इत्यादींचे मुस्लिम नाण्यांच्यावरील संशोधन महत्त्वाचे आहे. सन १८७१ मध्ये टॉमस ह्याने लिहिलेला 'कॉनिकल्स ऑफ द पठाण किंग्ज ऑफ देल्ही' हा प्रबंध प्रसिद्ध केला. सन १९०४ मध्ये 'द नुमिस्मॅटिक सप्लीमेंटस् ऑफ द जर्नल ऑफ एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' ही पत्रिका सुरू झाली. सन १९१० मध्ये 'द नुमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया' ही संस्था स्थापन झाली. 'द नुमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेने केलेले 'कॉपर्स ऑफ इंडियन कॉइन्स' या अनेक खंडात्मक ग्रंथाच्या प्रकाशनाचे काम महत्वपूर्ण आहे. ग. ह. खरे यांनी 'मंडळातील नाणी' हा ग्रंथ प्रकाशित केलेले असून त्यांनी दिल्ली सुलतानशाहीची काही नाणी प्रकाशित केलेली आहेत.

मध्ययुगीन कालखंडात दिल्लीचे सुलतान, विजयनगरचे सम्राटांचे विविध धातूंची नाणी उपलब्ध होतात. या नाण्यांवरून राजांची किंवा त्याच्या कालखंडाची, त्याच्या साम्राज्यविस्ताराची, धार्मिक जीवनाची, आर्थिक स्थिती व चलनपद्धती, राजघराणे, धर्म, देवता, प्रतीके, बिरुदे यावर प्रकाश टाकणे शक्य होते. याशिवाय नाण्यावर कोरलेल्या विविध प्रतिमा, केशरचना, वेशभूषा, भाषा, लिपी व धातू इत्यादी संबंधीवर प्रकाश टाकल्यास मदत होते. या कालखंडातील नाणी आकार-प्रकारातील विविधता, उच्च दर्जा व कलात्मकता या दृष्टीने अत्यंत समृद्धी होती. सुलतानशाहीमध्ये अनेक मुस्लिम शासकांनी गादीवर येताच स्वत:ची नाणी प्रचारात आणली होती. सुलतानांच्या नाण्यांवर पहिल्या चार खलिफांची आणि त्यांच्या समकालीन, खलिफांची नावे कोरलेली दिसतात. शिवाय सुलतानाचे नाव, नाणे पाडलेले वर्ष आणि टांकसाळीचे शहर यांचा उल्लेख केलेला आहे. यावरून सुलतानाच्या गादीवर येण्याचे वर्ष, त्याचा साम्राज्यविस्तार, त्याचे नाव, खलिफाशी असलेले त्याचे संबंध, शेजारील देशांशी असलेले त्याचे संबंध अशी बरीच माहिती मिळते.

अल्तमशने प्रथम रुप्याची नाणी 'टंका' पाडण्यास सुरुवात केली. अल्तमश स्वतंत्र सार्वभौम राजा होता हे जरी खरे असले तरीही तो घटनात्मकदृष्ट्या खलिफाच्या अधिपत्याखाली होता, हे त्याच्या सन १२२८ नंतरच्या नाण्यांवरून समजते. त्यानंतर मुस्तन्शीर या बगदादच्या खलिफाकडून अधिकारपत्र स्वीकारल्यानंतर खलिका नाव असलेली नाणी पाडण्यास सुरुवात केली. अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिण भारताच्या स्वारीमधून जी लूट आणली त्यामधून सोन्याची नाणी पाडली. अल्लाउद्दीनसारखा बलवानसुद्धा स्वत:ला 'खिलाफतीचा उजवा हात' म्हणवून घेत असल्याचे त्याच्या नाण्यांवरून समजते. मात्र कुतुबुद्दीन मुबारक याने खलिफाचे वर्चस्व नाममात्र झगारून दिले आणि तो स्वत:लाच इस्लामचा सर्वश्रेष्ठ प्रमुख, स्वर्ग आणि पृथ्वीवरील

ईश्वराचा प्रतिनिधी आणि सर्वश्रेष्ठ इमाम असे संबोधून घेवू लागला. मुहम्मद बीन तुघलकाने प्रथम खलिफाचे वर्चस्व झुगारून दिले होते मात्र पुन्हा आपल्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात नाण्यांवर खलिफाचं नाव छापण्यास सुरुवात केली हे त्यांच्या नाण्यावरून समजून येते.

विविध धातूच्या नाण्याच्या उपलब्धतेवरुन तत्कालीन राजाची आर्थिक परिस्थिती लक्षात येते. एखाद्या राजाची नाणी कोण-कोणत्या प्रदेशात अथवा देशात सापडतात. त्यावरून त्या राज्याचा साम्राज्य विस्तार, नाण्याचे विनीमय मुल्य व परकीय व्यापार कशा प्रकारचा असावा यावरही प्रकाश पडतो. राजाचे अथवा बादशहाचे नाव, वडिलांचे नाव, नाणे पाडल्याचे वर्ष, काही वेळा महिना, ज्या ठिकाणी नाणे पाडले त्या टांकसाळीचे नाव मिळते. नाण्यामुळे राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखालील प्रदेश, ठिकाण, हिजरी वर्ष याची माहिती संबंधित मिळते. जेव्हा एक नवा राज्यकर्ता गादीवर येत असे तेंव्हा असा प्रघात होता की, शुक्रवारच्या नमाजमध्ये त्याचे नाव घेऊन नमाजप्रसंगी खुतबा पठण केले जात असत. इस्लाम धर्मियांतील प्रजेला आजपासून नवा राजा झाला याची माहिती होत असत तर इतर धर्मियांना देखील ही माहिती व्हावी म्हणून लगेचच त्या राजाच्या नावाची नाणी पाडली जात आणि व्यवहारासाठी प्रचलित केले जात. त्यामुळे इतर प्रांतीय राज्यकर्त्यांना देखील याची माहिती होत असे. तत्कालीन काही नाण्यांवर कुराणातील धर्म प्रार्थना कलीमा, चार खलिफांची नावे पहावयास मिळतात. मात्र ही प्रथा औरंगजेबच्या काळापासून बंद करण्यात आली. नाण्यावर येणारे विविध चिन्ह संस्कृतीचे प्रमाण ठरतात तसेच राजाचे चित्र, विविध राशींवर आधारीत काढलेली नाणी (जहाँगीरच्या) काळातील पहावयास मिळतात तर अकबराची असिरगड, आग्रा येथून पाडलेल्या नाण्यांवर पक्ष्यांची चित्रे पाहावयास मिळतात. १६ जुलै ६२२ पासून प्रामुख्याने हिजरी कालगणना वापरस सुरवात झाल्यामुळे नाण्यांवरदेखील हिजरी सन पहावयास मिळते. ज्या दिवशी मोहम्मद पैगंबर मक्केहून मदीनेस (सन ६२२) गेले त्या दिवसापासून या काळाची गणना सुरु झाल्याने हे वर्षासन मुस्लीम शासकाच्या व तसेच इतर राज्यकर्त्यांनी मुस्लीम बादशहाच्या नावाने पाडलेल्या नाण्यांवर आढळते.

मुघल कालखंडात हुमायूनपासून सर्वच मुघल सम्राटांनी सोने व चांदीची नाणी पाडल्याचे दिसून येते. मुघल काळात सोने, चांदी व तांबे इत्यादी विविध प्रकारची नाणी पाडण्यात आली. बाबर व हुमायून यांच्या कारकिर्दीतील 'शारूखी' व 'दिरहम' ही चांदीची नाणी होती. हुमायूनच्या कारकिर्दीपासून सोन्याच्या नाण्याचा वापर झाल्याचे दिसते, अर्थात ती वजनाने लहान होती. शेरशहाने रुपया हे चांदीचे नाणे तर दाम व टंका हे तांब्याचे नाणे सुरू केले. आधुनिक भारताला शेरशहाने दिलेली देणगी म्हणजे रुपया हे नाणे होय. मुहर हे मुघल कालीन सोन्याचे नाणे प्रसिद्ध असून विशेषतः जहांगिराच्या काळातील मुहरा या अतिशय आकर्षक होत्या. शेरशहाने सुरू केलेल्या दाम व टंका या नाण्यांना अनुक्रमे 'फुलस' व 'टंका -ए- अकबरशाही' असे नाव देण्यात आले. मुघल सम्राट जहागीरच्या काही नाण्यावर त्याच्या नावाबरोबर त्याची पत्नी नूरजहाँचेही नाव कोरलेले आढळते. अकबराच्या काही नाण्यांवर बदकाचे तर काही नाण्यांवर 'राम-सीता' यांचे चित्र कोरले आहे. जहागिराच्या काही नाण्यांवर मेंढा, काही नाण्यांवर सूर्य, राशीचक्र इत्यादी प्रतिमा आढळतात. शहाजहान व औरंगजेबाच्या कारकिर्दीत नाण्यांचा दर्जा घसरल्याचा दिसतो. या काळात मुहर, रुपया व निसार ही नाणी अस्तित्वात होती.

विजयनगरमधील राजांच्या सोन्याच्या नाण्यांवरून त्यांच्या आर्थिक भरभराटीची कल्पना येते. नाण्यावरील नावे, देवदेवतांची चिन्हे, बिरुदावल्यावरून त्यांचा राज्यविस्तार, धार्मिक श्रद्धा याविषयी माहिती मिळते. विजयनगरच्या सोन्याच्या वराह नाण्यांबरोबरच लहान नाणीही पाडलेली होती. त्यावरून त्यांच्या राज्यात व्यापार भरभराटीत होता आणि व्यापारातील अनेक लहान मोठे व्यवहार करण्यासाठी छोट्या किमतीची नाणी उपयुक्त होती हे लक्षात येते. विजयनगरच्या प्रारंभीच्या नाण्यांवर कानडी व नागरी लिपीतील लेख आहेत. उत्तरार्धाच्या काळात मात्र नाण्यांवर फक्त नागरी लेख आढळतात. मदुरा आणि बहामनी सुलतानांची नाणीही सापडली आहेत. त्यांची नाणी दिल्ली सुलतानांच्या नाण्यांप्रमाणेच होती. त्या राज्यांची आर्थिक, राजकीय, धार्मिक माहिती समजण्यास ही नाणी महत्त्वाची आहेत.

**७) वस्त्रे, धातू कलावस्तू:**

मुघल काळात ओरिसा, बंगाल, गुजरात, ख्बायत, बुराहणपूर, लाहोर, जौनपूर, अलाहाबाद, बनारस, पाटणा, अवध, ढाक्का, लखनौ इत्यादी कापडनिर्मिती केंद्र होती. विशेष प्रकारच्या रेशीम कापडासाठी पैठण, आग्रा, खंबायत ही शहरे प्रसिद्ध होती. लाहोर मधील 'ओर्मेसिन' आणि 'मच्छिवारा वाफ्ता' हे कापड प्रकार प्रसिद्ध होते. सरहिद येथे लालशालू आणि चिटाचे कापड तयार होत होते. बनारस येथील ङ्गमिरीरकुलफ हे कापड प्रसिद्ध होते. अकबराने लोकर उत्पादनाला उत्तेजन दिलेले दिसते. आज मुघल काळातील कोणत्याही स्वरूपाची वस्त्रे प्राप्त होत नसली तरी तत्कालीन चित्रावरून याची माहिती प्राप्त होते. भारतातील वेगवेगळ्या प्रांतांत भिन्न प्रकारची वेशभूषा अस्तित्वात होती. कपड्यावरून व्यक्तीचा समजतील दर्जा कळून येतो. विविध प्रथा, परंपरा, सण-उत्सव यातील वैविध्य वस्त्रांवरून समजून घेण्यास मदत होते. विविध स्तरातील स्त्री-पुरुष यांच्यातील विविध वस्त्र प्रकार याचे आकलन होते.

मुघल काळात स्त्रियांबरोबरच सर्व स्तरातील व्यक्ति, मुघल सम्राट आणि अमीर-उमरावाना विविध प्रकारच्या दाग-दागिण्याची हौस होती. शिरोपेच, अंगठ्या, हातकंडे, कमरपटे, पैजण, कंगन, बाजूबंद, माळ, मोत्यांचे हार, रत्नांचे हार, नथ, बाजूबंद, बाहुभूषण इत्यादी प्रकारच्या अनेक दाग-दागिन्यांनचा समावेश होतो. अकबर, जहांगीर व शाहजहान या सम्राटांच्या काळात धातुकाम मोठ्या प्रमाणात चालू होते. वस्त्रकाम अकबर व जहांगीर यांच्या काळात अधिक झाले. मध्य आशियात सापडणाऱ्या, विविध रंगांच्या छटा असलेल्या, मात्र पांढऱ्या व गडद हिरव्या पारदर्शक हरितमण्याच्या दगडांतून जडावकामाच्या साहाय्याने विविध वस्तू तयार केल्या जात. ह्या दगडाचा पृष्ठभाग घोटून गुळागुळीत करून त्यावर कोरीवकाम केले जाई. अधिक प्रमाणात कोरून त्यामध्ये सोने मौल्यवान खडे विशिष्ट पद्धतीने जडवून अलंकरण केले जात. उदा. हुक्कापात्र, मद्यपात्र, झुंबर, हत्यारांच्या मुठी, गुहोपयोगी वस्तू इत्यादीचा समावेश होतो. या वस्तूंचे आकार आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण असत. पिंपळपान, गुलाबपुष्प आदी आकारांत घडवलेली जहांगीरकालीन मद्यपात्रे अतिशय मनोहारी आहेत. वेगवेगळ्या प्राण्यांची शीर्षे त्याकाळच्या हत्यारांच्या मुठीवर कोरलेली आढळतात. त्यांत हत्ती, घोडा, वाघ, बोकड इ. प्राण्यांचा समावेश आहे. दिल्ली व हैदराबाद येथील वस्तुसंग्रहालयांत या जडावकामातील महत्त्वाच्या वस्तू, तसेच मीनाकारीतील वैशिष्ट्यपूर्ण वस्तू प्रदर्शित केलेल्या दिसतात. मीनाकारीची कला सोने, चांदी व पितळ या धातूंवर केली जात असे. हैदराबादजवळील

बीदर जिल्ह्यात बीदरीकाम म्हणून नावारूपाला आलेली या तंत्राची खास अशी पद्धती विशेष उल्लेखनीय आहे. बीदरीकामाचा वापर करून सुरया, फुलदाण्या, दागिन्यांच्या पेट्या, अत्तरदाण्या, पानसुपारीची तबके, अशा विविध वस्तू घडविल्या जात. या वस्तूंना मोर, बदक, गुलाबपुष्प असे विविध मोहक आकार देत. गोलाकार, वाटोळ्या, घंटाकृती इ. विविध आकारांतही काही वस्तू बनवल्या जात. लघुचित्रणाच्या कामात जसे तीनचार चित्रकार एकाच चित्रावर काम करीत, तसेच या कामातही एकाच वस्तूवर तीनचार कारागीर काम करीत.

**८) बाग–बगीचे व कालवे:**

मुघल कालखंडात अनेक बाग–बगीचे तयार करण्यात आले. यावर पर्शियन बागांचा प्रभाव जाणवतो, याला चारबाग पद्धती म्हणतात. मुघल बादशहांनी दिल्ली, आग्रा आणि इतर ठिकाणी फळा–फुलांच्या बागा लावल्या. जहांगीर बादशहाने काश्मीरमध्ये 'शालिमार उद्यान' 'निशांत बाग' निर्माण केली. दिल्ली मधील 'हुमायूँ का मकबरा बाग', आग्रा मधील ताजमहाल बाग, आर्म बाग, मेहेताब बाग, रामबाग, जहराबाग, पिंजोर मधील यादवेन्द्र बाग, इलाहाबाद मधील खुसरो बाग इत्यादींचा उल्लेख करता येईल. शहाजहान द्वारा निर्मित 'अंगुरीबाग' प्रसिद्ध आहे. मुघल बादशहांच्या बरोबर राजस्थानमधील राजपूत राजांनी जोधपूर, उदयपूर, बिकानेर आणि जयपूर इत्यादी ठिकाणी अनेक बाग– बगीचे तयार केले. या काळात कालवे व बंधारे बांधून शेतीला व जनतेला पाणीपुरवठ्याची सोय केली जाई. पंजाब, सिंध, लाहोर, गोवळकोंडा इत्यादी ठिकाणी तलाव बांधून शेतीला पाणीपुरवठ्याची सुविधा पुरवण्यात आल्याचे उल्लेख मिळतात. मेवाड मधील 'धेवर' सरोवर प्रसिद्ध होते. शहाजहान व जहांगीरच्या कालखंडात तलाव निर्मितीवर भर देण्यात आला. शहाजहानने रावी नदीपासून लाहोरपर्यंत ९८ मैल लांबींचा कालवा काढला. शहाजहानने 'नहर– ए–साहिब' हा फिरोज तघुलकाचा कालवा दुरुस्त करून त्याची लांबी पुढे ६० मैल वाढविली. त्याचे नूतनीकरण करून 'नहर–ए–शाह' असे त्याचे नामकरण केले होते. सन १६१५ मध्ये बरहानपूर येथे तब्कुतुल अर्ज याने बांधलेला कालवा प्रसिद्ध आहे. मुघल काळातील बाग–बगीचे, धरणे व कालवे काही उत्तम स्थितीत तर काही अवशेषरूपाने पहावयास मिळतात. तत्कालीन मुघल कालखंडाच्या इतिहासलेखनासाठी ही सर्वांत विश्वसनीय समजली जाते. या वरुन इतिहास संशोधकास तत्कालीन बांधकाम कला, स्थापत्य तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, शेती पद्धती, आवड–निवड, अभिरुचि इत्यादीवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**९) शस्त्रास्त्रे व अवजारे:**

पुरातत्वीय साधनांच्या मध्ये विविध प्रकारची शस्त्रास्त्रे आणि शेतीची अवजारे यांचा समावेश होतो. भारत आणि परदेशातील विविध वस्तुसंग्रहालयांच्यामध्ये शस्त्रास्त्रे आणि अवजारे पाहावयास मिळतात. तत्कालीन युद्धशास्त्राचा आणि शेतीचा अभ्यास करण्यासाठी ही साधने महत्वाची आहेत. बाबराने पानिपतच्या युद्धात पहिल्यांदाच तोफाचा वापर केला, बंदुकांचा वापर सुरू झाला. पारंपरिक युद्धं शास्त्रात खूप मोठ बद्दल घडून आला. किल्ला स्थापत्य शास्त्रात झालेला बदल आणि शास्त्रास्त्रे याचा या वस्तु अवषेशावरून अभ्यास केला जावू शकतो, त एक महत्वाचे साधन आहे. मुघल काळातील ढाल, तलवार,

भाला, धनुष्यबाण, कट्यार, खंजीर, दांडपट्टा, सुरा-बरचा, वाघनखे, बंदुका, तोफा, जिरेटोप, चिलखत, शिंगाडा इत्यादीसारखी अनेक शस्त्रास्त्रे पहावयास मिळतात. या शस्त्रास्त्राच्याद्वारे तत्कालीन लढाईमध्ये कोणकोणती शस्त्रे वापरली असून त्या लढाईचे तंत्र कसे होते यावरही प्रकाश टाकता येतो. मुघलकालीन शेतीशी संबंधित विविध आवजारांच्यावरून शेती पद्धतीचा अभ्यास केला जावू शकतो.

**१०) गुहाचित्रे (चित्रकला):**

मानवी भावनांच्या अभिव्यक्तीचे एक साधन म्हणून आपल्या मनातील भाव-भावनांचे सुंदर चित्रण दगड धातू, गुहा व लाकडावर कोरीव अथवा रंगाच्या माध्यमातून चित्रे रेखाटलेली दिसतात. आदिमानवाला भाषा येण्यापूर्वी तोंडातील स्वरांनी केवळ विकारच दर्शविता येत असावेत. मानवी बुध्दीच्या विकासाबरोबर त्याला विचाराचीही अभिव्यक्ती करण्याची गरज वाटली असावी. शब्दशुन्य विचार आकाराने व्यक्त करता येतो. जेथे शब्द नसतो किंवा शब्दच संपतो तेथे कलेचा प्रारंभ होतो. भाषेचा विकास होण्यापूर्वी स्वाभाविकपणे मानव कलेकडे वळला. मानवी संस्कृतीच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी गुहाचित्रे अथवा चित्रकला हे प्रमुख साधन आहे.

अश्मयुगीन मानव ज्यावेळी डोंगराच्या टेकडाच्या आश्रयाने राहत होता. त्या ठिकाणी त्याच्या प्रतिमेचे आणखी एक स्कूरण दिसले ते म्हणजे डोंगराच्या गुहामधून रंगविलेली किंवा कोरलेली गुहाचित्रे मध्यप्रदेश, कर्नाटक व आंध प्रदेशातील प्राचीन गुहामध्ये अतिप्राचीन चित्रकलाकृती रेखाटलेली आहेत. यामध्ये सिधनपूर, आदमगढ, चक्रधरपूर, मिर्झापूर, लघुनिया, भलदारिया, विजयगढ, पंचपदी, भीमदेखा इत्यादी ठिकाणी आहेत.

मौर्य काळात हिनयान पंथीय चित्रकलेचा विकास झालेला दिसतो. अजंठा, पितळखोरे, भाजे, कार्ले इत्यादी शैलगृहातील चित्रकलाकृतीचा यामध्ये समावेश होतो. गुप्तकाळात महायान पंथीय चित्रकलाकृतीचा विकास झालेला दिसतो. अंजिठा व बाघा लेण्यामधील महायान पंथीय चित्रकाम विशेष प्रसिध्द आहे. या चित्रकलेच्या माध्यमातून विविध प्रकारची पाने, फुले, पक्षी, प्राणी, मानवी हावभाव, आचार-विचार, वेशभूषा व केशरचना इत्यादी बरोबर विविध रूपकात्मक कथाच्यावर प्रकाश पडतो. गुहाचित्रापासुन सुरु झालेला चित्रकलेचा विकास आजतागायत पहावयास मिळतो. यामध्ये विविध प्रवाह दिसतात. या मध्ये जैनकला, राजपूत कला, कांग्रा चित्रशैली, गढवाल कला, मुघल शैली व मराठा शैली इत्यादी समावेश होतो.

**११) नकाशे:**

इतिहासलेखनासाठी व ऐतिहासिक घटना विशद करण्यासाठी नकाशांचा उपयोग होतो. ए. ए. मिलर यांन 'The Dissection Analysis of Maps' या ग्रंथात नकाशाचे महत्व विशद करताना म्हणतात की, "I refer to the map as a tool in reality it is a whole bag of tools, containing more ingenious devices than boy scouts knife and if property Used it will open almost any geographic problem'' वरील विधानावरुन नकाशाचे महत्व लक्षात येते. रोमन संस्कृतीच्या काळात

नकाशे तयार करण्याच्या तंत्रात प्रगती झाली. टॉलेमीने लिहिलेल्या 'जिऑग्राफिया' या ग्रंथात विविध नकाशे पहावयास मिळतात. भारताचा पहिला नकाशा टॉलमीने रेखाटला, त्यानंतर सर थॉमस रो यांने मुघल साम्राज्याचा नकाशा काढला. भारताचा पहिला अधिकृत नकाशा सन १७५२ मध्ये डी-ॲनव्हील यांने काढला. ब्रिटिश काळात 'सर्वे ऑफ इंडिया' या विभागाची स्थापना झाली. त्यांच्या मार्फत अधिकृत नकाशे तयार केले जाऊ लागले. कर्तोग्राफी (Cartography) या विषयामध्ये नकाशा शाखाचा अभ्यास केला जातो.

विविध काळात तयार झालेल्या नकाशावरून तत्कालीन भौगोलिक माहितीचे आकलन होण्यास मदत होते. ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावत असताना भौगोलिक घटक खूप महत्वाचे असतात. एका अर्थानि विविध भौगोलिक घटकांचा इतिहासावर प्रभाव पडलेला दिसतो. कारण ज्या भागात जे भौगोलिक वातावरण असते. त्या वातावरणानुसार तेथील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, व राजकीय जडणघडण होत असते. एखाद्या संस्कृतिचा किंवा साम्राज्याचा उदय किंवा अस्त हा तेथील भौगोलिक परिस्थितीमुळे झालेला दिसतो. त्यामुळे नकाशे तेथील भौगोलिक परिस्थिती विशद करण्यासाठी सहाय्यभूत ठरतात.

**※ स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

**रिकाम्या जागा भरा.**

१) प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांचे ......... आत्मचरित्र आहे.

२) मध्ययुगीन काळात आलेला मोरोक्कन प्रवासी इब्ज बतुता यांने ......... पुस्तक लिहिले आहे.

३) सन १८६१ मध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याची स्थापना ......... यांनी केली.

४) उत्खननात प्राप्त मानवी व प्राण्याचे सांगाडे यावर ........... रासायनिक प्रक्रिया केली जाते.

५) एशियाटीक सोसायटीने प्राचीन भारतीय शिलालेख ताम्रपट व जुनी हस्तलिखिते याचा अभ्यास करण्यासाठी सन १७८८ मध्ये ......... नावाचे नियतकालिक सुरु केले.

६) वा. सी. बेंद्रे यांनी शिलालेखावर आधारित ............... हा ग्रंथ लिहिला आहे.

७) हनमकोंडा येथील हजार खांबांचा शिलालेख ............ भाषेत आहे.

८) कॉनिकल्स ऑफ द पठाण किंग्ज ऑफ देल्ही हा ग्रंथ ........... यांनी लिहिला आहे.

९) द नुमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था ............ मध्ये स्थापन झाली.

१०) भारताचा पहिला अधिकृत नकाशा ......... मध्ये डी-ॲनव्हील यांने काढला.

## १.२.२ साधनांचे संकलन: पुराभिलेखीय साधने, सर्वेक्षण, प्रश्नावली, वर्तमानपत्रे व इंटरनेट

(Data collection: Archives/Record Office, Survey, Questionnaires, Newspapers, Internet)

**साधन संकलन:** (Data Collection)

ऐतिहासिक संशोधनामध्ये संशोधांनाची पहिली अथवा महत्वाची पायरी म्हणजे संशोधनपूरक माहितीचे उद्दिष्टपूर्ण संकलन अर्थात साधन संकलन हे आहे. कोणत्याही संशोधनामध्ये साधन संकलन ही एक महत्त्वाची पायरी आहे. जाम केलेली साधने अचूक, विश्वसनीय, संबंधित व उचित नसेल तर संशोधक अचूक निष्कर्ष काढू शकत नाही अथवा तो आपल्या उद्दिष्टपूर्ती पर्यंत पोहचू शकत नाही. ऐतिहासिक संशोधन हे साधन संकलनावर आधारलेले असते. साधन संकलनासाठी संशोधकाला सर्वकश जाणीव, अनुभव व आपल्या संशोधन विषयाच्या ज्ञानाची आवश्यकता असते. कोणत्याही संशोधनासाठी साधने जमा करत असताना संशोधक हा सतत तत्पर, संवेदनशील, खबरदार व अटकळीचा वापर करणारा असला पाहिजे. ऐतिहासिक संशोधनासाठी प्रामुख्याने दोन प्रकारात साधनांची वर्गीकरण केले जाते. प्राथमिक साधने व दुय्यम साधने. साधारण: साधनांची व्याख्या खालील प्रमाणे केली जाते.

१) ज्या विशिष्ट घटनेचा अथवा विषयाचे संशोधन अथवा अभ्यास चालू आहे, तिच्या विषयीची आकडेवारी व तथ्य म्हणजे साधन अथवा सामुग्री होय.

२) साधन म्हणजे तथ्य किंवा वस्तुस्थितीचे असे संकलन की ज्याची व्यवस्थित रचना नसते, मात्र त्याची व्यवस्थित व सूत्रबद्ध रचना करता येते.

प्रस्तुत उपघटकामध्ये आपण इतिहासलेखांनासाठी सहय्याभूत असलेली पुराभिलेखीय साधने व त्याचे स्वरूप, सर्वेक्षण पद्धती, प्रश्नावली या पद्धतीची तोंड ओळख करून घेणार आहोत. याशिवाय इतिहास लेखनासाठी वर्तमानपत्रे व इंटरनेट याची उपयुक्तता व साधन संकलन त्याची उपयुक्तता आणि मर्यादा काय आहे हे जाणून घेणार आहोत.

### अ) पुराभिलेखीय साधने:

इतिहासलेखनासाठी प्राथमिक संदर्भ साधने मिळण्याचे खात्रीशीर ठिकाण म्हणून पुराभिलेखागार ओळखले जाते. पुराभिलेखागारामध्ये विविध प्रकारची हस्तलिखिते, जुने दुर्मिळ ग्रंथ, विविध शासकांची कागदपत्रे, हिशेबाची दफ्तरे, शासकीय कागदपत्रे, सरकारी अहवाल, गॅझेट, विविध वृत्तपत्रे इत्यादीचे व्यवस्थित जतन व संवर्धन केलेले असते. पुराभिलेखागार म्हणजे पुरातन अथवा जुने उपयुक्त अभिलेख म्हणजेच दस्तऐवज किंवा कागदपत्रे ठेवण्याचे ठिकाण. ऐतिहासिक दस्तऐवज, राज्यकारभाराची कागदपत्रे, हिशेबाची कागदपत्रे ज्या ठिकाणी जतन करून ठेवली असतात त्याला दप्तरखाना (Record Office) किंवा पुराभिलेखागार (Archives) असे म्हणतात. पुराभिलेखागारामधील ही साधने प्रकाशित अथवा अप्रकाशित स्वरूपामध्ये असतात. पुराभिलेखागारामधील ही साधने मूळ अस्सल, प्राथमिक दर्जाची असतात. या

साधनांच्या आधारे केलेले संशोधन अत्यंत विश्वसनीय व दर्जेदार मानले जाते. भारतातील विविध राज्यातील पुराभिलेखागारांच्यामध्ये विविध कालखंडातील कागदपत्रे सद्यस्थितीत उपलब्ध होतात. यामध्ये विविध राजकीय कागदपत्रांच्या बरोबरच संस्थानी राज्यकर्ते, विविध आदेशपत्रे, गुप्त पत्रव्यवहार, लष्करी हालचाली, दळणवळण, शेती, पाणीपुरवठा, नागरी सुविधा, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, रस्ते, धरणे, बंदरे,जमिनीची कागपत्रे, इत्यादी संबंधीची माहिती उपलब्ध होण्यास मदत होते.

**दफ्तरखाने अथवा पुराभिलेखागाराचे प्रकार:**

पुराभिलेखागार अथवा दप्तरखान्याचे विविध स्तरावर जतन व संवर्धनाचे कार्य चालू आहे. पुराभिलेखागारांचे प्रामुख्याने पुढील प्रकार आहेत.

१) शासकीय पुराभिलेखागार

२) निमशासकीय पुराभिलेखागार,

३) संशोधन संस्था पुराभिलेखागार

४) विद्यापीठ/महाविद्यालय पुराभिलेखागार/दप्तरखाने

५) खाजगी पुराभिलेखागार अथवा दप्तरखाने

६) देवस्थान दप्तरखाने

७) व्यवसाय अथवा औद्योगिक पुराभिलेखागार

**भारतातील प्रमुख पुराभिलेखागार:**

भारतामध्ये ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर दप्तरखाना अथवा पुराभिलेखागाराकडे लक्ष देण्यास सुरूवात केली. भारताची राज्यकारभाराच्या सोयीसाठी बंगाल, मद्रास, मुंबई असे चार प्रांत केले. त्या-त्या प्रांताच्या ठिकाणी त्यांनी आपले दप्तरखाने स्थापन केले. ब्रिटिशांनी मद्रास येथे सन १८१८ मध्ये पहिल्या पुराभिलेखागाराची स्थापना केली. पुढे सन १९१९ मध्ये कलकत्ता, सन १८२१ मध्ये मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना केली. प्रारंभी ब्रिटिशांनी कलकत्ता ही भारताची राजधानी म्हणून केलेली होती. याच ठिकाणी त्यांनी सन १८९१ मध्ये 'इंपिरियल रेकॉर्ड ऑफिस' ची स्थापना करून त्याचे प्रमुख म्हणून डॉ. जी. डब्ल्यू. फॉरेस्ट यांची नेमणूक केलेली होती. भारतात ब्रिटिशसत्ता जस-जशी दृडमूल होत गेली तशी नागपूर, लाहोर, पाटणा, अलाहाबाद, गोहत्ती, कटक, श्रीनगर याठिकाणी नवीन पुराभिलेखागारांची स्थापना केलेली दिसते. सध्या भारतात केंद्रीय पुराभिलेखागारांच्या शिवाय राजस्थान २१, महाराष्ट्र ५, मध्यप्रदेश ५, उत्तर प्रदेश २, केरळ २, गुजरात २ तर बाकी राज्यात प्रत्येकी एक पुराभिलेखागार आहेत. राजस्थानमधील बिकानेर येथील पुराभिलेखागार सर्वात मोठे आहे.

## १) दिल्ली राष्ट्रीय पुराभिलेखागार:

दिल्ली राष्ट्रीय पुराभिलेखागाराची स्थापना ११ मार्च १८९१ रोजी कलकत्ता येथे प्रथम झाली होती. पुढे १९११ मध्ये नवी दिल्ली येथे त्याचे स्थलांतर करण्यात आले. या पुराभिलेखागारामध्ये सन १८५७ च्या उठावापूर्वीचे व नंतरचे असे कागदपत्रांचे दोन भाग आहेत. ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकार या दोघांचेही कागद आहेत. याची संख्या २.७ मिलियन इतकी आहे. यातील बरीच कागदपत्रे सध्या ऑनलाइन स्वरुपात उपलब्ध आहेत. हे कागद मुख्यतः फार्सी, उर्दू, हिंदी, मराठी, संस्कृत, बांगला या भाषांत आहेत. पैकी फार्सी भाषेतील काही कागदपत्रांची बृहत्सूची कॅलेंडर ऑफ पर्शियन कॉरेस्पाँडन्स् या मालेच्या ११ खंडांत प्रकाशित झाली आहे. तसेच संस्कृत, हिंदी, बांगला या भाषांतील कागद प्रकाशित झाले असून मराठी भाषेतील कागदही प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. यांखेरीज या राष्ट्रीय अभिलेखागाराने फोर्ट विल्यम कॉरेस्पाँडन्स, काही यूरोपीय प्रवासवृत्ते व काही भारतीय भाषांतील कागदपत्रांच्या सूचि प्रकाशीत केल्या आहेत. या राष्ट्रीय अभिलेखागाराची भोपाळ येथे एक शाखा असून यामध्ये पूर्वीच्या मध्य प्रांतातील काही कागद सुरक्षित ठेवले आहेत.

## २) जम्मू व काश्मीर राज्य पुराभिलेखागार (श्रीनगर) :

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १९५१ मध्ये करण्यात आलेली आहे. श्रीनगर येथे मुख्य कार्यालय असून जम्मू येथे शाखा आहे. या पुराभिलेखागारात १७२४ ते १९७५ पर्यंतची फार्सी, काश्मीरी, तिबेटीयन, इंग्रजी या भाषांतील कागदपत्रे आहेत.

## ३) पंजाब राज्य पुराभिलेखागार (पतियाळा) :

पंजाबचे पुराभिलेखागार सन १९४७ मध्ये अस्तित्वात आले. फाळणीपूर्वी पंजाबचे पुराभिलेखागार लाहोर येथे होते. विद्यमान पुराभिलेखागार पतियाळा येथे आहे. येथील कागदपत्रांत सिमला येथील विविध ब्रिटीश कार्यालयांचे कागदपत्र आहेत. यांशिवाय येथे जुनी चित्रे, हस्तलिखिते, शस्त्रादी वस्तू इत्यादींचा संग्रह आहे.

## ४) उत्तर प्रदेश राज्य पुराभिलेखागार (अलाहाबाद) :

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १९४९ मध्ये अलाहाबाद येथे झाली. पुढे सन १९७३ मध्ये लखनौ येथे त्याचे मुख्यालय करण्यात आले. सध्या याची अलाहाबाद, वाराणसी येथे शाखा आहे. या ठिकाणी सन १८०० ते १९१७ या कालखंडातील कागदपत्रे असून या कागदपत्रांच्या काही सूची प्रकाशित केल्या आहेत.

## ५) बिहार राज्य पुराभिलेखागार (पटणा) :

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १८६१ मध्ये सिविल सेक्रेटरियट रेकॉर्ड ऑफिस, पाटणा या नावाने झाली. पुढे सन १९५४ मध्ये राज्य पुराभिलेखागारामध्ये रूपांतर करण्यात आले. या ठिकाणी सन १७७१ ते १९६३ पर्यंतच्या कालखंडातील कागदपत्रे उपलब्ध आहे.

**६) मध्यप्रदेश राज्य पुराभिलेखागार (भोपाळ) :**

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १९७५ मध्ये भोपाळ येथे झाली. येथील पुराभिलेखागारात इंदूर, ग्वाल्हेर, देवास, रतलाम, धार, जावरा, बढवानी इ. संस्थानांचे व पूर्वीच्या मध्य प्रांतातील काही कागदपत्रांचा संग्रह ३३ हजार बस्त्यांच्या रूपात बांधून ठेवला आहे. तर इतर कागद १६ लाख १६ हजार फायलींच्या रूपात आहेत. जुन्या मध्य प्रांतातील कागदपत्रांचे ५ इंग्रजी खंड प्रसिद्ध केले आहेत.

**७) आसाम राज्य पुराभिलेखागार (शिलोंग):**

आसाम येथील पुराभिलेखागार सन १८७४ मध्ये आसाम सिविल सेक्रेटरियट रेकॉर्ड ऑफिस या नावाने येथे शिलाँग स्थापन झाले. येथे सन १८२३ ते १९४९ या कालखंडातील पत्रव्यवहार उपलब्ध आहे. या पुराभिलेखागारातील हँडबूक डॉ. एस. के. भुयान यांनी सन १९५१ मध्ये प्रकाशित केलेली आहे.

**८) ओरिसा राज्य पुराभिलेखागार (भुवनेश्वर):**

या पुराभिलेखागाराची स्थापना १९४८ मध्ये भुवनेश्वर येथे झाली. या अभिलेखागारात कटक, बलसोर, संबळपूर इ. विभाग आणि धैकनाल, पर्लाकिमिडी इ. संस्थाने यांचे कागदपत्र संरक्षित ठेवले आहेत. या पुराभिलेखगारात मराठ्यांच्या इतिहासाच्या संबंधी कागदपत्रे उपलब्ध आहेत.

**९) पश्चिम बंगाल राज्य पुराभिलेखगार (कलकत्ता):**

कलकत्ता हे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे राजधानीचे ठिकाण होते. सन १८२९ मध्ये कलकत्ता प्रांताचे रेकॉर्ड ऑफिस म्हणून याची स्थापना करण्यात आली. पुढे सन १९६१ मध्ये राज्य पुराभिलेखगार मध्ये याचे रूपांतर करण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीचे सुरूवातीचे सर्व कागद मूळ वा नक्कल स्वरूपात संग्रहीत होते. ते सर्व कागद राष्ट्रीय पुराभिलेखागारामध्ये नेले असून आता फक्त पश्चिम बंगालसंबंधीचे कागद येथे आहेत. येथून 'एन्शीयट इंडियन हिस्ट्री' व 'इंडियन हिस्टॉरिकल क्वाटर्ली' या संशोधन पत्रिका प्रकाशित होतात.

**१०) राजस्थान राज्य पुराभिलेखागार (जयपूर) :**

राजस्थान हे स्वतंत्र राज्य होण्यापूर्वी म्हणजे सर्व संस्थाने राजस्थान राज्यात विलीन होण्यापूर्वी प्रत्येक संस्थानाचे स्वतंत्र दफ्तरखाने होते. मात्र सर्व संस्थाने राजस्थान ह्या एका राज्यात विलीन झाल्यानंतर ह्या राज्याचे एक मोठे पुराभिलेखागार सन १९५५ मध्ये स्थापन करण्यात आले. या पुराभिलेखागारातील सर्व कागदपत्र एकाच ठिकाणी ठेवणे अशक्य झाल्यामुळे बिकानेर येथे मुख्य पुराभिलेखागार करून जयपूर, जोधपूर, कोटा, अलवर इ. वीस ठिकाणी विभागीय पुराभिलेखागारे स्थापन करण्यात आली. या सर्व अभिलेखागारांत सन १६३५ ते १९४८ या कालखंडातील सुमारे ८० लाख बस्ते (रुमाल) व फायली असून त्यांतील सर्व कागदपत्रांची संख्या दोन ते तीन अब्ज इतकी आहे.

**११) गुजरात राज्य पुराभिलेखागार (अहमदाबाद) :**

गुजरात राज्य पुराभिलेखागार सन १९७१ मध्ये स्थापन करण्यात आले. या पुराभिलेखागाराचे मुख्य कार्यालय अहमदाबाद येथे असून एक शाखा बडोडा व राजकोट येथे आहे. अहमदाबादचे पुराभिलेखागार गुजरात राज्य स्वतंत्र झाल्यानंतर स्थापन झाले असून बडोदे येथील शाखा सयाजीराव गायकवाड यांनी स्थापन केलेली आहे. बडोद्याच्या शाखेमध्ये अधिक जुने कागदपत्र उपलब्ध आहेत. या ठिकाणी सन १७२८ ते १९४७ या कालखंडातील कागदपत्रे उपलब्ध आहेत. यातील कागदपत्रे मराठी, गुजराती व इंग्रजी या तीन भाषांत असून बडोद्याच्या कार्यालयाने तेथील कागदपत्रांचे ८ खंड मराठीत व १० खंड इंग्रजीत प्रकाशित केले आहेत.

**१२) गोवा राज्य पुराभिलेखगार (पणजी):**

या दफ्तरखान्याची स्थापना सन १५९५ मध्ये केली असे मानले जाते. येथील कागदपत्रे पोर्तुगीजांनी वसाहत स्थापनेपासून जपून ठेवलेली आहेत. पोर्तुगीजांना ऐतिहासिक कागदपत्रांचे महत्त्व चांगले माहीत होते. त्यामुळे येथे गोव्यासह आशियातील सर्व पोर्तुगीज प्रदेशांचे कागदपत्र जपून ठेवले आहेत. येथील कागद मुख्यतः पोर्तुगीज व मराठी या दोन भाषांत आणि अगदी थोडे फार्सी भाषेत आहेत. यांतील काही थोडे कागद सुटे असून इतर कागदांची कातडी बांधणीची सुमारे ७० हजार पुस्तके करून ठेवली आहेत. अशेताँश नावच्या मालेमध्ये या पुराभिलेखागाराने आतापर्यंत ५ खंड प्रसिद्ध केलेले आहेत. त्याशिवाय मिस्टर बेकर, फादर विकी, पा. स. पिसुर्लेकर यांनी येथील कागदपत्रांचा पुरेपुर उपयोग करून ट्रीटीज, एंगेजमेंट्स अँड सनद्स या मालेत १५ खंड व पोर्तुगीज व मराठाज् या मालेत ५ खंड प्रकाशित केले आहेत. या बांधीव पुस्तकात सोळाव्या शतकातील गोव्यामधील हिंदू समाजसंस्थेची माहिती देणारे हजारो कागद आहेत.

**१३) कर्नाटक राज्य पुराभिलेखागार (बंगलोर):**

या पुराभिलेखागाराची स्थापना सन १८५८ मध्ये मैसूर राज्याचा भाग म्हणून झालेली होती. पुढे सन १९७३ मध्ये कर्नाटक राज्य पुराभिलेखागार, बंगलोर असे रूपांतर झाले. या ठिकाणी सन १७९९ ते १९५६ पर्यंतचे रेकॉर्ड असून फार्सी, मराठी, कन्नड या भाषांतील कागदांचा भरणा फार मोठा आहे. हे कागद मुख्यतः पूर्वीचे म्हैसूर संस्थान आणि त्याच्या लगतचे पाळेगार व नायक यांजकडील आणि अग्रहारासंबंधीचे आहे.

**१४) आंध्र प्रदेश राज्य पुराभिलेखागार (हैदराबाद):**

हैद्राबाद संस्थानने सन १८९४ मध्ये सुरु केले. या मधील दफ्तरे दीवानी, माल-मुलकी या नावाने प्रसिद्ध होती. हैदराबाद संस्थान शेजारच्या तीन राज्यांत विलीन झाल्यानंतर या पुराभिलेखागारांस सन १९६२ मध्ये आंध्र प्रदेश राज्य पुराभिलेखागार असे नाव देण्यात आले. यामध्ये २,०००,००० हून अधिक कागदपत्रे असून मुघल काळातील १६२८ पासूनची व सालारजंग संग्रहामध्ये १८००ते १९६० पर्यंतची फार्सी, मराठी, काही उर्दू व तेलुगू कागदपत्रे आहेत. या पुराभिलेखागाराने एक उर्दू, दहा फार्सी-इंग्रजी व चार मराठी कागदपत्रांचे खंड प्रसिद्ध केले आहेत.

**१५) तामिळनाडू राज्य पुराभिलेखागार (मद्रास) :**

तामिळनाडू येथील दफ्तरखाना सन १८०६ मध्ये फोर्ट सेंट जॉर्ज येथे स्थापन करण्यात आला. पुढे सन १९०९ मध्ये याचा विस्तार करण्यात आला. मलबार व कोरोमांडल किनाऱ्यावरील इंग्रज वखारींतील तसेच ईस्ट इंडिया कंपनीच्या वेळचे मद्रास सरकार व मद्रास इलाखा या संबंधीचे सन १६७० पासूनचे लक्षावधी कागदपत्र इथे आहेत. त्यांतील इंग्रजी कागद मुख्यतः फाईल रूपात असून तमिळ, तेलुगू, मराठी इ. भाषांतील कागद बस्त्यांच्या रूपात ठेवले आहेत. यांत शेकडो ताडपत्रावरीलही आभिलेख आहेत. याचबारोबर याठिकाणी डच (१६ वे शतक), डॅनिश (१७ व १८ वे शतक), तंजोर राज्य रेकॉर्ड (१७३८–१७८३), चर्च रेकॉर्ड (१७६५–१८८४) या पुराभिलेखारातील सर्व कागदपत्रांच्या सूची तयार करण्यात आलेल्या आहेत.

**१६) केरळ राज्य पुराभिलेखागार (त्रिवेंद्रम):**

केरळ राज्य पुराभिलेखागाराची सुरवात त्रावनकोर व कोचीन राज्याचे रेकॉर्ड ऑफिस म्हणून अनुक्रमे सन १८८७ व १९०९ मध्ये झाली. पुढे सन १९६२ मध्ये केरळ राज्य पुराभिलेखागार अस्तित्वात आले. याचे मुख्य कार्यालय त्रिवेंद्रम येथे असून एर्नाकुलम व कोझिकोडे येथे त्याची शाखा आहेत. येथील कागदपत्रे सन १६२५ ते १९५६ पर्यंतच्या कालखंडातील असून ती प्रामुख्याने ताडपत्रे व कागद या स्वरुपांत असून ते मुख्यतः मल्याळम, तमिळ भाषांत व क्वचित मोडी–देवनागरी लिप्यांत आहेत. यातील सुमारे १,३०० लेख वेळुपत्रांवर लिहिलेले आहेत. येथून 'इंडियन हिस्ट्री जर्नल' नावाची संशोधन पत्रिका प्रकाशित होते.

**१७) महाराष्ट्रातील प्रमुख दफ्तरखाने व पुराभिलेखागार:**

**१) मुंबई पुराभिलेखागार:**

मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या कालखंडात १५ सप्टेंबर, १८२१ रोजी झाली. यामध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या पासून ते स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सर्व महत्त्वाची शासकीय कागदपत्रे आहेत. १७ व्या शतकापासून मुंबई ब्रिटिशांच्या कारभाराचे प्रमुख केंद्र होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने हुबळी, धारवाड, कारवार, राजापूर, ठाणे इ. ठिकाणी ज्या वखारी स्थापन केलेल्या होत्या तेथील पत्रव्यवहार या ठिकाणी आहे. ब्रिटीशांनी मुंबई, बंगाल व मद्रास हे तीन इलाखे स्थापन करून मराठे, म्हैसूरकर, निजाम, राजपूत आदींशी सत्ता संपादनासाठी तह केले त्यासंबंधीचा व ह्या सत्ताधिशांस अंकित करून केलेल्या राज्यकारभाराचा सर्व इंग्रजी पत्रव्यवहार आहे. या अभिलेखागारात ९८,००० हस्तलिखित कागदांचे पुठ्ठा बांधणीचे ग्रंथ (फाईल्स), ४,००,९९९ हस्तलिखित फाईल्स व साध्या बांधणीचे ८०,००० छापीलग्रंथ आहेत. येथील कागदपत्रांचे रेसिडेंटचे दप्तर, सचिवालयातील विविध विभागांचे दप्तर, किरकोळ दप्तर, खाजगी दप्तर व छापील दप्तर असे पाच विभाग आहेत. यामधील सर्वात जुना अभिलेख सन १६३० मधील आहे. ब्रिटिश कालखंड व मराठा कालखंडाचा इतिहास अभ्यासण्यासाठी मुंबईचे पुराभिलेखागार अत्यंत महत्त्वाचे आहे. या पुराभिलेखागारात अनेक दुर्मीळ मराठी, हिंदी व इंग्रजी वृत्तपत्रे आहेत. यामध्ये 'बॉम्बे समाचार' (१८३१), 'दर्पण' (१८३२), 'मॉर्निंग स्टार्ट'

(१८३६), 'बॉम्बे कुरिअर' (१७९७ - १८४६), 'हरिजन' (१९४२) इत्यादी वृत्तपत्रांचा समावेश आहे. याशिवाय ६,००० ऐतिहासिक नकाशे आहेत. पुराभिलेखागाराच्या माध्यमातून सन १९८४ पासून प्रकाशन शाखा सुरू केली आहे. मुंबई पुराभिलेखागारात परदेशाविषयी असणाऱ्या अभिलेखांची माहिती संकलित करून 'रेकॉर्ड पर्टेनिंग टू फॉरिन कंट्रीज' (आबुधाबी ते पर्शिया भाग - १ व भाग - २) इत्यादी प्रकाशने केलेली आहेत.

**२) पुणे पुराभिलेखागार (पेशवा दफ्तर) :**

पुणे पुराभिलेखागाराची स्थापना १ सप्टेंबर १८९१ रोजी करण्यात आली. याला 'पेशवे दप्तर' अथवा 'एलिनेशन ऑफिस' असेही म्हणतात. मराठ्यांच्या इतिहासाच्या कागदपत्रांनी समृद्ध असा हा दप्तरखाना आहे. पेशवे दप्तरातील कागदपत्रे मोठ्या प्रमाणात मोडी लिपीत आहेत. त्याच बरोबर याठिकाणी फार्सी, गुजराती, हिंदी व इंग्रजी कागदपत्रे आहेत. मोडी कागदांची दप्तरे ३९ हजार असून त्यातील सर्व कागद साडेतीन कोटींच्यावर आहेत. पेशवे दप्तरात कागदपत्रांचे एकूण ३६ विभाग आहेत. त्यामध्ये शाहू दप्तर, रोजकीर्द (रोजच्या खर्चाच्या नोंदी), घडणी (आर्थिक व्यवहाराचे दप्तर), प्रांत अजमास (प्रांताच्या हिशेबाचे कागद), पागा, आंग्रे दफ्तर, चिटणीशी, जमाव, सातारा महाराज दप्तर, इनाम कमिशन, पैमाश, पाहणी खर्डे, डेक्कन कमिशनर दप्तर, एजंट दप्तर, रेसिडेंसी दप्तर हे त्यांपैकी काही विभाग आहेत. पेशवे काळातील काशी, मथुरा, त्र्यंबकेश्वर, नाशिक, वाशी, पंढरपूर इ. धार्मिक स्थळांचा पत्रव्यवहार पेशवे दप्तरात उपलब्ध आहे. अशा पत्रव्यवहारातून त्या धार्मिक स्थळाचे महत्त्व, जतन, आर्थिक व्यवहार इत्यादीची माहिती मिळते. पेशव्यांनी मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण पुरोहितांना धार्मिक सनदा व दानपत्रे दिली आहेत त्याची माहिती मोठ्या प्रमाणात मिळते. या कागदपत्रांतून काही इतिहासोपयोगी कागदपत्र निवडून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले आहेत. सर जदुनाथ सरकार व रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी पेशवे दप्तराचे ४५ खंड प्रसिद्ध केलेले आहेत. सर जदुनाथ सरकार यांनी पुण्याच्या रेसिडेन्सीची कागदपत्रे जमवून त्याचे १५ खंड प्रसिद्ध केले. त्यानंतर डॉ. पी. एम. जोशी व डॉ. व्ही. जी. खोबरेकर यांनी पेशवे दप्तरातील इतर कागदपत्रे प्रसिद्ध केलेली आहेत.

**३) कोल्हापूर पुराभिलेखागार :**

कोहापूर पुराभिलेखागाराची स्थापना १ मार्च १९४९ रोजी करण्यात आली. या पुराभिलेखागारात मराठेकालीन मराठी व फारसी कागदपत्रांचा समावेश आहे. याचे पारसनिशी, निवडी, चिटणीशी, जमेनिशी, हुजूर खाजगी इत्यादी विभाग आहेत. ही सर्व कागदपत्रे मोडी लिपीत असून ती सुमारे तीन हजार रूमालात बांधून ठेवली आहेत. यात कोल्हापूर छत्रपतींचा पेशवे, पटवर्धन, सावंतवाडीकर, निजाम, पोर्तुगीज, इंग्रज, कर्नाटकचे पाळेगार यांच्याशी झालेला पत्रव्यवहार आहे. गगनबावडा, विशाळगड, इचलकरंजी, तोरगल, कागल इत्यादी संस्थाने विलीन झाल्यावर त्यांच्याकडील कागदपत्रे या दप्तरखान्यात जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. सन १७३४ ते १९४९ पर्यंतची कागदपत्रे या पुराभिलेखागारात आहेत. या पुराभिलेखागारात विविध खातेनिहाय ४० हजार बस्ते आहेत. शिवाजी महाराजांची १० पत्रे येथे आहेत. राजर्षी शाहू छत्रपती

महाराज व छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातील सर्व कागदपत्रे येथे उपलब्ध आहेत. कोल्हापूर संस्थानच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कलाविषयक इत्यादी अभ्यासासाठी हे पुराभिलेखागार संशोधकांच्यासाठी महत्वाचे आहे.

**४) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे :**

भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी सन १९१० मध्ये करण्यात आली. भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये मराठ्यांच्या इतिहासाची शिवकालीन व पेशवेकालीन कागदपत्रे आहेत. याशिवाय यूरोपियन वकील, बादशाह व त्यांचे वजीर, सरदार, शिलेदार, जहागीरदार, जासुद इत्यादी विविध विषयावरील कागदपत्रे आहेत. त्याचबरोबर चिंचवड संस्थानची कागदपत्रे, चिपळूणकर घराण्याची कागदपत्रे, इचलकरंजीच्या घोरपडे घराण्याची कागदपत्रे, जेजुरी देवस्थानची कागदपत्रे, ज्योतिषविषयक कागदपत्रे आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळाकडे वेळोवेळी प्रसिद्ध झालेली त्रैमासिके, इतिवृत्त, स्वीय ग्रंथमाला, पुरस्कृत ग्रंथमाला इत्यादीचा मोठा संग्रह आहे.

**ब) सर्वेक्षण पद्धत:**

**१) सर्वेक्षण पद्धतीची संकल्पना:**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखनाचे महत्वाचे माध्यम म्हणून सर्वेक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वेक्षण म्हणजेच चिकित्सकपणे केलेली पाहणी, अथवा समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण, अथवा एखाद्या विशिष्ट प्रश्नासंबंधीची चिकित्सक पाहणी करणे व तत्संबंधी सर्व त-हेची विस्तृत माहिती घेणे म्हणजेच सर्वेक्षण अशी सर्व साधारण व्याख्या केली जाते. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जावू शकतो. उदा. प्राचीन, मध्ययुगीन शिल्पस्थापत्य, शिलालेख, पुरातत्वीय स्थळे, मंदिरे इत्यादीसंबंधीच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती वापरावी लागते. सर्वेक्षण पद्धतीनुसार प्राप्त अवशेषांची सविस्तर माहिती नोंदवून त्या अवशेषांची व्याप्ती, भौगोलिक विस्तार, सीमा लक्षात घ्यावी लागते. याशिवाय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी स्थानिक किंवा समकालीन इतिहास लेखनासाठी सर्वेक्षण पद्धती उपयोगी ठरते. सर्वेक्षण पद्धतीला सामाजिक सर्वेक्षण पद्धती म्हणून उल्लेख देखील ओळखले जाते. एका विशिष्ट भू-भागावर अथवा भौगोलिक ठिकाणी राहणाऱ्या विशिष्ट व्यक्तीसमूह अथवा जाती, धर्म, पंथ समुदायाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची विस्तृत माहिती सर्वेक्षण पद्धतीच्या माध्यमातून प्राप्त करू शकतो. सामाजिक सर्वेक्षणाने समाजाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची व्यवस्थित माहिती मिळविता येते. सर्वेक्षणातून माहिती संकलित करून विश्लेषण केल्यानंतर विशिष्ट निवडलेली समस्या अथवा प्रश्नासंबंधी निश्चित स्वरूपाची मांडणी करता येते.

**२) सर्वेक्षण पद्धतीची पार्श्वभूमी:**

सर्वेक्षण पद्धती प्राचीन कालखंडापासून वापरत असल्याच्या नोंदी मिळतात. इ. स. पू. ३०० मध्ये हिरोडोटसने इजिप्तमधील लोकसंख्येची पाहणी करण्याचा विचार मांडला होता. ११ व्या शतकात इंग्लंडमध्ये

काही सामाजिक प्रश्नांसाठी पाहणी हाती घेतल्याची नोंद आहे. सर्वेक्षणाची सुरुवात इंग्लंड व वेल्समध्ये जॉन हॉवर्ड यांनी तुरुंगाची पाहणी करून केली. कैद्यांची स्थिती व त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी ते स्वत: तुरुंगात कैद्यांसमवेत राहिले होते. अमेरिकेमधील जेकोब राईस यांने सन १८९० मध्ये झोपडपटीमधील लोकांचे आर्थिक जीवनमान पाहण्यासाठी सर्वेक्षण केलेले होते. त्यानंतर सन १९०९ मध्ये पॉल केलांगने सर्वेक्षण केले, आधुनिक समाजावरील आधुनिकीकरणाचे व नागरीकरणाचे परिणाम हा त्यांचा अभ्यासविषय होता.

भारतामध्ये सामाजिक सर्वेक्षणाची सुरुवात प्राचीन कालापासून झाली असल्याचे विविध उल्लेख सापडतात. कौटिल्याकृत अर्थशास्त्र आणि अकबराच्या 'ऐन-ई-अकबरी' मधील माहिती सामाजिक पाहण्यावरच आधारलेली दिसून येते. अल्लाउद्दीन खिलजीने आर्थिक धोरण पाहणीवरून ठरविले होते. शेरशहाने जमिनी विषयक पाहणी करून आपले करविषयक धोरण निश्चित केलेले होते असे दिसते. मात्र, भारतासारखा प्रचंड आकाराचा देश, सर्वेक्षणासाठी होणारा प्रचंड खर्च, लोकांमध्ये संशोधनासंबंधीची उदासीनता, बहुसंख्यांचे खेड्यातील वास्तव्य आणि भाषेची विविधता यामुळे अपेक्षित यश मिळू शकलेले नाही.

**३) सर्वेक्षण पद्धतीची व्याप्ती:**

सर्वेक्षणाच्या माध्यमातून गाव, शहर, कुटुंब, कुल, जान, जमात, वर्ग, समूह अशा कोणत्याही घटक संबंधी अथवा लोकांची अगर संशोधन संबंधी प्रश्नाशी निगडित माहिती पद्धतशीरपणे प्राप्त करण्याचे सर्वेक्षण हा महत्वाचे माध्यम आहे. लोकांची सामाजिक परिस्थिती, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्यापुढील प्रश्न, त्यांच्यातील होत असणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, दिशा व गती इत्यादी बाबींची तपशीलवार आणि विस्तृत माहिती सर्वेक्षणाने घेता येते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी विषयाशी निगडीत संशोधन स्थानिक किंवा समकालीन परिप्रेक्षातून करता येते. कोणत्याही भागातील समाजाच्या जीवनासंबंधी सविस्तर माहिती मिळतेच पण त्या समाज पुढचे प्रश्न समजतात व त्यांचे निराकरण कसे करावे यासंबंधी उपाय-योजना सुचविणे सामाजिक सर्वेक्षणाने शक्य होते.

**४) सर्वेक्षणाचे प्रकार:**

सर्वेक्षणाची उद्दिष्टे ज्याप्रकारे वेगवेगळी असतात त्याप्रमाणे माहिती प्राप्त करण्याचे मार्ग आणि पद्धती व तंत्रे यामध्येही विविधता आढळते. यावरून सर्वेक्षणाचे प्रकार पाडता येतात. सर्वसामान्य व विशिष्ट सर्वेक्षण, नियमित व नैमित्तिक सर्वेक्षण, प्रारंभिक व अंतिम सर्वेक्षण, वैश्विक व नमूना सर्वेक्षण इत्यादीचा यामध्ये समावेश होतो.

**५) सर्वेक्षण आणि प्रश्नावली:**

सर्वेक्षण करण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावलीचा वापर केला जातो. प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधकाला हवी असणारी माहिती शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करता येते. वृत्तपत्रामधील बातम्या, सरकारकडून जाहीर केली जाणारी माहिती, शासकीय योजना, राजकीय नेत्यांच्या मुलाखती, इ. माहिती

सर्वेक्षणातून ताडून पाहता येते. एखाद्या घटनेबद्दल जनसामान्यांचे मत समजावून घ्यावयाचे असेल तर ही सर्वात चांगली पद्धत आहे. सर्व्हेक्षणासाठी वापरली जाणारी प्रश्नावली साधी सोपी व सुटसुटीत असावी. अशा प्रश्नावलीतील प्रश्न संदिग्ध नसावेत व प्रश्नावली परिपूर्ण असावी. त्यामुळे मिळणारी माहिती परिपूर्ण व उपयुक्त मिळते.

**६) सर्वेक्षण करताना कोणती खबरदारी घ्यावी:**

सर्वेक्षण करताना काही मूलभूत स्वरूपाची खबरदारी संशोधकाने घेणे जरूरी असते. सर्वेक्षणासाठी तयार केलेली प्रश्नावली जास्तीत जास्त अचूक आणि परिपूर्ण असावी. संशोधकास जी माहिती हवी आहे त्याची मांडणी स्पष्ट शब्दात केलेली असावी, संदिग्ध प्रश्न विचारू नयेत. सर्वेक्षणामधील मुद्दे सोपे, स्पष्ट आणि सुटसुटीत असावेत. सर्वेक्षणातून प्राप्त माहिती हा पूरावा असल्याने त्याच्या नोंदी घाईगडबडीने न करता त्या अचूक व निर्दोष करव्यात. सर्वेक्षणामधून प्राप्त महितीचे चिकित्सकपणे विश्लेषण करणे गरजेचे असते. चिकित्सक विश्लेषण हा सर्वेक्षणचा दुसरा टप्पा असून प्राप्त माहिती विश्वासार्ह आहे का? नवीन माहिती मिळते का? अथवा नव्या पैलूवर प्रकाश पडतो का? या दृष्टीकोणातून विचार करणे गजेचे असते. बिनचूक निष्कर्ष काढण्यासाठी सर्वेक्षण जास्तीत जास्त व्यापक स्वरूपाचे असणे गजचे आहे.

**७) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा:**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखानाचे सर्वेक्षण हे प्रभावी साधन असले तरी त्याच्या काही मर्यादा अथवा उणिवा आहेत हेही ध्यानात घेतले पाहिजे. सरकारी, निम सरकारी, व्यावसायिक आणि वैयक्तीक पातळीवर केले जाते. संशोधकाने संशोधनासाठी इतरांनी सर्वेक्षण करून गोळा केलेल्या माहितीवर आधारीत स्वत:चे निष्कर्ष काढवयाचे असतील तर, कोणाचे सर्वेक्षण निश्चित करायचे आणि त्याचे निष्कर्ष कसे घ्यायचे हे जिकरीचे आहे. संशोधक ज्या तंत्र पद्धतीचा उपयोग करीत आहे याचा संशोधकाने विचार केला पाहिजे. मुळात सर्वेक्षण ही खर्चीक बाब आहे. याला वेळ आणि पैसा अधिक लागतो. सर्वेक्षणातून मिळालेली तथ्ये एकसारखी असतीलच असे नाही. मिळालेल्या तथ्य संकलनाची विश्वसनीयता सांगता येत नाही. विशिष्ठ लोकसमुदायचा एका विस्तृत भौगोलिक पार्श्वभूमीवर सखोल अभ्यास करणे कठीण असते, कारण यासाठी निवडलेले नमुने एकसारखे, समान आणि खात्रीशीर माहिती प्रदान करतील याची शक्यता नसते.

**क) प्रश्नावली पद्धत:**

स्थानिक अथवा समकालीन संशोधांनासाठी विशिष्ट समूह, वर्ग, गट अथवा विशिष्ट भौगोलिक मर्यादेमध्ये प्रश्नावलीचा उपयोग करून माहिती प्राप्त करता येते. संशोधन कामी माहिती संकलित करण्याची प्रश्नावली ही अप्रत्यक्ष पद्धत आहे. ''विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधिताकडून त्या समस्येबाबत माहिती मिळविण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात''. अथवा सर्वेक्षणाचा अर्थ कोणत्याही वस्तूंचे वा घटनांचे सूक्ष्म निरीक्षण व परीक्षण होय. कोणत्याही प्रश्नाचा पूर्ण परीचय करुन घेण्यासाठी किंवा त्या प्रश्नांचे निदान करुन त्यावर व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी सर्वेक्षणाचा

आधार घ्यावा लागतो. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय विषयाशी निगडीत संशोधनाकामी प्रश्नावली पद्धत वापरुन माहितीचे संकलन केले जाते. स्थानिक आणि समकालीन इतिहासलेखनासाठी या पद्धतीचा प्रभावीपणे वापर केला जातो. स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखन करीत असताना संशोधक विशिष्ट अभ्यास समूहाचे उत्तम निरीक्षण करू शकतो, मात्र केवळ निरीक्षणाने त्यांच्या वर्तनामागील प्रेरणा, भावना, श्रद्धा अथवा विचार, मते काय? व कोणत्या असतात? हे कळत नाही. व्यक्तीचे वर्तन पाहून संशोधक वस्तुस्थिती रेखाटू शकतो. मात्र पण त्याची वैयक्तिक मते, त्यामागील प्रेरणा अभ्यासण्यासाठी प्रत्यक्ष व्यक्तीशी संपर्क साधून, त्याला प्रश्न विचारूनच ती ही माहिप्राप्त होवू शकते.

**१) लिखित प्रश्न व लिखित उत्तर:**

संशोधनविषयाची विस्तृत माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधक लिखित प्रश्नांची यादी तयार करतो. प्रश्नांची स्वरूप, आखनी आणि क्रमवारी पद्धतशीरपणे केलेली असते. संशोधक अभ्यास विषयाशी संबंधित असणार्या निवेदकांना लिखित प्रश्न संशोधक प्रत्यक्षपणे विचारू शकतो, किंवा जे निवेदक दूर असतात त्यांच्याकडून माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावली पोस्टाद्वारे पाठवली जाते आणि त्यांच्याकडून लिखित प्रश्नांची लिखित उत्तरे प्राप्त केली जातात.

**२) प्रश्नावलीचे प्रकार:**

संशोधन विषयाच्या हेतुनुसार प्रश्नावलीचे अनेक प्रकार पाडतात. संशोधन विषयाचे स्वरूप, प्रश्नांचे स्वरूप, रचना इत्यादी घटकावर आधारित प्रश्नावलीचे अनेक प्रकार येतात मात्र प्रामुख्याने पुढील दोन प्रमुख प्रकारांचा समावेश होतो.

अ) संरचित प्रश्नावली: (Structured Questionnaire)

ब) असंरचित प्रश्नावली: (Unstructured Questionnaire)

**अ) संरचित प्रश्नावली:**

संशोधक या प्रकारात आपला विषय, हेतू, व्याप्ती आणि संशोधांनाची खोली विचारात घेवून प्रश्न व प्रश्नांचा क्रम निश्चित करतो. सर्वसामान्यपणे प्रश्नावलीतील प्रश्न आणि त्याचा क्रम निश्चित झाल्यानंतर संशोधक पर्यायी उत्तरेही देतो व उत्तरदात्यास आपल्या पसंतीचे उत्तर निवडण्यास सांगतो. अशा प्रकारची प्रश्नावली छापून पोष्टाने किंवा मुलाखतकारा बरोबर पाठवितो त्याला याला बंदिस्त प्रश्नावली असे म्हणतात. ज्या प्रश्नांची पर्यायी उत्तरे दिलेली नसल्यास उत्तरदात्याकडून त्याच्या शब्दामध्ये उत्तर देण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते. त्याला मुक्त प्रश्नावली असे म्हणतात.

**ब) असंरचित प्रश्नावली:**

संशोधकाने संशोधनविषय निश्चित केलेला असला तरी संशोधनविषयाची संपूर्ण माहिती संशोधकाला असेलच असे नाही. यावेळी नेमके कोणते प्रश्न विचारावयाचे व त्यांची पर्यायी उत्तरे कोणती यासंबंधी

संशोधकाच्या मनात शंका असते. साहजिकच संशोधन विषयासंबंधी काही स्थूल प्रश्न उभे करून लोकांची मते, प्रतिक्रिया, नवे दृष्टिकोण समजून घेण्यासाठी असंरचित प्रश्नावलीचा वापर केला जातो. या प्रश्नावलीमध्ये ज्या संशोधनविषयाची फारशी माहिती उपलब्ध नाही, निश्चित प्रश्न किंवा पर्याय देता येत नाहीत अशा वेळी असंरचित प्रश्नालीचा उपयोग केला जातो.

**३) प्रश्नावली पद्धतीचे स्वरूप:**

प्रश्नावली तयार करताना संशोधकाने विशेष काळजी घेतली पाहिजे. प्रश्नांचा क्रम, लांबी, पर्यायी उत्तरे याबाबत स्पष्टता असणे गरजेचे असते. प्रश्नावलीचे स्वरूप संशोधन विषयाशी निगडीत ठेवले पाहिजे. प्रश्न छोटे, सोपे व सुटसुटीत असावेत. प्रश्न अचूक व काटेकोर शब्दात विचारावेत. प्रश्नाच्या अर्थाबाबत संधिग्ता असता कामा नये. कोणती शंका राहू नये. मुक्त प्रश्न मोजके व आवश्यक तेवढेच असावेत. योग्य उत्तराला बरोबर खूण करण्यास सांगावे. प्रश्नातून उत्तर सूचित होतील असे प्रश्न विचारू नयेत. उत्तरदात्यास उत्तर देताना आकडेमोड करावी लाग् नये. प्रश्नावलीमध्ये खाजगी प्रश्न विचारताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी. गृहितकावर आधारलेले प्रश्न विचारताना काळजी घ्यावी.

**४) प्रश्नावलीची पद्धतीची उपयुक्तता:**

स्थानिक अथवा समकालीन इतिहास लिखानामध्ये साधने प्राप्त करताना अनेक अडचणी येतात. स्थानिक व समकालीन संशोधन विषयावर विपुल प्रमाणात साधने उपलब्ध असतील असे नाही, अशा वेळी संशोधक प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधांनाला पूरक पुरावे जमा करू शकतो. प्रश्नावली पद्धती मध्ये संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. विचारलेल्या प्रश्नातून उत्तरात कमी विसंगती येते. प्राप्त उत्तरांची तुलना आणि विश्लेषण करणे सोपे जाते. प्रश्नावलीतून संशोधन विषयाचा एक दस्ताऐवज तयार होतो. की जो पुढे तुलनात्मक अभ्यासासाठी उपयुक्त असतो. संशोधन विषयाशी निगडीत ऐतिहासिक साधन तयार होते.

**५) प्रश्नावली पद्धतीची मर्यादा:**

प्रश्नावलीचे जसे फायदे आहेत तसेच काही उणिवादेखील आहेत, जसे की प्रश्नावली भरून देणार्याच्या स्वतंत्र विचारला आळा बसलेला असतो. कारण एका ठराविक मर्यादेमध्ये राहून उत्तरे द्यावी लागतात. त्यातूनही दिलेले उत्तर खरे असेलच असे नाही. प्रश्नावलीमधील प्रश्नांचा अर्थ समजावून घेण्याची कुवत प्रश्नावली भरून देणार्याकडे असावी लागते. त्याला प्रश्नाची उकल व्यवस्थित न झाल्यास चुकीची अथवा संधिग्ध उत्तरे प्राप्त होवू शकतात. अथवा उत्तरात उणीव राहण्याची शक्यता असते. प्रश्नावली भरून विशिष्ट जाती समूह, धर्म समूह, वर्ग समूह समाजामध्ये रहात असल्याने तो पूर्वग्रहदूषित असण्याची शक्यता असते, यामध्ये वस्तूनिष्ठतेला बाधा येण्याची शक्य नाकारता येत नाही. प्रश्नावलीमध्ये प्रश्नावली भरून देणार्याच्या उत्तरावर विश्वास ठेवावा लागतो, दिलेल्या उत्तराची पडताळणी शक्यता नसते.

### ड) वर्तमानपत्रे:

छापखान्याच्या वापरास सुरवात झाल्यानंतर अनेक घटना छापील स्वरूपात उपलब्ध होऊ लागल्या. आधुनिक काळात वर्तमानपत्र ही एक नवीन संकल्पना व ज्ञानाचे भांडार आणि लोकजागृतीचे साधन म्हणून उदयास आले. वर्तमानपत्रे मुख्यतः वार्ता तसेच मते, जाहिराती, रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असलेले, ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन म्हणजे वर्तमानपत्र होय. रोजच्या ताज्या घडामोडींच्या वार्ता देणे, लोकमत घडवणे व प्रभावित करणे तसेच लोकमताचे नेतृत्व करणे, प्रबोधन करणे, शासनसंस्थेवर अंकुश ठेवणे अशा विविध उद्दिष्टांनी आधुनिक नागर संस्कृतीत विकसित झालेल्या संस्था असे वर्तमानपत्र माध्यमाचे वर्णन केले जाते. स्थानिक, देशांतर्गत व जागतिक स्वरुपाच्या विविध बातम्या ताबडतोब पुरवणे, हा वर्तमानपत्रांचा मुख्य हेतू आहे. वार्ता आणि विचार-प्रसार ह्या दोन अंगांनी मिळून वर्तमानपत्र बनते, चालू घडामोडींच्या नोंदींचा तो ऐतिहासिक दस्तऐवज असतो, तसेच घडलेल्या घटनेचा योग्य अन्वयार्थ लावून त्यावर भाष्य करणे, संपादकीय दृष्टीकोनातून मतप्रदर्शन करणे, हेही वृत्तपत्राचे महत्त्वाचे अवतारकार्य मानले जाते. वर्तमानपत्रास सामान्य माणसाचे विद्यापीठ मानले जाते. माहिती, मनोरंजन, मार्गदर्शन व सेवा ही वर्तमानपत्राची चार कार्य मानली जातात. विपुल, विस्तृत व विविधांगी स्वरुपाच्या बातम्या देणे हे वर्तमानपत्राचे आद्य कर्तव्य मानले जाते. वर्तमानपत्रांत वृत्तविभाग, संपादकीय विभाग, जाहिरात विभाग, स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय, वृत्तविशेष, क्रीडा विशेष इ. विभाग असतात, वस्तूंचे भाव असतात. त्या त्या कालखंडाचे समाजजीवन, आर्थिक जीवन, एखादी चळवळ किंवा व्यक्ती यांचा अभ्यास करण्यासाठी वृत्तपत्रे निश्चित उपयोगाची अशी संदर्भ साधने आहेत यात शंका नाही.

साधारणपणे ब्रिटिश भारतात आले आणि वर्तमानपत्रांची सुरवात झाली. तेव्हापासून भारताचा इतिहास लिहावयाचा झाल्यास वर्तमानत्रांचे सहाय्य घ्यावे लागते. वर्तमानपत्रात येणारी बातमी खरीच असेल यावर विसंबून राहता येत नाही. वर्तमानपत्रातील माहिती इतर साधनांच्या साह्याने पडताळून पाहावी लागते. इतिहासलेखनात वर्तमानपत्रांचा कितपत वापर करावा हा एक वादाचा विषय आहे. समकालीन इतिहासाच्या संशोधनात वर्तमानपत्रांचा वापर वाढत चालला आहे. जुन्या व दुर्मिळ वर्तमानपत्रांच्या संचिका त्या-त्या वर्तमानपत्राच्या कार्यालयातच उपलब्ध होतीलच असे काही नाही. काही वर्षांपूर्वी बंद पडलेल्या वर्तमानपत्रांच्या संचिका इतर खासगी संग्रहात आढळतात किंवा एखाद्या संशोधन संस्थेत वृत्तपत्रांचा संचिका जतन करून ठेवलेल्या असतात. उदा.

१) मोगल दरबारात दैनंदिन घडामोडींचा वृतांत सरकारी अधिकाऱ्यांकडून लिहून घेतला जाई. ग. ह. खरे, सेतुमाधवराव पगडी यांनी अखबरातांचे मराठी भाषांतर केले आहे. ते भाषांतर इतिहासलेखनात प्राथमिक साधन म्हणून महत्वाचे आहे.

२) डॉ. य. दि. फडके यांनी लिहिलेला 'केशवराव जेधे' यांच्यावरील चरित्रात्मक ग्रंथ हा प्रामुख्याने तत्कालीन वर्तमानपत्रांच्या संदर्भावर आधारित आहे. पुरावा अथवा संदर्भ साधन म्हणून वर्तमान पत्रातील लेखणाचा संदर्भ घेणे म्हणजे वरवरपणा आहे असे म्हटले जात असले तरी वर्तमानपत्रातील

कात्रणांचा संशोधनासाठी कसा उपयोग होतो याचा आदर्श डॉ. य. दि. फडके घालून दिलेला आहे. याशिवाय

३) रा. का. लेले यांनी लिहिलेले 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथात बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण'मधून जी शेकडो वृत्तपत्रे महाराष्ट्रात प्रकाशित केलेली होती त्यावर विस्तृतपणे प्रकाश टाकला आहे.

४) महाराष्ट्रातील सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळींचे (१८७३-१९३८) संशोधन करण्यासाठी या चळवळींची जी मुखपत्रे होती ती संदर्भ म्हणून निश्चितपणे उपयोगाची आहेत. शेतकरी कामगार पक्षाच्या प्रारंभीच्या काळातील (१९४८-५१) संशोधांनासाठी या पक्षाचे 'जनसत्ता' हे मुखपत्र महत्वाचे आहे.

**महाराष्ट्राच्या संदर्भातील वर्तमानपत्रे आणि संदर्भ:**

महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांच्या संदर्भ साधन म्हणून आढावा घेताना यामध्ये विविध विचार प्रवाह आढळतात. या विचार प्रवाहाप्रमाणे वर्तमानपत्रांच्या स्वरूपामध्ये झालेल्या बदलानुसार त्यांनी हाताळलेले प्रश्न, त्यांनी ज्यांची बाजू घेतली त्या सामाजिक वर्गातील विभिन्नता आणि त्यामागील विचारप्रणाली याची कल्पना येते. यामध्ये प्रामुख्याने चार विचार प्रवाहाची वर्तमानपत्रे दिसतात.

१) सुधारणावादी विचार प्रवाहाची वर्तमानपत्रे

२) ख्रिस्ती धर्मप्रचारकांचा प्रवाहाची वर्तमानपत्रे

३) धर्म-परंपराभिमानी प्रवाहाची वर्तमानपत्रे

४) अब्राह्मणी प्रवाहाची वर्तमानपत्रे

१) सुधारणावादी विचार प्रवाहाची वर्तमानपत्रे:

**१) दर्पण :** बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी या वृत्तपत्राची सुरुवात केली. मराठीतील हे पहिले वृत्तपत्र समजले जाते. मात्र यामध्ये इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेतील मजकूर छापला जात असे. त्याचे इंग्रजी नाव "THE BOMBAY DURPAN' असे होते. यातील मराठी मजकूर इंग्रजीचे भाषांतरित रूप असे. सुरुवातीला पाक्षिक म्हणून सुरुवात होऊन मे १८३२ मध्ये ते साप्ताहिकात रूपांतरित झाले. लोकांना पश्चिमेकडील विद्येची ओळख करून देणे, समाजास आधुनिक ज्ञानाने उद्योगी व प्रयत्नशील करणे, लोकशिक्षण करणे आदी ध्येयाने या पत्राची सुरुवात करण्यात आली. पृथ्वी, ग्रहणे, वाफेची यंत्रे, ग्रहगोल, तारे इ. विषयी लोकांना उपयुक्त शास्त्रीय माहिती दिली जात असे. जातीधर्मविषयक वाद-विवाद लोकांसमोर मांडले जात. महाराष्ट्रीय प्रबोधनाची सुरुवात या पत्राने केली. मात्र आर्थिक समस्येमुळे १८४० साली ते बंद पडले.

**२) मुंबई अखबार:** ४ जुलै १८४० रोजी या वृत्तपत्राची सुरुवात झाली. पुर्णपणे मराठीतील मजकूर असलेले पहिले वृत्तपत्र म्हणून याचा उल्लेख केला जातो. दर शनिवारी हे पत्र प्रकाशित केले जात असे. यामधून अधिकाऱ्यांच्या नेमणूका बदल्या, इंग्रजी वार्ताची भाषांतरे, हवामान, अफगाण युद्धाच्या बातम्या, अपघात, चोर्या इत्यादीच्या बातम्या दिल्या जात असत.

**३) प्रभाकर:** २४ ऑक्टोबर १८४१ रोजी भाऊ महाजन (गोविंद विठ्ठल कुंठे) यांनी या वृत्तपत्राची सुरुवात केली. या वृत्तपत्रातून प्रकाशित केलेली लोकहितवादींची शतपत्रे मोठ्या प्रमाणात गाजली. अज्ञानी, परंपरागत, रूढीग्रस्त समाजाला पाश्चात्त्य विचारांच्या शिक्षणाने समर्थ बनवणे हे भाऊ महाजनांचे ध्येय होते.

**४) ज्ञानसिंधु:** विरेश्वर छत्रे यांनी १८४२ मध्ये मुंबई येथे ज्ञानसिंधु साप्ताहिकाची सुरुवात केली. अनेक सामाजिक प्रश्नांवर ज्ञानसिंधुमधून जांभेकरांच्या दर्पणमधील मतांचाच पाठपुरावा केला.

**५) ज्ञानप्रकाश:** कृष्णाजी रानडे १२ फेब्रुवारी १८४९ रोजी ज्ञानप्रकाश पत्राचे पुणे येथून प्रकाशन सुरू झाले. १०० वर्षांपेक्षा अधिक काळ हे वृत्तपत्र सुरू होते. साप्ताहिक स्वरूपात सुरू झालेले हे वृतपत्र १८५३ पासून वाङ:मय, राजकारण, व्यापारवार्ता इत्यादी विषयांवर लिहीत असे. १५ ऑगस्ट १९०४ पासून त्याचे दैनिकात रूपांतर झाले. १९०९ पासून हे पत्र गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या भारत सेवक समाजाच्या मालकीचे झाले. या वृत्तपत्रास मवाळांचे वृत्तपत्र म्हणून ओळखले जात होते. हवामान बाजारभाव, सरकारी नेमणुका, घात-अपघाताच्या बातम्या, सत्कार व गौरवाचे वृत्त, स्थानिक तक्रारी, परदेशी व देशी वृत्त इ. असत. म. गांधींची दांडी मोहीम, कायदेभंगाची चळवळ, कॉंग्रेस अधिवेशनाची हकिकत सविस्तर दिली जात असे. संपादक काकासाहेब लिमये (१८२६-४१) यांच्या काळात या पत्राचा सर्वाधिक विस्तार झाला. ब्रिटिशांच्या धोरणावर टीका करणारे व सामाजिक प्रश्नांवर मवाळ भूमिका घेणारे असे या वृत्तपत्राचे स्वरूप होते.

**६) इंदुप्रकाश:** सन १८६२ मध्ये इंदुप्रकाशची सुरुवात झाली. यामध्ये मराठी आणि इंग्रजी असा दोन्ही भाषेतील मजकूर असे. मराठी विभागाचे संपादक जनार्दन सखारामा गाडगीळ हे होते. पत्राचे संपादक समाजसुधारक विष्णुशास्त्री पंडित होते. या पत्राने विधवा विवाहाचा पुरस्कार केला. बालविवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह, स्त्री शिक्षण इ. प्रश्नांची चर्चा विस्ताराने केली. त्या काळात सुधारकाचे मुखपत्र म्हणून इंदुप्रकाश ओळखले जात असे.

**७) विविध ज्ञानविस्तार:** संस्कृत व इंग्रजीतले ज्ञान मराठी भाषिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सन १८६७ मध्ये या मासिकाची सुरुवात झाली. ज्ञान संग्रह आणि ज्ञानप्रसार हे याचे ध्येय होते. शास्त्रीय विषय, स्त्रियांच्या उपयोगास्तव मनोरंजक, सन्मार्गवती अशा गोष्टी, रूपके, कविता, विद्यार्थ्यांसाठी अन्य भाषेतून केलेले भाषांतर, इतिहास, देशज्ञान, विख्यात पुरुषांची आजन्म चरित्रे, शरीरसंपत्ती रक्षणार्थ उत्तम वैद्यकाच्या आधारे घेतलेले नियम, नवीन आलेल्या पुस्तकाचे गुणावगुण विवेचन, नित्य व्यवहारासंबंधी नीतिवादाचे निबंध इ. विषयावरील मजकूर दिला जात असे.

**८) सुबोध पत्रिका:** सन १८७३ मध्ये या पत्राची सुरुवात झाली. प्रार्थना समाजाचे हे मुखपत्र होते. समाज व धर्मासंबंधी सुधारणाविषयक चर्चा या पत्रातून होत असे. प्रार्थना समाजाचे धर्मासंबंधीचे विचार प्रसारित करणे आणि त्यावरील आक्षेपांना उत्तर देणे हा यामागील हेतू होता. न्या. रानडे, डॉ. भांडारक, सर नारायण चंदावरकर, मामा परमानंत यांनी यातून लेखन केले.

**९) सुधारक:** गोपाळ गणेश आगरकर यांनी सन १८८८ मध्ये याची सुरुवात केली. परंपरानिष्ठ समाजातील दुष्ट रूढी, वेडगळ समजूती, चिवट अंधश्रद्धा, जबरदस्त दुराभिमान यावर सातत्याने प्रहार करणारे हे साप्ताहिक होते. सामाजिक सुधारणेला प्राधान्य देणार्या विचार प्रवाहाचे हे वृत्तपत्र होते.

**२) ख्रिस्ती धर्मप्रचारकांचा प्रवाहाची वर्तमानपत्रे:**

**१) ज्ञानोदय:** सन १९४१ मध्ये ज्ञानोदय मासिकाची सुरुवात झाली. हे पत्र अहमदनगर येथून छापले जात असे. या मासिकाची सुरुवात ख्रिस्ती मिशन-यांनी केली. यांचा मुख्य हेतू धर्मप्रसाराचा होता असे म्हटले जाते. सन १८७३ सालापासून याचे साप्ताहिकात रूपांतर करण्यात आले. ज्ञानप्रसाराबरोबर अहमदनगरविषयी मजकूर छापणे हा या साप्ताहिकाचा उद्देश होता. हे पत्र येथील सामाजिक प्रश्नावर सुधारणावादी भूमिका घेणारे होते. या पत्राच्या सातत्यात मात्र खंड पडला नव्हता. यामधून हिंदू धर्माच्या विकृ, परंपरांची टर डवली गेली. त्याला प्रतिक्रिया म्हणून धर्माभिमान्यांची वृत्तपत्रे सुरू झाल्याचेही दिसून येते. ज्ञानोदया शिवाय सत्यदीपिका हे पत्रही बाबा पद्मनजी (ख्रिस्ती मिशनरी) यांनी सुरू केले. यातून महात्मा ज्योतिबा फुल्यांच्या कार्याप्रती सहमती दर्शविली जायची.

**३) धर्म-परंपराभिमानी प्रवाहाची वर्तमानपत्रे:**

**१) नेटिव्ह ओपिनियन:** सन १८६४ मध्ये रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी हे वृत्तपत्र सुरू केले. इंग्रजीतून निघालेल्या या वृत्तपत्रात मराठी भाषिकांसाठी मराठी मजकूर छापला जात असे. या पत्राची संपादकीय जबाबदारी नारायण महादेव ऊर्फ मामा परमानंद यांच्याकडे होती. इंदुप्रकाशच्या सामाजिक सुधारणेचा पुरस्कार यांना मान्य नव्हता. तर नेटिव्ह लोकांचे मत इंग्रजी राज्यकर्त्यांच्या कानावर घालावे हा मूल हेतू होता.

**२) निबंधमाला:** विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी सन १८७४ मध्ये याची सुरुवात केली. यातून हिंदू धर्मातील प्रथा, परंपरा, रूढी यांचे पुनरुज्जीवन करणारे लेखन केले. या लेखनातून ख्रिस्ती मिशन्र्यांबरोबरच इंग्रजांचे गुण गाणार्या ऐत्तद्देशियांवर टीका केली जात असे. सुधारणावादी पत्रकारितेला प्रतिक्रिया म्हणून धर्माभिमान्यांच्या पत्रकारितेच्या प्रवाहातील हे लेखन होते. समाजातील न्यूनगंडावर प्रहार करणारे लेखन असा यांच्या लेखनाचा अन्वयार्थ लावला जातो.

**३) केसरी:** लोकमान्य टिळक आणि गो. ग. आगरकर यांनी सन १८८१ मध्ये याची सुरवात केली. टिळकांचा केसरी राजकीय स्वातंत्र्याला प्राधान्य देणारा होता. मात्र सामाजिक सुधारणांच्या बाबतीत त्यांनी स्थितीशील (परंपरावादी) भूमिका घेतली. राष्ट्रवादाची प्रेरणा, स्वधर्म, स्वभाषा इ.चा अभिमान आणि

स्वदेशी, सामाजिक सुधारणावादी व परकीय सरकार यांचे खंडन करणे हे केसरीचे वैशिष्टय होते. राष्ट्रीय अस्मिता निर्माण करण्यात केसरीची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. सडेतोड लेखन, प्रखर टीकास्त्र व सोपी भाषा असलेले हे टिळकांच्या लेखनाचे वैशिष्टय होते.

**४) काळ:** शिवरामपंत परांजपे यांनी सन १७९८ मध्ये याची सुरुवात झाली. सशस्त्र प्रतिकार करण्यास स्फूर्ती देणारे वृत्तपत्र म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्य लढ्यातील कित्येक सैनिकांवर खटले भरलेल्या ब्रिटिश सरकारवर टीका करणारे लेखन केल्यामुळे या पत्रास राजद्रोहाच्या खटल्यास सामोरे जावे लागले. १९१० साली काळ पत्र बंद पडले.

**५) संदेश:** १४ जानेवारी १९१५ रोजी अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी मुंबईमध्ये सुरू केले. यामधून लो. टिळकांच्या राजकारणाचा आणि विचाराचा पुरस्कार केला जात असे. चौफेर बातम्या, चुरचुरीत सदरे, सोपी आकर्षक भाषा, नेटकी मांडणी ही संदेशची वैशिष्टये होती. जहाल आणि मवाळ यांच्या राजकारणावर भाष्य करणारे सदर वत्सला वहिनीची पत्रे या नावाने दिले जात असे. या वृत्तपत्रातून सरकारवर टीका करणारी प्रखर राष्ट्रवादी विचाराची परंपरा विकसित झाली.

**४) अब्राह्मणी प्रवाहाची वर्तमानपत्रे:**

**१) दीनबंधू:** महात्मा फुल्यांच्या प्रेरणेने कृष्णराव भालेकर यांनी सन १८७७ मध्ये पुणे येथे याची सुरुवात केली. महात्मा फुल्यांच्या कार्याचा प्रसार व्हावा, विचार जागृतीची, समतेची प्रेरणा मिळावी या उद्देशाने त्यांनी स्वतःच्या खर्चाने हे पत्र सुरू केले होते. पुढे सन १८८० मध्ये मुंबईचे कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांच्याकडे हे पत्र सुपूर्द करण्यात आले. लोखंडेनेही नुकसान सोसून वृत्तपत्र चालू ठेवले. जातीभेदावर प्रहार करण्याचे महत्त्वाचे कार्य या वृत्तपत्राने केले.

**२) दीनमित्र:** सन १८८४ मध्ये स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेचे मुखपत्र म्हणून दीनमित्र वृत्तपत्र सुरू झाले. हे मासिक भालेकरांचे भाचे गणपतराव पाटील चालवत असत.

**३) विटाळ–विध्वंसक:** सन १८८९ मध्ये किसन फागुजी बनसोड यांनी हे वृत्तपत्र सुरू केले. चळवळीसाठी स्वतःचा छापखाना उभारून वृत्तपत्र चालवले.

**४) सत्यप्रकाश:** २४ मे १८९१ रोजी सत्यशोधक समाजाचे सत्यधर्मसमाज असे नामांतर करण्यात आले. सयाजीराव गायकवाड, शिवाजीराव होळकर, विश्राम रामजी घोले यांच्या मदतीने (आर्थिक साहाय्याने) या सत्यधर्म समाजाने सत्यप्रकाश नावाचे पत्र काढले.

**५) सोमवंशीय मित्र:** सन १९०८ मध्ये शिवराम जानबा कांबळे यांनी या मासिकाची सुरुवात केली. ३ वर्षे हे मासिक चालवले.

**६) मूकनायक:** अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व त्यांच्या उन्नतीसाठी मूकनायक पाक्षिकाची सुरुवात झाली. मुक्यांचा नायक म्हणजे मूकनायक. छत्रपती शाहू महाराजांच्या मदतीने सन १९२० मध्ये डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांनी या पाक्षिकाची सुरुवात केली. संपादकपदी पांडुरंग नंदुराम भटकर या तरुणाची नेमणूक केली. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे ते मुखपत्र होते.

**७) बहिष्कृत भारत:** ३ एप्रिल १२ १० रोजी याची सुरुवात झाली. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे संपादक होते. या पत्रात ते अग्रलेख, स्फुटे लिहित. आजकालचे प्रश्न, प्रासंगिक विचार या नावाने त्यांनी स्फुटे लिहिली. यामध्ये चवदार तळ्याचा सत्याग्रह, सत्याग्रहींना धीर देणे, विषमता, धर्म, परंपरा, गुलामगिरीचा इतिहास, महार वतन, गरिबी, कामगारांचे प्रश्न, खोतीचा विषय, संघटनेचे महत्त्व, मुंबई नगरपालिकेचे प्रश्न, हिंदूधर्मशास्त्राची चिकित्सा, हिंदू महासभेची धोरणे इ. विषयांवर लेखन केले. यातून त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नावर वृत्तपत्रीय लढा दिला.

**८) जनता:** सन १९२० मध्ये पाक्षिक म्हणून याची सुरुवात झाली. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी जनता साप्ताहिकाचे प्रबुद्ध भारत साप्ताहिकात रूपांतर करण्यात आले. यामध्ये गांधीजींच्या भूमिकेची चिकित्सा, सरकारी जमिनीचा प्रश्न, जातिभेदाचा राक्षस इ. विषयांवर लेखन होत असे.

**९) जागरूक:** १९ जुलै, १९१७ रोजी पुणे येथे वालचंद रामचंद्र कोठारींनी 'जागरूक' हे पत्र ब्राम्हणेतर चळवळीच्या प्रचारासाठी सुरु केले. याशिवाय बडोद्याचे भगवंत पाळेकरांचे 'जागृती' (साप्ताहिक) आण्णासाहेब लठठे व वा. रा. कोठारी यांचे 'डेक्कन रयत', कोल्हापुरमधील बळवंत कृष्णा पिसाळ यांचे 'विद्याबंधू', दत्ताजीराव यशवंत कुरणे यांचे 'भगवा झेंडा', दिनकरराव जवळकरांचे 'तरुण मराठा', बाबुराव हैबतराव यादवांचे 'गरीबांचा कैवारी', दत्तात्रय भिकाजी रणदिवे यांचे 'संजीवन', तासगांव येथून नारायण रामचंद्र विभूते यांचे 'सत्यप्रकाश' बेळगावचे शामराव देसाई यांचे ङ्गराष्ट्रवीरफ केशवराव ठाकरे यांचे 'प्रबोधन' आणि केशवराव बागडे व कीर्तिवानराव निंबाळकरांचे 'शिवछत्रपती' इत्यादी मधून ब्राम्हणेतर चळवळीची साधने उपलब्ध होतात.

**वर्तमानपत्राच्या मर्यादा:**

बाळशास्त्री जांभेकर, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधीजी, डॉ. भीमराव आंबेडकर यांच्यासबोबतच इतर अनेक मान्यवरांनी वर्तमानपत्रीय लिखाण केलेले आहे, त्यांचे हे जीवनकार्य व विचारांच्या अभ्यासासाठी निश्चितच उपयोगाचे आहे. मात्र आज विविध पक्ष किंवा त्यांच्या मतांचा पुरस्कार करणारी अनेक वर्तमानपत्रे प्रकाशित होत आहेत. ही वर्तमानपत्रे पुढील काळात पक्षीय राजकारणाच्या अभ्यासांची साधनेच ठरतात. मात्र या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणारा मजकूर अनेक वेळा एकतर्फी किंवा अतिशयोक्तीवर आधारलेला असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तो खोडसाळ व काही वेळा चक्क चुकीचाही असू शकतो. त्यामुळे इतिहासलेखन करत असताना एकाच वर्तमानपत्रावर अथवा एकाच विचारसरणीच्या अनेक वर्तमानपत्रांवर विसंबून राहून चालणार नाही. एखाद्या घटनेला विविध वर्तमानपत्रांनी त्या बातमीला कसे अतिरंजित किंवा एकांगी स्वरूप दिले आहे हे लक्षात घ्यावे लागेल. या वर्तमानपत्रातील बातम्या कणाकणाने गोळा करून, त्यातील तथ्य पारखून व संदर्भ लक्षात घेऊनच

इतिहासलेखन करावे लागते. सामान्यतः विश्वासनीयतेचा भाग म्हणून या साधनांचा सावध राहून काळजीपूर्वक उपयोग करावा लागतो.

**इ) इंटरनेट (माहितीचे महाजाल):**

एकविसावे शतक माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. आज ज्ञान उपलब्ध करून देणाऱ्या साधनांचा विस्फोट झाला आहे. इंटरनेटच्या माध्यमातून संपूर्ण जग एकत्र जोडले गेले आहे. इंटरनेटवरून कोणतीही माहिती तत्काळ उपलब्ध होऊ लागली आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचे मायाजाल मानले जाते. या आधुनिक साधनाच्या साह्याने विविध विषयांची माहिती सहजपणे उपलब्ध होते. परंतु ही माहिती अनेकांनी आपापल्या बुद्धिमत्तेप्रमाणे, समजुतीप्रमाणे व विचारसरणीप्रमाणे उपलब्ध करून दिलेली असते. इंटरनेटवरून मिळालेली माहिती पोहोचण्यासाठी ही माहिती पुरेशी व उपयुक्त असते. सीडी, पेनड्राईव्ह, मेमरी कार्ड अशी एक नाही तर अनेक साधने ही माहिती देण्यासाठी आज उपलब्ध आहेत. इंटरनेट वरून प्राप्त माहिती निश्चितपणे दुय्यमच असते व ती पडताळून घ्यावी लागते. मात्र ही माहिती संशोधकास प्राथमिक साधनांपर्यंत पोहचवण्याची पहिली पायरी ठरू शकते.

**डिजिटल लायब्ररी, बुक्स आणि कॅटलॉग:** (Digital libraries, books and catalogues)

अनेक राष्ट्रीय ग्रंथालयांमध्ये आता त्यांच्याकडील विविध स्त्रोतांचे सर्वसमावेशक कॅटलॉग आहेत आणि त्यापैकी काही डिजीटल आणि थेट प्रवेशयोग्य आहेत. उदा. ब्रिटीश लायब्ररी, नॅशनल लायब्ररी ऑफ स्कॉटलंड आणि नॅशनल लायब्ररी ऑफ वेल्स. नॅशनल लायब्ररी ऑफ न्यूझीलंड, लायब्ररी ऑफ कॉंग्रेस आणि नॅशनल लायब्ररी ऑफ ऑस्ट्रेलिया या सर्व डिजीटाइज्ड पुस्तके, प्रतिमा आणि दस्तऐवजांच्या विस्तृत स्त्रोटामध्ये आपल्याला विनामूल्य प्रवेश देतात. आपण संशोधन करत असलेल्या विषयावर अवलंबून इतर राष्ट्रांची राष्ट्रीय ग्रंथालये देखील शोधण्यासाठी मदत करतात.

१) विविध संकेत स्थळावरील एक सर्वोत्कृष्ट डिजिटल लायब्ररी इंटरनेट आर्काइव्ह (Internet Archive: eBooks and Texts) आहे, ज्यामध्ये वेबॅक मशीन देखील समाविष्ट आहे, की जे १९९० च्या दशकात बंद झालेल्या संकेत स्थळांचे संग्रहण आहे. आपण लाखो डिजीटाइज्ड पुस्तके, जर्नल्स, मासिके, व्हिडिओ, ध्वनी फाइल्स, रेडिओ ट्रान्सक्रिप्ट्स, दस्तऐवज आणि विविध संग्रह शोधू शकतो.

२) जे ग्रंथ आज उपलब्ध होवू शकत नाहीत अशा प्रकारची जुनी नियतकालिके आणि पुस्तके शोधण्यासाठी archive.org उपयुक्त आहे.

३) पुस्तकांची अशीच एक डिजिटल लायब्ररी म्हणजे हाथि ट्रस्ट (HathiTrust) आहे. यावरती ८ मिलियन डिजिटल साधन स्त्रोत व २ मोलियन अधिक सार्वजनिक डोमेन पुस्तकांसह विनामूल्य उपलब्ध आहेत. हाथि ट्रस्ट ही प्रमुख संशोधन संस्था आणि ग्रंथालयांची भागीदारी आहे.

४) Online Medieval Classical Library शास्त्रीय आणि मध्ययुगीन संकृतीची काही महत्त्वाच्या साहित्यकृतींचा संग्रह असलेले संकेत स्थळ आहे.

५) त्याचप्रमाणे EServer.org ही कला, आर्किटेक्चर, नाटक, मानवता, सामाजिक समस्या इत्यादी क्षेत्रातील ५० हून अधिक डिजिटल संग्रहांचा समावेश असलेले संकेत स्थळ आहे आहे. (आयोवा विद्यापीठ).

६) इंटरनेटवरील सर्वात प्रसिद्ध संकेत स्थळ म्हणजे Google Books. गूगल बुक्स वरती सन २०१९ मधील माहिती प्रमाणे ४० मिलियन डिजिटल केलेले ग्रंथ उपलब्ध आहेत. यामध्ये सन १९२५ पूर्वीचे अनेक ग्रंथ व साधन संग्रह उपलब्ध आहे.

७) WorldCat वर्ल्डकॅट हे यू. एस. आणि कॅनडामधील बहुतेक ग्रंथालये आणि इतर देशांतील ग्रंथालयांचे कॅटलॉग आहे. आपण आपली पुस्तके, डीव्हीडी, संकेत स्थळे, संग्रहीत साहित्य आणि इतर काही संदर्भ साहित्याचा शोध घेवू शकतो.

८) Internet Public Library: History Collection इतिहासासाठी उपयुक्त अशी सुमारे ९०० हून अधिक वेब संसाधने यावर उपलब्ध आहेत. यामध्ये ऐतिहासिक दस्तऐवज आणि साधनांचा समावेश आहे. यामध्ये इतिहासाचे ब्लॉग, कालखंडांनुसार, प्रदेशांनुसार व विषयानुसार इतिहास उपलब्ध आहे.

९) Interlibrary Loan (ILL) service. चा वापर करून आपणास हवे असलेले एखादे पुस्तक अथवा नियतकालिक अथवा लेख इंटरलायब्ररी लोन (ILL) सेवेद्वारे ते विनामूल्य ऑर्डर करू शकता.

१०) Internet Library of Early Journals (ILEJ): बर्मिंगहॅम, लीड्स, मँचेस्टर आणि ऑक्सफर्ड विद्यापीठांचा हा डिजिटल संग्रह. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या ब्रिटिश प्रकाशनांचा शोध घेण्यासाठी याचा वापर करू शकता.

११) JSTOR ही एक डिजिटल लायब्ररी आहे, ज्याची स्थापना १९९४ मध्ये झाली आहे. मूळत: शैक्षणिक जर्नल्सचे डिजिटलाइज्ड बॅक इश्यू असलेले संकेत स्थळ आहे, त्यात आता पुस्तके आणि इतर प्राथमिक स्त्रोत तसेच मानविकी आणि सामाजिक विज्ञानातील जर्नल्सच्या वर्तमान समस्यांचा समावेश आहे. हे जवळजवळ ७५ विषयांचा समावेश असेलेले १२ मिलियन जर्नल्स, बुक्स आणि चित्रे यांचा पूर्ण-मजकूर आपणास उपलब्ध करून देते.

**शोधगंगा:**

विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमधील एम.फील. व पी. एच. डीचे प्रबंध (थिसीस) जगभरातील संशोधकांसाठी उपलब्ध व्हावेत यासाठी भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सुरु केलेल्या नॅशनल मिशन ऑन एज्युकेशन थ्रू इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नोलॉजी (NME-ICT) अंतर्गत 'शोधगंगा' हा ऑनलाइन प्लॅटफॉर्म सुरु करण्यात आला आहे. एखाद्या विषयात संशोधन करताना त्या विषयासंबंधी कोणत्या प्रकारचं संशोधन काम झालं आहे किंवा सुरु आहे, हे संशोधन करणारे तज्ज्ञ कोण आहेत, ते कोणत्या संस्था किंवा विद्यापीठांमधून संशोधन करत आहेत याची माहिती महत्त्वपूर्ण असते. विद्यापीठांतील संशोधन प्रबंध हे खूप महत्त्वाचे दस्तावेज असतात. एखाद्या विषयामध्ये चार ते पाच वर्षं संशोधन करुन

संशोधक आपला प्रबंध सादर करत असतात. हे प्रबंध ज्ञानाचा आणि माहितीचा उत्तम स्त्रोत असतात. पण ग्रंथरुपात असल्यानं अनेकदा संबंधित विद्यापीठांमध्ये वा संशोधन संस्थांच्या ग्रंथालयातच पडून असतात. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमधील एम.फील. व पी. एच. डीचे प्रबंध (थिसीस) जगभरातील संशोधकांसाठी उपलब्ध व्हावेत यासाठी भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सुरु केलेल्या नॅशनल मिशन ऑन एज्युकेशन थ्रू इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नोलॉजी (NME-ICT) अंतर्गत 'शोधगंगा' हा ऑनलाइन प्लॅटफॉर्म सुरु करण्यात आला आहे. शोधगंगा ही देशभरातील प्रबंधांची इलेक्ट्रॉनिक/ डिजिटल रिपॉझिटरी आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने विनियमाद्वारे (रेग्युलेशन) सर्व विद्यापीठांना एम.फील. आणि पी.एच.डी. प्रबंधांची इलेक्ट्रॉनिक प्रत देणं बंधनकारक केलं आहे. शोधगंगा या उपक्रमामुळे संशोधकांना माहितीचं आणि ज्ञानाचं विश्व खुलं झालं आहे. https://shodhganga.inflibnet.ac.in

**ऑडिओ–व्हिज्युअल आणि चित्रे** (Audio-Visual Picture Collections)

संशोधकास विविध प्रकारच्या ऑडिओ-व्हिज्युअल महितीपट अथवा आणि प्रतिमांची गरज असते, आणि जर संशोधकास चित्र, ध्वनी आणि व्हिडिओ संशोधनामध्ये स्वारस्य असेल तर जगातील अनेक संकेतस्थळे यासाठी उपयुक्त आहेत. आपण सर्व प्रमुख शोध इंजिनांमध्ये आता चित्रे आणि व्हिडिओ समाविष्ट आहेत. उदा. गूगल प्रतिमा शोध. ऐतिहासिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या-संबंधित चित्रांच्या भांडारांमध्ये Flickr.com समाविष्ट आहे, ज्यामध्ये Flickr Commons, सार्वजनिक संग्रहणांमधील छायाचित्रे आणि प्रतिमांचा शोधण्यायोग्य कॅटलॉग समाविष्ट आहे. जे कॉपीराइटमध्ये नाहीत आणि ब्रिटिश लायब्ररी किंवा काँग्रेस लायब्ररी सारख्या संरक्षक संस्थांद्वारे मुक्तपणे दिले जातात. विकिमीडिया कॉमन्स हा आणखी एक समान स्त्रोत आहे. गूगल सारख्या शोध इंजिनमध्ये तुम्हाला त्यांच्या वापराच्या अधिकारांनुसार चित्रे फिल्टर करण्यात मदत करण्यासाठी साधने समाविष्ट आहेत, जे तुम्ही केवळ विशेषता आवश्यक असलेल्या चित्रे वापरण्यासाठी विनामूल्य शोधत असाल तर ते खूप उपयुक्त ठरू शकतात. Internet Archives वरती ४००००० हून अधिक फोटो आणि ७००००० अडिओ उपलब्ध आहेत. History.com हे संकेत स्थळ विविध प्रकारच्या ऐतिहासिक महितीपटसाठी महत्वपूर्ण आहे. इइउ हे अशाच प्रकारचे महत्वाचे चॅनल व संकेत स्थळ आहे ज्याद्वारे आपण अनेक प्रकारचे संशोधनात्मक माहितीपट आठव स्टोरी पाहू, वाचू किंवा ऐकू शकतो. चित्रपट अथवा व्हिडिओ फुटेजसाठी YouTube किंवा तळाशे हा अत्यंत महत्वाचा मार्ग आहे, ज्याद्वारे आपपण मोठ्या प्रमाणात चित्रपट, महितीपट अथवा विविध प्रकारच्या व्हिडीओच्या लायब्ररी अथवा प्लॅटफॉर्मचा वापर वापर करू शकतो. खालील काही महत्वपूर्ण संकेत स्थळे आहेत ज्यावर आपणास उपयुक्त माहिती प्राप्त होवू शकते. उदा. Library of Congress Prints Photographs Online Catalog, American Memory Photography Print Collections, New York Public Library Digital Gallery, Picture Collection of the French National Library, British Library Online Gallery: Points of View Exhibition

**विकिपीडिया** (Wikipedia)

वर्तमान काळात जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात इंटरनेटचा उपयोग वाढत आहे. वर्तमान काळात एकूण जागतिक लोकसंख्येपैकी ४९० कोटींपेक्षा अधिक लोक इंटरनेट चा उपयोग करत आहेत. आज इंटरनेटवर प्रत्येक गोष्टीची माहिती उपलब्ध आहे, विकिपीडिया हा इंटरनेटवरील माहितीचा सर्वात मोठा आणि सुप्रसिद्ध असा स्त्रोत आहे. विकिपीडियावर न केवळ एका ठरविक भाषेत, तर जवळजवळ जगात वापरल्या जाणाऱ्या विविध भाषेत माहिती उपलब्ध आहे. विकिपीडिया या मुक्त-सामग्रीचा ऑनलाइन विश्वकोश आहे, ज्यामध्ये विविध विषयांवर लेख स्वरूपात माहिती उपलब्ध आहे. हे स्वयंसेवक योगदानकर्त्यांच्या जागतिक समुदायाद्वारे लिहिले व संपादित केले जातात. विकिपीडियावरील लेख तटस्थ दृष्टिकोनातून लिहिलेले असतात जे विश्वसनीय स्त्रोतांच्या आधारे लिहिले जातात. विकिपीडिया हे संकेत स्थळ २००१ मध्ये सुरू झाले आणि शेकडो भाषांमध्ये लाखो लेखांसह जगातील सर्वात लोकप्रिय संकेतस्थळ बनले आहे. यावरती संशोधकास उपयोगी असलेली पुढील माहिती प्राप्त होवू शकते. उदा. List of Digital Library Projects, List of academic databases and search engines, List of online newspaper archives

**ऐतिहासिक संकेत स्थळे:**

ऐतिहासिक प्राथमिक स्वरूपाची माहिती, व्याख्या, अर्थ, संकल्पना याची माहिती इंटरनेटवरील विविध संकेत स्थळांच्या माध्यमातून उपलब्ध करू शकतो. यासाठी Best of History Web Sites हे संकेत स्थळ महत्वाचे आहे. एव Tech Teacher द्वारे तयार करण्यात आलेले इतिहासाच्या सर्वोत्तम संकेत स्थळामधले हे एक उपलब्ध आहेत. यावरती १२०० हून अधिक इतिहासाच्या विविध संकेत स्थळाचा समावेश आहे. तसेच दर्जेदार के-१२ इतिहासाची प्रकरणे, योजना, इतिहास शिक्षक मार्गदर्शक, इतिहासाचे विविध उपक्रम, इतिहासाचे खेळ प्रकार, इतिहास प्रश्न मंजूषा व इतर गोष्टीचा समावेश आहे. त्याच बरोबर History Matters (Center for History and New Media) ह्या अनेक डिजिटल संसाधनांमध्ये धडे, योजना, अभ्यासक्रम, लिंक्स आणि प्रदर्शने आहेत. व्यावसायिक इतिहासकार, हायस्कूल शिक्षक आणि इतिहासाच्या विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेले आहे.

✼ **स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३**

**रिकाम्या जागा भरा.**

१) ब्रिटिशांनी मद्रास येथे .......... मध्ये पहिल्या पुराभिलेखागाराची स्थापना केली.

२) सर जदुनाथ सरकार व रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी पेशवे दप्तराचे .......... खंड प्रसिद्ध केलेले आहेत.

३) अकबराच्या काळातील .......... मधील माहिती सामाजिक पाहण्यावरच आधारलेली दिसून येते.

४) डॉ. य. दि. फडके यांनी लिहिलेला .......... यांच्यावरील चरित्रात्मक ग्रंथ हा प्रामुख्याने तत्कालीन वर्तमानपत्रांच्या संदर्भावर आधारित आहे.

५) मुंबई अखबार या वृत्तपत्राची सुरुवात .......... रोजी झाली.

६) विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी सन १८७४ मध्ये .......... वृतपत्राची सुरुवात केली.

७) सन १९९० च्या दशकात बंद झालेल्या संकेत स्थळांचे संग्रहण .......... मध्ये आहे.

८) इंटरनेटवरील पुस्तकासाठी सर्वात प्रसिद्ध संकेत स्थळ म्हणजे ..........

९) एखादे पुस्तक अथवा नियतकालिक अथवा लेख .......... सेवेद्वारे ते विनामूल्य ऑर्डर करू शकता.

१०) भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सुरु केलेल्या नॅशनल मिशन ऑन एज्युकेशन थ्रू इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नोलॉजी (NME-ICT) अंतर्गत .......... हा ऑनलाइन प्लॅटफॉर्म सुरु करण्यात आला आहे.

### **१.२.३ मौखिक साधने आणि मुलाखत पद्धती:** (Oral Sources and Interview Techniques)

**अ) मौखिक साधने:**

इतिहासलेखन व आधुनिक संदर्भ साधनांचे क्षेत्र अधिक विस्तारत आहे. इतिहासलेखनात नवनविन विचार प्रवाहांचा अंर्तभाव झालेला आहे. वंचितांचा इतिहास, ॲनल्स, संरचनावादी, स्थानिक, सामाजिक, सांस्कृतिक, खाद्य संस्कृतीचा इतिहास इत्यादी नवनवीन प्रकारचे इतिहासलेखन प्रवाह एकाच घटनेचे विविध अंगानी इतिहास लेखन करताना दिसतात. या नविन विचारप्रवाहांनी नव्याने ऐतिहासिक साधनांचे महत्व, चिकित्सा, विश्लेषण अथवा प्रचलित साधनांचा नव्या पध्दतीने वापर करण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये मौखीक परंपरा आणि साधनां अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. मौखिक साधने किंवा मौखिक इतिहास म्हणजे इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तिगत, कौटुंबिक, समूहिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि दैनंदिन जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांसंबधी मौखिक स्वरूपातील माहितीचा संग्रह आणि अभ्यास होय. लिखित साधनांपेक्षा मौखिक साधनांची विश्वासार्हता कमी मानली जात असली, हे जरी खरे असले तरी जेथे लिखित साधनाचा अभाव असतो तेथे मौखिक साधने काळजीपूर्वक उपयोगात आणता येतात. मानवी समाजात काही समूहाकडे-जमातींकडे लिखित साधनांचा अभाव होता अथवा त्यांना लेखन कलेची माहिती नव्हती. त्याचप्रमाणे लेखन कलेची माहिती असून देखील काही समूहांनी आपली माहिती मौखिक परंपरेनेच पिढ्यानपिढ्या संक्रमित केली आणि पाठांतराद्वारे पिढ्यानपिढ्या त्यांचे जतन देखील केले. अशा पद्धतीने ज्ञान, स्मृति, भूतकालीन घटना, पारंपारिक कथा-गाणी, पारंपारिक कायदे यांचे ग्रहण, संवर्धन आणि संक्रमण होत राहिले. पारंपारिक कथा, दंतकथा, मिथके, म्हणी, पोवाडे, ओव्या, गाणी इत्यादींचा अंतर्भाव मौखिक परंपरेत केला जातो. मौखिक परंपरेतून मिळालेल्या माहितीची लिखित अथवा पुरातत्त्वीय साधनांशी पडताळणी करून इतिहासकार त्या माहितीचा वापर करतात. अशा पडताळणीमुळे माहितीच्या सत्यासत्यतेची तपासणी करता येते.

**मौखिक इतिहासाचे महत्व:**

ऐतिहासिक घटना किंवा घडलेले प्रसंग बऱ्याच वेळा लिहून ठेवलेले नसतात किंबहुना ते त्यांना शक्यही नव्हते. कारण प्राचीन काळापासून साक्षरतेचे प्रमाण अल्प होते. त्यामुळे त्या घटना किंवा प्रसंगांची नोंद झाली नाही. परंतु मौखिक साधनांच्या मधून ते प्रतिबिंबित झालेले दिसते. मौखिक परंपरेत प्रसंग किंवा घटना सारखीच असते परंतु सांगणारी व्यक्ती वेगळी असते, त्यामध्ये तो स्वत: ची भर घालून अधिक रंजकता आणण्याचा प्रयत्न करत असतो किंवा केलेला असतो. त्यामुळे घटना व प्रसंग सारखाच असतो परंतु त्यातील नावे वेगवेगळी असतात. तो प्रसंग किंवा घटना अनेक मौखिक साधनांच्या माध्यातून वर्षानुवर्षे सांगण्याचे काम चालू असते. त्यामुळे प्रसंगातील वस्तूनिष्ठता लुप्त होते. परिणामी मौखिक साधनांचा इतिहास लेखनामध्ये फारसा उपयोग होत नाही, त्याचे महत्वही राहत नाही, हे जरी खरे असले तरी अशा मौखिक साधनांच्या माध्यमातून जी माहिती प्राप्त होते अथवा त्यामधुन जो अर्थबोध होतो त्या माहितीच्या आधारे पूर्वी घडलेल्या घटनांच्या ऐतिहासिक सत्यापर्यंत जाता येते. जेव्हा एखाद्या महत्वाच्या घटनेविषयी कोणताही लिखित अस्सल पुरावा किंवा साधन उपलब्ध होत नाही तेव्हा अशा मौखिक साधनांच्या आधाराने काही अंशी त्या घटनेवर प्रकाश टाकणे शक्य होते. मौखिक साधनांच्यामधून मिळालेल्या ऐतिहासिक माहितीची तर्क संगत दृष्टीकोणातून चिकित्सा किंवा अभ्यास करून त्या संबंधीत घटनेचा उचीत अन्वयार्थ काढता येतो. मौखिक साधनांच्या माध्यमातून परंपरागत चालत आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय इतिहासावर प्रकाश टाकण्यास मदत होते. त्याचबरोबर तत्कालीन आचार-विचार, रुढी-परंपरा, आहार-विहार इत्यादी संबंधी माहितीही मिळते.

**मौखिक इतिहासाची संकल्पना:**

ऐतिहासिक घटनांमधील साक्षीदारांकडून त्यांच्या स्मृतींवर आधारित माहिती गोळा करणे व त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे मौखिक इतिहास होय. ही क्रिया एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिकपद्धतीने जात असते. असंरचित मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्तीकडून एखाद्या घटनेची, कार्यक्रमाची किंवा क्रियेची माहिती गोळा करण्याची ही पद्धती होय. मौखिक इतिहास हा व्यक्तिच्या आठवणींवरती आधारित असतो. भूतकाळात घडलेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक या घटना व्यक्ती तिच्या आठवणींच्या आधारे एखाद्यास सांगतो व ऐकणारा त्या आठवणींच्या आधारावरून विश्लेषण करीत असतो. मौखिक इतिहासपद्धती ही ऐतिहासिक दस्तऐवजीकरणासाठी वापरात येणारी सर्वात जुनी पद्धती मानली जाते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षित सर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासपद्धतीचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी केला गेला. पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला.

मौखिक इतिहास हे एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या विधानांची, अनुभवांची आणि आठवणींची एक पद्धतशीर संकलन आहे, जे इतिहासकारांनी सादर केले आहे. एक मौखिक इतिहासकार प्राप्त केलेल्या

मौखिक माहितीची तपासणी, परीक्षण आणि विश्लेषण करतो. कारण मौखिक इतिहास वैयक्तिक विधानांच्या स्मृतीवर आधारित असतात. त्यामुळे त्यात विचलन होण्याची शक्यता आहे. म्हणूनच कागदपत्रे आणि अभिलेखावर आधारित इतिहासकार त्यावर टीका करतात. त्यांच्या मते मौखिक इतिहास म्हणजे एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे वैयक्तिक असते. म्हणून अशा प्रकारचा इतिहास बऱ्याच मर्यादित आणि अरुंद असू शकतो. मात्र हे हे पूर्ण सत्य नाही.

औद्योगिकीकरणाच्या अगोदर मौखिक परंपरा समाजांचे एक महत्त्वाचे अंग होते. जगभरात या काळात शिक्षण व तंत्रज्ञान प्रसार पाहिजे तेवढा झालेला नव्हता. इतिहासाच्या निर्मिती, संप्रेषण आणि संवर्धनात मौखिकतेची भूमिका महत्त्वपूर्ण होती. हेरोडोटस, कल्हन, इब्न बतुता, अल्बेरुनी, बर्नियर मध्याकालीन प्रवाशांचे लेखन आधुनिक इतिहासकारांच्या लेखनाचे प्रमुख साधन आहे, मात्र आपण हे लक्ष्यात ठेवले पाहिजे की यांचे लिखान मौखिक माहितीवर आधारित आहे. आपण जर फाह्यान, हूनत्संग आणि मार्को पोलो यासारख्या प्रवाशांच्या लेखनाबद्दल बोललो तर त्यांनी त्यांच्या प्रवासात भेटलेल्या सर्वसामान्य लोक, शेतकरी, व्यापारी, कलाकार, राज्यकर्ते आणि अधिकारी इत्यादींचे अनुभव जाणून घेतल्यानंतरच ते लिपीबद्ध केले आहेत, या अर्थाने जर आपण याचा विचार केला तर एक प्रकारे हा मौखिक इतिहासच आहे. या दृष्टीकोणातून पहिले तर मौखिक इतिहास आणि लेखी इतिहास परस्परांना पूरक आहेत. त्या दोघांमध्ये एक समान धागा आढळतो. कधीकधी मौखिक इतिहास चुकीचा असू शकतो आणि लिहिलेला इतिहास चुकीचा अथवा विपरित देखील असू शकतो. उदा. प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी जर आपण वेदांचा साधन म्हणून उपयोग केला तर ते स्पष्टपणे मौखिक परंपरावर अवलंबून आहे. कारण वेद लिखित येण्यागोदर ते मौखिक होते.

**मौखिक इतिहासलेखन आणि संशोधन पद्धती:**

इतिहासलेखन व पुर्नलेखनासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घ्यावा लागतो. याशिवाय इतिहासलेखन परिपूर्ण होत नाही. प्राचीन व ऐतिहासिक घटना व व्यक्तीच्या संदर्भात संशोधन करताना काही घटना किंवा व्यक्तीच्या संबंधी-परिपूर्ण माहिती अथवा साधने उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आशा ऐतिहासिक घटना किंवा व्यक्तीचा इतिहास लिहिताना काही वेळा पोकळी राहिलेली दिसते. राजकीय, सामाजिक, धार्मिक किंवा सांस्कृतिक इतिहास संदर्भ साधनांच्या शिवाय परिपूर्ण होवू शकत नाही. संदर्भ साधनांच्या कमतरतेमुळे निर्माण झालेली ही पोकळी भरून काढण्याचे काम मौखिक साधने काही प्रमाणात पूर्ण करतात. मौखिक साधने म्हणजे पिढ्यान-पिढ्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक स्वरूपात आलेले साहित्य होय. साहित्यामध्ये देखील मौखिक साहित्य नावाचा स्वतंत्र प्रकार आहे. असे साहित्य लिहिलेले नसते व त्याचा कर्ता बऱ्याच प्रसंगी अज्ञात असतो, परंतु ते पिढ्या-दर-पिढ्या मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेले असते. यामध्ये लोककथा, दंतकथा, पुराणकथा, पोवाडे, खंडकाव्य, वीरगीते, ओव्या, जात्यावरची गाणी, म्हणी व वाक्प्रचार इत्यादी चा समावेश होतो.

वास्तविक पाहता मौखिक इतिहास अथवा इतिहासलेखनाचा मुख्य उद्देश संभाषणाद्वारे एखादी घटना अथवा किंवा घटनाक्रमाचे विश्लेषण करणे किंवा त्यांचे वर्णन करणे हा आहे. या मध्ये मुख्यतःजे मुख्य प्रवाहात सामील होत नाहीत त्यांचा आवाज सामील केरून घेण्याची प्रकिया आहे. त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देते. ज्यामध्ये ते आपला मुद्दा मांडू शकतात. यामध्ये त्याचा आधार म्हणजे लोकांची थेट मुलाखत. मौखिक इतिहासाने लोकांच्या वृत्ती आणि अनुभवांचा इतिहासात समावेश करून इतिहासात बदल घडवून आणले. मौखिक साधनाचे ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीने, ढोबळ मानाने दोन प्रकार पडतात, एक मौखिक परंपरा आणि दूसरा मुलाखत. मौखिक परंपरा म्हणजे, परंपरेने, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणारी विभिन्न स्वरूपातील मौखिक माहिती होय, याला आपण मौखिक वाङ्‌ममय देखील म्हणू शकतो.

मौखिक इतिहासाचे आणखी एक अभ्यासक रीची डोनाल्ड यांनी आपल्या 'रेकॉर्डिंग ओरल हिस्ट्री' ग्रंथात मौखिक इतिहासलेखांना संबंधी, ङ्गसामाजिक शास्त्राच्या इतर क्षेत्रांप्रमाणे मौखिक इतिहासाची संशोधन पद्धत पद्धतशीर आणि सर्वसमावेशक आणि कथात्मक असावी लागते. मौखिक इतिहासकलेखकांचा असा विश्वास आहे की इतिहासकारांनी दिलेल्या व्याख्या आणि कथनांपेक्षा त्यांचा इतिहासातील अनुभव अधिक जटिल आहे. एखाद्या ऐतिहासिक घटनेशी संबंधित मुलाखतीद्वारे क्वचितच ऐतिहासिक पुरावे मिळू शकतात. परंतु, कधीकधी अशा घटनेत इतिहासाच्या कोणत्याही शाखांविषयीच्या आपल्या कल्पनांमध्ये बदल घडण्याची क्षमता असतेफ असे रीची यांनी नमूद केले आहे.

**आठवण, स्मृती आणि मौखिक इतिहास:**

मौखिक इतिहासाचा वापर १९८० मध्ये 'इतिहास' व 'आठवणी' यांच्या सहसंबंधातील उदयामुळे मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. आठवण ही मौखिक इतिहासाचा खूप मोठा आधार आहे. आठवण ही सामाजिक उत्पादनाचे प्रभावी साधन मानता येत; कारण आठवणीतून दैनंदिन जीवनातील भूतकाळ व वर्तमानकाळ यांना जोडणारे ज्ञान तयार होत असते. मौखिक इतिहासपद्धतीमुळे दुर्लक्षित घटकांची जाणीव, संवेदना समजून घेण्यास मदत होते. मौखिक इतिहास हा सत्ताधारी घटकाकडून न येता, तो थेट भोगलेल्या व्यक्तिच्या तोंडून बाहेर येत असतो. ग्लक यांच्या मते, 'ज्या स्त्रियांनी औपचारिक शिक्षण घेतले नाही किंवा ज्या स्त्रियांना संवाद साधण्यास जमत नाही, अशा स्त्रियांची माहिती घेण्यासाठी व त्यांना सशक्त बनविण्यासाठी मौखिक इतिहास महत्त्वाचे साधन आहे.

इतिहास जेवढा ग्रंथांच्यामध्ये आहे तेवढेच इतिहासाच्या बाहेर सुद्धा आहे? जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या आठवणी जगतात आणि ज्या कोठेही नोंदवल्या गेलेल्या नसतात. एखाद्या व्यक्तीने एखाद्या घटनेची आठवण कशी जगावावी हे त्याचे स्वत:चेच वर्णन असते, की जे दुसऱ्यापेक्षा पूर्णपणे भिन्न असते. विस्थापित, शोषित, पिडीत, बलात्कार अथवा पुनर्वसित यांचे स्वत:चे अनुभव असतात. सार्वजनिक आठवणींमध्ये नोंदलेल्या अशा घटनांकडे दुर्लक्ष करून कोणत्याही जाती, समाज किंवा राष्ट्राचा संपूर्ण इतिहास आपण जाणू शकतो का, यात मला शंका आहे. आठवणी कोण, काय, कोण आणि कसे संग्रहित करतात यावर बरेच काही

अवलंबून आहे. असे असूनही, एखाद्या वांशिक गट किंवा व्यक्तीस एखाद्या घटनेची आठवण कशी होते, कोणाकडे, ज्याच्या समोर ती सांगितली जाते, मुख्य घटनेबद्दल किंवा तिच्या कोणत्याही उप-घटनेबद्दल त्याचा-त्याचा दृष्टिकोन काय आहे, हे ऐतिहासिक तथ्यांशी समांतर होते की नव्हते याचे उत्तम ज्ञात असले पाहिजे.

वैयक्तिक आठवण आणि स्मृती मौखिक इतिहासाची महत्त्वपूर्ण बाजू आहेत. मुलाखत घेणाऱ्याला तांत्रिक कौशल्य आणि अनुभव आवश्यक असतो. मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीकडून काय शोधायचे आहे आणि काय काढायचे आहे याविषयी माहिती असणे आवश्यक आहे. प्रश्नांचा संबंध परस्पर संबंधित क्षेत्रावर केंद्रीत असला पाहिजे. जेणे करून अधिक अंतरदृष्टीने समस्येवर प्रकाश टाकता येईल. मौखिक इतिहासकार त्यासाठी व्यावसायिकदृष्ट्या सुसज्ज आणि अनुभवी असणे गरजेचे असते. ऐतिहासिक घटनेच्या कोणत्याही पैलूवर त्यांचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. या संबधी बर्खहार्ड, आपल्या 'जजमेंट्स इन हिस्ट्री अँड हिस्टोरीन्स' या ग्रंथात म्हणतो की, मौखिक इतिहास केवळ स्मृतीवर आधारित आहे. म्हणून मुलाखत घेणार्याने घटनेची किंवा प्रथेची चांगली स्मरणशक्ती ठेवली पाहिजे. घटनेची तारीख किंवा तपशील कदाचित बरोबर असू शकत नाहीत आणि त्या तपासण्यासाठी किंवा अस्सल लिखित स्त्रोतांद्वारे तपासले जाणे आवश्यक आहे. मुलाखत किंवा त्याच्या आत्मचरित्राची कोणतीही घटनेची नोंद अथवा डायरी देखील त्याच्या कथनात किंवा अनुभवासाठी पूरक म्हणून वापरली जाऊ शकते. अशा परिस्थितीत मुलाखतदारास मुलाखती घेणाऱ्या उपक्रम, योगदान आणि सहभागाची चांगली माहिती असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, संगीतकार आणि साहित्य यासारख्या क्षेत्रांवर सामाजिक कार्यकर्त्याकडून माहिती गोळा करण्याचा अर्थ नाही, जोपर्यंत तो त्या क्षेत्रांमध्ये काम करणारे आणि प्रत्यक्षय अनुभवी असत नाहीत तो पर्यन्त त्याला काही अर्थ उरत नाही. आठवण, स्मृती आणि मौखिक इतिहास या संदर्भात आपण 'द सीन्स वुइ मेड- ॲन ओरल हिस्टरी ऑफ एक्स्पेरिमेंटल थिएटर इन मुंबई' हे शांता गोखले यांच्या ग्रंथाचे एक उत्तम उदाहरण म्हणून देवू शकतो. याशिवाय आपण नेहरू स्मारक संग्रहालयाने १९६६ मध्ये जी मौखिक इतिहासाचा प्रकल्प सुरू केला त्याचाही उल्लेख विशेषकरून करावा लागेल. या मध्ये त्यांनी १३५१ विविध महत्व पूर्ण व्यक्तीच्या मुलखीत घेवून त्याचे या पैकी ८८२ प्रतिलेख नेहरू स्मारक संग्रहालयाच्या वाचनालयात उपलब्ध आहेत.

मौखिक इतिहास अनुभवाच्या अधिक व्यक्तिपरक पैलू प्रकट करतो. आयुष्याचा दीर्घ अनुभव असलेला एखादा माणूस म्हणजे त्याच्या जीवनातील अनुभवांमधील एक महत्त्वाचा स्त्रोत सामग्री किंवा मौल्यवान दस्तऐवज. त्याचे जतन केवळ मौखिक इतिहासाद्वारे शक्य आहे. मौखिक इतिहासाच्या रूपातील असे अनुभव मौखिक इतिहासाच्या योग्य संग्रहात जतन केले जाणे आवश्यक आहे. त्यांची सामग्री, नाव, व्यवसाय, कालावधी आणि महत्त्व यासारख्या तपशीलांसह दस्तऐवजीकरण केले जाऊ शकते. दुर्दैवाने, भारतीय आणि सरकारी संस्था अशा दोन्ही संस्थांना मौखिक इतिहास अभिलेखाचे किंवा अशा प्रकल्पांचे उपनगरीय गट किंवा उपेक्षित विभागांचा इतिहास नोंदविण्याचे महत्त्व कळले नाही. मौखिक इतिहास एखाद्या रस्त्याच्या इतिहासातील लोकांना मदत करतात.

**प्रादेशिक, स्थानिक इतिहास आणि मौखिकता:**

प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहासामध्ये कुटुंबांची भूमिका प्रमुख आहे. कौटुंबिक इतिहासाचे लेखन ही प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहासाच्या पुनर्रचनेची एक परिपूर्ण आवश्यकता आहे. दुर्दैवाने आपल्या शैक्षणिक कामांमध्ये असा नवीन प्रवाह समोर आला नाही. मौखिक परंपरा आणि व्यक्तींच्या स्मृती अशा लिखाणांसाठी सिंहाचा वाटा पुरवतात. या दिशानिर्देशातील मुलाखती स्थलांतर, शेती, उद्योग, संस्कृती आणि कौटुंबिक प्रणालीशी संबंधित मुद्यांना उजाळा देऊ शकतात. सेटलमेंट पॅटर्न, परस्परावलंबन, सामाजिक संबंध, विवाह संबंध कौटुंबिक इतिहासात आढळू शकतात. येथे तथ्यात्मक कथन आणि स्मरणशक्तीच्या आधारे माहिती एकत्रित केली जाऊ शकते. महिला मुलाखतदारांना कौटुंबिक रीतिरिवाज, कौटुंबिक संसाधनांचा वापर, स्थानिक भांडणे आणि संघर्ष यासंबंधी अधिक तपशीलवार माहिती प्रदान करण्यात मदत होईल. स्थानिक कार्यक्रम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींशी कसे जोडले जातात हे सामान्य लोक शिकतात. ऐतिहासिक चौकशीच्या प्रकाराबद्दल लोकांशी संवाद साधण्याची ही संधी आहे. समाज किंवा आदिवासी गट किंवा उपेक्षित विभाग यांच्या एकत्रित स्मृती मौखिक इतिहासकारांनी त्यांचे प्रथा, शिष्टाचार, विधी आणि सामान्य अनुभव प्रकाशात आणण्यासाठी अथवा करण्यासाठी नोंदवल्या जाऊ शकतात. येथे, पुरुष किंवा स्त्रिया किंवा आदिवासी किंवा स्थलांतरितांचा विशिष्ट गट त्यांचे सामान्य अनुभव सार्वजनिक करू शकतात. कोणतीही अतिशयोक्ती किंवा अनुमानानुसार अथवा अतिअंदाजीत असल्यास त्या समुहा अथवा गटांकडूनच दुरुस्त होण्याची शक्यता आहे. समुदायाची स्मरणशक्ती किंवा सामूहिक स्मरणशक्ती निश्चित करण्यासाठी एकत्रित मुलाखतीचा किंवा समुदायाचा मुलाखत घेण्याचा दृष्टीकोन म्हणजे एखाद्या विशिष्ट सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत त्यांच्या अनुभवांशी संबंधित असलेल्या एखाद्या समुदायाचा किंवा आदिवासींच्या मौखिक इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी योग्य पद्धत आहे. मौखिक इतिहासाद्वारे, भूतकाळाच्या तथ्यांचे संपूर्ण विश्लेषण करण्यासाठी, संस्कृतीचे मौखिक रूप आणि ज्ञान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो, अनेक अर्थाने मौखिक इतिहास अनेक समाजांच्या भूतकाळच्या पुनर्रचनेत अत्यंत महत्वाची भूमिका बजावतो.

**मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन:**

भारतीय मौखिक साहित्य आणि साधनांचा शोध घ्यायला इंग्रजानी सुरुवात केली. इंग्रजांनी वसाहतींवादासंबंधी जे धोरण स्वीकारले होते त्यानुसार ज्या ठिकाणी राज्य करावयाचे तेथील लोक लोकजीवन, भूतकाळ, वाङ्ममय, चालीरीती, प्रथा, परंपरा, आचार, विचार, समजुती यांची बारकाई अभ्यास करण्यास प्रारंभ केला, त्यांच्या राजकीय धोरणाचा तो एक महत्त्वाचा भाग होता. येथील लोकसंस्कृतीचा परिचय करून घेण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी येथी समाजजीवन, धर्मजीवन, सांस्कृतिक जीवन यांचे अवलोकन करण्यास सुरुवात केली.

मौखिक वाङ्मयाचाही त्यांनी अभ्यास करण्यास सुरवात केली. विल्यम् जोन्स यांच्या प्रेरणेने आणि प्रयत्नाने 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' या संस्थेची कलकत्ता येथे सन १८७४ मध्ये स्थापना करण्यात

आली. या संस्थेनेच प्रथम लोकसाहित्याच्या संशोधन आणि संकलनास सुरुवात केली. भारतातील इंग्रज अधिकारी आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक यांचे भारतीय लोकसंस्कृती विषयक कुतुहल जागे झाले आणि ते भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे वळले. कर्नल टॉड हे राजस्थानचे रेसिडेंट असताना राजस्थानी लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचा त्यांनी अभ्यास केला. राजस्थानी मौखिक वाङ्मयातील कथा-गीते आणि पोवाडे त्यांना मिळाले. सन १८२९ मध्ये कर्नल टॉड यांनी या अभ्यासाला प्रारंभ केला आणि 'एनल्स ॲण्ड एंटिक्विटिझ ऑफ राजस्थान' हा मौलिक ग्रंथ साकार केला. सन १८५४ मध्ये साली रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुखपत्रातून जे. एलट यांनी 'पंजाबची वीरगाथा' हा लेख लिहिला आणि पंजाबी लोकजीवनात प्रचलित असलेल्या पराक्रमाची गाथा शब्दरूप केली. प्रो. व्हीस डेव्हिड्स यांनी 'द बुद्धिस्ट स्टोरीज' हे देखील यातील उत्तम उदाहरण आहे.

मेरी फ्रिअरचे 'ओल्ड डेक्कन डेज' (१८६८), चार्ल्स ग्रोवरने 'दक्षिण भारतातील लोकगीते' (१८७१), डॉल्टनचे 'डिस्क्रिप्टीव्ह एन्थोलॉजी ऑफ बंगाल' (१८७२), तारादत्त यांचे 'हिंदुस्थानातील पोवाडे आणि दंतकथा' (१८८२), लाल लालबिहारी डे यांनी लिहिलेले 'बंगालच्या लोककथा' (फोकटेल्स ऑफ बंगाल) (१८८३), सर रिचर्ड कारनॅक टेंपल यांचे 'पंजाबच्या लोककथा', (लीजंड ऑफ द पंजाब) (१८८४), इ. जे. रोबिन्सन यांचे 'दक्षिण भारतातील लोकगीते व लोककथा' (१८८५), ग्रियर्सन यांनी लिहिलेला 'भोजपुरी गीते' (१८८६), कुक यांनी लिहिलेला 'पॉप्युलर रिलिजन ॲन्ड फोक लोअर ऑफ नॉर्दन इंडिया' (१८९६), थर्स्टन याचे 'ओमेन्स ॲण्ड सुपरस्टिशन्स ऑफ सदर्न इंडिया' आणि कास्टस् ॲण्ड ट्राइब्ज ऑफ सदर्न इंडिया इत्यादी ग्रंथ भारतीय मौखिक आणि लोक साहित्याच्या दृष्टीकोणातून मौलिक स्वरूपाचे आहेत. मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा जाणीवपूर्वक प्रयत्न वि. का. राजवाडे यांनी केला. १९२५ साली त्यांनी 'सज्जनगडावरील लोकगीत' आणि 'सूर्यनारायणची कहाणी व सूर्यव्रत' या शीर्षकाने 'आदित्य राणुबाईची कहाणी' हस्तलिखितवरून असे दोन लेख प्रकाशित केले प्रकाशित केली. डी. डी. कोसंबी यांचे 'मिथ अँड रियलिटी' शं. गो. दाते यांनी 'लोककथा' (१९३०), दुर्गा भागवत यांनी 'सातपुड्यातील गोंड जमातीची लोकगीत' (१९५०), इत्यादी भारतीय अभ्यासकांनी या संबंधी महत्वपूर्ण काम केले आहे. याच बरोबर भारतीय हिन्दी लेखकांनी भारतीय मौखिक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ केला. डॉ. दिनेशचंद्र सेन, रायबहादूर शरचंद्रराय, रामन त्रिपाठी, देवेंद्र सत्यार्थी वगैरेंचा प्रामुख्यणे उल्लेख होतो.

**मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन पारंपरिक साधने:**

**१) पोवाडे:**

पोवाडा म्हणजे एखाद्या घटनेवर अथवा व्यक्तीवर आधारीत काव्य स्वरुपात आवेशयुक्त भाषेत निवेदन करणारे कवन. गायनाद्वारे मनोरंजनात्मकदृष्ट्या पोवाडा सादर करणाऱ्या व्यक्तीस 'शाहीर' असे म्हणतात. बहामनी राज्याच्या अमलापासून 'शाहीर' हे नाव अरबी-फारसी भाषेतून मराठीत रुढ झाले. पोवाडा हा विरांच्या पराक्रमाचे, विद्ववानांच्या, बुध्दिमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन अथवा स्तुती स्वरुपात असते. पोवाड्यामधील अनेक वर्णन ऐतिहासिक सत्याला धरून असल्यामुळे त्याचा एक मौखिक

साधन म्हणून वापर केला जातो. बखरीपेक्षा पोवाड्यास वरचे स्थान असावे असे मत वि. का. राजवाडे यांनी व्यक्त कलेले आहे. पोवाड्याचे छत्तिसगडी पोवाडे, कच्छमधील भाट व वादी यांचे पोवाडे, सिंधचे पोवाडे, मराठी पोवाडे इत्यादी प्रांतिक भाषेनुसार प्रकार आढळतात. मराठी भाषेतील ३०० ऐतिहासिक पोवाडे उपलब्ध असून त्यापैकी शिवकालीन ०४, शाहूकालीन ०३, पेशवेकालीन १५० व उर्वरित इंग्रजी कालखंडातील आहेत. मराठ्यांच्या इतिहासावरील पोवाड्यांचे संकलन इत्यादी संपादन शाळीग्राम, य.न.केळकर यांनी केलेले आहे, दिनेशचंद्र सेन यांनी "Ballads of Eastern Begal Mai Manisng' या ग्रंथात बंगाल प्रांतातील पोवड्यांचे संकलन आहे.

इतिहासाचे साधन म्हणून पोवाड्यांचा मर्यादीत प्रमाणात उपयोग होतो. राजकीय इतिहासापेक्षा तत्कालीन सांस्कृतिक जीवनांचे प्रतिबिंब पोवाड्यातून ठळकपणे उमटलेले दिसते. अफझल खानचा वध, सिंहगडाची स्वारी, सवाई माधवरावाचा मृत्यु, संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, तुळाजी आंग्रे, संताजी-धनाजी, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे व पहिला बाजीराव यांच्यावरील पोवाडे उपलब्ध आहेत. पेशव्यांच्या काळात अनंत फंदी (१७४४-१८५३), शाहीर परशराम (१७५४-१८४४), रामजोशी (१७५८-१८१३), प्रभाकर (१७६ ९ १८४३ ), सगनभाऊ (१७७४-१८४०) व होनाजी बाळा इत्यादी प्रसिध्द शाहीर होवून गेले. पोवाड्यांची परंपरा मौखिक पध्दतीने एका-पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असल्याने बऱ्याच वेळा मूळ पोवाड्यातील काही कडवी विसरली जाऊन त्या ठिकाणी दुसरी कडवी आलेली दिसतात. शिवाय पोवाडे हे मनोरंजनाचे साधन असल्याने त्यामध्ये रंजकता आणण्यासाठी अतिशयोक्ती, पाल्हाळ, दंतकथा, विभूतीपूजा ज्याच्यावर पोवाडा रचावयाचा आहे त्याच्या विषयी वाटणारा आदर किंवा आकस यामुळे पोवाड्यातून त्याचा विपर्यास झालेला दिसतो. तरी ही पोवाडे हे एक ऐतिहासिक साधन म्हणून महत्व आहे .

### २) म्हणी आणि वाक्प्रचार:

लौकिक अर्थाने अनेक म्हणी व वाक्प्रचार बोली भाषेच्या रुपाने व्यवहारात प्रचलित असतात. त्यापैकी काही म्हणी व वाक्प्रचार ऐतिहासिक घटना व प्रसंगावर आधारित असतात. वाक्प्रचार आणि म्हणी हा मौखिक वाङ्मयाचा अमोल ठेवा आहे. कणभर शब्दात मणभर आशय प्रकट करणे हे या म्हणींचे वैशिष्टय आहे. भाषिक इतिहासाच्या दृष्टीने वाक्प्रचार आणि म्हणींचे महत्व आहे. वाक्प्रचार व म्हणी हा जीवनातील अनुभवांचा अर्क असतो. तो एक भाषिक, अल्पाक्षरी जीवनानुभव असतो. एखादा विशिष्ट प्रसंग लोकांच्या मनावर चांगलाच परिणाम घडवून आणतो. हा प्रसंग जितका संस्मरणीय असेल, त्या प्रमाणात त्यावर आधारीत एखादी म्हण अथवा वाक्प्रचार अस्तित्वात येतो व बराच काळ अस्तित्वात राहतो. ऐतिहासिक प्रसंगावरून किंवा पुरुषांच्या नावावरून तयार झालेल्या म्हणी पुढे काही शतके जनमानसावर प्रभाव टाकतात. म्हणीला भाषा संप्रदाय यांचे मर्यादीत स्थान असते. एखादी म्हण अथवा वाक्प्रचार एखाद्या गावापूरता किंवा भौगोलिक प्रदेशापुरता मर्यादीत असतो. म्हणी साधारणतः दंतकथा, पुराणकथा किंवा विशिष्ट ऐतिहासिक प्रसंगावर आधारीत असतात. काही म्हणींचा अर्थ सरळ असतो तर काहींचा अर्थ विरोधी, उपरोधी अथवा निषेधी स्वरूपाचा असतो.

शिवकालीन प्रसंगावर आधारीत काही म्हणी आजही टिकून आहेत. उदा. 'होता जीवा म्हणून वाचला शिवा', 'गड आला पण सिंह गेला', 'आधी लगीन कोंडाण्याचे मग रायबाचे', 'बचेंगे तो और भी लढेंगे' इत्यादी याशिवाय काही म्हणी व वाक्प्रचार ऐतिहासिक दंतकथेवर आधारीत असतात, उदाः 'हा सुर्य हा जयद्रथ', 'सतीचे वाण' (ही म्हण/वाक्प्रचार दासकन्या सतीच्या दंतकथेवर आधारीत आहे.) म्हणीप्रमाणे काही वाक्प्रचारही ऐतिहासिक घटनेवर आधारित असतात. उदा. 'लष्कराच्या भाकरी भाजणे', 'तोफेच्या तोंडी देणे', 'सुळावर देणे', 'सुळावरची पोळी', 'हुतात्मा होणे', 'इतश्री होणे' इत्यादी स्वरुपाच्या म्हणी व वाक्प्रचारातून काही ऐतिहासिक प्रसंग तत्कालीन न्यायनिवाडा, सामाजिक, सांस्कृतिक, प्रथा परंपरांच्यावर प्रकाश टाकतात. वाक्प्रचार आणि म्हणींतून जातिव्यवस्थेवरही प्रकाश पडतो.

म्हणी व वाक्प्रचार यांचेही संकलन करण्याचा पहिला प्रयत्न म्हणून 'ज्ञानसिंधू' छापखान्याने सन १८४२ मध्ये केला. म्हणीचा पहिला संग्रह 'कुडूकवही' (फुर्डक वही) या नावाचा काढला. सदाशिव विश्वनाथ यांनी मसर्व देशांतील निवडक म्हणीफ या नावाने चार हजारांवर म्हणींचा संग्रह सन १८५८ मध्ये प्रसिद्ध केला मसर्व देशांतीलफ असे म्हटले असले तरी मुख्यत्वे इंग्रजी व मराठी म्हणींचा संग्रह हेच त्याचे स्वरूप आहे. गंगाधर गोविंद सापकर ह्यांनी १८७२ मध्ये 'मराठी प्रचारातील म्हणी' चा एक संग्रह प्रकाशित केला. रेव्हरंड ए. मॅनवॉरिंग यांच्या 'मराठी प्रोव्हर्भ' (Marathi Proverbs) या मराठी म्हणींच्या संग्रहातून येथील जनसामान्यांची विचारपद्धती व स्वभावधर्म यांवर चांगला प्रकाश पडतो. गुणवत्तेच्या दृष्टीने मॅनवॉरिंगचे हे काम अधिक वाखाणण्याजोगे आहे. यानंतर सन १९०० मध्ये म्हणींचा पहिला कोश गणेश नारायण देशपांडे यांनी तयार केला.

**३) लोकपरंपरा : (लोककथा/ दंतकथा आणि प्रथा परंपरा)**

पारंपारिक सांस्कृतिक आशय असलेली व मौखिक परंपरेने जतन केली जाणारी कथा म्हणजे ङ्गलोककथाफ होय. समग्र लोक साहित्याप्रमाणे लोककथा ही सुध्दा समूहनिर्मित व समूहरहित असते. मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ती संक्रमित होत असते व पिढ्यान पिढ्या जतन केली जाते. लोक कथा या प्रवाही व परिवर्तनशील असतात आणि भौगोलिक प्रदेशानुसार त्यांची रूपेही बदलतात. वि. का. राजवाडे यांनी पारंपारिक कथासाठी सर्वप्रथम 'लोककथा' हा शब्द वापरला. लोककथांना विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व पारंपारिक रूढी परंपरांचे आशय असतात. उदा. ब्रह्मकथा, पंचतंत्र, जातककथा, वेताळ पंचविशी इत्यादी. मेरी फ्रिअरचे 'ओल्ड डेक्कन डेज'(१८६८), मध्ये काही पारंपारिक लोककथाचे संकलन केलेले आहे. तर रिर्चड टेंपल यांनी राजपूताना व पंजाबमधील पारंपारीक मौखिक लोककथा 'लीजण्ड्स ऑफ पंजाब' या ग्रंथात संकलित केलेल्या आहेत दंतकथा ही संज्ञा स्थानिक अथवा ऐतिहासिक आख्यायिकांना वापरली जाते. इंग्रजीतील 'Legend' या शब्दाला मराठीत 'दंतकथा' हा समानार्थी शब्द जातो. दंतकथा म्हणजे असंबध्द व पुष्कळदा विस्मृत इतिहास असे लोकसाहित्याचे विशारद मानतात. हे जरी खरे असले तरी दंतकथेत इतिहासाचा अगदी सुक्ष्म का असेना भाग अथवा धागा असतो. श्रीधरांनी लिहिलेल्या 'पांडवप्रताप' या ग्रंथात प्रथम 'दंतकथा' हा शब्द वापरला. श्रीधरांनी दंतकथा हा शब्द 'तोंडो-तोंडी' सांगितलेल्या गोष्टी ज्यांना पुराव्याचा लेखी आधार नाही या अर्थाने वापरलेला आहे.

दंतकथेचा प्रभाव जनमानसावर कायम राहतो. दंतकथेमध्ये सत्य व कल्पित यांची अशी सरमिसळ केलेली असते की, वस्तूस्थिती त्यापेक्षा वेगळी असते.

राघोबा मोरोबा यांनी सन १८५५ मध्ये केलेले 'Tales of King Vikrama of Ujjain' प्राकृत भाषेतील हरिदास यांच्या पुस्तकाचे इंग्रजीत केलेले भाषांतर हे मराठी माणसाने केलेले गोष्टींचे पहिले संकलन असले तरी, भारतातील मौखिक कथांच्या मौखिकता आणि लोकसाहित्य संकलनाचा पाया मेरी फ्रिअर हिने घातला. सन १८६८ मध्ये तिने 'ओल्ड डेक्कन डेज' या आपल्या पुस्तकास भारतातील कथांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे संकलन केले. त्यातून महाराष्ट्रातील काही ऐतिहासिक दंतकथा आणि काही लोककथा हाती लागतात.

सेतूमाधवराव पगडी यांनी अशाच दंतकथेवर आधारीत ङ्गइतिहास व कल्पितफ हा ग्रंथ लिहिलेला आहे. ना. गो. चापेकरांनी 'बदलापूर' या पुस्तकामध्ये चंद्रहासाची कातोडी दंतकथा संकलित केलेली आहे. त्र्य. श. शेजवलकरांनी वि. ग. भिडे यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मोत्याच्या कणिसाची दंतकथा दिलेली आहे. भटक्या यहुश्याच्या मीडसच्या दंतकथेच्या धर्तीवर श्री शं. ग. दाते यांनी 'लोककथा व लोकगीते' या ग्रंथात 'राजा धिंग माया शिंग' ही दंतकथा संकलित केलेली आहे. याशिवाय राजपूतान्यामधील 'खेमरोजी आभलदे' राजा हुण व त्याची पत्नी पिंगला यांच्यावरील 'पिंगलेची कथा' इत्यादी प्रसिध्द ऐतिहासिक दंतकथा आहेत. दंतकथेचा उगम वस्तूस्थितीत असला तरी त्या वस्तूस्थितीला अधिक उठाव किंवा रंजकता यावी म्हणून त्या घटना अथवा व्यक्तीला दैवत्व किंवा देवतास्वरुप देण्याचा प्रयत्न केलेला असतो असे सरोजिनी बाबर यांचे मत आहे. दंतकथेच्या आधारे इतिहासलेखन करताना अधिक खबरदारी घेतली जाते. जरी दंतकथेतून काही ऐतिहासिक घटनांचा बोध होत असला तरी दंतकथा या विर्पस्त असतात. प्रत्येक भाग, जिल्हा, तालुका व त्या तालुक्यातील गावा-गावात अशा काही दंतकथा प्रचलित असतात, की त्यांचा संदर्भ काही ऐतिहासिक घटनेशी असतो. बऱ्याच दंतकथा वंशपरंपरेने चालत आलेल्या असतात. अशा दंतकथांचा शोध घेवून त्यांचा ऐतिहासिक अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केल्यास नवीन इतिहास समोर येण्याची शक्यता असते.

आर्थर क्रॉफर्डचे 'लीजंडस् ऑफ कोकण' (१९०९) हे पुस्तक दंतकथांचा सुरेख संग्रह आह. यात अगदी जुन्या पुराणकथा व शिवाजीच्या, पेशव्यांच्या व इंग्रजांच्या सत्तेच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या नव्या दंतकथा यांचे गमतीदार मिश्रण आहे. भाषाविज्ञान, लोकसाहित्य व सामाजिक इतिहास या दृष्टींनी या संग्रहाचे महत्त्व विशेष आहे. जेम्स कॅम्बेलचे 'स्पिरीट बेसिस ऑफ बेलीफ अँड कस्टम' (१८८५) हे पुस्तक 'इंडियन अँटिक्वरी' मधून क्रमशः टिपणांच्या स्वरूपात पहिल्यांदा प्रसिद्ध झाले. कॅम्बेलचे हे काम म्हणजे तत्कालीन उच्चवर्णीय व कनिष्ठवर्णीय हिंदू प्रजेच्या मनात खोलवर रुजलेल्या समजुतींचा शोध आणि विश्लेषण आहे. कॅम्बेलने हिंदूमधील प्रथाप्रघातांचे निरीक्षण करताना विशेषतः जन्म, विवाह, स्त्रीत्व, गरोदरपण, अंत्यसंस्कार यांवर विशेष भर दिला आहे.

बी. ए. गुप्ते यांनी लिहिलेले 'हिंदू हॉलिडेज अँड सेरेमोनीज, विथ डेजरटेशन ऑन ओरिजन, फोल्क्लोरे अँड सिंबोल' (१९१०) Hindu Holidays and Ceremonies, with dissertations on origin, folklore and symbols हे पुस्तक महाराष्ट्रातील हिंदू जातीजमातीत त्या काळी प्रचलित असणाऱ्या व्रतवैकल्यांची, उपवास तापासांची, सणाउत्सवांची माहिती आहे. या अनुषंगाने लेखकाने अनेक कहाण्यांचे भाषांतर केले आहे. श्रावणी रविवार, आजेपाडवा, चैत्रगौरी, चंपाषष्ठी आणि आदित्य-राणुबाईची कहाणी, खंडोबा आणि बनाईची कहाणी, गोपद्माची कहाणी व गोपाद्यपूजा, महालक्ष्मीची कथा आणि महालक्ष्मीचे व्रत, सोमवाराचे व्रत, नागपंचमीचे व्रत व नागपंचमीची कथा यांसारख्या अनेक तपशिलांनी युक्त असणारे हे पुस्तक सांस्कृतिकदृष्ट्या मौल्यवान माहिती पुरविते. ए. एम. टी. जॅक्सन आणि आर. ई. एन्थोवेन यांच्या Folklore of konkan (१९१५) for Folk-Lore of Bombay (१९२४) निर्देश येथेच करावयास हवा. जॅक्सनचा नाशिकला वध झाल्यावर लोकसाहित्याच्या संकलनाच्या कामाची जबाबदारी एन्थोवेन यांच्यावर येऊन पडली. जॅक्सन यांची टाचणे (Folklore notes on the Konkan and Gujarat) एन्थोवेन यांनी इंडियन अँटिक्वेरीत दोन लेखांत प्रसिद्ध केली.

सी. ए. किंकेड यांचे 'Deccan Nursery Tales' (१९१४) हे पुस्तक पुराणातील, मध्ययुगीन व स्थानिक स्वरूपाच्या अनेक गोष्टींचा संग्रह आहे. मुलांना आकर्षक वाटतील अशा गोष्टींच्या या संग्रहातील कथानिवेदन व शैलीही वेधक आहे. रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार आणि गुरुवार, शुक्रवार, शनिवार अशा वारांच्या गोष्टी, महालक्ष्मी व दोन राण्या, बेटावरील राजवाडा, नागोबा-सापांचा राजा, सोनेरी मंदिर यांसारख्या एकंदर सतरा गोष्टी येथे आहेत.

**४) लोकगीते:**

मौखिक परंपरेने चालत आलेल्या अनेक विविध गीतप्रकारांचा समावेश 'लोकगीते' या संज्ञेत होतो. पारंपारिक गीतांना लोकगीते हा शब्द प्रयोग सर्व प्रथम वि. का. राजवाडे यानी वापरला. प्राचीन काळापासुन प्रचलित असलेला 'गाथा' प्रकार हा लोकगीताचाच प्रकारमनाला जातो लोकगीताचाच एक प्रकार मानला जातो. लोकगीत अथवा लोकगाथा हा मौखिक परंपरेने चालत आलेला प्रदीर्घ कथनपर गीत काव्याचा प्रकार वि. का. राजवाडे यांनी 'सज्जनगडचे एक लोकगीत' Folk Song of Sajjangad' हा लेख लिहून लोकगीतातून आलेली ऐतिहासिकता अथवा इतिहासाचे अंग शोधण्याचा प्रयत्न केला. यानंतर लोकगीताच्या माध्यमातून सामाजिक इतिहासाचे संशोधन ठरण्याच्या उद्देशाने सन १९१५-२५ या काळात भारत इतिहास संशोधन मंडळाने वार्षिक माध्यमातून लोकगीतांचा संग्रह प्रसिध्द केला. यामध्ये वि. का. राजवाडे व श्री मुंडले यांनी धनगरांच्या ओव्या इत्यादी संपादन केले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील धनगरांच्या दोन मौखिक ओव्यांचा अभ्यास प्रा. ॲन फेल्डहाउस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला आहे. ह्या ओव्याचे ध्वनिमुद्रण प्रसिद्ध जर्मन अभ्यासक गुंथर सोन्थायमर यांनी सन १९७० मध्ये केले होते. ओवी धनगर लोकांच्या बिरोबा आणि धुळोबा ह्या देवांबद्दल आहेत. याओव्यांचा सखोल अभ्यास करून धनगर लोकांचे जीवन अनुभव, सामाजिक चालीरीती, मूल्यं, संकल्पना, भौतिक परिस्थिती व मानसिकते बद्दल महत्त्वाची

आंतरदृष्टी मिळते. धनगरांचा भौगोलिक प्रदेश, त्यांची अर्थव्यवस्था, जात आधारित श्रम-विभागणी आणि त्यांचे राजकीय जीवन याचे संदर्भ कळतात. मौखिक साधनांचा अभ्यास करून प्रा. ॲन फेल्डहाउस यांनी धनगर समूहाचे जग आणि जीवन वाचकासमोर प्रकट केले आहे.

ना. गो. चापेकरांनी महाराष्ट्रातील मुसलमान स्त्रियांच्या ओव्या इत्यादी संपादन केले आहे. ना. गो. चापेकरांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिके मध्ये वासुदेव गीते, गोसावी गीते, इत्यादी संकलन केलेले आहे. एखाद्या ऐतिहासिक घटनेवर अथवा प्रसंगावर व व्यक्तिवर आधारीत भारतातील विविध प्रांतिक भाषेतील मौखिक परंपरेने चालत आलेली लोकगीते आजही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. या लोकगीतातून तत्कालिन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, रुढी, परंपरा इत्यादी संबंधी माहिती मिळण्यास मदत होते. लोकगीतामधून प्रतिविधीत झालेला इतिहास खरा असेलच असे ठाम सांगता येत नाही यामध्ये काही प्रमाणात विपर्यस्त माहिती येण्याची शक्यता असते.

**मौखिक परंपरेचे धोके**

युरोपमधील बऱ्याच पत्रकारांनी आणि इतिहासकारांनी समकालीन इतिहासलेखनात साहित्य म्हणून अशी अनेक पुस्तके दिली आहेत ज्यामुळे आपल्याला इतिहास पुन्हा समजण्यास भाग पाडले आहे. इतिहासाची मौखिक परंपरा दीर्घकाळ टिकणारी आहे, परंतु ती कधीतरी नोंदविली जाणे देखील आवश्यक आहे. अशा स्त्रोतांचा धोका देखील कमी नाही, कारण बर्याच वेळा लोक आपल्या समुदायाचा अभिमान बाळगण्यास अतिशयोक्तीही करतात. पण त्यात सत्याचा काही अंश नक्कीच आहे. हा तुकड्याची चाळण करून तो समोर आणण्याची जबाबदारी इतिहासकारांची आहे.

**ब) मुलाखत तंत्र:** (Interview Technique)

**१) मुलाखत तंत्र:**

मुलाखत ही तथ्य संकलनाची अशी पध्दती आहे की, ज्यामध्ये मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा (दाता) यात प्रत्यक्ष समोरासमोरचा संवाद प्रस्थापित होतो. मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते. स्थानिक व समकालीन इतिहासलेखनाचे एक साधन म्हणून मुलाखतीला विशेष महत्त्व आहे. सामाजिकशास्त्र संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो. मुलाखत पद्धतीचा वापर करण्यापूर्वी मुलाखतीची उद्दिष्टे, स्वरूप, व्याप्तीचा विचार संशोधकाने करणे गरजेचे असते. मुलाखतीच्या माध्यमातून संशोधकाला कोणती माहिती प्राप्त करवयाची आहे, मुलाखत कोणाची घ्यावयाची आहे, मुलाखतीचे स्वरूप कोणते असावे, किती लोकांच्या मुलाखती घेणे अपेक्षित आहे, याचा संशोधकाने विचार करणे गरजेचे असते.

**२) मुलाखत तंत्राची व्याख्या :**

एखाद्या प्रश्नाबाबत माहिती प्राप्त करण्याच्या हेतूने सहाकार्य देणाऱ्या व जाणकार निवेदकाबरोबर मुलाखतकाराने केलेला संवाद म्हणजे मुलाखत होय. अशी सर्व साधारण व्याख्या केली जात असली तरी

समाजशास्त्रीय संशोधनातील माहिती संकलनाचे एक महत्वपूर्ण तंत्र असलेल्या या पद्धतीची अनेक संशोधकांनी/विचारवंतांनी व्याख्या केली आहे.

त्यापैकी काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

**१) पॉलिन यंग:**

''मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर शरित असतो.''

**२) हॅडर आणि लिंडमन:**

''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो'' .

वरील व्याख्यांवरुन मुलाखत म्हणजे संशोधक स्वत: निवेदकांना भेटून संशोधना विषयाशी संबंधित प्रश्न विचारतो व माहिती संकलीत करतो. मुलाखत हे माहिती संकलनाचे सोपे तंत्र आहे.

**३) मुलाखत तंत्राची वैशिष्ट्ये :**

ब्लॅक आणि चॅंपीयन यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

१) संशोधक व निवेदक (मुलाखत दाता) यांच्यात प्रत्यक्ष संवाद असतो.

२) संशोधक प्रत्यक्ष प्रश्न निवेदकाला विचारुन माहिती घेतो यातून संवाद होतो.

३) संशोधक व निवेदकाचे संबंध तात्पुरते असतात.

४) संशोधकाने प्रत्यक्ष संवाद साधल्याने संशोधांन विषयाची सखोल माहिती प्राप्त होते.

५) तथ्यांचे सुव्यवस्थित संकलन प्राप्त होते.

६) अनावश्यक माहिती टाळता येते.

७) मुलाखतीचा मुख्य हेतू विश्वसनीय माहितीचे संकलन करणे हा असतो.

**४) मुलाखत तंत्राचे वर्गीकरण:**

मुलाखत तंत्राचा व्यापक उपयोग आणि वापर लक्षात घेता सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये विविध समाजशास्त्रज्ञांनी मुलाखतीचे खालील प्रकारात वर्गीकरण केलेले आहे.

**अ) लुंडबर्ग:** लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे तीन प्रकार सांगितलेले आहे, यामध्ये १) वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन करणे, २) अभिवृत्ती निर्धारण व मापन करणे आणि ३) सामाजिक संघटन व संस्थांची माहिती करुन घेणारी इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**ब) पी. व्ही. यंग:** पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे चार प्रकार सांगीतलेले आहेत, यामध्ये १) संस्था सर्व्हेक्षण, २) निरीक्षण, ३) मूल्यांकन आणि ४) दस्तऐवज इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

### ५) मुलाखत तंत्राचे प्रकार:

### अ) संरचित किंवा आकारीक मुलाखत :

संरचित मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जात असल्याने संशोधकाचे काम सोपे होते. प्रश्नांची यादी अगोदरच तयार केल्याने मुलाखतदात्याला प्रश्नांच्या बाहेर जाता येत नाही, म्हणून मुलाखतीला संरचित किंवा आकारीक मुलाखत असे म्हणतात. यामध्ये प्रश्नाबरोबर संभाव्य उत्तरेही त्यांना दिली जातात. प्रश्न व उत्तरांची यादी छापून घेतलेली असते. संशोधक मुलाखतदात्याला प्रश्न विचारून पर्यायी उत्तरापैकी कोणते उत्तर निवेदकास द्यावयाचे आहे ते विचारतो व उत्तराबरोबर बरोबरची खूण करतो. पर्यायी उत्तरापैकी कोणत्याही उत्तराशी संशोधक सहमत होत नसेल तर मुलाखतदात्याच्या उत्तराशी अधिकाधिक साम्य असणाऱ्या उत्तरासमोर तो वरील प्रमाणे खूण करतो. जर निवेदकास संपूर्णपणे वेगळे उत्तर द्यावयाचे असल्यास ते उत्तर मुलाखतकार पूर्णपणे लिहून घेतो.

### ब) असंरचि किंवा मुक्त मुलाखत:

मुक्त मुलाखतीमध्ये संशोधक मुलाखतदात्यासमोर मुलाखतीचा विषय मांडतो. मुलाखतीमधील त्याचा हेतू स्पष्ट करून मुलाखतदात्याला मुक्तपणाने आपली मते मांडण्याची परवानगी देतो. संशोधकाने विषयाचा अभ्यास केला असल्याने कोणते प्रश्न विचारावयाचे याचा त्याने विचार केलेला असतो. संशोधक कोणताही प्रश्न केव्हाही विचारू शकतो. प्रश्न व उत्तरे दोन्हीही पूर्वनियोजित नसल्यामुळे मुलाखतीचे स्वरूप अनिश्चित असते. मुलाखतदात्याला व काही प्रमाणात संशोधकाला मुक्त स्वातंत्र्य असते हे या मुलाखतीचे वैशिष्टय असते. मुलाखतीमध्ये मुलाखतदाता आणि संशोधक यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याने मुलाखतीमध्ये लवचिकता येते. मुलाखतदाता आपली मते स्पष्टपणे व स्वत:च्या शब्दात मांडू शकतो. संशोधकाकडे अधिक कौशल्य लागते.

### क) केंद्रित मुलाखत:

केंद्रीत मुलाखत हा अनिर्देशित अथवा मुक्तमुलाखती प्रकार आहे. यामध्ये संशोधक मुलाखतदात्याच्या विशिष्ट अनुभवावर व त्याच्यावर झालेल्या परिणामावर आपले लक्ष केंद्रित करतो. अशा प्रकारच्या मुलाखती रेडिओ, टी.व्ही, चित्रपटामध्ये होतो.

### ड) पुनरावृत्ती किंवा फेरमुलाखत:

एखाद्या घटनेबाबत व्यक्तीची मते कायमचीच राहतात असे नाही. त्या घटनेबाबतचा त्याचा दृष्टीकोनात अथवा विचार बदलत राहतात. अशा प्रकारच्या मुलाखती एखाद्या सामाजिक, मानसशास्त्रीय, आर्थिक किंवा राजकीय प्रश्नाबाबत लोकांचे दृष्टीकोनात कसा बदल होत गेला याचा अभ्यास करण्यासाठी होतो.

**इ) निदानोपचारात्मक मुलाखत:**

निदानोपचारात्मक मुलाखतीत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो. केंद्रित मुलाखतीप्रमाणेच यामध्ये विशिष्ट वर्तनाचा अथवा अनुभवाच्या प्रेरणा कोणत्या आहेत जाणून घेण्यासाठी होतो. मुलाखतीची पूर्व तयारी असते. मुलाखतदात्याला कोणते प्रश्न विचारायचे व कोणत्या क्रमाने हे संशोधक ठरवत असतो.

वरील मुलाखत प्रकाराशिवाय औपचारिक, अनौपचारिक, व्यक्तीगत, सामूहिक, गुणात्मक, परिणामात्मक, उपचारात्मक, संशोधनात्मक असे अनेक प्रकार मुलाखतीचे आहेत.

**६) मुलाखतीची पूर्व तयारी:**

मुलाखत ही एक तांत्रिक गोष्ट असल्यामुळे ती जितकी कौशल्याने हाताळता येईल तेवढी अधिक परिणामकारक ठरते. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे त्याची इत्यंभूत माहिती मुलाखत घेणाऱ्याकडे असायला हवी. मुलाखत देणारा आणि मुलाखत घेणारा यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक असते. विसंवाद झाल्यास मुलाखत देणारा माहिती देणे थांबू शकतो अथवा योग्य माहिती मिळवण्यास अडथळा येऊ शकतो. मुलाखत सुरु करण्याआधी, मुलाखत देणाऱ्याला, विषयाची आधीच माहिती देणे गरजेचे असते, तसे न केल्यास गोंधळ होण्याची शक्यता असते. मुलाखत घेणाऱ्याने, मुलाखत देणाऱ्याच्या मनात, स्वत:बद्दल विश्वास निर्माण करायला हवा. त्यामुळे मुलाखत देणारा त्याला संवेदनशील वाटणारी माहिती देखील मुलाखत घेणाऱ्याला सांगू शकतो. मुलाखतीदरम्यान अथवा नंतर, मुलाखतीची टिपणे काढून, ती मुलाखत देणाऱ्याकडून तपासून मजकूर खरा असल्याची त्याच्याकडून खात्री करून, त्याची स्वाक्षरी घ्यावी. मुलाखतीची ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफिती बनवल्यास मुलाखतीचा सगळाच मजकूर दीर्घकाळासाठी उपयोगात आणता येतो. मुलाखत घेणे हे एक तंत्र असून ते कौशल्याने हाताळावे लागते. मुलाखत घेताना जर चूक झाली तर मुलाखतीचा हेतू साध्य होत नाही. मुलाखतीमधून हवी असणारी माहिती प्राप्त न झाल्याने संशोधक निराश अथवा हताश होवू शकतो. मुलाखतीची पूर्वतयारी करणे आवश्यक असते. मुलाखतीची पूर्वतयारी करताना पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.

१. प्रथम मुलाखतदात्याची सर्व इत्यंभूत माहिती घेणे गरजेचे असते. यामध्ये नाव, टोपण नाव, वय, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक व राजकीय दर्जा, सांस्कृतिक पातळी इत्यादीचा समावेश होतो. वरील माहिती वरुन त्या व्यक्तीची माहिती पुरविण्याची बौद्धिक क्षमता याचा अंदाज येतो.

२. मुलाखत घेणारा व देणारा यांच्यामध्ये संवाद निर्माण झाला तरच मुलाखत यशस्वी होवू शकते, अन्यथा अपेक्षित माहिती प्राप्त होत नाही.

३. मुलाखतददात्याची मानसिकता, आवड-निवड, मते, विचार पद्धती याची माहिती जमा केल्यास संशोधकाला हवी ती माहिती प्राप्त करता येते, संवादामध्ये अडथळा येत नये.

४. संशोधकाने मुलाखतददात्याला स्वत:ची ओळख व मुलाखतीचा स्पष्ट हेतू सांगितला पाहिजे, त्यामुळे संशोधनाविषयी कोणतीही शंका न राहता संवाद मोकळेपणाने होतो.

### ७) मुलाखत देणारी व्यक्ती

एखाद्या व्यक्तीचे चरित्रलेखन करत असताना त्याची स्वत:ची, जवळच्या व्यक्ती, परिवारातील व्यक्ती, व्यवसायिक सहकारी आणि विरोधक इत्यादींच्या मुलाखती घेणे गरजेचे असते. संशोधन विषयाशी संबंधीत व्यक्तीशी थेट संबंध नसलेले, मात्र त्यांच्या संबंधीची माहिती असलेल्या त्रयस्थ व्यक्तींची देखील मुलाखत घेणे महत्वाचे ठरते. चरित्रनायकाचे सहकारी अथवा विरोधकांकडून मिळणारी माहिती ही आत्मनिष्ठ असते. अशावेळी त्रयस्थ आणि चौकसबुद्धीच्या व्यक्तीची मुलाखत बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास उपयोगी ठरते. आंदोलन, चळवळ, राजकीय पक्ष, संस्था यांच्याशी संबंधित विषयांवर मुलाखती घेताना त्रयस्थ व्यक्तींच्या मुलाखती अत्यंत उपयुक्त ठरतात.

### ८) मुलाखतीमधील प्रश्न

मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे थेट, मुद्देसूद आणि वस्तुनिष्ठ असावेत. असे प्रश्न विचारल्यास मुलाखतदात्याचा गोंधळ उडत नाही. मुलाखतदात्याला संशोधकाच्या व्यक्तीनिष्ठेची अथवा पूर्वग्रह दूषितपणाची शंका आल्यास तो अपेक्षित मोकळेपणाने माहिती देणार नाही. शक्यतो मुलाखत देणाऱ्याला न दुखावता त्याच्या कडून व्यक्ती, घटना यांच्याविषयीची त्याची मते हळुवारपणे काढून घ्यावीत.

### ९) मुलाखतीमधील प्रश्नांचे स्वरूप:

मुलाखतदात्याला आपला विषय कथन केलल्यानंतर संबंधीत विषयावर बोलण्याची मुभा दिली जाते. संशोधकाला आवश्यकता वाटल्यास मुलाखतदात्याला काही प्रश्न विचारावे लागतात. योग्य उत्तरे प्राप्त करण्यासाठी खबरदारीने प्रश्न तयार करावे लागतात. प्रश्न सरळ, नि:संदिग्ध, मुद्देसुद व सुटसुटीत असल्यास उत्तरे देताना मुलाखतदात्याचा गोंधळ होणार नाही. प्रश्न मुद्देसूद असले की उत्तरेही मुद्देसूद मिळतात.

### १०) मुलाखतीचा उपयोग आणि मर्यादा:

सामाजिक शास्त्र अथवा स्थानिक/समकालीन इतिहासलेखनामध्ये तथ्य संकलनाचे प्रभावी साधन म्हणून मुलाखत सर्वमान्य आहे. मुलाखत तंत्र हे मुलाखतदात्याकडून अभ्यासविषय अथवा समस्येविषयीची माहिती संकलित करण्याचे प्रत्यक्ष तंत्र आहे. आज सामाजिक संशोधनात मुलाखत तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, त्याची ज्या प्रकारे उपयुक्ततात आहे त्याप्रमाणे त्याच्या काही उणिवादेखील आहेत.

#### अ) मुलाखत तंत्राच उपयोग:

१) संशोधक व मुलाखतदाता यांच्यातील सुसंवाद हा पारंपारिक व प्रेरणात्मक स्वरुपाचा असल्याने मुलखातीमधून मिळणारी माहिती यथार्थ व व्यापक स्वरुपाची असते.

२) मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद होत असल्याने सखोल संशोधनासंबंधी सखोल माहिती मिळते.

३) संशोधनासंबंधी असलेले प्रश्न ताठर स्वरुपाचे नसतात. त्यात लवचिकता असल्याने माहिती घेणे सोपे जाते.

४) समोरा समोर प्रश्न विचारत असताना मुलाखतदात्याच्या भावना जाणून घेता येतात.

५) माहितीची विश्वसनियता राहते.

६) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यामध्ये औपचारिक संबंध असले तरी बोलण्याच्या ओघात संशोधकाला इतर पूरक माहिती प्राप्त होते.

७) मुलाखतदात्या कडून प्राप्त माहिती संशोधक पडताळणी करू शकतो.

८) मुलाखतीमुळे पूर्वग्रह कमी होण्यास मदत होते.

**ब) मुलाखत तंत्राच्या मर्यादा:**

संशोधनासाठी मुलाखतीचे अनेक उपयोग असले तरी काही मर्यादासुद्धा आहेत, येतात त्या पुढीलप्रमाणे.

१) मुलाखत हे खचिक आणि वेळखाऊ स्वरुपाची पद्धती आहे.

२) पूर्वागृहयुक्त प्रतिक्रिया मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) मर्यादित क्षेत्रात तथ्य संकलन होते, संशोधकाला सहकार्य मिळवण्यात अडचणी येतात.

४) संशोधकाकडे प्रचंड सहनशीलता असणे आवश्यक असते.

५) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यातील आंतरक्रिया पूर्णपणे परस्पर विश्वासावर आवलंबून असते.

६) मुलाखत घेण्याचे वैयक्तीक कौशल्य सर्वांनीच आत्मसात केलेले असते असे नाही.

वरील मर्यादा गृहीत धरल्या तरी सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रात मुलाखत तंत्राचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. एक विश्वसनिय तंत्र म्हणून याकडे पाहिले जाते

**※ स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) रेकॉर्डिंग ओरल हिस्ट्री हा ग्रंथ ............... यांनी लिहिला आहे.

२) ओल्ड डेक्कन डेज हे पुस्तक ............. यांनी लिहिले आहे.

३) पेशव्यांच्या काळात ............. हे प्रसिद्ध शाहीर होते.

४) .............. यांनी १८७२ मध्ये मराठी प्रचारातील म्हणी चा एक संग्रह प्रकाशित केला.

५) लीजंडस् ऑफ कोकण हे पुस्तक .............. यांनी लिहिले आहे.

६) पारंपारिक गीतांना लोकगीते हा शब्द प्रयोग सर्व प्रथम ........... यांनी वापरला.

७) महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील धनगरांच्या दोन मौखिक ओव्यांचा अभ्यास ............. आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला आहे.

८) लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे ............. प्रकार सांगितलेले आहे.

९) ............. मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जातात.

१०) .......... मुलाखतीत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो.

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

सूक्ष्म : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.

अभिजन : उच्च स्थानावरील लोक अथवा श्रेष्ठ (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय.)

सबाल्टर्न : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.

मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.

मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.

सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.

पुराभिलेख : विविध माध्यमातून लिहिलेले कोरीव लेख

पुरातत्वविद्या: प्राचीन वस्तू आणि वास्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र

ताम्रपट : तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले लेख

भौतिक साधने: पुरतत्वीय अवशेष

दिने-ए-इलाही: सम्राट अकबराने पुरस्कृत केलेला धर्मसंप्रदाय.

खलिफा : प्रेषितांचा वारस

टाकंसाळ : नाणी तयार करण्याचा कारखाना अथवा ठिकाण

## १.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

* स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

१) माझी जीवनगाथा

२) किताब- उल-रहेला

३) लॉर्ड कॅनिग

४) कार्बन १४ व रेडिओ कार्बन रासायनिक प्रक्रिया

५) एशियाटीक रिसर्चेस

६) A Story of Muslim Inscriptions

७) तेलगू ८) टॉमस ९) सन १९१० १०) सन १७५२

* स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

१) सन १८१८ २) ४५ ३) ऐन-ई-अकबरी ४) केशवराव जेधे

५) ४ जुलै १८४० ६) निबंधमाला ७) वेबॅक मशीन ८) गूगल बुक्स

९) इंटरलायब्ररी लोन (ILL) १०) शोधगंगा

* स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे

१) रीची डोनाल्ड २) मेरी फ्रिअर ३) अनंत फंदी ४) गंगाधर गोविंद सापकर

५) आर्थर क्रॉफर्ड ६) वि. का. राजवाडे ७) प्रा. ॲन फेल्डहाउस ८) तीन

९) संरचित १०) निदानोपचारात्मक

## १.५ सारांश

इतिहासलेखन प्रक्रियेत "No Documents No History' हे प्रा. लॉजीलॉस व प्रा. सिईनबॉस यांचे विधान यथार्थ आहे. इतिहास हा संदर्भसाधनांच्या आधारे लिहिला जातो. तसे न केल्यास त्यास इतिहास ही संज्ञा प्राप्त होत नाही. इतिहासलेखन जास्तीत जास्त वास्तव, वस्तूनिष्ठ व सत्य लिहिण्यासाठी साधनाची नितांत आवश्यकता असते. इतिहास लेखन प्रक्रियेमध्ये लिखित अलिखित, पुरातत्वीय मौखिक साधनाचा आधार घेतला जातो. लिखित साधनाच्यामध्ये प्राथमिक संदर्भ साधनाना अधिक महत्व असते. प्राथमिक संदर्भ साधनामधील पोकळी भरून काढण्याचे काम दुय्यम संदर्भ साधने करतात. लिखित संदर्भ साधन ज्या प्रसंगी मिळत नाहीत खास करून प्राचीन कालखंडाचा अभ्यास करताना संशोधकास भौतिक संदर्भ साधनाचा म्हणजे पुरातत्वीय साधनाचा आधार घ्यावा लागतो. पुरातत्वीय साधने जरी बोलकी नसली किंवा त्यामधून प्रत्यक्षदर्शी पुरावा पटकन ती समोर येत नसला तरी त्या साधनांना बोलते करण्याचे काम संशोधक करतो. त्यामुळे ही साधनेही महत्वाची आहेत. लिखित अथवा पुरातत्वीय संदर्भ साधनांच्या पलिकडे जावून काही ऐतिहासिक घटना किंवा तथ्य आपणास मौखिक साधननाच्यामधून ही मिळतात. पिढ्यान पिढ्या एकाकडून दुसऱ्याकडे आलेले मौखिक साहित्य अनेक घटनांवर प्रकाश टाकण्यास मदत करते. इतिहासलेखनामध्ये साधने खूप महत्वाची असतात. मग ती कोणत्याही स्वरूपातील असोत. संदर्भ साधनांचे महत्व स्पष्ट करताना थ्युसिडीज हा इतिहासकार असे म्हणतो की, ''ऐतिहासिक घटनांचे खरेखुरे, ततोतंत वर्णन करणे महत्वाचे असते. त्यासाठी योग्य साधने जमविणे आवश्यक असते की, ज्या पासुन भविष्यकाळात मानवाला काही बोध व धडा मिळू शकेल.''

## १.६ सरावासाठी स्वाध्याय:

अ) टिपा लिहा:

१) स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना

२) स्थानिक इतिहास लेखनातील महत्त्वाचे पैलू/घटक

३) मौखिक इतिहासाचे महत्व

४) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन

५) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा

६) मुलाखत तंत्राची वैशिष्ठ्ये

७) वास्तू अवशेष:

८) नाणी

९) महाराष्ट्रातील प्रमुख दफ्तरखाने व पुराभिलेखागार:

ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.

१) इतिहासलेखनाचे साधन म्हणून प्राथमिक व दुय्यम साधनांचे महत्व सांगा.

२) इतिहासलेखनाचे साधन म्हणून पुराभिलेखीय साधने सांगा.

३) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन पारंपरिक साधनांची माहिती द्या.

४) इतिहासलेखनाचे साधन म्हणून सर्वेक्षण पद्धतीची माहिती द्या.

५) इतिहासलेखनाचे साधन म्हणून प्रश्नावली पद्धतीची माहिती द्या.

६) इतिहासलेखनाचे साधन म्हणून मुलाखत तंत्राची माहिती द्या.

७) इतिहासलेखनासाठी ऑनलाइन संदर्भ कसे शोधावे याची माहिती द्या.

८) इतिहासलेखनाचे साधन म्हणून वर्तमानपत्रांचे महत्व सांगा.

## १.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके:


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन

५) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००

६) दिक्षित, राजा., इतिहास वाङ:मय, संपादक जाधव, र. ग., मराठी वाङ:मयाचा इतिहास, खंड, ७, भाग तीन, पुणे २०१०

७) विद्या, व्यवहारे, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, प्रतिमा प्रकाशन, २००२

८) ढेरे, रा. चि., लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००९

९) खोले, विलास, मराठीतील मौखिक साहित्याचे संकलन, मौखिता आणि लोकसाहित्य (संपा.) वाकोडे मधुकर, करोगल सुषमा, साहित्य अकादमी, २००८

१०) पाटील, अवनीश, स्थानिक इतिहास संशोधांनाची सहाय्यक पद्धती, भारतातील स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक ओळख, नदाफ, हाजी., (संपा.) ज्ञानजोत प्रकाशन, कोल्हापूर, २०२०

११) भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.

❑❑❑

## घटक २

# इतिहास लिहिण्याची प्रक्रिया

(Process of Writing History)

**अनुक्रमणिका :**


२.० उदिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ विषयाची निवड Selection of topic

२.२.२ प्रस्ताव/रूपरेषा तयार करणे Preparation of proposal/outline

२.२.३ माहिती विश्लेषण: अंतर्गत आणि बाह्य परीक्षण Data Analysis: Internal and External Criticism

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं - अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उदिष्टे

इतिहास लिहिणे. इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत सामील असलेल्या मुख्य उद्दिष्टांची सर्वसमावेशक माहिती वाचकांना प्रदान करणे हा या प्रकरणाचा उद्देश आहे. ऐतिहासिक कथांचे संशोधन, विश्लेषण आणि सादरीकरण करताना इतिहासकार ज्या मूलभूत उद्दिष्टांचे आणि तत्त्वांचे पालन करतात ते येथे स्पष्ट केले आहे .

प्रस्तुत प्रकरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. ऐतिहासिक प्रक्रियेची व्याख्या: ऐतिहासिक प्रक्रियेची संकल्पना स्पष्ट करणे, इतिहासकार भूतकाळाच्या अभ्यासाकडे पद्धतशीरपणे कसे पोहोचतात आणि इतिहासाला इतर शाखांपासून वेगळे करतात. ते अभ्यासणे

२. साधनांची भूमिका स्पष्ट करणे : भूतकाळाची पुनर्रचना करताना प्राथमिक आणि दुय्यम अशा ऐतिहासिक स्त्रोतांच्या महत्त्वाची चर्चा करने . अर्थपूर्ण माहिती काढण्यासाठी इतिहासकार विविध स्त्रोतांचे समालोचनात्मक विश्लेषण आणि व्याख्या कसे करतात ते तपासने .

३. ऐतिहासिक कार्यपद्धती तपासणे : इतिहासकारांनी वापरलेल्या विविध पद्धतींचा शोध घेणे , जसे की सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक आणि बौद्धिक इतिहास आणि या पद्धती ऐतिहासिक समज कशी समृद्ध करतात ते पाहणे .

४. वस्तुनिष्ठता आणि पूर्वाग्रह यावर जोर देणे : ऐतिहासिक संशोधन आणि लेखनात वस्तुनिष्ठतेचे महत्त्व अधोरेखित करणे , हे मान्य करताना की, इतिहासकारांनी स्त्रोत आणि व्याख्यांमध्ये अंतर्भूत असलेल्या पूर्वाग्रहांकडे लक्ष देणे आणि त्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे.

५. ऐतिहासिक व्याख्येची चर्चा करण्यासाठी: ऐतिहासिक पुराव्यांचा अर्थ लावण्याची प्रक्रिया आणि इतिहासकार अनेक दृष्टीकोनांचा लेखाजोखा करताना उपलब्ध माहितीच्या आधारे इतिहास कथा कशी तयार करतात याचे परीक्षण करणे .

६. ऐतिहासिक संदर्भ संबोधित करणे : भूतकाळातील घटना समजून घेण्यासाठी ऐतिहासिक संदर्भाचे महत्त्व आणि इतिहासकार त्यांच्या संशोधनाला व्यापक ऐतिहासिक चौकटीत कसे संदर्भित करतात यावर जोर देणे.

७. लेखन प्रक्रियेची रूपरेषा तयार करणे : इतिहास लिहिण्यात गुंतलेल्या टप्प्यांचे वर्णन करणे , विषय निवडणे आणि संशोधन करणे ते माहिती आयोजित करणे आणि सुसंगत इतिहास तयार करणे.

८. पुनरावृत्तीचे महत्त्व अधोरेखित करणे : ऐतिहासिक लेखनाच्या पुनरावृत्तीच्या स्वरूपावर आणि नवीन पुरावे आणि दृष्टीकोन उदयास येत असताना सतत पुनरावृत्ती आणि परिष्करण करण्याची आवश्यकता यावर जोर देणे.

९. नैतिक विचारांवर चर्चा करणे : संवेदनशील स्त्रोतांचा वापर, उपेक्षित गटांचे प्रतिनिधित्व आणि भूतकाळाशी जबाबदारीने गुंतण्याची इतिहासकारांची जबाबदारी यासह ऐतिहासिक संशोधनातील नैतिक आव्हानांना स्पष्ट करणे .

१०. केस स्टडीजसह स्पष्ट करण्यासाठी: उदाहरणात्मक केस स्टडीज किंवा ऐतिहासिक संशोधनातील उदाहरणे प्रदान करणे जे प्रकरणामध्ये चर्चा केलेल्या उद्दिष्टांचे उदाहरण देतात, लेखन प्रक्रियेमध्ये व्यावहारिक अंतर्दृष्टी देतात.

११. गंभीर विचारांना प्रोत्साहन देणे : ऐतिहासिक कार्यांचे विश्लेषण करण्यासाठी आणि ऐतिहासिक संशोधनाच्या विविध पद्धतींचा विचार करण्यासाठी विध्यार्त्यांच्या च्या टीकात्मक विचारांना उत्तेजन देणे.

प्रस्तुत प्रकरणाचा उद्देश विध्यार्थ्यांना ना इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेची सर्वसमावेशक समज देऊन, भूतकाळाचा शोध आणि व्याख्या करताना मार्गदर्शन करणे आणि ऐतिहासिक विद्वत्तेच्या गुंतागुंतीबद्दल सखोल चर्चा करणे हे आहे.

## २.१ प्रस्तावना

इतिहास हा मानवी अनुभवाची गोष्ट आहे, जी वेळ, स्मृती आणि व्याख्या यांच्या धाग्यांनी एकत्र विणलेली आहे. ही आपल्या सामूहिक भूतकाळाची कथा आहे, ज्यात विजय आणि शोकांतिका, यश आणि अपयश आणि सभ्यतेची प्रगती आणि प्रतिगमन यांचा समावेश आहे. तथापि, आपण जो इतिहास जाणतो आणि समजतो तो भूतकाळाचे अस्पष्ट प्रतिनिधित्व नाही; उलट, हे इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेद्वारे आकार दिलेले एक काळजीपूर्वक तयार केलेले कथानक आहे.

इतिहास लिहिण्याची प्रक्रिया हा एक जटिल आणि गतिशील प्रयत्न आहे, ज्यामध्ये इतिहासकाराचा दृष्टीकोन, उपलब्ध स्रोत आणि प्रचलित विचारधारा यासह विविध घटकांचा प्रभाव असतो. यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचे सूक्ष्म परीक्षण, घटना आणि त्यांचे संदर्भ यांचे गंभीर विश्लेषण आणि पूर्वाग्रह आणि पक्षपात नेव्हिगेट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न यांचा समावेश आहे. इतिहासकार माहितीचे धागे एकत्र विणत असताना, ते भूतकाळाचे एक मोज़ेक तयार करतात जे अचूक आणि अर्थपूर्ण असण्याचा प्रयत्न करतात.

युगानुयुगे, इतिहासाचे लेखन उत्क्रांत आणि परिवर्तन झाले आहे. सुरुवातीच्या ऐतिहासिक कथा बहुतेक वेळा पौराणिक कथा आणि दंतकथेने जोडल्या गेल्या होत्या, पिढ्यानपिढ्या तोंडी दिल्या जात होत्या. समाजाने लेखन पद्धती विकसित केल्यामुळे, इतिहासकारांनी मातीच्या गोळ्या, पॅपिरस स्क्रोल आणि चर्मपत्रांवर घटनांची नोंद केली. अलीकडच्या काळात, प्रिंटिंग प्रेसने ऐतिहासिक ज्ञानाचा व्यापक प्रसार करण्यास सक्षम केले, इतिहासाचा वापर आणि समजून घेण्याच्या पद्धतीला आकार दिला.

जसजसे आपण इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेचा सखोल अभ्यास करतो, तसतसे हे स्पष्ट होते की ऐतिहासिक कथा स्थिर घटक नसून त्या पुनर्व्याख्या आणि पुनरावृत्तीच्या अधीन असतात. नवीन शोध, नवीन दृष्टीकोन आणि बदलणारे सामाजिक नियम स्थापित ऐतिहासिक कथनांना सतत आव्हान देतात, ज्यामुळे भूतकाळाचे पुनर्मूल्यांकन करण्याची शाश्वत प्रक्रिया होते.

हा अध्याय इतिहास लेखनाच्या बहुआयामी प्रक्रियेचा शोध घेतो. पारंपारिक सकारात्मक दृष्टिकोनापासून ऐतिहासिक सत्याच्या उत्तर-आधुनिकतावादी विघटनापर्यंत आपण इतिहासकारांनी वापरलेल्या विविध पद्धतींचा अभ्यास करू. याव्यतिरिक्त, आपण ऐतिहासिक संशोधन आणि प्रसारावर तांत्रिक प्रगतीचा प्रभाव तसेच भूतकाळातील आपल्या समजाला आकार देण्यासाठी मौखिक इतिहास आणि स्मृतीची भूमिका तपासू.

शिवाय, निःपक्षपाती आणि सर्वसमावेशक कथा सादर करण्याची इतिहासकारांची जबाबदारी लक्षात घेऊन आपण इतिहास लेखनाच्या नैतिक परिमाणांवर विचार करू. सांस्कृतिक ओळख घडवून आणण्यासाठी आणि वर्तमानकाळातील निर्णयांची माहिती देण्यासाठी ऐतिहासिक कथनांची ताकद ओळखून, आपण भूतकाळाचे प्रामाणिक चित्रण तयार करण्यासाठी ऐतिहासिक सहानुभूती आणि वस्तुनिष्ठतेचे महत्त्व शोधू.

इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेतील प्रवास हे एक बौद्धिक साहस आहे, जो आव्हाने, विरोधाभास आणि कल्पनांनी भरलेला आहे. हा एक प्रवास आहे जो आपल्याला आपल्या गृहितकांवर प्रश्न विचारण्यासाठी, आपल्या पूर्वग्रहांना तोंड देण्यासाठी आणि आपली क्षितिजे विस्तृत करण्यासाठी आमंत्रित करतो. इतिहास लिहिण्याची प्रक्रिया समजून घेऊन, आपण स्वतःला ऐतिहासिक ज्ञानाचे अधिक विवेकी ग्राहक बनण्यास सक्षम करतो आणि आमच्या सामायिक मानवी कथेबद्दल गंभीर संवादांमध्ये गुंततो.

सदर प्रकरणांमध्ये, आपण विविध ऐतिहासिक कालखंडातील भूदृश्यांचा मार्गक्रमण करू, भूतकाळातील आपल्या आकलनाला आकार देणार्या कार्यपद्धतींचे परीक्षण करू आणि आपल्या वर्तमान आणि भविष्याला आकार देण्यावर इतिहासाच्या गहन प्रभावाचा विचार करू. एकत्रितपणे, आपण इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेतील गुंतागुंत उलगडण्याचा प्रयत्न करतो आणि आपण कोठे जात आहोत हे जाणून घेण्यासाठी आपण कोठून आलो आहोत हे जाणून घेण्याच्या महत्त्वाची प्रशंसा करतो.

## २.२ विषय विवेचन

इतिहास हा काळ, स्मृती आणि अर्थाच्या गुंतागुंतीच्या धाग्यांनी एकत्र विणलेला एक मनमोहक टेपेस्ट्री आहे. हे मानवतेची कथा सांगते, विजय आणि शोकांतिका, प्रगती आणि प्रतिगमन आणि सभ्यतेच्या उत्क्रांतीची कथा सांगते. तथापि, इतिहास हा केवळ वस्तुनिष्ठपणे नोंदवलेल्या घटनांचा संग्रह नाही; उलट, ही एक गतिमान आणि सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे ज्यामध्ये इतिहास लिहिण्याची कला आणि विज्ञान समाविष्ट आहे.

इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेच्या विषयाचे विश्लेषण बहुआयामी पद्धती, स्त्रोत आणि नैतिक विचारांचा शोध घेते जे इतिहासकार भूतकाळातील कथा तयार करताना नेव्हिगेट करतात. हे अन्वेषण ऐतिहासिक संशोधनातील गुंतागुंत उलगडून दाखवते, इतिहासकार त्यांच्या कलेकडे कसे जातात आणि त्यांच्या कार्याचा वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांसाठी काय परिणाम होतो याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करते.

ऐतिहासिक कार्यपद्धतीच्या केंद्रस्थानी सकारात्मकतावादी दृष्टीकोन आणि उत्तर-आधुनिकतावादी विघटन यांच्यातील द्वंद्व आहे. सकारात्मकतावादी पद्धत तथ्यात्मक ऐतिहासिक खाती तयार करण्यासाठी अनुभवजन्य पुरावे आणि वस्तुनिष्ठ विश्लेषणावर अवलंबून असते, पूर्वाग्रह आणि अनुमान कमी करण्याचा प्रयत्न करते. याउलट, उत्तर-आधुनिकतावादी इतिहासकार परिपूर्ण सत्याच्या कल्पनेला आव्हान देतात, अंतर्निहित शक्तीची गतिशीलता, संदर्भात्मक प्रभाव आणि इतिहासकाराचा व्यक्तिनिष्ठ दृष्टीकोन प्रकट करण्यासाठी पारंपारिक कथांचे विघटन करतात.

इतिहास लिहिण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी इतिहासकार वापरत असलेले विविध स्त्रोत आणि पुरावे तपासणे आवश्यक आहे. मूळ दस्तऐवज, कलाकृती आणि प्रत्यक्षदर्शी खाती यासारखे प्राथमिक स्त्रोत भूतकाळातील घटनांची थेट माहिती देतात. अभ्यासपूर्ण कार्ये आणि ऐतिहासिक विश्लेषणांसह दुय्यम स्रोत, प्राथमिक सामग्रीचे स्पष्टीकरण आणि विश्लेषण देतात. याव्यतिरिक्त, मौखिक इतिहास इतिहासकारांना जिव्हाळ्याचा आणि वैयक्तिक साक्ष्ये गोळा करण्यास सक्षम करतो, ज्यांनी त्यांचा अनुभव घेतला त्यांच्या आवाजाद्वारे ऐतिहासिक घटनांमध्ये जीवन श्वास घेतो.

तंत्रज्ञानाच्या आगमनाने ऐतिहासिक संशोधन आणि प्रसारात क्रांती घडवून आणली आहे. ऐतिहासिक संग्रहणांच्या डिजिटायझेशनने प्रवेशयोग्यता वाढवली आहे, ज्यामुळे इतिहासकारांना कागदपत्रे आणि कलाकृतींच्या विशाल संग्रहांचे ऑनलाइन परीक्षण आणि विश्लेषण करता येते. डेटा मायनिंग आणि मोठ्या डेटाने ऐतिहासिक चौकशीची व्याप्ती आणखी वाढवली आहे, भूतकाळातील नमुने आणि ट्रेंड ओळखण्यासाठी नवीन मार्ग प्रदान केले आहेत. ऑनलाइन प्रकाशन आणि मुक्त-प्रवेश जर्नल्सने ऐतिहासिक ज्ञान कसे सामायिक केले जाते हे बदलले आहे, ज्यामुळे ते व्यापक प्रेक्षकांसाठी अधिक सहज उपलब्ध झाले आहे.

प्रतिमान बदलणे आणि व्याख्या करणे हे इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत अंतर्भूत असतात. संशोधनवादी इतिहास प्रस्थापित कथनांना आव्हान देतो, इतिहासकारांना घटनांचे पुनर्मूल्यांकन करण्यास आणि नवीन पुरावे किंवा पुनर्मूल्यांकनांच्या आधारे पर्यायी दृष्टीकोन प्रस्तावित करण्यास प्रोत्साहित करतो. उपनिवेशीकरण इतिहास अधिक समावेशक आणि वैविध्यपूर्ण ऐतिहासिक कथा तयार करण्यासाठी स्वदेशी आणि गैर-पाश्चात्य दृष्टिकोनांचा समावेश करून, युरोकेंद्री पूर्वाग्रहांपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतो. कोणाच्या इतिहासाचे प्रतिनिधित्व केले जाते आणि कोणाचे अनुभव वगळले जातात याबद्दलचे प्रश्न इतिहासकारांना ऐतिहासिक अपवाद मान्य करण्याचे आणि दुरुस्त करण्याचे आव्हान देतात.

इतिहासाच्या लेखनात नैतिक विचार नेहमीच उपस्थित असतात. इतिहासकार त्यांच्या स्वतःच्या पक्षपातीपणा आणि घटनांचा एक निष्पक्ष आणि संतुलित लेखाजोखा मांडण्याची जबाबदारी घेतात. वस्तुनिष्ठता आणि वकिली यांच्यातील तणाव काळजीपूर्वक नेव्हिगेशनची मागणी करतो, कारण इतिहासकारांनी त्यांच्या कार्याद्वारे सामाजिक न्यायासाठी योगदान देण्याची क्षमता ओळखून विकृतीशिवाय इतिहास सादर करताना संतुलन राखले पाहिजे. शिवाय, विविध संस्कृतींमधून इतिहासाचा अभ्यास आणि अर्थ लावताना, विविध समाजांच्या बारकावे आणि गुंतागुंतीचा आदर करताना सांस्कृतिक संवेदनशीलता आवश्यक आहे.

वर्तमान आणि भविष्यावर इतिहासाचा प्रभाव निर्विवाद आहे. ऐतिहासिक स्मृती आणि राष्ट्रीय ओळख गुंतागुंतीच्या पद्धतीने विणलेल्या आहेत, कारण ऐतिहासिक कथा एखाद्या राष्ट्राच्या आत्म-धारणेवर आणि ओळखीवर प्रभाव पाडतात. इतिहासातील धडे निर्णय घेण्याची आणि धोरण निवडींची माहिती देतात, कारण भूतकाळ हे समकालीन आव्हानांना नेव्हिगेट करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करते. सामाजिक बदलांना

प्रेरणा देण्यासाठी ऐतिहासिक ज्ञान देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, कारण लोक सामाजिक चळवळी आणि राजकीय विचारसरणींना आकार देण्यासाठी ऐतिहासिक चेतनेचा आधार घेतात.

इतिहासकार आकर्षक आणि सुसंगत कथन तयार करण्याचा प्रयत्न करत असल्याने, गंभीर विचार आणि ऐतिहासिक सहानुभूती महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांमध्ये ही कौशल्ये वाढवण्यात, त्यांना भूतकाळातील लोकांच्या प्रेरणा आणि अनुभव समजून घेण्यात मदत करण्यात शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतात. आमच्या सामायिक मानवी कथेची अधिक व्यापक समज निर्माण करण्यासाठी लपलेले इतिहास उघड करणे आणि ऐतिहासिक ज्ञानाच्या मर्यादा मान्य करणे आवश्यक आहे.

आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारणे ऐतिहासिक शिष्यवृत्ती समृद्ध करते. मानववंशशास्त्रासह इतिहासाची सांगड घालणे भूतकाळातील संस्कृती आणि सामाजिक पद्धतींबद्दल अंतर्दृष्टी देते, तर पर्यावरणीय अभ्यासांचे एकत्रीकरण संपूर्ण इतिहासातील नैसर्गिक जगावर मानवी क्रियाकलापांच्या प्रभावावर प्रकाश टाकते. मनोवैज्ञानिक दृष्टीकोनांचा समावेश केल्याने ऐतिहासिक अभिनेत्यांच्या प्रेरणांची सखोल माहिती मिळते

### २.२.१ विषयाची निवड: (Selection of topic)

※ **इतिहास लेखन प्रक्रियेतील विषय निवडीचे महत्त्व:**

इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत एखाद्या विषयाची निवड अत्यंत महत्त्वाची असते, कारण ती ऐतिहासिक कथनाची गुणवत्ता, प्रासंगिकता आणि महत्त्व यावर खोलवर परिणाम करते. विषयाची निवड भूतकाळातील कोणते पैलू तपासले जातात आणि त्यांचा अर्थ कसा लावला जातो हे ठरवते, इतिहासकाराचा दृष्टिकोन, संशोधन आणि त्यांच्या कार्याचे व्यापक परिणाम घडवून आणतात. इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत विषय निवडीची महत्त्वपूर्ण भूमिका अनेक कारणे अधोरेखित करतात:

**१. महत्त्व आणि प्रासंगिकता:** निवडलेल्या विषयाचे ऐतिहासिक महत्त्व आणि प्रासंगिकता असणे आवश्यक आहे. योग्यरित्या निवडलेला विषय महत्त्वाच्या घटना, व्यक्ती किंवा घडामोडींना संबोधित करतो ज्यांचा समाज, संस्कृती, राजकारण किंवा अर्थशास्त्रावर कायमस्वरूपी परिणाम झाला आहे. इतिहासकारांचे उद्दिष्ट भूतकाळातील पैलूंवर प्रकाश टाकणे आहे जे वर्तमानकाळातील चिंतेशी संबंधित आहेत आणि समकालीन समस्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास हातभार लावतात.

**२. संशोधनाची व्याप्ती आणि खोली:** ऐतिहासिक संशोधनाची जटिलता आणि खोली निवडलेल्या विषयावर अवलंबून असते. काही विषयांमध्ये मुबलक प्राथमिक स्रोत असू शकतात, जे सखोल तपासासाठी परवानगी देतात, तर इतर मर्यादित किंवा खंडित ऐतिहासिक नोंदीमुळे आव्हाने सादर करू शकतात. इतिहासकाराने स्त्रोतांची उपलब्धता आणि सखोल आणि सर्वसमावेशक अभ्यास करण्याच्या व्यवहार्यतेचे काळजीपूर्वक मूल्यांकन केले पाहिजे.

**३. आंतरविद्याशाखीय संभाव्यता:** काही ऐतिहासिक विषयांना अंतःविषय प्रासंगिकता असते, जे मानवशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र किंवा मानसशास्त्र यासारख्या इतर क्षेत्रांमधील अंतर्दृष्टी एकत्रित करण्याच्या संधी प्रदान करतात. एक अंतःविषय दृष्टीकोन ऐतिहासिक विश्लेषण समृद्ध करू शकतो आणि विषयाची व्यापक समज देऊ शकतो.

**४. वैविध्यपूर्ण दृष्टीकोन:** विषयाच्या निवडीवरून कोणाचे अनुभव आणि वर्णने दर्शविली जातात हे ठरवता येते. विविध सामाजिक गटांच्या अनुभवांचे प्रतिनिधित्व करणारे अधिक सर्वसमावेशक आणि गोलाकार ऐतिहासिक खाते सुनिश्चित करून, विविध आवाज आणि दृष्टीकोन समाविष्ट करण्यासाठी इतिहासकारांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

**५. अंतर आणि विवादांना संबोधित करणे:** इतिहासकार असे विषय निवडू शकतात जे ऐतिहासिक अंतर किंवा विवादास्पद घटनांना संबोधित करतात, पर्यायी व्याख्या देऊ शकतात किंवा विद्यमान कथनातील वगळणे आणि चुकीचे वर्णन सुधारण्याचा प्रयत्न करू शकतात. कमी-प्रसिद्ध किंवा विवादित क्षेत्रांचा अभ्यास करून, इतिहासकार भूतकाळातील अधिक सूक्ष्म आणि सर्वसमावेशक समजून घेण्यास हातभार लावतात.

**६. स्मृती आणि ओळख यावर प्रभाव:** ऐतिहासिक कथा सामूहिक स्मृती आणि राष्ट्रीय ओळख प्रभावित करतात. विषयांची निवड एकतर प्रस्थापित कथनांना बळकटी देऊ शकते किंवा विद्यमान संकल्पनांना आव्हान देऊ शकते, ज्यामुळे समाजाला त्याचा इतिहास आणि ओळख कशी समजते हे आकार देते.

**७. समकालीन चिंतांसह व्यस्तता:** काही विषय समकालीन चिंता आणि वादविवादांसह अधिक खोलवर प्रतिध्वनी करतात. वर्तमान सामाजिक, राजकीय किंवा पर्यावरणीय समस्यांशी जोडणारे विषय निवडून, इतिहासकार त्यांच्या प्रेक्षकांमध्ये अधिक प्रतिबद्धता आणि प्रासंगिकता वाढवू शकतात.

**८. नैतिक विचार:** विषयाची निवड नैतिक दुविधा वाढवू शकते, विशेषत: संवेदनशील किंवा क्लेशकारक घटनांना सामोरे जाताना. इतिहासकारांनी अशा विषयांवर संवेदनशीलतेने, संबंधितांच्या सन्मानाचा आणि अनुभवांचा आदर करणे आवश्यक आहे.

**९. वैयक्तिक स्वारस्य आणि कौशल्य:** इतिहासकार अनेकदा त्यांच्या वैयक्तिक स्वारस्य आणि कौशल्यावर आधारित विषय निवडतात. इतिहासकाराची उत्सुकता आणि उत्कटतेला मोहित करणारा विषय आकर्षक आणि अंतर्दृष्टीपूर्ण ऐतिहासिक लेखाजोखा बनवण्याची शक्यता जास्त असते.

**१०. शिष्यवृत्तीसाठी योगदान:** एखाद्या विषयाच्या निवडीने ऐतिहासिक शिष्यवृत्तीसाठी अर्थपूर्ण योगदान दिले पाहिजे, नवीन अंतर्दृष्टी, व्याख्या किंवा कार्यपद्धती ऑफर केली पाहिजे जी भूतकाळातील क्षेत्राची समज वाढवते.

शेवटी, इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत एखाद्या विषयाची निवड हा एक गंभीर निर्णय आहे जो ऐतिहासिक संशोधनाची दिशा आणि परिणाम ठरवतो. महत्त्वपूर्ण, प्रासंगिक आणि सर्वसमावेशक विषय निवडून, इतिहासकार समकालीन प्रेक्षकांशी संलग्नता वाढवताना आपल्या सामायिक मानवी भूतकाळाबद्दल अधिक समृद्ध आणि अधिक सूक्ष्म समजून घेण्यास हातभार लावणारी कामे तयार करू शकतात. या विषयाचा काळजीपूर्वक विचार केल्याने आपल्या इतिहासाच्या एकत्रित ज्ञानाची माहिती देणारे आणि समृद्ध करणार्या ऐतिहासिक कथनाचा पाया घातला जातो.

- **इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेतील विषयाच्या निवडीचे घटक :**

इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत विषयाची निवड ही एक विचारशील आणि उद्देशपूर्ण प्रक्रिया आहे, जी ऐतिहासिक संशोधनाच्या दिशा आणि व्याप्तीवर प्रभाव टाकणाऱ्या विशिष्ट वैशिष्ट्यांद्वारे मार्गदर्शन करते. ही वैशिष्ट्ये निवडलेल्या विषयाची प्रासंगिकता, महत्त्व आणि संभाव्य प्रभाव निर्धारित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत विषय निवडण्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये येथे आहेत:

- संदर्भग्रंथ सूची करिता वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरचा परिचय होईल.
- संशोधन सादर करण्याचे कौश्यल्य आत्मसात करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

इतिहास हे कला की शास्त्र असा वाद आधुनिक इतिहास लेखनाच्या आरंभीच्या काळात झाला होता. इतिहास संशोधनला शास्त्रशुध्द स्वरूप देण्याचा प्रयत्न तेव्हापासून सातत्याने सुरु आहे. यातून इतिहासलेखन हे शास्त्रशुध्द पद्धतीने करण्याकडे संशोधकांचा कल असतो. इतिहासलेखन हे दर्जेदार होण्यासाठी इतिहास संशोधनात शास्त्रशुद्ध पद्धतीचा वापर केला पाहिजे. इतिहासलेखन हे एक शास्त्र व कलाही आहे. आपले संशोधन समाजापुढे आणण्यासाठी इतिहासकाराकडे इतिहासलेखनाची कला असली पाहिजे. इतिहासाची मांडणी तसेच सादरीकरण करण्यासाठी काही शास्त्रशुद्ध टप्पे पार पाडावे लागतात. संशोकाने सुरुवातीलाच त्याच्याजवळ जी संदर्भसाधने असतील त्याची वर्गवारी करून त्यानंतर ही संदर्भसाधने एका विशिष्ट हेतूत मांडून घेतली पाहिजेत. संशोधकाने आपल्या बुद्धीचा योग्य वापर करून, घटनातून अन्वयार्थ लावून तो अन्वयार्थ योग्य शब्दात मांडून व घटनेवरून न्यायी बुद्धीने निर्णय घेतला पाहिजे. कोणतेही संशोधन तळटीपांशिवाय पूर्ण होत नाही. संदर्भसाधनाच्या वापराविषयीचे मार्गदर्शन संदर्भसूचीतून केले जाते.

संशोधन दर्जेदार होण्याबरोबर वाचनीय आणि उपयुक्त व्हावे यासाठी टिपणे काढणे, तळटीपा देणे, सूची, संदर्भसूची यादी, संदर्भ ग्रंथ सूची बनविण्यासाठी सॉफ्टवेअरचा वापर, इ. गोष्टींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. टिपणे व तळटीपाचा योग्य वापर केल्यास लेखन दर्जेदार व विश्‍वसनीय होते. इतिहास लेखनासाठी ग्रंथाच्या शेवटी सूची दिली जाते. त्यामुळे भविष्यातील काही संशोधकाना संशोधनासाठी मार्गदर्शन होते व इतिहासलेखन प्रक्रियेला शास्त्रशुद्ध स्वरूप देण्यासाठी टिपणे काढणे, तळटीपा देणे, सूची, संदर्भसूची तयार करणे या तंत्राचा काटेकोरपणे अवलंब केला जातो. संशोधनाचे सादरीकरण करताना तळटिपा/ अंतटिपा, संदर्भसूची इत्यादींचा व्यवस्थितपणा आणि दर्जा हे संशोधनाचा स्तर ठरविण्यासाठीचे एक महत्त्वपूर्ण मानदंड मानले जातात. प्रस्तुत घटकात आपण संशोधनाचे सादरीकरण करताना उपयोगात आणले जाणाऱ्या तळटीपा/अंतटिपा, सूची व संदर्भ ग्रंथ सूची, टिपणे बनवणे आणि संदर्भ सूचीचे सॉफ्टवेअर इत्यादींची माहिती घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ तळटीपा /अंतटीपा (Foot/End Notes)

ऐतिहासिक संशोधन मग ते संशोधकीय लेखाच्या स्वरूपात असो की शोधप्रबंधाच्या स्वरुपात असो किंवा ग्रंथाच्या स्वरूपात असो त्यामध्ये तळटीपा / अंतसूची देण्याच्या तंत्राला फार महत्त्व आहे. तळटीप (footnote) ही लेखाच्या मधील प्रत्येक पानाच्या खाली दिलेली असते. अंतसूची (endnote) हे लेखाच्या अथवा प्रकरणाच्या शेवटी दिलेली असते. तळटीप व अंतसूची देण्याच्या स्थानाबद्दलचाच फरक वगळता तळटीप व अंतसूचीमध्ये फारसा फरक नसतो. त्यामुळे सदर घटकात तळटीप/अंतसूची यांच्यासाठी ङ्गतळटीपफ हाच शब्द योजला आहे. संशोधकाने आपल्या संशोधनासाठी वापरलेल्या संदर्भांतील पुरावे म्हणून किंवा अधिक माहितीचा मजकूर म्हणून तळटीप दिलेली असते. आपण मांडलेल्या विचारांच्या समर्थनासाठी देखील संशोधक तळटीपा देतो. कोणत्याही प्रकारचे ऐतिहासिक संशोधन हे तळटीप शिवाय परिपूर्ण म्हणता

येत नाही. लेखकाला आपल्या निवेदनाच्या बळकटीसाठी, तंतोतंतपणा व बिनचूक संशोधन करण्यासाठी तळटीपाचा उपयोग होतो.

**तळटीपाचा उद्देश**

तळटीप/अंतसूची देण्यामागील उद्देशांची चर्चा करताना पुढील मुद्दे लक्षात घेणे आवश्यक आहेत.

१. संशोधना करिता वापरलेल्या साधनातील माहिती नेमकी कोठून अथवा कोणत्या पानावरून घेतली याची माहिती देणे.

२. संशोधनात मांडलेल्या विचारांची पुष्टी करणे.

३. लेखकाच्या लिखाणाला जबाबदार व्यक्तींचा पाठिंबा दाखवून देणे.

४. आपल्या लिखाणाचा ओघ थांबू नये, वाचकाचे मन द्विधा होऊ नये व त्याच्या वाचनातील उत्साह कमी होऊ नये अशासाठी तळटीपा देतात.

५. संशोधनातील संबंधीत मुद्द्याबाबत अधिक माहिती वाचकाला देणे.

६. एखाद्या वेळेस आपल्या लिखाणाच्या विरोधात काय लिहिले आहे ते वाचकाला समजावे या उद्देशाने तळटीपा दिल्या जातात.

५. वरीलपैकी दोन किंवा जादा हेतूने तळटिपा दिल्या जातात.

संशोधकांने संशोधनात नवीन माहिती दिली आहे व ती विश्वसनीय आहे हे पटवून देण्यासाठी ती माहिती कोणत्या साधनांमधून घेतली त्याचा उल्लेख करणे आवशक असते. तळटीपा दिल्यामुळे संशोधन कार्याला भक्कम आधार मिळत असतो, संशोधन कार्याची विश्वसनियता वाढत असते. तळटीपांमुळे संशोधकाला आपल्या मातांना पुष्टी देता येते. संशोधन करता असतांना अनेक वेळा संशोधन विषयाच्या अनुषंगानी घटना किवा व्यक्तींची बरीच माहिती मिळत असते, ती सर्वच माहिती संशोधनाकरिता आवश्यक असते असे नाही, मात्र सदर माहिती दिल्यास त्या विषयावर नवीन प्रकाश पडत असतो. मात्र अशी माहिती अतिशय लांबलचक नसावी. माहिती प्राथमिक स्वरुपाची असल्यास ती परिशिष्ठाच्या स्वरुपात द्यावी. संशोधकांनी तळटीपांच्या माध्यमातून संदर्भ साधनांचा पुरावा दिल्यामुळे तो पुरावा इतर संशोधकांना तपासून पाहता येतो. संशोधकांनी एखादा विचार जरी एखाद्या ग्रंथातून घेतला असेल तरीही त्याचा उल्लेख तळटीपांमध्ये करणे आवश्यक आहे. तळटीपा देण्यामागचा दुसरा उद्देश असा की, वाचकाला सबंधित विषयावर अनेक संदर्भ देऊन त्यांच्या ज्ञानात भर घालणे असतो. तळटीपा दिल्यामुळे अनेक विचार प्रवाह वाचकाला समजू शकतात. त्यामुळे त्याची विचारसरणी तयार होत असते. संशोधाकालाही तळटीपांमुळे एखाद्या विषयावर किती संशोधन झाले आहे याची जाणीव होते.

**तळटीपांचे प्रकार**

१. ज्यावेळी संशोधकाला आपला मुद्दा स्पष्ट करावयाचा असतो तेव्हा तो मध्येच एखादी तळटीप देवून मुद्दा स्पष्ट करतो. असा संदर्भ देण्यामध्ये त्याचा उद्देश आपल्या मताचे स्पष्टीकरण करणे हाच असतो.

२. दुसऱ्या प्रकारात संशोधक एखादा अस्सल पुरावा आपल्या विधानाच्या समर्थनासाठी देत असतो. अशा पुराव्यामुळे वाचकाच्या ज्ञानामध्ये भर पडते.

संशोधकाने दोन्ही प्रकारच्या तळटीपा योग्य ठिकाणी व त्याची प्रासंगिकता पाहून द्यायच्या असतात.

**तळटीपाचा उपयोग**

संशोधन कार्यात तळटीपा देणे अत्यंत आवशक आहे. संशोधन करिता असतांना तळटीपा केव्हा व कश्या प्रकारे द्यायचे याचेही एक विशिष्ट पद्धत आहे. संशोधनात नवीन माहिती देणाऱ्या विधानांना त्याचप्रमाणे महत्वाच्या विधानांना तळटीपा देणे आवश्यक असते. सर्वसाधारण व सर्वांना ज्ञात असलेल्या माहितीसाठी तळटीपा देणे आवश्यक नाही. संशोधनात काही वादग्रस्त मुद्दा असेल तर त्यास तळटीप देणे आवश्यक आहे, एका वाक्यात किवा परिच्छेदात एकच मुद्दा असेल तर त्याकरिता एकच तळटीप देणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे संशोधकाची स्वत:ची विचार, विधाने व इतरांची विधाने यातील भेद स्पष्ट करण्याकरिता तळटीप देणे आवश्यक असते. तळटीपा या स्पष्टीकरणाकरीता तयार केलेल्या नोंदी (Notes) पेक्षा वेगळ्या असतात. तळटीपा संशोधकाला संशोधनाच्या संदर्भात नवीन माहिती मिळविण्याकरिता मार्गदर्शक म्हणून काम करतात. त्याचप्रमाणे संशोधक प्रतिकूल टीका टाळण्यासाठी तळटीपा देत असतो.

**तळटीपा देण्याची पद्धत**

तळटीपा देण्याच्या विविध पद्धती प्रचलित आहेत. तळटीपा देण्यासाठी कोणती पद्धत वापरायची हे साधारणपणे संशोधकाच्या इच्छेच्या नुसार, विद्यापीठाने शोधप्रबंधासाठी आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, संशोधन नियतकालिकेच्या किंवा प्रकाशन संस्थेच्या प्रकाशन नियमांनुसार ठरते. काही विद्वानांना तळटीपा एकाच पानाच्या खालच्या भागात असाव्यात असे वाटते. म्हणजे पानाच्या खालच्या बाजूला तळटीपा द्याव्यात वाचकांच्या दृष्टीने ही पद्धत सोयीचे असते. पृष्टाच्या खालच्या बाजूला आवश्यक त्या ठिकाणी क्रमश: १., २., ३., असे आकडे देऊन त्या आकड्यानुसार खालच्या बाजूला तळटीप देत असतात. या पद्धतीत कधी तळटीपांचे क्रमांक पृष्ठानुसार बदलत असतात. एका पृष्ठावर जेवढी आकडे आले असतील तेवढेच असतात. नंतरच्या पृष्ठावर त्या पुढील आकडे दिले जातात. ही पद्धत प्रकरणाच्या शेवटापर्यंत वापरली जाते. तळटीपा देण्याच्या दुसऱ्या पद्धतीत तळटीपा पृष्ठाच्या खाली न देता प्रकरणाच्या शेवटी सलगपणे दिल्या जातात, ज्याला एपवर्पीश म्हणजेच 'अंत्यटीप' किंवा 'अंतसूची' असे देखील म्हणतात. या पद्धतीमध्ये क्रमांक प्रकरणाप्रमाणे दिले जातात. मुद्रणाच्या दृष्टीने ही पद्धत सोयीची आहे. तळटीपा देण्याची ही पद्धत मोठ्या ग्रंथांमध्ये वापरली जाते. या पद्धतीमध्ये वाचकाला वाचत असतांना अडथळा येत नाही.

**तळटीपा देण्याचे तंत्र/कौशल्य**

तळटीपा देण्यासंदर्भात अमेरिकेतील मॉडर्न लँग्वेज असोसिएशन म्यॅन्यूअल Modern Language Association Manual (MLA Style), अमेरिकन सायकोलॉजी असोसिएशन म्यॅन्यूअल [American Psychological Association Manual (APA Style), शिकागो युनिव्हर्सिटी म्यॅन्यूअल ऑफ स्टाईल The Chicago Manual of Style] (Chicago Style) या संस्थांनी तळटीपा देण्याची जी पद्धत स्वीकारली आहे, सामान्यतः तीच पद्धत तळटीपा देण्याकरिता वापरली जाते. तळटीपा देण्याचे एक सामान्य तंत्र आहे, तळटीपा देण्याचा क्रम ठरविलेला असतो. संदर्भ देतांना तळटीपांमध्ये सुरवातीला लेखकाचे नाव, संपादकांचे नाव, आद्याक्षरासह आडनाव, त्यानंतर स्वल्पविराम देऊन ग्रंथाचे शीर्षक, खंड क्रमांक, प्रकाशक व प्रकाशन वर्ष आणि शेवटी पृष्ट क्रमांक असा तळटीपा देण्याचा क्रम असतो. एखाद्या ग्रंथ प्रथम वापरत असल्यास ग्रंथाचे पूर्ण शीर्षक लिहावे, दुसऱ्यांदा त्याच ग्रंथाचा उल्लेख येत असेल तर ग्रंथाचे नाव संक्षेपामध्ये लिहावे. तळटीपा देण्यासाठी इंग्रजीमध्ये काही शब्द वापरले जातात. उदा. Ibid, Op Cit, Loc Cit इत्यादी. एखाद्या ग्रंथाचा संदर्भ दिल्या नंतर लगेच त्याच ग्रंथाचा संदर्भ पुन्हा येत असेल तर Ibid या शब्दाचा उपयोग केला जातो. मराठीमध्ये त्यासाठी 'कित्ता' हा शब्द लिहला जातो. संदर्भाचा पृष्ट क्रमांक वेगळा असल्यास पृष्ट क्रमांक लिहिला जातो. Op Cit म्हणजे "Opera Citato' या लॅटिन शब्दाचा अर्थ "In the work cited' असा होतो. एखाद्या संदर्भ ग्रंथाचा उल्लेख पूर्वी येऊन गेला असेल व त्याचा पुन्हा उल्लेख करायचा असेल व त्या दोहोंच्या मध्ये दोन - तीन तळटीपा आल्या असतील तर Op Cit असे लिहितात. Op Cit चा वापर करतांना ग्रंथाचे नाव न लिहता फक्त लेखकाचे नाव व पृष्ट क्रमांक असतात. त्याच ग्रंथाचा उल्लेख एक-दोन पृष्टापूर्वी आलेला असेल तेव्हा मात्र ग्रंथाचे नाव लिहिले जाते. Loc Cit चा वापर करताना केवळ ग्रंथाच्या लेखकाचे नाव लिहले जाते. Loc Cit चा वापर पूर्वी येऊन गेलेल्या संदर्भ ग्रंथ व पृष्ट क्रमांक लिहण्यासाठी केला जातो. या दोन्ही शब्दासाठी मराठी मध्ये 'उपरोक्त' व 'तत्रैव' या शब्दांचा वापर करतात. वरील तळटीपांचे तंत्र खालील उदाहरणावरून समजून येईल.

१) आर. जी. कॉलिंगवूड, आयडिया ऑफ हिस्ट्री, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, ऑक्सफोर्ड, १९४६, पृ. ११०.

२) कित्ता. पृ. ११५.

३) कित्ता. पृ. ११६.

४) ई. श्रीधरन, ए टेक्स्ट बुक ऑफ हिस्ट्रोग्राफी, ओरीएंटल ब्लॅक स्वान, न्यू दिल्ली, २००४, पृ. १२०.

५) सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्वज्ञान, प्राज्ञ प्रकाशन, वाई,१९६७, पृ. ५०.

६) आर. जी. कॉलिंगवूड, तत्रैव

सामान्यतः तळटीपा देण्याबद्दल निश्चित स्वरूपाचे नियम नाहीत. पण वरउल्लेखलेल्या MLA Style, APA Style आणि Chicago Style सारख्या पद्धती बहुतांशी स्वीकारल्या गेल्या आहेत. याच पद्धती

सर्वसाधारणपणे सर्वत्र वापरल्या जातात. यासंदर्भात लिखीत स्वरूपात नियम नाहीत. पण काही परंपरागत पद्धतीमुळे काही संकेत पाळले जातात व त्यानुसार तळटीपा दिल्या जातात. तळटीपांच्या संदर्भातील संकेत पुढील प्रमाणे -

१. छापील रेषेवरच तळटीपेच्या निदर्शनाचा आकडा लिहावा.

२. निदर्शनाचे आकडे उजव्या बाजूला लिहावेत.

३. ज्या ठिकाणी आकडा द्यावयाचा असेल तेथील शब्द व आकडा यामध्ये अंतर असू नये.

४. ज्यावेळी टंकलिखीत लेखन असते तेव्हा (१), (२), (३) असे आकडे लिहावेत.

५. तळटीपा प्रत्येक पानावर द्याव्यात व शक्य नसेल तर ग्रंथाच्या शेवटी प्रत्येक प्रकरणानुसार द्याव्यात.

६. प्रत्येक प्रकरणात एकपासून आकडे टाकावेत. प्रत्येक पानावर किंवा जास्तीत जास्त प्रत्येक प्रकरणाला एकपासून आकडे टाकल्यास जास्त सोईस्कर ठरते.

७. एखाद्या अवतरणाच्या शेवटी तळटीपेचा आकडा टाकावा. सुरुवातीला आकडा टाकू नये.

८. कोणत्याही शीर्षकाला कधीही तळटीप देवू नये.

९. ज्यावेळी एकापेक्षा जास्त संदर्भ एकाच वाक्यात दिलेले असतात. तेव्हा जेथे पहिला संदर्भ असेल तर त्या अक्षरावर किंवा शब्दावर लगेच आकडा लिहिला पाहिजे व नंतरच्या संदर्भावर पुढील आकडा लिहिला पाहिजे.

तळटीपा देत असताना सामान्यत: संशोधकाने काही नियम पाळावेत अशी अपेक्षा केली जाते. ते नियम पुढील प्रमाणे–

१. सुरुवातीला लेखकाचे नांव, नंतर ग्रंथाचे नांव, त्यानंतर प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशनाचे वर्ष व शेवटी ज्या पानावरून तो संदर्भ घेतला असेल त्या पानाचा आकडा द्यावा. उदा. सरकार जदूनाथ, फॉल ऑफ दि मुघल एम्पायर, ओरिएंट लॉगमन, कलकत्ता, १९५८, पान नं. १६३.

२. तळटीपेमध्ये खंडाचा क्रमांक देत असताना तो रोमन लिपीमध्ये म्हणजे I, II,..., IV, . IX अशा पद्धतीने द्यावा. खंडाचे नाव Italic मध्ये म्हणजेच तिरक्या अक्षरात द्यावे. पानाचा क्रमांक इंग्रजी अंकात द्यावा.

३. तळटीपेत लेखकाचे नांव देताना प्रथम आद्याक्षरे द्यावीत व त्यानंतर आडनाव द्यावे. उदा. गो. स. सरदेसाई, वि. का. राजवाडे इत्यादी.

४. एकवेळ एखाद्या संदर्भ साधनाची सविस्तर माहिती दिली असेल तर तीच माहिती पुन्हा सविस्तर देण्याची आवश्यकता नाही. तोच संदर्भ क्रमाने लगेच येत असेल तर फक्त 'कित्ता' असे लिहावे. जर पान क्रमांक वेगळा असेल तर तो नमूद करावा.

५. संशोधकाने जर अस्सल साधनाचा वापर केला असेल तर पुन्हा दुय्यम साधनाचा वापर करण्याची आवश्यकता नाही.

६. एकवेळ संदर्भासाठी वापरलेल्या ग्रंथाचा उल्लेख पुन्हा पुन्हा टाळण्यासाठी ज्याप्रमाणे 'कित्ता' या शब्दाचा वापर केला जातो. त्याप्रमाणेच 'उपरोक्त' या शब्दाचाही वापर केला जातो. क्रमाने लगेच संदर्भासाठी तोच ग्रंथ वापरावयाचा असेल तर लेखकाच्या नावाचा उल्लेख करावा व त्यानंतर 'उपरोक्त' हा शब्द वापरावा व त्यानंतर पण पृष्ट क्रमांक लिहावा.

७. तळटीपेमध्ये 'कित्ता' व 'उपरोक्त' या संक्षित रूपाचा वापर ज्या पद्धतीने केला जातो त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार अनेक संक्षिप्त रूपांचा वापर करावा लागतो.

**तळटीपांचे फायदे**

संशोधनाचे सादरीकरण करताना तळटीपा देण्याचे फायदे पुढीलप्रमाणे -

१. संशोधकीय ग्रंथात तसेच शोधप्रबंधात तळटीपा बहुतेक वेळा प्रत्येक पानावर दिली जाते. त्यामुळे वाचकाला सहजासहजी संदर्भ समजतो. वाचक व संशोधकाच्या ज्ञानात भर पडते.

२. प्रकरणाच्या शेवटी तळटीपा दिल्यास सामान्य वाचकास वाचन करणे सहज व सुलभ होते. त्याच्या वाचनात खंड पडत नाही व अडथळाही येत नाही. परिणामी वाचकास रसभंग न होता वाचन पूर्ण करता येते.

**तळटीपांच्या समस्या (मर्यादा)**

तळटीपा या संशोधकासाठी व त्या विषयातील तज्ञ व्यक्तीसाठी महत्त्वाच्या असतात. मात्र, सामान्य वाचकांच्या दृष्टीने अशा तळटीपाचा फारसा फायदा होत नाही. अत्याधिक प्रमाणात तळटीपा पाहून सामान्य वाचकाचे मन द्विधा होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्याच्या वाचनात खंड पडून रसभंग होऊ शकतो. त्याचबरोबर तळटीपा देताना संशोधकाकडून काही चुका होण्याची व त्यामुळे वाचकामध्ये गोंधळ होण्याची शक्यता असते. काही वेळा हस्तलिखित तयार होत असताना तळटीपा दिल्या जात नाही. तर हस्तलिखित तयार झाल्यानंतर तळटीपा दिल्या जातात. परिणामी, संशोधकाचे विधान व त्याची तळटीप यांच्यामध्ये समन्वय राहात नाही. सबब, लिखाण करताना कंटाळा न करता लगेच क्रमाने तळटीपा देणे आवश्यक आहे. शेवटी तळटीपा कशा वापरावयाच्या हे वापर करणाऱ्याच्या कौशल्यावर अवलंबून असते.

**★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- १**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) Ibid साठी मराठीत कोणता शब्द वापरतात ?

(२) 'उपरोक्त' किंवा 'तत्रैव' हे मराठी शब्द कोणत्या इंग्रजी शब्दासाठी वापरतात ?

(३) संशोधकाचे विधान व त्याची तळटीप यांच्यामध्ये समन्वय राहावा म्हणून काय करावे ?

(४) 'अंतसूची' म्हणजे काय?

(५) प्रकरणाच्या शेवटी तळटीपा दिल्यास कोणास वाचन करणे सहज व सुलभ होते ?

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) एखाद्या ग्रंथाचा संदर्भ दिल्या नंतर लगेच त्याच ग्रंथाचा संदर्भ पुन्हा येत असेल तर ............ या शब्दाचा उपयोग केला जातो.

(२) ............ कार्यात तळटीपा देणे अत्यंत आवशक आहे.

(३) तळटीपा देताना संशोधकाकडून चुका झाल्यास वाचकाचा ............ होण्याची शक्यता असते.

(४) संशोधकीय ग्रंथात तसेच ............ मध्ये तळटीपा बहुतेक वेळा प्रत्येक पानावर दिली जाते.

(५) अत्याधिक प्रमाणात ............ पाहून सामान्य वाचकाचे मन द्विधा होण्याची शक्यता असते.

**३.२.२ सूची आणि संदर्भ सूची** (Index Bibliography) :

**(अ) सूची** (Index)

इतिहासलेखन पद्धतीमध्ये महत्त्वाचा भाग म्हणजे सूची (Index) होय. इतिहासलेखनामध्ये सूचीचे फार महत्त्वाचे स्थान आहे. इतिहास संशोधनाला सूची जोडल्याशिवाय परिपूर्णता येत नाही. सूचीचा आधार संशोधनाचा दर्जा ठरवण्यासाठी घेतला जातो. संशोधकात सूचीचा वापर आरशासारखा होतो. सूची म्हणजे आपण ज्या विषयावर संशोधन करणार आहोत किंवा जे संशोधन पूर्ण झालेले आहे त्याचा आरसाच असतो. इतिहास संशोधन मुख्यतः ऐतिहासिक साधनांद्वारे केले जाते. ऐतिहासिक साधने खूप असतात. त्यामधून आपल्या संशोधन विषयाला अनुलक्षून माहिती गोळा करणे अतिशय जिकीरीचे काम असते व अशावेळी सूचीचे महत्त्व जाणवते. इतिहास संशोधनामध्ये सूचीचे (खपवशु) साधारणपणे तीन प्रकार वापरले जातात. उदा. (१) स्थळसूची (२) व्यक्ती/नाम सूची (३) ग्रंथसूची

**१. स्थळसूची** (Place Index) : इतिहास संशोधन प्रक्रियेमध्ये भूगोलाला अतिशय महत्त्व आहे. इतिहास संशोधनामध्ये ज्या परिसराचा इतिहास लिहावयाचा असतो तेथील भूगोल व भौगोलिक परिस्थिती यांचा अभ्यास संशोधकास असणे आवश्यक असते. राज्याच्या राजधान्यांची ठिकाणे, दळणवळणाचे मार्ग, लढायांच्या जागा वेगवेगळ्या वस्तू निर्माण होण्याची ठिकाणे इ. ची माहिती आवश्यक असते. अशा माहितीचा उपयोग संशोधक आपल्या सोयीप्रमाणे करतो. अशा सूचीमध्ये गावांची, शहरांची, ऐतिहासिक स्थळांची माहिती दिलेली असते. त्यावरून विविध प्रकारचे नकाशे बनवता येतात. अशा सूचीमध्ये वर्णानुक्रमे स्थळांची यादी व त्यांचे पृष्ठसंख्या दिलेली असते. त्यावरून ज्या ठिकाणाची आपल्याला माहिती गोळा करावयाची असते ती एकत्रितपणे मिळते. उदा. रायगड जिल्हा गॅझेटिअरमधून अलिबागचा उल्लेख २०, ३०,

४०, ५०, १०० इ. पानावर आढळतो. त्या ग्रंथात असणारी रायगडासंबंधी माहिती चटकन, एकत्रितपणे मिळू शकते. अशा सूचीमुळे वेळ, श्रम व पैसा यांची बचत होते व संशोधकाचा उत्साह टिकतो.

**२. व्यक्ती /नाम सूची** (Person / Name Index) : आपणास ज्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा अभ्यास करावयाचा आहे त्या व्यक्तीसंबंधी संबंधित ग्रंथामध्ये कोठे-कोठे उल्लेख आलेला आहे हे समजून घेण्यासाठी व्यक्ती सूचीचा उपयोग होतो. उदा. शहाजहानचे धार्मिक धोरण १०१ ते १०७ इ. पृष्ठावर शहाजहानच्या धार्मिक धोरणासंबंधी माहिती मिळू शकते. व्यक्तीसूचीला 'नाम सूची' (Name Index) या नांवाने देखील ओळखले जाते. अशी सूची तयार करत असताना व्यक्तीच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार तयार करावी. ज्या-ज्या पृष्ठांवर त्या व्यक्तीच्या नावाचा उल्लेख आलेला असतो अशा सर्वच पृष्ठ क्रमांकाचा उल्लेख करावा त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या कार्याची सर्व माहिती पटकन मिळते. उदा. छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी प्रशासन पृष्ठ क्रमांक ९०, १०५, १०७, १११ इ. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करी प्रशासनाची सर्व माहिती एकत्रितपणे संशोधकाला मिळते.

**३. ग्रंथसूची** (Book Index) : संशोधकांना ग्रंथ सूचीचा बहुमोल उपयोग होतो. संशोधनासाठी वापरलेल्या संदर्भ ग्रंथाची यादी म्हणजेच 'ग्रंथसूची' होय. संशोधकाला आवश्यक असणाऱ्या ग्रंथाची, ग्रंथ विषयाची व ग्रंथ लेखकाची समग्र माहिती मिळू शकते. डॉ. व्ही. डी. दिवेकर यांनी लिहिलेल्या 'Survey of Material in Marathi on the Economic and Social History of India (BISM), Pune, १९८१ या ग्रंथातून मराठ्यांच्या आर्थिक व सामाजिक इतिहासावर महाराष्ट्रात झालेले ग्रंथलेखन एकत्रितपणे मिळू शकते.

संशोधन करत असताना माहिती गोळा करताना वेळेची बचत व्हावी म्हणून स्थळसूची, व्यक्तीनाम सूची, ग्रंथसूची व यांच्या सारख्या इतर प्रकारच्या सुचींचा संशोधकाला खूप उपयोग होतो.

**(ब) संदर्भसूची** (Bibliography)

संदर्भ ग्रंथसूची किंवा संदर्भसूची किंवा यादी म्हणजे संशोधकाने कोणते ग्रंथ उपयोगात आणले आहेत याची एक यादी होय. यालाच इंग्रजी मध्ये 'Bibliography' असे म्हणतात. काही अभ्यासकांच्या मते एखाद्या संशोधन कार्याचे महत्व संशोधकांनी संशोधनाच्या शेवटी दिलेल्या संदर्भ ग्रंथावरून कळत असते. संदर्भ ग्रंथसूची ही संशोधकांनी संशोधन करीत असतांना वापरलेल्या पुस्तकांची यादी असते. संदर्भ ग्रंथांची यादी अतिशय काटेकोरपणे तयार करावी लागते. तळटीपांप्रमाणेच संदर्भ ग्रंथांची यादी देण्याची विशिष्ट पद्धत आहे. संदर्भ ग्रंथ सूची तयार करण्याचे विविध प्रकार आहेत. काही संशोधक संदर्भ सूचीमध्ये फक्त वाचलेल्या ग्रंथांचाच संदर्भ सूचीमध्ये समावेश करित असतात, तर काही संशोधक वाचलेल्या संदर्भ ग्रंथाबरोबरच न वाचलेल्या पण संशोधन विषयाशी सबंधित ग्रंथांचाही समावेश संदर्भ सूचीमध्ये करीत असतात. काही संशोधक संशोधन लेखन कार्यात वापरलेल्या ग्रंथांचाच संदर्भ सूचीमध्ये समावेश करिता असतात.

संदर्भ ग्रंथांची यादी तयार करीत असतांना मूळ साधने किंवा प्राथमिक साधनांचे अ) प्रकाशित ब) अप्रकाशित या दोन भागात वर्गीकरण केले जाते. त्याचप्रमाणे भाषिक आधारे देखील साधनांचे वर्गीकरण केले जाते. मुळ साधने प्रकाशित - मराठी, हिंदी, इंग्रजी याप्रमाणे, अप्रकाशित साधनांचे भाषेनुसार - मराठी, हिंदी, इंग्रजी याप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते. त्यानंतर दुय्यम साधनांचीही भाषेनुसार वर्गीकरण मराठी, हिंदी व इंग्रजी याप्रमाणे करता येते.

संदर्भग्रंथाची यादी तयार करणे हे एक तंत्र आहे. संशोधकाला जर काही शंका निर्माण झाल्या तर त्याचे निरसन करण्यासाठी कोणती संदर्भ साधने वापरणे आवश्यक आहे याचे मार्गदर्शन अशा संदर्भसूचीच्या माध्यमातून मिळते.

१. संदर्भग्रंथ यादीची वर्गवारी : ग्रंथाच्या प्रकारानुसार त्यांची वर्गवारी केली जाते.

१. महत्त्वाच्या व निवडक संदर्भग्रंथांची यादी

२. ज्यामध्ये सर्व ग्रंथांची नोंद केली आहे अशी यादी.

३. ज्यामध्ये सर्व ग्रंथाचा मागोवा घेतला आहे अशी यादी.

४. विषयाशी संबंधित अशा ग्रंथाची यादी

५. संशोधनासाठी प्रत्यक्षपणे वापरलेल्या ग्रंथाची यादी

या प्रकारांची वर्गवारी (१) सर्वसाधारण ग्रंथाची यादी (२) सटिक ग्रंथाची यादी या दोन प्रकारात करता येते.

**२. संदर्भसाधनांचे वर्गीकरण / विभागणी**

**(अ) प्राथमिक संदर्भसाधने**

१. प्रकाशित प्राथमिक संदर्भसाधने

२. अप्रकाशित प्राथमिक संदर्भसाधने

**(ब) दुय्यम संदर्भसाधने**

१. प्रकाशित दुय्यम संदर्भसाधने

२. अप्रकाशित दुय्यम संदर्भसाधने

संदर्भ साधने एकाच भाषेतील असतील तर प्रश्न नाही. परंतु, साधने जर वेगवेगळ्या भाषेतून उपलब्ध असतील तर प्रत्येक भाषेची स्वतंत्र यादी करणे आवश्यक असते. उदा. इंग्रजी, मराठी व संस्कृत साधने इ. बऱ्याच वेळेला संदर्भसाधने जी अलिखीत स्वरूपाची असतात तेव्हा अशा साधनांचीच वर्गवारी करावी लागते. काही वेळेला एखाद्या विषयावर वेगवेगळ्या नियतकालिकांमधून लेख आलेले असतात. तेव्हा अशा नियतकालिकांची विषयानुसार यादी करणे आवश्यक असते. तसेच काही सुटी कागदपत्रे वापरली असल्यास

त्यांचीही यादी स्वतंत्रपणे देणे आवश्यक असते.अशा प्रकारे जी वर्णानुक्रमे यादी तयार केली जाते तिला Dictionary Catalogue असे म्हणतात. त्याचबरोबर या यादीला संदर्भग्रंथसूची या नावानेही ओळखले जाते. संदर्भग्रंथाची ही यादी संशोधकांच्यामध्ये जिज्ञासा निर्माण व्हावी या विशिष्ट हेतूने तयार केली आहे तसेच या ग्रंथात ज्या संदर्भ साधनांचा वापर केलेला नाही अशांची ही यादी आहे.

**३. संदर्भग्रंथ यादी तयार करण्याचे तंत्र**

संदर्भग्रंथ यादी तयार करण्याची पुढील तंत्रे संशोधनाच्या सुरुवातीपासूनच लक्षात ठेवावी लागतात.

१. प्रथमतः लेखकाचे आडनाव, नंतर नाव जर लेखक हा अनुवादक (Tr.) असेल तर तेथे अनुवादक असे लिहावे. जर लेखक हा संपादक असेल तर (Ed.) असे स्पष्ट लिहावे.

२. पुस्तकाचे नाव लिहून स्वल्पविराम द्यावा.

३. त्याच्यापुढे आवृत्तीचा क्रमांक, खंड क्रमांक, प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशनाचे नाव व शेवटी प्रकाशनाची तारीख द्यावी मग पूर्णविराम द्यावा.

४. संशोधनासंबंधी वाचनाची सुरुवात केल्यापासून जे सर्व ग्रंथ वाचनात येतात त्यांनी सविस्तर व स्वतंत्र नोंद ठेवावी. म्हणजे संशोधन पूर्ण झाल्यानंतर संदर्भ ग्रंथाची यादी करताना सुलभता येते.

५. ज्यावेळी दोन लेखक असतात तेव्हा फक्त पहिल्या लेखकाचे आडनाव पहिल्यांदा लिहावे. परंतु दुसऱ्या लेखकाचे नाव जरी पहिल्यांदा लिहिले तरी चालते.

६. ज्यावेळी तीन लेखक एकत्र येतात तेव्हा पहिल्याचे आडनाव नंतर दुसऱ्याचे नाव आडनाव द्यावे. त्याच्यापुढे तिसऱ्याचे नांव व आडनांव द्यावे.

**४. संदर्भग्रंथाची यादी तयार करताना घ्यावयाची काळजी**

लेखकाचे नाव लिहितांना महाराष्ट्रीयांप्रमाणे संपूर्ण नाव लिहिण्याची पद्धत इतर प्रांतीयांची नसते. त्यामुळे गोंधळ उडतो. महाराष्ट्रीयन परंपरेनुसार स्वतःचे नाव, वडिलांचे व शेवटी आडनांव लिहिले जाते. परंतु इतर प्रांतातील परंपरा वेगळ्या असल्याचे जाणवते. त्यामुळे अडचणी येतात. दक्षिण भारतीय आपले आडनांव लिहित नाहीत तर सुरुवातीला गावाचे नांव, नंतर आजोबांचे नाव, नंतर वडिलांचे नाव व मग स्वतःचे नाव लिहितात. अशावेळी गावाच्या नावाचा वापर आडनावा प्रमाणे करतात. उदा. E.A.S. Prasanna (इरापल्ली अनंत श्रीनिवास प्रसन्ना) या नावामध्ये इरापल्ली हे गावाचे नाव आहे. अनंत हे आजोबाचे नाव आहे. श्रीनिवास हे वडिलांचे तर प्रसन्ना स्वतःचे नाव आहे. या नावाचा यादीमध्ये समावेश करताना विशेष दक्षता घ्यावी लागते.

काही ठिकाणी प्रकाशनाचे ठिकाण व वर्ष लिहिण्याची पद्धती असते तर काही ठिकाणी प्रकाशकाचे नाव लिहिण्याची पद्धत आहे. संशोधकाचे संशोधन जेव्हा पूर्ण होते तेव्हाच त्याची संदर्भग्रंथाची यादी सुद्धा तयार होते.

संदर्भ ग्रंथ सूची तयार करीत असतांना लेखकाच्या आडनावाचा वर्णक्रम लक्ष्यात घेऊन संदर्भ ग्रंथसूची तयार करावी. यात लेखकाचे आडनाव प्रथम, त्यानंतर नावाची सुरवातीची अक्षरे, ग्रंथाचे शीर्षक, ग्रंथाचा खंड क्रमांक, आवृत्ती, प्रकाशक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष या प्रमाणे संदर्भ ग्रंथ सूची तयार करावी, त्यानंतर संदर्भ ग्रंथ सूचीमध्ये वृत्तपत्र, नियतकालिके व मुलाखतींचा समावेश असतो. संदर्भ ग्रंथसूची मध्ये येणारी नावे साधारणपणे पुढील प्रमाणे येतात.

१) कुलकर्णी अ.रा., मराठ्यांचे इतिहासकार (इतिहास लेखन पद्धती), डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७.

२) कोठेकर शांता., इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.

३) सरदेसाई बी.एन., इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न– २**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) व्यक्तीसूचीला आणखी कोणत्या नावाने ओळखले जाते ?

(२) संदर्भ ग्रंथांची यादी तयार करीत असतांना मूळ साधने किंवा प्राथमिक साधनांचे कोणत्या दोन प्रकारात वर्गीकरण केले जात ?

(३) अनेक भाषांमधील साधने वापरली असल्यास त्यांची यादी कशी करावी ?

(४) संदर्भ ग्रंथसूचीला इंग्रजीमध्ये काय म्हणतात ?

(५) कोणत्या सूचीमध्ये गावांची, शहरांची नावे ही पृष्ठ क्रमांकासह दिली असतात ?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) संशोधकास सूचीचा वापर ............... सारखा होतो.

(२) संशोधनासाठी वापरलेल्या संदर्भग्रंथाची यादी म्हणजेच ............... होय.

(३) संदर्भग्रंथ यादी तयार करण्याची तंत्रे संशोधनाच्या ............... पासूनच लक्षात ठेवावी लागतात.

(४) व्यक्तीसंबंधी ग्रंथामध्ये कोठे-कोठे उल्लेख आलेला आहे हे समजून घेण्यासाठी ...............चा उपयोग होतो.

(५) संदर्भ ग्रंथ सूची तयार करीत असतांना लेखकाच्या ............... चा वर्णक्रम लक्ष्यात घेऊन संदर्भ ग्रंथसूची तयार करावी.

### ३.२.३ टिपण बनवणे आणि संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर (Note Making and Bibliographic Software)

**(अ) टिपण बनवणे** (Note Making) : प्रत्येक संशोधन प्रक्रियेच्या काही तांत्रिक बाबी असतात. या तांत्रिक बाबींचा नीट उपयोग केल्यास संशोधन सुकर होते. संशोधन करताना संशोधक मोठ्या संख्येने विभिन्न प्राथमिक साधने, दुय्यम साधने आणि विविध संदर्भग्रंथ अभ्यासत असतो. या सर्व साधनांतून मिळालेला तपशील, मजकूर, मुद्दे इत्यादी सगळीच्या सगळी लक्ष्यात ठेवणे अशक्य बाब आहे. साधने अभ्यासत असताना काही मुद्दे त्यावेळी महत्त्वाचे वाटत नाहीत, तरी देखील पुढे ते उपयोगी ठरण्याची शक्यता असते. त्याचबरोबर संकलित केलेली माहिती संदर्भ म्हणून देताना पुरावा म्हणून जवळ असणे आवश्यक असते. संशोधकाजवळ सुव्यवस्थित रुपात बनवलेली टिपणे असल्यास अवतरणे देताना, तळटीप देताना आणि संदर्भ सूची तयार करताना ती अत्यंत उपयोगी ठरतात. टिपण बनवण्याच्या तंत्राचा सुयोग्य आणि सुव्यस्थित पद्धतीने वापर केल्यास संशोधकाच्या स्मरणशक्तीवर ताण येत नाही.

**(i) टिपण बनवताना पाळावयाची पथ्ये :** एकाचा विषयाशी संबंधित विभिन्न पैलूंवर दीर्घकालीन संशोधनासाठी उपयोगी ठरणारी टिपणे बनवताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक असते. प्राथमिक साधन असल्यास त्याची पुराभिलेखागारातील नोंदीचे तपशील व्यवस्थित टिपणावर नोंदवाव्यात. संदर्भ ग्रंथांचे शीर्षक, लेखकाचे नाव, प्रकाशक, प्रकाशन वर्ष, अनेक खंडीय ग्रंथ असल्यास खंडाचा क्रमांक, अनेक आवृत्या असतील तर उपयोगात आणलेल्या आवृत्तीची नोंद इत्यादींचा तपशील ठेवणे आवश्यक आहे. मजकुर ज्या पृष्ठावरून घेतला आहे त्याचा पृष्ठक्रमांक देखील नोंदवणे गरजेचे असते. टिपण हे मुद्देसूद आणि विषयानुसार केले असावे. एखाद्या संदर्भ ग्रंथातील विधान योग्य वाटल्यास अवतरण देण्यासाठी कोणताही बदल न करता जसाच्या तसा उतरवून घ्यावा. योग्य पद्धतीने काळजीपूर्वक बनवलेली टिपणे ही संशोधकाला अत्यंत उपयुक्त ठरतात.

**(ii) टिपण बनवण्याच्या पद्धती** : वहीवर अथवा रजिस्टरवर टिपण, विषयानुसार अथवा प्रकरणानुसार टिपण, सुट्या कागदावर टिपण आणि कार्डवर टिपण अशी टिपण बनवण्याच्या चार पद्धती आहेत. या प्रत्येक पद्धतीच्या काही सोयी आहेत तशाच त्यांच्या काही गैरसोयी देखील आहेत. पद्धत कोणतीही असो ती संशोधकाला सोयीस्कर वाटणारी असायला हवी. त्यामुळे संशोधकाने त्याला उपयुक्त आणि सोयीची वाटेल तीच टिपण बनवण्याची पद्धत उपयोगात आणावी.

**(१) वह्यांतून संदर्भ ग्रंथांचे टिपण :** या पद्धतीत प्रत्येक संदर्भ ग्रंथासाठी प्रत्येकी एक वही अथवा रजिस्टर वापरून त्यात टिपण बनवले जाते. काही संशोधकांना, विशेषत: नवख्या संशोधकांना ज्यांना संक्षिप्त स्वरुपात माहिती नोंदवण्याचे तंत्र माहित नसते त्यांना ही पद्धत उपयुक्त असते. काही संशोधकांना संदर्भ ग्रंथ वाचताना मोठ्याप्रमाणात माहिती नोंदवावी असे वाटते. काही वेळा माहिती इतकी प्रभावी आणि समर्पक असते की त्याची विस्तृत नोंद घ्यावी असे वाटते, त्यावेळी देखील ही पद्धत उपयुक्त ठरते.

प्रत्येक संदर्भ ग्रंथासाठी एक वहीवर अथवा रजिस्टरवर टिपण घेतल्यास अनेक टिपणाच्या अनेक वह्या तयार होतात. इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या वह्यांतून नेमका संदर्भ शोधून काढणे हे जिकीरीचे काम बनते. नेमके संदर्भ कोणत्या वहीत आणि त्या वहीत नेमके कोठे आहेत ही बाब संशोधकाला स्मरणात ठेवावी लागते, त्यामुळे त्याच्या स्मरणशक्तीवर ताण पडतो. या पद्धतीच्या वापरात वेळेचा अपव्यय होण्याची शक्यता असते.

**(२) उपविषयानुसार अथवा प्रकरणानुसार टिपण :** या पद्धतीत संशोधक एका संदर्भ ग्रंथाची एका वहीत टिपणे न काढता त्याच्या मुख्य संशोधन विषयाच्या उपविषयानुसार अथवा प्रकरणानुसार एका वहीत टिपणे काढतो. एका उपविषयावर, एका प्रकरणावर अथवा एका घटकावर टिपण लिहिल्यामुळे संशोधनाचे संबंधित प्रकरण लिहिताना आवश्यक ती माहिती एकत्र प्राप्त होते. त्यामुळे संशोधकाच्या स्मरणशक्तीवर ताण येत नाही.

प्रकरणानुरूप टिपण घेतल्यामुळे ही पद्धत सोयीची वाटली तरी या पद्धतीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात माहिती संकलित होते. त्यामुळे आवश्यक माहिती अथवा संदर्भ शोधून काढणे अवघड बनते. एकच माहिती दोन किंवा जास्त प्रकरणात अथवा उपविषयात वापरायची असल्यास ही पद्धत गैरसोईची ठरते.

**(३) सुट्या कागदावर टिपण:** टिपण बनवायची तिसरी पद्धत म्हणजे सुट्या कागदावर टिपण काढणे. या पद्धतीत संशोधक वहीवर टिपण काढण्या ऐवजी सुट्या कागदांवर टिपणे घेतो आणि आपल्या सोईनुसार त्यांची विभागणी करतो आणि गरजेनुसार क्रम लावून त्यांच्या फाइल्स बनवतो. या पद्धतीमुळे वर उल्लेखलेल्या दोन्ही पद्धतीचे लाभ मिळतात, म्हणजे जास्त तपशील असलेले टिपण तयार करता येते आणि गरज पडल्यास त्याची प्रकरणानुसार अथवा सोयीनुसार जुळवाजुळव करता येते.

मात्र, सुट्या कागदावर टिपण घेण्याच्या पद्धतीत देखील संपूर्ण कागद वाचवा लागतो. त्यातील नेमके संदर्भ सहज सापडत नाहीत. संशोधनाच्या दिशेमध्ये, संशोधनाच्या क्रमामध्ये किंवा संशोधनाच्या टप्प्यांमध्ये बदल होऊ शकतो त्यामुळे या कागदांची पुन्हा पुन्हा जुळवाजुळव करणे अवघड होते.

**(४) कार्डवरील टिपण :** वरील सर्व पद्धतींपेक्षा कार्डवर टिपण काढण्याची सर्वात सोयीची ठरते. ही पद्धत कमी त्रासाची, कमी खर्चिक, कमी वेळ घेणारी आहे. कार्ड पद्धतीचे दोन फायदे आहेत. कार्ड पद्धतीचा पहिला फायदा म्हणजे एकाच छोट्या कार्डवर वापरायची सर्व महिती एकत्र आणि संक्षिप्त स्वरूपात मिळते. कार्ड पद्धतीचा दुसरा फायदा म्हणजे कार्डची पुन्हा पुन्हा जुळवाजुळव तुलनेने सोपी आणि सोयीची ठरते. एकदा कार्ड तयार झाले आणि गरजेनुसार यांचा जुळणी झाली आणि संशोधन कच्चा आराखडा तयार असल्यास संशोधनाचे काम वेगाने करता येते. संक्षिप्त टिपणांमुळे तळटीपा आणि संदर्भ ग्रंथसूची बनवण्याचे काम सोपे होते.

कार्ड पद्धतीसाठी वापरायचे संशोधनाचे काम के बरीच वर्षे चालत असल्यामुळे साधारणपणे पोस्टकार्डच्या आकाराचे थोडे जाड कार्ड वापरणे सोयीस्कर असते. साधारण कागदपेक्षा जाड असलेले कार्ड जास्त काळ टिकते. कार्डवर कोणताही क्रमांक न घालता शक्यतो एकाच बाजूवर टिपण लिहावे. एका

कार्डवर एकच मुद्दा घेतल्यास कार्डची जुळवाजुळव करणे सोपे जाते. संदर्भ देण्यासाठीच्या आवश्यक नोंदी उदा. संदर्भ ग्रंथाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशक, प्रकाशन वर्ष, पृष्ठ क्रमांक इत्यादी हे कार्डवर ठराविक जागेवर नोंदवावेत. कार्डच्या वरच्या भागात मध्यावर त्याविषयाची अथवा मुद्द्याची माहिती लिहावी की ज्यामुळे कार्डची जुळवाजुळव करणे सोपे होईल. ग्रंथातील आवश्यक वाटणारी वाक्ये ही कार्डच्या मागील बाजूला टिपून घेता येतात. दीर्घकाळ टिकणारी आणि सोयीस्कर असलेली कार्ड पद्धत संशोधकांत जास्त प्रमाणात प्रचलित आहे.

**(iii) टिपणचे वर्गीकरण :** टिपणे काढून झाल्यानंतरचा टप्पा हा टिपणांच्या वर्गीकरणाचा असतो. टिपणाच्या वर्गीकरण हे कालक्रमानुसार, विषयानुसार, स्थळानुसार आणि संदर्भ ग्रंथ लेखकाच्या आद्याक्षरानुसार अशा चार पद्धतींनुसार केले जाते.

टिपण बनवण्याचे तंत्र संशोधकाने व्यवस्थितपणे आत्मसात केल्यास संशोधकाचे काम सोपे होते.

**(ब) संदर्भ सूचीचे सॉफ्टवेअर** (Bibliographic Software) :

इतिहास संशोधनात संदर्भाचे जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व संदर्भ सूचीला आहे. संशोधकाने कोणते संदर्भ ग्रंथ अभ्यासले किंवा वापरले आहेत ? कोणत्या लेखकाचे कोणते ग्रंथ अभ्यासले आहेत ? कोणता ग्रंथ केंव्हा आणि कोणी प्रकाशित केला ? ग्रंथाची कितवी आवृत्ती वापरली आहे ? कोणत्या मासिकातील किंवा संशोधन पत्रिकेतील लेख आहे ? अशा अनेक प्रकारच्या प्रश्नाची उत्तरे संदर्भ सूची पहिल्यानंतर मिळतात. संदर्भ ग्रंथसूची ही संशोधकीय लेखाच्या अथवा ग्रंथाच्या शेवटी दिली जाते. लेखकाच्या आडनावाच्या आद्याक्षरांच्या क्रमानुसार ग्रंथांची सूची दिली जाते.

संदर्भ ग्रंथसूची देण्याचे विविध पद्धती आहेत. वेगवेगळ्या प्रकाशकांना, संशोधन पत्रिकांना वेगवेगळ्या प्रकारे संदर्भ ग्रंथसूची हवी असते. संशोधकाला पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या प्रकारची संदर्भ ग्रंथसूची बनवणे अवघड आणि वेळखाऊ काम वाटते. मुळात एखाद्या संशोधनाची सुव्यवस्थित संदर्भ ग्रंथसूची बनवणे हे अत्यंत कष्टाचे, काळजीपूर्वक करण्याचे आणि वेळखाऊ काम असते. ग्रंथ प्रकाशन विश्वात वाढ झाली आहे, त्याच प्रमाणे इंटरनेटमुळे देखील माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यामुळे सर्व संदर्भ सुव्यवस्थित पणे जुळवणे आणि त्यांची संदर्भ ग्रंथसूची बनवणे हे कठीण होत आहे.

सध्याच्या या बदलणाऱ्या परिस्थितीत तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संशोधकाच्या मदतीला संदर्भ सूचीसाठीचे सॉफ्टवेअर आले आहे. बिब्ल्योग्राफिकल सॉफ्टवेअर म्हणून ओळखली जाणारी ही सॉफ्टवेअर संदर्भ ग्रंथसूची बनवण्यासोबतच संशोधकाला आणखी बरीच मदत करतात. संदर्भ सूची सॉफ्टवेअरचे तीन मुख्य उपयोग पुढील प्रमाणे आहेत.

(१) हे सॉफ्टवेअर संशोधकाला त्याच्या संदर्भांची व्यवस्थितपणे जुळवणी करण्यास मदत करते. विषयवार, विभागवार संदर्भांची जुळवणी करणे आणि संदर्भांना शोधणे सोपे होते.

(२) हे सॉफ्टवेअर संशोधकांसाठी संदर्भ ग्रंथसूची आणि तळटीपा बनवते.त्यामुळे वेगवेगळ्या पद्धतीने संदर्भ ग्रंथसूची अथवा तळटीपा द्यायच्या असल्या तरी या सॉफ्टवेअरच्या मदतीने त्या तत्काळ देता येतात.

(३) हे सॉफ्टवेअर संशोधकाला त्यांच्या जवळ माहितीचा साठवण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. संशोधकाला त्या माहितीच्या साठ्यात स्वत:ची माहिती साठवता येते. त्यामुळे संशोधकाला इंटरनेटद्वारे जगात कोठेही असताना त्याचे संदर्भ वापरता येतात.

Endnote and EndNoteWeb, Mendeley, RefWorks, Zotero ही काही प्रचलित संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर (Bibliographic Software) आहेत.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) ज्या संशोधकांना संक्षिप्त स्वरुपात माहिती नोंदवण्याचे तंत्र माहित नसते त्यांना कोणती पद्धत उपयुक्त असते ?

(२) कोणती पद्धत संशोधकांत जास्त प्रमाणात प्रचलित आहे ?

(३) कार्ड पद्धतीत जाड कागद का वापरतात?

(४) कशामुळे माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे ?

(५) Mendeley आणि RefWorks ही काय आहेत ?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) योग्य पद्धतीने काळजीपूर्वक बनवलेली ................ ही संशोधकाला अत्यंत उपयुक्त ठरतात.

(२) संक्षिप्त टिपणांमुळे तळटीपा आणि ................ बनवण्याचे काम सोपे होते.

(३) ................ तंत्र संशोधकाने व्यवस्थितपणे आत्मसात केल्यास संशोधकाचे काम सोपे होते.

(४) ................च्या प्रगतीमुळे संशोधकाच्या मदतीला संदर्भ ग्रंथसूचीसाठीचे सॉफ्टवेअर आले आहे.

(५) संदर्भ सूचीचे सॉफ्टवेअर संशोधकांसाठी संदर्भ ग्रंथसूची आणि ................ बनवते.

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**संदर्भ :** माहितीचा स्रोत

**तळटीप :** संशोधनातील एखाद्या संदर्भाची त्याच पृष्ठावर खालच्या बाजूस दिलेली माहिती

**अंतसूची :** संशोधनातील एखाद्या संदर्भाची प्रकरणाच्या शेवटी दिलेली माहिती

**सूची :** यादी

**स्थळसूची :** संशोधनात आलेल्या गावांचे, शहरांच्या उल्लेखांची पृष्ठ क्रमांकासह यादी

**व्यक्ती/नामसूची :** संशोधनात आलेल्या व्यक्तींच्या उल्लेखांची पृष्ठ क्रमांकासह यादी

**संदर्भ ग्रंथसूची :** संशोधनात वापरलेल्या ग्रंथांची यादी

**टिपण :** संशोधनासाठी उपयुक्त महत्त्वपूर्ण नोंदी

**शोधप्रबंध :** संशोधन पदवीसाठी सादर केलेले संशोधन

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- १

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) कित्ता

(२) Op Cit d Loc Cit

(३) लिखाण करतानाच तळटीप द्यावी.

(४) तळटीपा पृष्ठाच्या खाली न देता प्रकरणाच्या शेवटी सलगपणे देण्याची पद्धत

(५) सामान्य वाचकास

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) Ibid (२) संशोधन (३) गोंधळ (४) शोधप्रबंध

(५) तळटीपा

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- २

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) नाम सूची (२) प्रकाशित व अप्रकाशित (३) प्रत्येक भाषेनुसार

(४) Bibliography (५) स्थळ सूची

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) आरश्या (२) संदर्भ ग्रंथसूची (३) सुरवाती

(४) व्यक्ती / नाम सूची (५) आडनावाचा

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) वह्यांतून संदर्भ ग्रंथांचे टिपण पद्धत (२) कार्ड पद्धत

(३) जास्त काळ टिकतो म्हणून (४) इंटरनेटमुळे

(५) संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) टिपणे (२) संदर्भ ग्रंथसूची (३) टिपण बनवण्याचे

(४) तंत्रज्ञाना (५) तळटीपा

## ३.५ सारांश

ऐतिहासिक संशोधनाचे सादरीकरण करत असताना काही तंत्रे ही संशोधकाने आत्मसात करणे आवश्यक आहेत. तळटीपा देणे, सूची तयार करणे, संदर्भ ग्रंथसूची बनविणे, टिपणे काढणे व संदर्भ ग्रंथसूचीसाठीचे सॉफ्टवेअर वापरणे ही तांत्रिक कौश्यल्ये संशोधकाच्या संशोधनासाठी विश्वसनीयता व संशोधन कार्यात सुलभता आणण्यासाठी उपयुक्त ठरतात.

ऐतिहासिक संशोधनामध्ये तळटीपा व संदर्भ ग्रंथसूची यांना विशेष महत्व आहे. तळटीपा या अतिशय महत्त्वाच्या आहेत कारण कोणतेही संशोधन तळटीपांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. संशोधक व वाचक या दोघांनाही तळटीपांचा फायदा होत असतो. तळटीपा संशोधकाला संशोधनाच्या संदर्भात नवीन माहिती मिळविण्याकरिता मार्गदर्शक म्हणून काम करतात. संशोधकांनी तळटीपांच्या माध्यमातून संदर्भ साधनांचा पुरावा दिल्यामुळे तो पुरावा इतर संशोधकांना तपासून पाहता येतो. संशोधकांनी ऐतिहासिक पुराव्यांचे संदर्भ स्पष्टपणे नोंद केल्याशिवाय संशोधनात्मक लिखाणाला विश्वसनियता प्राप्त होत नाही. संशोधनाला विश्वसनियता प्राप्त करून देण्याचे कार्य तळटीपा करीत असतात. ग्रंथसूची ही संशोधकांनी संशोधन करीत असतांना वापरलेल्या पुस्तकांची यादी असते. ग्रंथ सूचीमध्ये गुणवत्ता पूर्ण प्राथमिक व दुय्यम ग्रंथांचा समावेश केला पाहिजे. संदर्भ ग्रंथ आणि तळटीपांशिवाय संशोधन कार्याशी सबंधित इतर महत्वाची माहिती असते, त्यांचा समावेश परीशिष्टामध्ये केला पाहिजे. एकंदरीत तळटीपा व ग्रंथ सुचीवरून संशोधन कार्याची गुणवत्ता लक्ष्यात येते.

संशोधनाचे सादरीकरण करताना विभिन्न प्रकारच्या सूची देखील महत्त्वाच्या ठरतात. वाचकाला किंवा इतर संशोधकाला ग्रंथातील अथवा शोधप्रबंधातील हवी असलेली माहिती तत्काळ मिळवण्यासाठी सुचींचा उपयोग होतो. स्थळसूची, व्यक्ती/नाम सूची, ग्रंथ सूची इत्यादी सूची संशोधनाच्या सादरीकरणाला नेटके पणा आणून इतर संशोधकांसाठी ग्रंथाची उपयुक्तता वाढवतात.

संदर्भ ग्रंथसूची ही संशोधनाच्या सादरीकरणामध्ये अत्यंत महत्त्वाची बाब आहे. संशोधकीय लेखापासून शोधप्रबंधापर्यंतच्या विविध प्रकारच्या सादरीकरणामध्ये संदर्भ ग्रंथसूची ही संशोधनाची विश्वासहार्यता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरते.

टिपण काढण्याची पद्धत ही संशोधकाला त्याचे संदर्भ साहित्याची जुळवाजुळव करताना उपयोगी पडणारी पद्धत आहे. योग्य पद्धतीने टिपण घेतल्यास संशोधकाचे वायफळ खर्च होणारा वेळ मोठ्या प्रमाणात वाचतो. संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर देखील संशोधकास त्याची संदर्भ ग्रंथसूची आणि तळटीपा बनवण्यात अत्यंत उपयोगी ठरते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

(१) संशोधनाच्या सादरीकरणासाठी उपयुक्त तळटीपा देण्याच्या तंत्राची सविस्तर चर्चा करा.

(२) तळटीपा आणि संदर्भग्रंथ सूची यांचे संशोधनाच्या सादरीकरणातील महत्त्व स्पष्ट करा.

(३) संदर्भ ग्रंथसूची तयार करण्याच्या पद्धतीची माहिती लिहा.

(४) सूची व संदर्भ ग्रंथसूची यांचे महत्त्व स्पष्ट करा.

(५) टिपण बनवायच्या विविध पद्धतींच्या गुणदोषांची चर्चा करा.

ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

(१) तळटिपांचे फायदे व तोटे

(२) तळटीपा देण्याची पद्धत

(३) सूची व तिचे प्रकार

(४) टिपणाचे प्रकार

(५) संदर्भसूचीचे सॉफ्टवेअर

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


Shaikh Ali, B, 'History : its Theory and Method', Manohar Publication, Delhi, 1979

कोठेकर शांता, 'इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २०११

सरदेसाई, बी., एन., 'इतिहासलेखनपद्धती', फडके प्रकाशन, कोल्हापूर २००४

गायकवाड आर. डी., सरदेसाई बी.एन., हनमाने व्ही. एन., 'इतिहासलेखनशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६


❑❑❑

## घटक ४

# इतिहासलेखन परंपरा

(Traditions of History Writing)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ युरोपियन इतिहासलेखन परंपरा : प्रत्यक्षार्थवादी, ॲनाल्स, तळाकडून इतिहास

४.२.२ भारतीय इतिहासलेखन परंपरा भाग १ : वासाहतिक, मार्क्सवादी, राष्ट्रवादी

४.२.३ भारतीय इतिहासलेखन परंपरा भाग २ : अब्राम्हणी इतिहासलेखन, स्त्रीवादी, सबल्टर्न

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- आधुनिक काळातील इतिहासलेखन परंपरांची माहिती होईल.
- युरोपियन इतिहासलेखनातील विविध प्रवाहांची ओळख होईल.
- भारतातील इतिहास लेखन परंपरा समजून घेता येतील.
- भारतीय इतिहास लेखन परंपरेतील विविध प्रवाह ज्ञात होतील.
- इतिहासलेखनातील मुलभूत बदलांचे आकलन होईल.

## ४.१ प्रास्ताविक :

विद्यार्थी मित्रांनो, मागील तीन घटकांमध्ये आपण इतिहास संशोधनाशी संबंधीत तंत्रे (Methods) जाणून घेतली. प्रस्तुत घटकामध्ये आपण इतिहासलेखन परंपरांची (Traditions of History Writings) माहिती घेणार आहोत. मानवी समाजात इतिहासलेखनाचा आरंभ झाल्यापासून जगाच्या विविध भागात विविध काळात वेगवेगळ्या प्रकारे भूतकाळातील घटना, घटनाक्रम यांची मांडणी करणाऱ्या इतिहासलेखन परंपरा अस्तित्वात आल्या. इतिहासलेखन परंपरा म्हणजे इतिहास संशोधनाची तंत्रे वापरून विशिष्ट प्रकारे इतिहासाची मांडणी करण्याची, अर्थान्वय लावण्याची, विश्लेषण करण्याची परंपरा होय. विभिन्न ऐतिहासिक काळ, विभिन्न प्रदेश, विभिन्न वैचारिक मतप्रवाह यांच्या वैविध्यातून विविध प्रकारच्या इतिहासलेखन परंपरा अस्तित्वात आल्या. काळानुरूप ज्ञानाच्या संकल्पना आणि ज्ञान मिळवण्याच्या पद्धती यातील बदलांचा परिणाम इतिहासलेखनावर झाला. इतिहास म्हणजे काय? ऐतिहासिक ज्ञान म्हणजे काय? इतिहास कसा लिहावा ? इतिहास कोणाचा लिहावा? अशा प्रश्नाच्या अनुषंगाने इतिहासलेखन परंपरेत बदल होत गेले. जगातील प्राचीन संस्कृतीमध्ये जसे की, युरोपातील ग्रीक व रोमन संस्कृती, आशियातील भारतीय व चिनी संस्कृती यांच्यामधील आधुनिकपूर्व इतिहास लेखनपरंपरा प्रसिद्ध आहेत. मध्ययुगीन काळातदेखील अनेक प्रकारच्या इतिहासलेखन परंपरा अस्तित्वात होत्या. याकाळात युरोपात चर्चशी संबंधित इतिहासलेखन परंपरा किंवा ख्रिश्चन इतिहासलेखन परंपरा तर आशियात फारसी इतिहासलेखन परंपरा प्रभावी होत्या. युरोपामध्ये प्रबोधनकाळात घडून आलेल्या वैचारिक क्रांतीचा इतिहासलेखनावर मोठ्या परिणाम झाला. शास्त्रीय पद्धतींचा उदय झाल्यामुळे, ज्ञानाच्या आणि ज्ञानप्राप्तीच्या संकल्पनांमध्ये क्रांतिकारी बदल झाले. प्रबोधन काळातील या बदलांचे परिणाम भूतकाळाच्या अभ्यासावर म्हणजेच इतिहास लेखनावर देखील झाले आणि त्यातून आधुनिक पद्धतीच्या इतिहास लेखन परंपरेची सुरुवात सर्वप्रथम युरोपात झाली. आधुनिक इतिहास लेखनाचा प्रसार युरोपातून जगातील इतर राष्ट्रात झाला आणि तेथे देखील आपणास विविध प्रकारच्या आधुनिक इतिहासलेखन परंपरांचा उदय झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत घटकामध्ये आपण युरोपातील प्रत्यक्षार्थवादी परंपरा, ॲनाल्स परंपरा, तळाकडून इतिहासलेखन परंपरा इत्यादी आधुनिक इतिहासलेखन परंपरांची माहिती घेणार आहोत. युरोपमध्ये आधुनिक इतिहासलेखन परंपरांचा विकास झाल्यानंतर भारतामध्ये वासाहतिक, मार्क्सवादी, राष्ट्रवादी या इतिहासलेखन परंपरांचा निर्माण झाल्या. तसेच इतिहासलेखनातील बदलांबरोबर भारतात अब्राम्हणी, स्त्रीवादी, सबल्टर्न अशा इतिहासलेखन परंपरा देखील अस्तित्वात आल्या. प्रस्तुत घटकामध्ये आपण या विविध इतिहासलेखन परंपरांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ युरोपियन: प्रत्यक्षार्थवादी, ॲनाल्स, तळाकडून इतिहास (European: Positivist, Annals, History from below )

**(अ) प्रत्यक्षार्थवादी इतिहासलेखन परंपरा** (Positivist Tradition)

१९ व्या शतकामध्ये इतिहासामध्ये अस्तित्वात आलेला एक वैचारिक तत्वज्ञानात्मक विचार म्हणजे 'प्रत्यक्षार्थवाद' (Positivism) होय. Positive म्हणजे 'प्रत्यक्षार्थवाद' या तत्त्वज्ञानाचा वास्तव अर्थ म्हणजे प्रवाह मूलभूत वैज्ञानिक संशोधन पद्धतीप्रमाणेच ऐतिहासिक ज्ञानाची मांडणी करणे. एकंदरीतच प्रत्यक्षार्थवाद म्हणजे ऐतिहासिक ज्ञानाची वैज्ञानिक बांधणी होय. १८ व्या शतकामध्ये अस्तित्वात आलेल्या वैज्ञानिक क्रांतीमुळे इतिहासाच्या अध्ययनाला, संशोधनाला निबुर, रॅन्को या सारख्या अनेक इतिहासकार व संशोधकांनी वैज्ञानिक चिकित्सेची जोड दिली. याचाच परिणाम म्हणजे ऐतिहासिक माहिती व ज्ञानाचे परिशिलन संशोधन शास्त्रीय किंवा वैज्ञानिक पद्धतीने करण्याच्या वैज्ञानिक पद्धतीला प्रत्यक्षार्थवादी असे म्हटले जाते.

**प्रत्यक्षार्थवाद म्हणजे काय? :** प्रत्यक्षार्थवाद हा शब्दप्रयोग दोन अर्थांनी वापरला जातो. एका अर्थाने मनाची एक प्रवृत्ती (Temper of Mind) असा अर्थ आहे तर याचा दुसरा अर्थ म्हणजे तत्त्वज्ञानाची एक विशिष्ट प्रणाली म्हणजेच प्रत्यक्षवाद होय, प्रत्यत्रार्थवाद हा मुलतः एक व्यवहारप्रधान दृष्टीकोन असून हा दृष्टिकोण प्रत्येक घटनेकडे (Incident) वा घटकाकडे नेहमी शंकेने पाहतो. एखाद्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करून तो प्रश्न शास्त्रीय दृष्टिकोनातून सोडवण्याची पद्धत म्हणजे प्रत्यत्रार्थवाद होय. ऐतिहासिक ज्ञानाला वैज्ञानिक आधार देण्याच्या पद्धतीला प्रत्यक्षार्थवाद असे म्हटले जाते. इतिहासाच्या ज्ञानाचे वैज्ञानिक ज्ञानात रूपांतरण करण्याच्या पद्धतीला प्रत्यक्षार्थवाद म्हटले जाते. प्रत्यक्षार्थवादामध्ये वास्तव घटनामधील वैज्ञानिक तत्त्व शोधले जाते.

काल्पनिक व अमूर्त घटना, गोष्टी, विचारांमध्ये न अडकता प्रत्यक्ष मिळालेल्या वैज्ञानिक अनुभवाच्या जोरावर सत्य पडताळून पाहण्याच्या पद्धतीला प्रत्यक्षार्थवाद असे म्हटले जाते. प्रत्यक्षार्थवादामध्ये वास्तव घटना आणि वैज्ञानिक तत्त्व यांनाच महत्त्व असून काल्पनिक घटना, विचार यांना प्रत्यक्षार्थवादामध्ये कुठलेच स्थान नाही. शिवाय प्रत्यक्षार्थवादाने स्वच्छंदतावादाचा विरोध करून स्वच्छंदतावादाच्या काल्पनिक स्वच्छंदतावादी ऐतिहासिक कल्पनांचा विरोध केला. प्रत्यक्षार्थवादी विचारांची मांडणी करणाऱ्या इतिहासकारांमध्ये नीबुर आणि रैंक यांचा प्रथम क्रमांक लागतो. पूर्णता तत्थांव आधारित व्यक्तिगत पक्षपाताचा अभाव असणाऱ्या लेखनाचा समावेश प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनामध्ये करण्यात येतो. लॉर्ड ॲक्टन यांनी 'केम्ब्रिज मॉडर्न हिस्ट्री' साठी प्रत्यक्षार्थवादी पूर्णतः वस्तूनिष्ठ व निष्पक्ष इतिहास लेखन करण्याची सूचना दिली. जे. बी. बरी यांनी प्रत्यक्षार्थवादाला प्रोत्साहन देताना असे म्हटले की, 'इतिहास फक्त विज्ञानच होता त्यापेक्षा कमीही नाही व जास्तपण नाही' प्रत्यक्षार्थवादी इतिहास म्हणजे भूतकालीन ऐतिहासिक घटनांना कुठल्याही प्रभावापासून मुक्त ठेवून वस्तूनिष्ठ मांडणी करण्याचा तत्त्वज्ञानात्मक प्रवाह होय. प्रत्यक्षार्थवादी इतिहासाची मांडणी, इतिहासाच्या प्रत्यक्षार्थवादी तत्त्वचिंतनाची मांडणी पहिल्यांदा फ्रान्समधील विचारवंत ऑगस्त कॉम्त (१७९८ – १८९७) यांनी केली. ऐतिहासिक साधनांची निष्पक्ष मांडणी ही प्रत्यक्षार्थवादी इतिहासलेखनाची पहिली पायरी आहे असे म्हटले आहे.

**ऑगस्त कॉम्त (१७९८–१८५७):** प्रत्यक्षार्थवादाबरोबरच आधुनिक समाजशास्क्षाचे जनक, पितासह असणाऱ्या कॉम्तचा जन्म इ.स. १७९८ मध्ये फ्रान्समधील मोटेपेलियर येथे झाला. ऑगस्त कॉम्तचा पिंड हा मुळातच विद्रोही स्वरूपाचा होता. कॉम्त यांनी काही काळ गणिताचे शिक्षक म्हणून काम केले व नंतर सेंट सिमो यांचे सचिव म्हणून काम केले. हे करत असतानांच कुठल्याही बंधनात अडकण्याचा कुठल्याही चमत्कारी विचारात न अडकण्याचा, कुठल्याही धार्मिक संकल्पनेत न अडकणाऱ्या कॉम्तच्या विचाराने बंडाला सुरूवात केली. कॉम्तच्या विचारांची उभारणी उच्च मानवतावादी मूल्यावर आधारित होती. गृहस्थ / पारिवारी, सांसारिक जीवनामध्ये अस्थिर आणि आर्थिक व शारीरिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या कॉम्तची सामाजिक संरचनेच्या सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील निरीक्षणे अतिशय सूक्ष्म होती. आर्थिक दृष्ट्या जरी हालाखिची परिस्थिती असली तरी कॉम्त कमालीचा आशावादी होता. स्वत:ला मानवतेचा धर्मगुरू घोषित करणारा ऑगस्त कॉम्त यांच्या समाजशास्त्राला दिलेल्या रचनात्मक व वैज्ञानिक योगदानामुळे त्यांना आधुनिक समाजशास्त्राचा जनक म्हटले जाते.

कॉम्तचे आईवडील कॅथालिक पंथीय होते. कॉम्तचे प्राथमिक शिक्षण त्याच्या गावीच झाले. इ.स. १८१४ मध्ये तो इकील पॉलिटेक्निकमध्ये दाखल झाला. कॉम्तवर बेंजामिन फ्रँकलिन यांचा प्रभाव होता. त्याचबरोबर डिमॉइस्टर या परंपरावाद्यांपासून कॉम्त ने उत्क्रांतीचे तत्त्व तो शिकला. मसमाज हा नेहमी उत्क्रांत होत असून ही उत्क्रांती एका विशिष्ट शिस्तीमधून होत असते हे तत्त्व त्याने शोधले. १९३० साली कॉम्तने Course of positive philosophy हा ग्रंथ लिहला. या ग्रंथाचे सहा खंड त्याने लिहले. या ग्रंथामध्ये समाजशास्त्रीय विचारांचा उहापोह केलेला आहे. Positive Policy हा ग्रंथसुद्धा विशेष मान्यता पावला. याबरोबरच कॉम्तच्या अन्य ग्रंथामधूनही कॉम्तने मानवी विचारशक्तीचा विकास आणि त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण यांची चर्चा केली आहे. ऑगस्त कॉम्त पूर्वी फ्रान्समध्ये परिवर्तनवादी विचारवंत हेन्री डे सेंट सिमे यांनी पूर्वाश्रमीच्या अवैज्ञानिक तथ्य असणाऱ्या सर्वच ऐतिहासिक मिथकांना निकालात काढण्याची परंपरा निर्माण करून 'प्रत्यक्षार्थवाद' प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. ज्यामध्ये न्यूटनच्या वैज्ञानिक संशोधन पद्धतीचे समर्थन करून सामाजिक शास्त्रांना वैज्ञानिक तत्त्वांच्या आधारे समजून घेवून ज्ञानाच्या सर्वच शाखांमध्ये हे विचार विकसित करण्यात आले.

ऑगस्त कॉम्तच्या वैचारिक प्रणालीला प्रत्यक्षार्थवादी म्हटले जाते कारण या प्रत्यक्षार्थवाद या नावामध्येच निश्चित, सुस्पष्ट, पूर्ण गुणवत्ता असून हीच तत्त्वे हेच गुण वैशिष्ट्ये व लक्षण भौतिक, नैसर्गिक विज्ञानाच्या नियमांना लागू होतात. प्रत्यक्षार्थवाद्यांच्या मते, ज्या पद्धतीने वैज्ञानिक निसर्ग विज्ञानाचे शास्त्रीय अध्ययन करतात. त्या प्रमाणेच समाजातील मानवाचे अध्ययन केले पाहिजे आणि हे शक्य आहे. त्याबरोबरच ऐतिहासिक आणि सामाजिक स्थित्यंतरांच्या मागच्या निश्चित वास्तवाला शोधणे शक्य आहे. ज्ञानाच्या प्रगत अवस्थांना लक्षात घेवून बौद्धिक विचारांना वेगळे वळण लावले पाहिजे असे कॉम्त यांना वाटत असे. कॉम्त यांना शास्त्रीय व वैज्ञानिक स्वरूपाचे ज्ञान अपेक्षित आहे. त्यांच्या मते, मसमाजाची पुनर्रचना होत असतांना केवळ शास्त्रीय व सामाजिक दृष्टिकोन जीवनातील प्रत्यक्ष घटनांचे ज्ञान असून भागणार नाही. तर शास्त्रीय दृष्टीकोन व वास्तव घटना यामध्ये समन्वय साधने आवश्यक आहे. कॉम्तच्या मते समाजाची सुधारणा व

पुनर्रचना करण्यासाठी समाजाचे नियम आधी माहित असले पाहिजेत. समाजाचे असे नियम समजण्यासाठी वासत्व ज्ञान हे निरीक्षण आणि अनुभव यांच्या सहाय्याने मिळू शकते आणि असे ज्ञान हेच प्रत्यक्षार्थवादी असते.

**विकासाच्या तीन अवस्था :** वयाच्या २४ व्या वर्षी कॉम्त यांनी विकासाच्या तीन अवस्थांचे प्रतिपादन केले. या नियमानुसार सर्व मानवी समाजाच्या सर्व काळात मानवी बुद्धिच्या विकासाचा आढावा घेत असतो. ज्यावेळी आढावा घेतला जातो तेंव्हाच एका श्रेष्ठ आणि आधारभूत अशा नियमांचा शोध लागतो आणि हा नियम तीन अवस्थांमधून जातो त्या अवस्था ईश्वरशास्त्रीय, आधिभौतिकशास्त्रीय आणि प्रत्यक्षार्थी किंवा वास्तववादी अशा आहेत.

ईश्वरशास्त्रीय (Theological) ही मानवी जीवनाची प्रथम अवस्था असून यालाच 'धर्मशास्त्रीय अवस्था' असेही म्हटले जाते. या अवस्थेमध्ये प्रत्येक गोष्टीचा विचार हा अलौकिक अशा दैवी शक्तीच्या माध्यमातून केला जात असे आणि प्रत्येक घटनेमागे ईश्वर आहे हे ग्रहीत धरले होते. मानवाची ही अवस्था त्याच्या चिंतनाची पहिली अवस्था होय. या अवस्थेमध्ये चेतना व चराचरातील वस्तूमध्ये आत्मतत्व भरलेले असण्याबरोबरच सर्वत्र आत्म्याचाच प्रभाव असतो. त्यानंतर अनेकेश्वरवाद व एकेश्वरवाद या तीन अवस्थांमधून ईश्वरशास्त्रीय अवस्थेचा कालखंड जातो.

मानवी समाज प्रत्यक्षार्थवादापर्यंतच्या अवस्थेत जाण्यापूर्वी आधिभौतिकशास्त्रीय (Metaphysical) अवस्थेमध्ये अराजक व क्रांती या दोन स्थितीतून जावे लागते. कॉम्तने भौतिकशास्त्रे व समाजशास्त्रे एकमेकांशी संबंधित आहेत हे दाखवून देण्याबरोबरच प्रत्यक्षार्थवादासाठी कॉम्तने शास्त्रांचा अनुक्रमही खालील प्रमाणे मांडला आहे. उदा. गणित, जोतिषशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि समाजशास्त्र यातील प्रत्येक शास्त्र हे त्याच्या आधीच्या शास्त्रावर अवलंबून आहे. उदा. समाजसास्त्र हे जीवशास्त्रावर अवलंबून आहे तर जीवशास्त्र हे रसायनशास्त्रावर अवलंबून आहे. अशा विश्लेषणातून सामाजिक इतिहास लिहीत असतांना संभाव्य नियमांची चर्चा करून प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाला आकार दिला.

जगातील कोणतीही घटना अनाकलनीय अशा घटनांमुळे घडत नसते. हाच या प्रत्यक्षार्थवादाचा मूळ गाभा आहे. प्रत्यक्ष बुद्धिगम्य विचाराला, तर्काला पटेल असा सामाजिक वाटचालीचा आलेख प्रत्यक्षार्थवादी तत्त्ववेत्यांनी मांडला. या प्रत्यक्षार्थवादी विचारांची मांडणी समाजशास्त्रीय भूमिकेतून केली गेली. घटना का घडतात, या प्रश्नाचा शोध घेवून मानवी जीवनाचा अन्वयार्थ लावण्याऐवजी घटना कशा व कोणत्या रितीने घडतात हे समजून घेण्याचा प्रयत्न प्रत्यक्षार्थवादी अन्वयार्थात केला गेला आहे. निरीक्षण केले गेले व निरीक्षणातून काही सर्वसामान्य नियम तयार केले गेले. तर्काला, बुद्धिला पटणारे सत्य उलगडले गेले. कार्यकारणसंबंध प्रस्थापित केले गेले व मानवी जीवनाचा अभ्यास हा निश्चित, अचूक, सत्य व संशयातील पद्धतीने शास्त्रीय निकषांवर केला जावू लागला व त्या आधारे प्रत्यक्षार्थवादी अन्वयार्थ लावला जावू

लागला. जे वास्तव्यात दिसते त्याच्याच आधारे या भौतिक जगातील घटना, प्रसंग याची सुसंगती लावली गेली.

प्रत्यक्षार्थवादावर लिहिलेल्या एकंदरीत सहा पुस्तकांमधून सहा पुस्तकांमधून ऑगस्त कॉम्त ने एकच मत पुन्हा पुन्हा पटवून सांगितले की, बुद्धिमत्तेच्या कसोटीवर घासून समाजाला पटतील असेच विचार मांडावे. मानवी विचार शक्ती, मानवी विचारांचे वैज्ञानिक विश्लेषण, समाजातील परीवर्तन यामधून नव्या विचारांची रचना होते असे कॉम्त म्हणतो.

**लिओपोल्ड रँके (१७९५–१८८६):** रँके हा जर्मन इतिहासकार असून बर्लिन विद्यापीठामध्ये इतिहासाचा प्राध्यापक म्हणून कार्य केले. हा ऑगस्त कॉम्तच्या समकालीन असून याने इतिहास संशोधनामध्ये प्रत्यक्षज्ञानवादाची मुहूर्तमेढ पद्धतशीरपणे रोवली. इतिहासलेखनामध्ये शास्त्रीय पद्धतीचा वापर करण्याचा आग्रह केल्यामुळेच रँकेला 'आधुनिक इतिहासलेखन शास्त्राचा जनक' असे म्हटले जाते. इतिहासाला दैववादी चौकटीतून बाहेर काढण्याचे काम रँके ने केले. शिवाय रँकेने नीतिबोधात्मक इतिहासाचा निषेध केला. No Document No History हा विचार दिला. त्याच्या Universal History नावाच्या आपल्या सहा खंडामध्ये विभागलेल्या ग्रंथातून ही प्रचिती येते. याशिवाय त्याने रोमन, जर्मनी व रशिया या देशांचा इतिहास प्रत्यक्षवादी विचारपद्धतीने लिहीला.

रँकेच्या या वस्तूनिष्ट इतिहास लेखनामुळेच खूप मोठ्या प्रमाणात इतिहासाबद्दल इतिहासकारांच्या मनामध्ये जाणिवा निर्माण झाल्या. कारण इतिहासाला शास्त्र मानणारा तो पहिला इतिहासकार होता.

**रँकेचे इतिहासलेखनविषयीचे विचार :**

१. सत्य हाच इतिहासाचा आत्मा आहे व इतिहास हेच शास्त्र आहे.

२. पुराव्याशिवाय वस्तूनिष्ट इतिहासलेखन होवू शकत नाही.

३. साधनांची वस्तूनिष्ठ प्रत्यक्ष चिकित्सा करावी.

४. इतिहास ही स्वायत्त ज्ञानशाखा असून तिच्या अध्ययनाची निश्चित उद्दिष्टे व विशिष्ट निर्धारित तंत्र आहे.

५. इतिहासलेखनामध्ये कल्पना व गुढवादाला मुळीच स्थान देवू नये.

प्रत्यक्ष ज्ञानवादी विचारांच्या प्रभावातून रँकेने आधुनिक कालखंडाच्या इतिहासलेखनामध्ये नवक्रांती घडवून आणली.

**प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञान व इतिहासलेखन :** प्रत्यक्षार्थवाद म्हणजे प्रत्यक्षज्ञान होय. प्रत्यक्षार्थवाद म्हणजे निश्चित, नि:संदिग्ध, वादातील स्वरूपाचे चिरंतन ज्ञान होय. विज्ञानशाखेतील संशोधनाप्रमाणे इतिहासकारांनी गतकालीन मानवी जीवनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करावा व सत्यशोधून काढावे असा या विचारप्रणालीचा आग्रह आहे. प्रत्यक्षार्थवादी विचारसरणी ही अनुभवसिद्ध विचारसरणी असून या विचारसरणीनुसार गतकालीन

मानवी जीवनातील वास्तवाचे शास्त्रीय पद्धतीचा वापर करून सत्यदर्शन घडवणे अभिप्रेत आहे. ही प्रत्यक्षार्थवादी विचारसणी इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित करण्याचे श्रेय जर्मन इतिहासकार लिओपाल्ड रँके व फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्त कॉम्त यांना जाते. आपल्या प्रत्यक्षवादी सिद्धांताच्या आधारावर इतिहासाचा सामाजिक शास्त्राद्वारे अन्वयार्थ लावण्याचा मार्ग भावी पिढीला खुला करून दिला. विज्ञानामुळे दूरदृष्टी प्राप्त होते आणि दूरदृष्टी कृतीला जन्म देते. Positive philosophy of history असा शब्दप्रयोग कॉम्त ने पहिल्यांदा केला. त्याच्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानाने इतिहास लेखनाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली. ऐतिहासिक सत्यावर भर दिल्यामुळे इतिहासाला विश्वसनीयतेचा भक्कम आधार मिळाला. शास्त्रीय ज्ञान व अनुभवसिद्ध प्रयोगाद्वारे मूलभूत सत्याचा शोध लागला की त्याचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करता येतो. ही ऑगस्त कॉम्तच्या प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञानाची वैचारिक बैठक आहे. कॉम्तच्या मते, इतिहासाच्या अभ्यासकाने केवळगतकालीन सत्य घटनांचा शोध लावणे एवढेच इतिकर्तव्य न मानता त्या घटनांमागील आंतरिक सूत्र शोधून काढावे, त्यातून सर्वसामान्य नियम शोधावेत. यातून मानवी व्यवहारांचे नियमन करणाऱ्या मूलभूत सूत्रांचा शोध लागला तर त्या आधारे भविष्यात मानवी जीवनाला दिशा देता येईल.

ऑगस्त कॉम्तने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये गुढवादी इतिहासलेखन पद्धती नाकारून इतिहासलेखनासाठी मूळ स्त्रोत साधनांच्या अभ्यासावर व शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ऐतिहासिक सत्याचा शोध घेण्यावर आणि ते सत्य वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडण्यावर भर दिला. ज्याप्रमाणे शास्त्रज्ञ निसर्गाच अभ्यास करतात. त्याचप्रमाणे समाजाचा शास्त्रीय ज्ञानावर आधारित अभ्यास करावा. इतिहासाचा अभ्यास करावा असे कॉम्त यांना वाटते. ज्याप्रमाणे निसर्गातील घटनांमध्ये एकप्रकारची शिस्त असते घटनाक्रम ठरलेला असतो. तशाच प्रकारची घटना व शिस्त मानवी समाजात असते. कॉम्तच्या मते, ऐतिहासिक घटनांकडे उत्क्रांतीवादातून पाहिले पाहिजे. इतिहासातील सत्य शोधण्यासाठी शास्त्रीय पद्धत हाच इतिहासाचा आधार विचारांचा आधार असावा, असे कॉम्त सांगतात.

१. ऐतिहासिक घटनांची तुलना करणे व समाजाची उत्क्रांती कशी झाली याचा तुलनात्मक विचार करणे हा प्रत्यक्षार्थवादाचा आधार आहे.

२. नैसर्गिक शास्त्राने ज्या प्रमाणे आपले नियम सिद्ध केले आहेत त्याचप्रमाणे सामाजिक शास्त्राने नियम सिद्ध केले म्हणजे त्याला सामाजिक शास्त्राचे स्वरूप प्राप्त होईल.

३. इतिहासाचा अभ्यास सत्यशोधण्यापुरता सिमीत नसावा तर मानवी व्यवहाराच्या शास्त्रीय अध्ययनातून हाती आलेल्या सत्याच्या आधारे त्याबाबत काही सिद्धांत शोधून काढता येतील. त्यांच्या जोरावर इतिहासातील घटनांचा सामान्य अभ्यास केल्यास त्या विषयाला शास्त्रशुद्ध पाया लाभेल.

४. इतिहास हे मानव्यशास्त्र असल्यामुळे शास्त्राचे नियम पूर्णपणे इतिहासाला लागू करता येत नसले तरी निरीक्षण, चिकित्सा, विश्लेषण, सत्य असत्याचा निर्णय या पद्धतीचा वापर करून इतिहासात देखील सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात.

५. प्रत्यक्षज्ञानवादात अथवा विज्ञानवादात कल्पना, श्रद्धा यांना स्थान नसून निरीक्षण, प्रयोगात्मकता, परीक्षण, वर्गीकरण विश्लेषण असे सूत्रबद्ध व्यवस्थापन असते.

६. निसर्गवादाच्या अभ्यासाप्रमाणे प्रत्यक्षार्थवादाच्या अभ्यासामुळे मानवाची गतकाळातील वाढ आपल्याला कळू शकेल व त्याच्या आधारावर आपल्याला भविष्य वर्तविणे शक्य होईल.

एकूणच ऑगस्त कॉम्त व रॅन्केच्या योगदानामुळे इतिहास लेखनामध्ये वास्तववादी दृष्टिकोण विकसित झाला.

**प्रत्यक्षार्थवादाचा इतिहासलेखनावरील प्रभाव :** कॉम्तच्या प्रत्यक्षार्थवादाचा इतिहास लेखनावरील प्रभाव हा १९ व्या शतकातील नैसर्गिक विज्ञानाचा प्रत्यक्ष परिणाम होता कारण १९ व्या शतकामध्ये विज्ञानाच्या संशोधनाला गतिशिलता प्राप्त झालेली होती. मुलत: गणिततज्ज्ञ असलेल्या कॉम्त याने विज्ञानाच्या तत्त्वाच्या आधारे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रामधील प्रयोग पद्धती संशोधनपद्धतीचा अवलंब सामाजिक शास्त्राच्या संशोधनामध्ये केला. या संशोधनामध्ये त्याने सर्वप्रथम तथ्यांचे संकलन करण्यापासून ते मांडत असलेल्या विधानाचा आराखडा करण्यापासून ते प्रत्येक छोट्या छोट्या घटकांकडे वैज्ञानिक दृष्टिकोणातून पाहून संशोधनातील सामान्यीकरणाच्या पायरीपर्यंत संशोधनाला अगदी वस्तुनिष्टतेने आपल्या वैज्ञानिकी चिकिस्तेतूनच निश्चित आकार दिला.

इतिहासावरील कॉम्तचे विवेचन हे अतिशय मौलिक असण्याबरोबरच सामाजिक विज्ञानाच्या सर्वच शाखांवर खूप व्यापक प्रभाव पाडणारे, सखोल प्रबाव पाडणारे होते. नवीन विचार व चिंतनाचे बिजारोपण करण्याच्यामध्ये सर्वात सशक्त चिंतनकर्ते आणि बौद्धिक प्रेरणास्त्रोत म्हणून फ्रान्सच्या इतिहासामध्ये डेकार्ट नंतर महान विचारवंत होते. प्रत्यक्षार्थवादामुळे किंवा प्रत्यक्षार्थवादाच्या प्रभावामुळे इतिहासाच्या विकासामध्ये आणि ऐतिहासिक ज्ञानामध्ये अभूतपूर्व वृद्धी झालेली दिसून येते. त्याचबरोबर एका नवीन प्रकारची विचारसरणी, प्रत्यक्षार्थवादामुळे अस्तित्वात आली. प्रत्यक्षार्थवादी मग ते रॅन्कोवादी असोत किंवा कॉम्तवादी असोत. त्यांनी तत्थसंकलनाच्या चमत्कारीक प्रभावाची सुरूवात करून विश्लेषणाचा एक नरीन मार्ग अनुसरला. इतिहासकारांना त्या सर्व सामग्रीतून तथ्य संकलन करण्याची प्रेरणा दिली मग ती तथ्ये पुरातत्वांमध्ये असोत, शिलालेखांमध्ये असोत, किंवा साहित्यत असोत त्यामुळे अतिशय विस्तृत आणि सखोल परिप्रेक्षातून शोध घेवून ऐतिहासिक सामग्रीचे संकलन करण्याचा नवीन संरचनेमुळे इतिहासाच्या ज्ञानामध्ये अभूतपूर्व वृद्धि झाल्याचे दिसून येते.

प्रत्यक्षार्थवादी तत्त्वचिंतकांच्या मते, इतिहासाच्या प्रत्येक तथ्यांमध्ये एक पूर्ण संपूर्ण अस्तित्व असून हे या सूक्ष्म तथ्यांचा व्यापक विस्तार होवू शकतो. त्यामुळे ही तथ्ये मूलभूत असण्याबरोबच स्वतंत्र, व्यापक व सर्वकष असतात. त्यामुळे इतिहासकाराद्वारा त्यावर मत मांडण्याच्या ऐवजी ते जसे आहेत तसे त्यांची चिकित्सा केली पाहिजे.

ऑगस्त कॉमच्या प्रत्यक्षार्थवादी विचारधारेच्या अनुसार 'मानवी समाज वैज्ञानिक संशोधनासाठी उपयुक्त' आहे आणि खऱ्या अर्थाने त्यामुळेच आधुनिक समाजशास्त्राचा उदय झाला आणि तद्नंतर या

प्रत्यक्षार्थवादी विचारांनुसार ऐतिहासिक घटनांची मांडणी करून असे निष्कर्ष काढले की ते त्रिकालाबाधीत असतील. म्हणजेच प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञान इतिहासाची ऐतिहासिक घटनेची उकल करण्याबरोबरच अशा काही सामान्य विधानांची मांडणी करतात की त्या आपल्याला इतिहासचक्रामध्ये पुन्हा पुन्हा आढळतात. उदा. नैसर्गिक / प्राकृतिक विज्ञानामधील विधान, रासायनिक, भौतिक किंवा गणितीय समिकरणे जी कुठल्याही काळात तशीच लागू पडतात. त्याच पद्धतीने प्रत्यक्षार्थवादी विधाने जरी पूर्णत: लागू होत नसली तरी ती पूर्णतेच्या जवळपास जातात. उदा. १५८ देशांच्या संविधानाचा अभ्यास करून अरस्तू ने असे मत मांडले की किंवा मांडण्यास समर्थ झाले की, 'क्रांतीसाठी सर्वसामान्य कारण म्हणजे सुविधासंपन्न आणि सुविधाविहीन वर्गाच्या मध्ये असणारा संघर्ष आहे.' अशी वस्तूनिष्ठ वास्तवदर्शी मते जी प्राकृतिक विज्ञानाच्या जवळ जाणारी ही प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानामध्ये व तत्त्वज्ञानाच्या ऐतिहासिक संशोधनीय संरचनेमध्ये अभिप्रेत आहेत.

प्रत्यक्षार्थवादी पद्धतीने इतिहासाचे, ऐतिहासिक घटनांचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, अतिशय छोट्यात छोट्या घटनेची सुद्धा सूक्ष्म पातळीवर चिकित्सा केली जाते. मुलत: प्रत्यक्षार्थवाद हा व्यवहाराप्रधान दृष्टिकोण असून तो विश्वाच्या व्यापक स्वरूपाच्या घडामोडींच्या तत्त्वाच्या मागे लागत नाही तर तो विश्वातील एखाद्या विशिष्ट प्रश्नावर लक्ष केंद्रित करून तो प्रश्न शास्त्रीय दृष्टिकोनातून कसा सोडवता येईल याचा विचार करतो. एकंदरितच प्रत्यक्षार्थवादींना असे वाटते की सर्व ज्ञानातील समान तत्त्वे शोधून त्याच्या आधारे समाजाची नवी रचना करावी म्हणजे जगाला चांगले मार्गदर्शन मिळेल. प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानामध्ये वास्तव घटना व वैज्ञानिक तत्त्व यांना फार मोठे महत्त्व दिले असून प्रत्यक्षार्थवादामध्ये अनाकलनीय, समजण्यापलीकडे असणाऱ्या गोष्टींना थारा नाही प्रत्यक्षार्थवादी दृष्टिकोण पूर्णत: वैज्ञानिक स्वरूपाचा असून काल्पनिक गोष्टी व अमुर्त कल्पनांना यामध्ये स्थान नाही.

शास्त्रीय ज्ञान व अनुभवसिद्ध प्रयोगाद्वारे मूलभूत सत्याचा शोध लागला की त्याचा उपयोग मानवी समाजाच्या विकासासाठी करता येतो ही प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाची वैचारिक बैठक आहे. प्रत्यक्षार्थवादामध्ये फक्त गतकालीन घटनांचे सत्य शोधणे एवढेच नाही तर त्या घटनांमधील आंतरिक सूत्र शोधून काढून त्यातून सर्वसामान्य नियून शोधावेत याद्वारे भविष्यामध्ये मानरी जीवनाला दिशा देता येईल.

गुढवादी इतिहास लेखनपद्धती, दैववादी इतिहास लेखनपद्धती नाकारून शास्त्रीयच पद्धतीनेच सत्यशोधनाचा नवा राजमार्ग, प्रत्यक्षार्थवादाने अंगिकारला. ज्या पद्धतीने निसर्गनियमाला एक प्रकारची शिस्त असते तिच शिस्त मानवी समाजामध्ये रूजवण्याचा प्रयत्न या प्रत्यक्षार्थवादाने केला. प्रत्यक्षार्थ वादामध्ये कल्पना व श्रद्धा यांना स्थान नसून निरीक्षण, प्रयोगात्मकता, परीक्षण, विश्लेषण याला स्थान असते. हेच प्रत्यक्षार्थवाद्यांनी दाखवून दिले. इतिहासाला दैववादी चौकटीतून बाहेर काढून शास्त्रीय ज्ञानशाखेचा दर्जा प्राप्त करून देण्याचे कार्य प्रत्यक्षार्थवाद्यांनी केले. इतिहासाला शास्त्र बनवण्याचे कार्य प्रत्यक्षार्थवाद्यांनी केले. साधनांचा शास्त्रीय शोध व चिकित्सा यावर प्रत्यक्षवादाचा भर असून प्रत्यक्षार्थवादी इतिहास लेखनामुळे इतिहासाच्या क्षेत्रात नवक्रांती घडून आली. प्रत्यक्षार्थवादाने पूर्वीच्या अवैज्ञानिक तथ्य असणाऱ्या सर्वच ऐतिहासिक मिथकांना निकालात काढले.

**(ब) ॲनाल्स इतिहासलेखन परंपरा** (Annales Tradition)

ॲनाल्स इतिहासलेखन परंपरा ही इतिहासलेखन, संशोधनामधील एक नवीन व मूलतः आंतरविद्याशास्त्रीय परंपरा आहे. जी निव्वळ तथ्यात्मक, कथनात्मक, निवेदनशैली किंवा राजकीय व चरित्रात्मक विषयांना बाजूला सारून ठराविक समजूतीपलीकडील मानवी अस्तित्वाच्या वेगवेगळ्या घटकांना सामावून घेते. ॲनाल्स तत्त्वज्ञानाला विकसित करण्याचे कार्य फ्रेंच विचारवंतांनी केले. त्यांनी २० व्या शतकामध्ये ॲनाल्स लिखानाला विशिष्ट तत्त्वज्ञानात्मक बैठक दिली.

इतिहासाचे विषय व उद्दिष्ट याबाबत काही समान गृहितके मानून संलग्न व उपशाखीय ज्ञानक्षेत्रातील कौशल्य व साधने आत्मसात करून संशोधनाच्या नवनवीन वाटा निर्माण फ्रान्समधील अभ्यासकांच्या समूहाला ॲनाल्स परंपरा म्हणून ओळखले जाते. ॲनाल्स विचारप्रवाह, संशोधन प्रवाह हा समग्र किंवा सर्वसमावेशक विचार अंगिकृत करतो. इतिहासाच्या ॲनाल्स परंपरेने इतिहासाला 'राजकीय व राजनैतिक' बंधनातून मुक्त केले. ॲनाल्सची इतिहासाची नवीन मांडणी मानवशास्त्र, हवामानशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल व इतर संलग्न शाखांच्या मदतीने इतिहासाचे श्रेष्ठत्व सिद्ध करते.

भूतकाळ व वर्तमानकाळ यांतील नाती प्रवाहीत असतात. त्यामुळे इतिहासाला प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक समाजाला आदिम व सुसंस्कृत अशा कप्यांमध्ये बंद करणे हे ॲनाल्सला मान्य नाही. त्यामुळे ॲनाल्सवाद्यांनी गतकाळाला तपासत असताना गतकाळाचे गतिशास्त्र समजून घेण्यावर भर दिला. गतकाळाच्या दस्तऐवजांना आपले शास्त्रनियम लागू करणाऱ्या जुन्या पठडीतील इतिहासकारांऐवजी सद्यकालीन अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेचे विश्लेषण करण्याचे साहस करणाऱ्या नवीन विचारवंताचा ॲनाल्सनी पुरस्कार केला.

२० व्या शतकामध्ये निर्माण झालेल्या ॲनाल्स परंपरेचा प्रसार रशिया, युरोप, अमेरिका, ब्राझील या राष्ट्रामध्ये अगदी झपाट्याने झाला. कारण या परंपरेचे या शाखेचे इतिहासकार हे मुलतः बुद्धिवादी गटात मोडणारे व शास्त्रीय दृष्टिकोण बाळगणारे असल्याबरोबरच कोणत्याही एका शास्त्रीय व सैद्धांतिक भूमिकेला बांधील नसल्यामुळे ॲनाल्स व इतिहासलेखनाला नवा आशय व नवी पद्धतीची देणगी दिली.

**ॲनल्स म्हणजे काय? :** ॲनल्स या शब्दाचा शब्दश: अर्थ आहे 'वार्षिक नोंदी' १९२९ मध्ये फ्रान्समध्ये 'ॲनल्स' नावाचे नियतकालीक होते. त्यामुळे या विचारसरणीला The Annales School of Thoughts असे म्हटले जाते. १९४६ पासून Annales : Economic, Societies, Civilizations हे नियतकालीक सुरू झाले. त्यामध्ये मुख्यत: आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील संशोधनपर लेखनाला प्रोत्साहित करण्यात आले. मानवाच्या/समाजाच्या जैविक स्वरूपाबद्दल आदर बाळगत असतानाच ॲनल्स इतिहासकारांनी ज्यांचे मोजमाप करता येईल अशा घडामोडीचाही पाठपुरावा केला. ॲनाल्स पद्धतीने कोणताही ऐतिहासिक कालखंड वा समाज सर्वार्थाने समजून घेण्याबरोबरच इतिहासाच्या आकलनासाठी समग्रतेवर भर देण्याचा प्रयत्न केला आणि आकलनाच्या कक्षा विस्तारीत करण्यासाठी अतिशय काटेकोरपणे गणित, अर्थशास्त्रीय व संख्याशास्त्रीय विश्लेषणाचा प्रारंभ केला.

**ॲनल्सचा हेतू :** पारंपारिक इतिहासाची चौकट मोडून इतिहासाचे घटनाधिष्ठीत स्वरूप बाजूला सारून इतिहासातून मानवी समाजाचे संपूर्ण चित्रण स्पष्ट करण्यासाठी मार्श ब्लाच व फेबवर यांनी ॲनल्स नियतकालीकाच्या स्थापणेच्या वेळी खालील हेतू स्पष्ट केले.

१. इतिहासातून गतकालीन मानवी समाजजीवनाचे संपूर्ण चित्रण करणे.

२. इतिहासाशी निघडीत असणाऱ्या समाज, अर्थ व भूगोल इत्यादी ज्ञानशाखांचा अभ्यास करणे.

३. इतिहासाला स्वायत्तता मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

४. इतिहासाला मानवी समाजाच्या सरींगणि व सर्वंकष अध्ययानचे शास्त्र बनविणे.

५. फ्रान्समध्ये जनसंपर्कासाठी नियतकालिक सुरू करणे.

६. ऐतिहासिक माहिती व ज्ञानाचा शास्त्रशुद्ध प्रचार करणे.

**ॲनल्सची भूमिका :** ॲनल्स विचारसरणीची भूमिका ही मूलतः ऑगस्त कॉम्त याच्या प्रत्यक्षज्ञानवादी विचारांच्या प्रभावातून अस्तित्वात आली. त्याचबरोबरच ॲनल्स विचारसरणी ही आर्थिक रचनेचा व समाजातील दुर्लक्षित व वंचित घटकांचा विचार असल्यामुळे ॲनल्सची विचारसरणी ही मार्क्सवादाशी जुळणारी आहे. मात्र थोर समाजशास्त्रज्ञ ऑगस्त कॉम्त व एमिल डरखाईम यांच्या विचारामध्ये ॲनल्सच्या विचारांची बिजे आढळतात. त्यामुळेच ॲनल्सचा हा विचार व भूमिका ही अभिनव असून ती खालील प्रमाणे दिसून येते.

१. इतिहास हा मानवी समाजाचा आरसा असल्यामुळे मानवी समाजाचा संपूर्ण, सर्वांगिण व एकत्रित अभ्यास हे इतिहासाचे उद्दिष्ट असावे.

२. एखादी घटना अथवा व्यक्ती हाच अभ्यासविषय न ठेवता त्या प्रदेशात प्रदिर्घ काळात घडणाऱ्या परीवर्तन, समस्या अर्थ व समाजरचना यांचा इतिहासकाराने अभ्यास केल्यास मानवी समाजाच्या संपूर्ण इतिहासाचा आलेख तयार होईल.

३. मानवी जीवनाचे चित्रण करणाऱ्या इतिहासाने एकाकीपणा टाकून देवून इतर मानव्यशास्त्राशी निकटचा संबंध प्रस्थापित केला पाहिजे.

४. ॲनल्स परंपरेने ऐतिहासिक माहितीच्या संकलनासाठी संदर्भ साधनांचे सटीक परीक्षण करण्याच्या भूमिकेवर खूप भर दिला.

५. ॲनल्स विचारवंतानी फक्त राजकीय घडामोडींचेच वर्णन करण्याऐवजी समग्र मानवी जीवन आणि जीवनातील घटनांचे अवलोकन करण्याची भूमिका मांडली कारण त्या सर्व घटना खपलळवशपीं या परस्परावलंबी असतात ही ॲनाल्स परंपरेची ठाम भूमिका आहे.

संपूर्ण इतिहास परस्परावलंबन, सर्वांगिण व एकत्रित अभ्यास, परीवर्तन, संदर्भ साधनांचे सटीक परिक्षण त्याचबरोबरच इतर मानवशास्त्राशी निकटचा संबंध प्रस्थापित करून सर्वंकष किंवा सर्वांगिण इतिहासाची मांडणी करण्याची भूमिका ॲनल्स परंपरेने २० व्या शतकामध्ये जगाला दिली ज्यामुळे इतिहासाला स्वायत्तता प्राप्त होते व इतिहासाला मानवी समाजाच्या सर्वांगिण अध्ययनाचे शास्त्र होण्यास मदत होते अशी ठाम भूमिका वरील भूमिकेच्या विचाराअंती लक्षात येते.

**ॲनल्स लेखन परंपरेतील इतिहासकार :** इतिहासाला गतिशिलता प्रदान करण्यामध्ये ॲनल्स परंपरेचा खूप मोठा वाटा आहे. इतिहासातील गतिहिनता या प्रवाहाला मान्य नव्हती. इतिहास व सामाजिक शास्त्रामध्ये अस्तित्वात असलेली रूक्ष व परंपरागत भिती नष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या परंपरेतील संशोधकांनी, इतिहासकारांनी केले. इतिहासाचे रूपांतरण मानव्यशास्त्रामध्ये करण्याचे कार्य या लेखन परंपरेतील इतिहासकारांनी केले. ॲनल्सच्या संशोधकांनी शास्त्रातील विचार संकलप्ना पद्धतीशास्त्र, हेतुपरस्पर इतिहासामध्ये आणल्या व खऱ्या अर्थाने इतिहासलेखन समग्र व व्यापक करण्याचे श्रेय या ॲनल्सवाद्यांना देण्यात येते.

ॲनल्स परंपरेवर १९ व्या शतकातील एमिल डरखाईन यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्याच्या समाजशास्त्रीय संशोधनपद्धतीचा वापर इतिहासामध्ये करण्याबरोबरच व्यक्ती किंवा घटनेऐवजी मानवी कृतीचा समग्र अभ्यास या परंपरेने स्वीकारला. एमिल डरखाईमने १८९७ मध्ये Ancee Sociologique ची स्थापना केली. व्यक्ती कधीही स्वायत्त नसतो सभोवतालच्या विविध घटक व्यक्तीच्या कृती नियंत्रित करत असतात. या परंपरेचे इतिहासकार खालील प्रमाणे

१) **ल्युसियन फेबवेर / ल्युसिन फ्रेबव (१८७८–१८५६)** यांच्या मते, ॲनल्सचा मुख्य हेतू म्हणजे इतिहासाचे मानव्यशास्त्रात रूपांतरण करणे व विज्ञानातील शास्त्रातील पद्धतीशास्त्रांची संकल्पनांची विचारांची बांधणी इतिहासामध्ये करावी.

२) **मार्क ब्लॉक (१८६६–१९४४)** या विचारवंताने The Royal Touch d King and Serts या दोन ग्रंथांच्या माध्यमातून ॲनाल्स परंपरेला जोपासण्याचे कार्य केले. ब्लॉक याने घटनेऐवजी सामाजिक रचनेच्या अभ्यासावर लक्ष दिले. तत्कालीन समाजामधील चालिरीती, रूढी, रचना यांचे इतिहासातील महत्त्व मार्कने अधोरेखित करून ॲनल्स परंपरेला उभारी दिली. एका घटनेवर लक्ष केंद्रित न करता समाजजीवनाच्या सर्व वैशिष्ट्यांना अधोरेखीत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मार्क ब्लॉकने केले. ब्लॉक यांच्या मांडणीमुळे इतिहासाच्या कक्षा रूंदावण्यास मदत झाली.

३) **फर्नांद ब्रॉदेल (१९०२–१९८५)** यांनी इतिहासाच्या जडणघडणीत व लेखणामध्ये सामाजिक व आर्थिक घटकाच्या अस्तित्वाकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे कार्य केले. फर्नांद ब्रॉदेल यांनाच 'वर्ल्ड सिस्टिम फ़र्नांद' चे उदगाते म्हणूनही ओळखले जाते. फर्नांद हे ॲनाल्स विचारप्रणालीचे आद्य प्रवक्ते म्हणूनही ओळखले जातात. इतिहासाच्या विस्तृत परिघाअंतर्गत सर्व ज्ञानाचा समावेश व पुनर्स्थापना व्हावी. परिणामी, मूलगामी विरोधाभास मान्य करूनही आपण अभेद्य ऐक्याचा सन्मान करून हा विचार ब्रॉदेल यांनी रूजविला.

अॅनाल्स प्रवक्ते फर्नांद ब्रॉदेल यांचा जन्म २७ ऑगस्ट १९०२ मध्ये फ्रान्समध्ये झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. १९२३ मध्ये ब्रॉदेल यांनी सोरबॉन विद्यापीठातून इतिहास विषयात पदवी मिळवली. त्यानंतर दोन वर्षे सैन्यात नोकरी केली. १९३२ पर्यंत त्यांनी अल्जेरिया मधील कान्स्टेन्टाईन या शाळेमध्ये इतिहास विषय शिकवला. ल्युसिन प्रेबव यांनी लिहीलेल्या Geographical Introduction to History या पुस्तकाचा खूप प्रभाव ब्रांदिलवर पडला. त्यांनी १९३९ च्या दुसऱ्या महायुद्धात सहभाग घेतला व १९४० ते १९४५ या कालखंडामध्ये त्यांना बंदीवासात ठेवले गेले. तुरूंग ही उत्तम शाळा असून तेथे संयम आणि सहनशीलता शिकायला मिळते हे विधान बॉदेल यांनी सुटकेनंतर केले. या बंदी जीवनाचा कालावधीमध्ये ब्रदिल यांनी 'द मेडिटेरेनियन अॅन्ड द मेडिटेरनियन वर्ल्ड इन द एज ऑफ फिलिप द सेकंड' हे पुस्तक लिहले.

मार्क ब्लॉक  व ल्युसिन फ्रेबव यानी सुरू केलेल्या अॅनाल्सचे ते सदस्य होते. १९४९ मध्ये 'कॉलेज द फ्रान्स' मध्ये त्यांची नियुक्ती झाली. १९५६ ते १९६८ या कालावधीमध्ये अॅनाल्सचे एकमेव संपादक म्हणून काम केले. १९६२ मध्ये त्यांनी ममे झॉ दे सायन्सेय दामफ या संस्थेची स्थापना केली. १९७९ मध्ये लिहिलेल्या 'सिव्हीलायझेशन अॅन्ड कॅपिटलिझम फिफटिन्थ टू एटिन्थ सेंच्युरीज' पुस्तकाने फर्नांद ला लोकमान्यता मिळाली. ब्रॉदेल यांनी इतिहासलेखनामध्ये विभक्त झालेल्या भाषा, लोकसंख्याशास्त्र आहार, वेषभूषा, राहमीमान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था नागरी जीवन, भूगोल संख्याशास्त्र यांची एकत्र गुंफन करून समग्र किंवा सर्वंकष इतिहास लेखनाचा मार्ग अवलंबला.

बहूजन समाजाला कवेत घेणाऱ्या इतिहासाची मांडणी करण्याबरोबरच ब्रॉदेल यांनी १९८० साली ऑन हिस्ट्री, १९८६ साली The Identity of France ही पुस्तके लिहली. शिवाय १९८४ मध्ये ते अकादमी फ्रान्कायावर निवडले गेले. १९८५ मध्ये त्यांचा मृत्यु झाला.

इतिहासाचे लेखन एकाकीपणे करता येत नाही. त्यासाठी ज्या भागाचा इतिहास लिहावयाचा आहे त्याच्या आसपासच्या घटनांचा संदर्भ लक्षात घेतला पाहिजे. असा अॅनल्स परंपरेचा विचार ब्रॉडेल यांनी दिला. इतिहासाच्या कक्षा विस्तारण्याचे कार्य ब्रॉडेल यांनी केले. मानवाच्या हालचाली भूप्रदेशावर होत असतात. म्हणून भूगोल व हवामान यांचा विचार इतिहासामध्ये झाला पाहिजे हा विचार ब्रॉडेल यांनी दिला. त्यांनी

१. भूगोलाचे महत्त्व अधोरेखित केले.

२. इतिहासामध्ये सर्व घटकांचे आकलन महत्त्वाचे असते.

३. भूगोल व हवामानाचा विचार इतिहासामध्ये झाला पाहिजे.

४. इतिहासकाराने मकाळफ ही संकल्पना नेहमी ध्यानात ठेवावी.

५. इतिहासलेखन साचेबंद नसून त्याला इतर सामाजिक शास्त्राची जोड द्यावी.

याबरोबरच ब्रॉदलयाने काळ, गती, भौगोलिक हवामान, इतर शास्त्र याच विवेचन करून इतिहासाला विस्तृत करण्याचा प्रयत्न केला.

याशिवाय अन्य इतिहास संशोधकांनी ॲनल्स परंपरेला जगभर पसरविण्याचे कार्य केले. भारतामध्ये ॲनाल्स इतिहास संशोधनपद्धतीचा सर्वप्रथम अवलंब करणाऱ्यांमध्ये हर्बन्स मुखिया यांचे नाव अग्रभागी आहे. मध्ययुगीन व प्राचीन भारतीय इतिहासाची पुराभिलेखीय, भौगोलिक व पर्यावरणीय मांडणी केली व तद्नंतर या विचारांची मांडणी भारतामध्ये खूप मोठ्या प्रमाणात होवू लागली व अनेक इतिसकारांनी आपले योगदान देवून भारतामध्ये विशेषत: मध्ययुग हे ॲनाल्स पद्धतीने रेखाटण्याचा प्रयत्न केला. त्यात सुतिम गुहा, रामचंद्र गुहा, इरफान हबीब, शिरीन मुसवी व इतर इतिहासकारांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे.

इतिहासाच्या अध्ययनासाठी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोण रूजविण्याचे आणि पारंपरिक इतिहासाच्या मर्यादा ओलांडून इतिहासाची नव्याने मांडणी करणारे फर्नाद ब्रॉदेल हे २० व्या शतकातील एक महान इतिहासकार मानले जातात. फर्नांद बादेल हे इतिहासाच्या जडणघडणतील सामाजिक व आर्थिक घटकांचे महत्त्व ओळखणारे महान इतिहासकार होते.

**ॲनल्सची वैशिष्ट्ये :** २० व्या शतकाच्या मध्यानंतर सुरू झालेल्या या प्रवाहाने इतिहासामध्ये घटना व व्यक्ती यानांच महत्त्व न देता घटना व व्यक्ती घडण्यामागे सभोवतालची परिस्थिती कारणीभूत असते आणि या सभोवतालच्या परिस्थितीचा विचार आपल्या ॲनल्स विचार प्रवाहामध्ये अधोरेखित केला. या विचार व लेखन परंपरेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१. केवळ राजकीय इतिहासाच्या मांडणीला विरोध.

२. पारंपरिक व घटनाधिष्ठीत इतिहासाची चौकट मोडून गतकालीन मानवी समाजजीवनाचे संपूर्ण चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न.

३. गतकालीन समाजजीवनाच्या विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी सातत्यपूर्णरितीने शास्त्रीय पद्धतीचा आग्रह हे ॲनाल्सचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होय.

४. शास्त्रीय पद्धतीने ज्ञानाचे संग्रहन करत असताना संशोधनासाठी निवडलेल्या साधनांचे परिशिलन करण्यावर ॲनाल्सवाद्यांनी भर दिला.

५. ॲनल्सवाद्यांनी इतिहासलेखनामध्ये इतर शास्त्रांचा सहभाग घेण्याची परंपरा सुरू केली.

६. ॲनल्स परंपरेने इतिहासाला सर्वंकष, सैद्धांतिक व शास्त्रीय चौकटीमध्ये बसवून स्वतःचे एक पद्धतीशास्त्र निर्माण केले.

७. ॲनल्स विचारधोरणे आपल्या तत्त्वज्ञानाला परंपरागत स्थितीशील, जातीय, धार्मिक व वर्गीय विचारधारेतून बाजूला काढून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेमण्याचा प्रयत्न केला.

८. ॲनल्स परंपरेने स्वत:चे पद्धतीशास्त्र विकसित केले. त्याचबरोबरच इतर शास्त्राची मदत घेवून इतिहासलेखनाला गतिशीलता प्राप्त करून दिली. उदा. संख्याशास्त्र, भूगोल, समाजशास्त्र इ

९. ॲनल्स विचारधारेने इतिहासाच्या साधनांना विपुलता प्राप्त करून दिली.

१०. समाजजीवनाचे योग्य अवलोकन होण्यासाठी समाजजीवनाचे सातत्यपूर्ण अवलोकन करणे आणि एककालीन घटनेऐवजी दिर्घकालीन किंवा समग्र अवलोकन केल्याने समाजजीवनाचे योग्य दर्शन होते अशी ॲनल्सची धारणा आहे.

**ॲनाल्स परंपरेचा इतिहासलेखनावरील प्रभाव:** ॲनाल्स इतिहासकार स्वतःला बौद्धिक क्रांतीकारक नव्हे तर बौद्धिक संशोधनाच्या क्षेत्रातील क्रांतीकारक समजतात. २० व्या शतकामध्ये उदयाला आलेला हा ॲनल्स इतिहासलेखन विचारप्रवाह इतिहासाच्या पारंपरिक लिखाणाला विरोध करून वेगळ्या सर्वंकष व सर्वव्यापी पद्धतीने इतिहासाचे पुर्नलेखन करण्याची नवीन परंपरा निर्माण केली. ॲनल्स परंपरा ही पूर्णत: नवीनच असे काही सांगते असे नाही तर या परंपरेने समग्रतेचा, संपूर्ण इतिहासाचा विशेषत: संदर्भसाधनाच्या परिक्षणाचा त्याच बरोबरच इतिहासाचा कालसंगतपणे प्रवाहीत करण्याचा मार्ग दिला.

ॲनल्सपूर्व कालखंडाममध्ये फ्रान्स व जगामध्ये इतिहासलेखन प्रवाहाला आलेली स्थितीशिलता, इतिहास लेखनाकडे झालेले दुर्लक्ष, राजकीय इतिहासाचेच धडे गिरविण्याच्या इतिहासकार व संशोधनामध्ये झालेली वृद्धी या सर्व आंतर्विरोधातून ॲनल्स परंपरेने आपले स्वतंत्र पद्धतीशास्त्र विकसित करून एका वेगळ्या अंगाने इतिहासलेखन करण्याची दृष्टी इतिहासकारांना दिली. हे वादातील सत्य असून ॲनल्स परंपरेने इतिहासाचे एकांगीपण नाकारून इतिहास व अन्य मानव्यशास्त्रात निर्माण झालेल्या भिंती नष्ट केल्या. इतिहासाची पारंपरिक चौकट नष्ट करून इतिहासाचे रूपांतरण मानव्यशास्त्रामध्ये केले. ॲनल्स पद्धतीशास्त्राचे अवलोकन करतांना असे दिसते की, इतिहासातील साचेबंद पद्धतीला फाटा देवून या परंपरेने इतिहासामध्ये विचार पद्धतीशास्त्र, संकल्पना त्याचबरोबर इतिहासलेखन हे समग्र असावे हा नवविचार रूजविल्या आणि या नवशास्त्रीय विचारांची सर्वंकष परंपरा कार्यान्वित केली. इतिहासाच्या एकांगीपणाला ॲनाल्स परंपरेने नाकारले.

ॲनाल्स परंपरावाद्यांनी साधरणतः आर्थिक इतिहासकारांनी न स्पर्शिलेल्या आणि सामाजिक व सांस्कृतिक इतिहासकारांनी दुर्लक्षिलेल्या अनेक विषयाच्या विश्लेषणातून ते एक स्वतंत्र आर्थिक दृष्टिकोण तयार करतात. ॲनाल्स विचारप्रणालीचे इतिहासाच्या एकमार्गी विचारसरणीच्या जागी समग्रतावादी दृष्टीकोनाचे बिजारोपन केले. या विचारप्रणालीच्या अन्वेषणात्मक दृष्टीकोणामुळे खऱ्या अर्थाने ॲनाल्सच्या वर्तुळाबाहेरील इतिहासकारांनी मोठ्या प्रमाणावर संशोधन केले. यातूनच खऱ्या अर्थाने ॲनाल्स प्रणालीचे महत्त्व अधोरेखित होते.

**(क) तळाकडून इतिहासलेखन परंपरा** (Tradition of History from Below)

आधुनिक भारताच्या किंवा भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात १८५७ चा उठाव अत्यंत महत्वाचा मानला जातो. '१८५७ चा उठाव' हा वसाहतीक इतिहासलेखन परंपरा आणि भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेमध्ये अत्यंत विस्ताराने अभ्यासला जातो. झाशीची राणी, तात्या टोपे, मुघल बादशाह बहादूर शाह जफर, नाना साहेब पेशवे यांच्या कर्तुत्वाची चर्चा मोठ्या प्रमाणात केली जाते. मात्र त्याचवेळी १८५७ च्या उठावात हजारोंच्या संख्येने सहभागी झालेल्या सैनिकांपैकी मंगल पांडे, बख्तखान अशा मोजक्याच सैनिकांचा अत्यंत त्रोटक इतिहास दृष्टीस पडतो. १८५७ च्या उठावाच्या दरम्यान पुण्याहून गोडसे भटजी नावाचे एक भिक्षुकी करणारे इसम तत्कालीन उत्तर भारतात तीर्थयात्रेस गेले आणि उठावाच्या रणधुमाळीत सापडले. तीर्थयात्रेहून परत आल्या नंतर काही वर्षांनी गोडसे भटजींनी 'माझा प्रवास' या नावाने १८५७ च्या उठावा दरम्यान त्यांना आलेल्या अनुभवांची हकीकत लिहिली. गोडसे भटजी हे झाशी येथे असताना झाशीच्या किल्ल्या भोवती झालेल्या लढाईची आणि झाशीच्या किल्ल्यात घुसल्यानंतर इंग्रज फौजेने तेथे केलेल्या अत्याचारांची इत्यंभूत माहिती 'माझा प्रवास' या ग्रंथात मिळते. १८५७ च्या उठावात राजेराजवाडे, सेनापती यांच्या शौर्याची तसेच युद्धांची वर्णने आपणास राष्ट्रवादी इतिहासलेखनात आढळतात. मात्र, गोडसे भटजींनी वर्णन केलेल्या सामान्य स्त्री-पुरुषांनी १८५७ च्या उठावात सहन केलेल्या अत्याचारांची आणि यातनांची दखल राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा घेत नाही. १८५७ च्या उठावात भाग घेतलेले हजारो अज्ञात सैनिक, मारलेले गेले लाखो सामान्य स्त्री-पुरुष आणि या काळात हालपेष्टा, यातना, अत्याचार सहन करणारे कोट्यावधी लोक हे १८५७ च्या उठावाच्या इतिहासाचे भाग नव्हेत का ? राजेरजवाडे, सेनापती या समाजातील वरच्या थरातील लोकांना इतिहासात महत्त्वाचे स्थान मिळाले, मात्र सर्वसामान्य लोक आणि सैनिक हे समाजाच्या तळातील घटक असल्यामुळे त्यांच्याकडे इतिहासलेखन करताना दुर्लक्ष्य झाले अथवा केले गेले. त्याच पद्धतीने भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात राष्ट्रीय सभा आणि सशस्त्र क्रांतिकारक गट यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान महत्वाचे मानले जाते. मात्र, त्याचवेळी शेतकरी, कष्टकरी, दलित आणि आदिवासी यांनी विविध मुद्दयांवर वसाहतिक शासनाशी केलेल्या संघर्षाला आधुनिक भारताच्या इतिहासात म्हणावे तेवढे स्थान मिळालेले नाही. अशाप्रकारे समाजाच्या तळाशी असणाऱ्या दुर्लक्षित घटकांच्या दृष्टीकोनातून केल्या जाणाऱ्या इतिहासलेखन परंपरेस ङ्गतळाकडून इतिहासलेखन परंपराफ असे म्हटले जाते. म्हणजेच 'तळाकडून इतिहास' हे एकप्रकारचे इतिहासलेखन असून त्यात ऐतिहासिक घटनांच्या बद्दल लिहिताना इतिहास प्रसिद्ध व्यक्तींच्या तसेच अभिजन वर्गाच्या ऐवजी सामान्य लोकांच्या बद्दल आणि त्यांच्या दृष्टीकोनातून लिहिला जातो. या इतिहासलेखन परंपरेमध्ये अधिकारविहीन लोक, कष्टकरी, शेतकरी, गरीब-दरिद्री लोक, असहमती दर्शवणारे लोक आणि परिघाबाहेरचे समाज घटक यांच्या इतिहासावर भर दिलेला दिसून येतो.

**ल्युसिन फेबव्र (१८७८-१९५६)** या फ्रेंच ॲनाल्स इतिहासलेखन परंपरेच्या सुप्रसिद्ध इतिहासकाराने पहिल्यांदा 'तळाकडून दिसणारा इतिहास' अशा अर्थाचा शब्दप्रयोग केला. फ्रेंच इतिहासकार आल्बर्ट मॅथेज यांच्या जनसामान्यांचा इतिहास लिहिण्याच्या उपक्रमावर भाष्य करत असताना १९३२ साली ल्युसिन फेबव्र

यांनी 'वरून नव्हे तर तळाकडून दिसणारा इतिहास' अशी संकल्पना मांडली. पुढील काळात ई. पी. थॉम्पसन या ब्रिटीश मार्क्सवादी इतिहासकाराने लिहिलेला "History from Below' या शीर्षकाचा लेख १९६६ मध्ये "The Times Literary Supplement' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित झाला. इ.स. १९७० नंतर 'तळाकडून इतिहासा'चा दृष्टीकोन इतिहासकारांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला. त्या अनुषंगाने युरोप आणि अमेरिकेत सामान्य नागरिक, कष्टकरी, कामगार यांच्या दृष्टीकोनातून इतिहास लिहिला जावू लागला.

अमेरिकन इतिहासकार हॉवर्ड झिन यांनी "A People's History of the United States' हा ग्रंथ १९८० मध्ये लिहिला. ज्यामध्ये सर्वसामान्य अमेरिकन नागरिक, अमेरिकेतली आफ्रिकन वंशाचे गुलाम, अमेरिकेचे मुळचे रेड इंडियन्स, अमेरिकेतली कामगार, अमेरिकेतली स्त्रिया इत्यादी समाज घटकांच्या शोषणाचा आणि मोजक्या संख्येने असलेल्या उच्च वर्गाच्या जुलमी-शोषक सत्तेचा इतिहास हॉवर्ड झिन यांनी समोर आणला. आपल्या ग्रंथात इतिहासविषयक भूमिका मांडताना हॉवर्ड झिन असे म्हणतात की, 'जगातील कोणत्याही देशाचा इतिहास, जो एखाद्या घराण्याचा अथवा वंशाचा इतिहास म्हणून मांडला जातो, तो हितसंबंधांच्या तीव्र संघर्षाला लपवत असतो. हा संघर्ष जेता आणि जित, मालक आणि गुलाम, भांडवलदार आणि कामगार तसेच वंश आणि लिंगभावाच्या दृष्टीकोनातून वर्चस्व गाजवणारे (वर्चस्वी) आणि वर्चस्वाखाली राहणारे (अंकित) मानलेल्या घटकांमध्ये असतो. अशा संघर्षमय जगात, ज्यात बळी जाणारे आणि बळी घेणारे आहेत, त्यात विचारी लोकांचे कर्तव्य आहे कि त्यांनी बळी घेणाऱ्यांच्या बाजूने उभे राहू नये.' म्हणजेच हॉवर्ड झिन सुचवतात की इतिहासकाराने इतिहासलेखन करताना शोषितांच्या दृष्टीकोनातून तसेच शोषितांच्या बाजूने इतिहासलेखन करावे.

आरंभीच नमूद केल्याप्रमाणे भारताच्या इतिहासलेखनामध्ये राजेराजवाडे, थोर व्यक्तींचे कर्तृत्व, संस्कृतींचा उदयास्त, राज्यांचा उदयास्त इत्यादी विषयांच्या इतिहासावर मोठ्याप्रमाणात भर दिल्याचे दिसून येते. समाजाच्या वरच्या वर्गातील घटकांचाच इतिहास यातून पुढे आल्याचे स्पष्ट आहे. त्याचीच प्रतिक्रिया म्हणून भारतामध्ये 'तळाकडून इतिहासा'च्या परंपरा अब्राम्हणी, स्त्रीवादी व सबालटर्न इतिहासलेखन परंपरेच्या स्वरूपात उदयास आल्या. युरोप व अमेरिकेत सामाजिक स्तर ठरताना वर्ग, वंश/रंग, लिंग या कोटी महत्त्वाच्या ठरत. त्यामुळे युरोप व अमेरिकेत 'तळाकडून इतिहासा'च्या परंपरेत वर्गीय आणि वांशिक दृष्ट्या शोषित ठरलेल्या घटकांचा इतिहास लिहिला गेला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- १**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) प्रत्यक्षार्थवादी विचारसरणी इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित करण्याचे कार्य कोणत्या जर्मन इतिहासकाराने केले ?

(२) पूर्णत: तथ्यांवर आधारित व्यक्तिगत पक्षपाताचा अभाव असणारे तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाणारे तत्त्वज्ञान कोणते ?

(३) परंपरागत स्थितीतील राजकीय लिखाणाऐवजी ॲनाल्स विचार प्रवाहाने कोणत्या पद्धतीच्या लिखाणाला सुरूवात केली ?

(४) ॲनाल्स विचार पद्धतीमध्ये 'वर्ल्ड सिस्टिम थेअरी' चे जनक कोण होते ?

(५) "A People's History of the United State' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) फ्रान्समध्ये ............ या लेखकाने प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाची मांडणी केली.

(२) संपूर्ण इतिहास म्हणून ............ हा इतिहास प्रवाह ओळखला जातो.

(३) भारतामध्ये ॲनल्स इतिहास संशोधन पद्धतीचा अवलंब सर्वप्रथम............ यांनी केला.

(४) युरोप व अमेरिकेत 'तळाकडून इतिहासा'च्या परंपरेत ............ आणि ............ दृष्ट्या शोषित ठरलेल्या घटकांचा इतिहास लिहिला गेला.

(५) ............ या ब्रिटीश मार्क्सवादी इतिहासकाराने "History from Below' या शीर्षकाचा लेख लिहिला.

### **४.२.२ भारतीय इतिहासलेखन परंपरा – भाग १ : वासाहतिक, मार्क्सवादी, राष्ट्रवादी** (Indian I : Colonial, Marxist, Nationalist)

प्रस्तुत घटकामध्ये आतापर्यंत आपण युरोपमधील आधुनिक इतिहासलेखन परंपरेची माहिती घेतली. आता आपण भारतातील आधुनिक इतिहासलेखन परंपरांची माहिती घेणार आहोत. ब्रिटीश सत्तेच्या आगमनापूर्वी भारतात इतिहासलेखनाची परंपरा नव्हती, असे मानले जात होते. याउलट इतिहास-पुराण, फारसी इतिहासलेखन परंपरा, अखबारात तसेच बखर लेखनपरंपरा इत्यादीं सारख्या इतिहाससदृश अथवा भूतकाळासंबंधीचे लेखन करणाऱ्या परंपरा भारतात अस्तित्वात होत्या. मात्र, प्रबोधन काळात युरोपात उदयाला आलेल्या इतिहासलेखनाप्रमाणे शास्त्रशुद्ध पद्धतीचे आधुनिक इतिहासलेखन हे भारतात वासाहतिक काळातच सुरु झाले हे स्पष्ट आहे.

भारताच्या संदर्भात इतिहासलेखनाचा आरंभ आणि विकास हा विविध इतिहासकारांच्या विविध वैचारिक दृष्टीकोनांच्या अनुषंगाने झाला. इतिहासकराचा दृष्टीकोन हा त्याच्या इतिहासविषयक आकलनावर प्रभाव टाकत असतो. त्यामुळे ऐतिहासिक घटनांची कारणमीमांसा करताना इतिहासकाराचा इतिहासविषयक दृष्टीकोन हा अत्यंत प्रभावी ठरतो. आधुनिक भारतीय इतिहासलेखन देखील याला अपवाद नाही. त्यामुळे विविध इतिहासकारांच्या भारताच्या इतिहासविषयक दृष्टिकोनांमुळे भारतातील आधुनिक इतिहासलेखन परंपरा या स्थूलमानाने तीन प्रवाहात विभागल्या जातात. वासाहतिक इतिहासलेखन परंपरा, राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा आणि मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरा अशी भारतीय इतिहासलेखन परंपरेची विभागणी केली जाते. आधुनिक भारतीय इतिहासलेखनाच्या या तीन मुख्य परंपरांचा आढावा आपण घेणार आहोत.

**(अ) वासाहतिक** (Colonial) **इतिहासलेखन परंपरा**

ब्रिटीश प्रशासक आणि इतिहासकार यांनी भारतासंबंधीच्या आकर्षणामुळे, वसाहातिक सत्तेच्या गरजेपोटी तसेच तिच्या समर्थनाकरिता इतिहासलेखन केले. या दृष्टीकोनातून केलेल्या इतिहासलेखनाला ङ्गवासाहतिक इतिहासलेखन परंपराफ म्हणून ओळखले जाते. वसाहतिक इतिहासलेखन परंपरेचे 'पौर्वात्यवादी परंपरा', 'साम्राज्यवादी परंपरा' आणि 'केंब्रिज परंपरा' असे तीन प्रवाह मानले जातात.

**(१) पौर्वात्यवादी** (Orientalist) **परंपरा :**

पौर्वात्यवाद, इंडोलॉजी आणि प्राच्यविद्या: प्राचिन काळापासून पौर्वात्य जगाविषयी म्हणजेच पूर्वेकडील प्रदेशाबद्दल पाश्चात्य जगतात कमालीचे कुतूहल मिश्रित आकर्षण होते. आशियात प्रवासकरून येणाऱ्या मार्को पोलो सारख्या पाश्चात्य प्रवाशांच्या प्रवासवर्णनामुळे आणि ख्रिश्चन मिशनरींच्यामुळे युरोपात पूर्वेकडील जगताची थोडीफार माहिती पोहचत असे. पुढे या प्रदेशात व्यापारासाठी आलेल्या पाश्चात्य व्यापाऱ्यांना या प्रदेशाची भौगोलिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी बाबींची माहिती करून घेण्याची आवश्यकता वाटू लागली. यातूनच पौर्वात्यवादाचा आणि पौर्वात्य विद्याभ्यासाचा उगम झाला. लॅटीन भाषेत पूर्वेला "Oriens' असे म्हणतात, या शब्दावरून इंग्रजी भाषेत पूर्वेकडील जगताला "Orient' म्हणत असत. यावरूनच पूर्वेकडील जगताच्या अभ्यासासाठी "Orientalism' म्हणजेच 'पौर्वात्यवाद' हा शब्द रूढ झाला.

अठराव्या शतकाच्या मध्यावर भारतात ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्ता स्थापन झाल्यानंतर पौर्वात्यवादी दृष्टीकोनातून भारताच्या अध्ययनास सुरुवात झाली. भारतासंबंधीच्या पौर्वात्यवादी अध्ययनास "Indology' किंवा 'भारतविद्या' असे म्हणतात. भारताच्या या पौर्वात्यवादी अभ्यासात प्राचिन भारतीय विद्यांचा अभ्यासावर अतिशय भर देण्यात आला त्यामुळे त्याला ङ्गप्राच्यविद्याफ असे देखील म्हटले जाते.

**पौर्वात्यवादी** (Orientalist) **परंपरेचा आरंभ :** सुरवातीच्या काळात धर्मप्रसारासाठी आलेले ख्रिश्चन मिशनरी आणि व्यापारासाठी आलेले व्यापारी यांना भारताच्या संबंधी ज्ञानाची आवश्यकता भासायची. भारतासंबंधी ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करण्यात जेसुईट मिशनरी आणि श्रीरामपूर येथील मिशनरी आघाडीवर होते. कोणत्या ही प्रदेशातील लोकांविषयी जाणून घ्यायचे असेल तर त्यांच्या भाषेचे ज्ञान असणे आवश्यक असते. भारतात वेद, उपनिषदे, तसेच रामायण आणि महाभारत सारख्या महाकाव्यांची रचना झाली होती. हे प्राचीन साहित्य मुख्यत: संस्कृत भाषेत रचले गेले होते. त्यामुळे या ग्रंथांचा अभ्यास तथा भाषांतर करण्यासाठी पौर्वात्यवादी विद्वानांनी संस्कृतचा अभ्यास केला. धर्मप्रसारासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान आवश्यक होते, त्यामुळेच श्रीरामपूर येथील मिशनरींनी भारतातील स्थानिक भाषांचा देखील अभ्यास केला. श्रीरामपूर येथील मिशनरी विल्यम कॅरी यांनी रामायण सारख्या प्राचीन संस्कृत साहित्याचे इंग्रजीत भाषांतर केले तसेच 'बायबल'चे बंगाली, मराठी, ओरिया, संस्कृत इत्यादी स्थानिक भाषेत भाषांतर केले. मराठी भाषेच्या व्याकरणाचे पहिले पुस्तक प्रकाशित करण्याच्या मान विल्यम कॅरी यांना जातो.

पौर्वात्यवादी इतिहासलेखन: धर्मप्रसारासाठी ज्या प्रमाणे विशिष्ठ प्रदेशातील लोकांच्या संस्कृती, धार्मिक समजुती, समाज रचना यांची माहिती आवश्यक होती, त्याच प्रमाणे त्या प्रदेशाच्या प्रशासनासाठी देखील अशा माहितीची आवश्यकता होती. भारतात ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेची स्थापना झाल्यानंतर अशा प्रकारच्या ज्ञानाची गरज वाढली. कंपनीची भारतातील सत्ता सुदृढ करण्यासाठी भारताच्या इतिहासाचे ज्ञान आवश्यक होते. ईस्ट इंडिया कंपनीचे भारतातील प्रशासक आणि अधिकाऱ्यांनी भारताच्या इतिहासाचे अध्ययन करण्यास सुरवात केली. यातूनच भारतासंबंधी आधुनिक भारतीय इतिहास लेखनाचा आरंभ अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. भारताच्या प्राचीन इतिहास आणि संस्कृतीबद्दल जिज्ञासा आणि आकर्षण असलेला पौर्वात्यवादी इतिहासलेखन हा आधुनिक भारतीय इतिहासलेखनाचा आरंभिक प्रवाह होता.

पौर्वात्यवादी इतिहासलेखन हे साधारणत: इ.स. १७७० पासून सक्रिय झाल्याचे दिसून येते. या काळात इंग्रज अधिकाऱ्यांनी संस्कृत आणि फारसी भाषांचा अभ्यास सुरु केला. बंगालच्या तत्कालीन गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टिंग्ज याने फारसी भाषेचा अभ्यास केला. ह्या भाषेच्या अध्ययनाला प्रोत्साहन देण्यासाठी हेस्टिंग्जने इ.स.१७८१ मध्ये कलकत्यात मदरसा स्थापन केला. बनारस येथे ईस्ट इंडिया कंपनीचा रेसिडंट म्हणून काम करणाऱ्या जोनाथन डंकन याने प्राचीन भारतीय विद्येच्या पुनरुज्जीवनास प्रोत्साहन दिले आणि इ.स. १७९१ मध्ये संस्कृत पाठशाळा स्थापन केली. चार्ल्स विल्किन्स याने संस्कृतचे अध्ययन करून गीतेचा इंग्रजी अनुवाद केला.

इ.स. १७६९ साली ईस्ट इंडिया कंपनीने रॉबर्ट ऑर्म याची अधिकृत इतिहासलेखक म्हणून नियुक्ती झाली. त्याने 'A History of the Military Transactions of the British Nation in Hindostan' आणि "Historical Fragments of Mughal Empire, of the Marathas and of the English concerns in Hindostan' हे ग्रंथ लिहून पूर्ण केले. रॉबर्ट ऑर्म प्रमाणेच विल्यम रॉबर्टसन आणि फ्रान्सिस ग्लाडविन यांनी भारताचा इतिहास लिहून प्रकाशित केला.

**सर विल्यम जोन्स आणि 'एशियाटिक सोसायटी' :** पौर्वात्यवादी अथवा प्राच्यवादी इतिहासाचा महत्वपूर्ण टप्पा सर विल्यम जोन्स यांच्या कार्यकिर्दीत गाठला गेला. कलकत्याच्या न्यायालयाचे पहिले न्यायाधीश म्हणून त्यांची इ.स. १७८३ मध्ये नियुक्ती झाली. त्यांनी कालिदासचे 'शाकुंतल', जयदेव कवीचे 'गीतगोविंद' आणि 'मनुस्मृती' या ग्रंथांचा इंग्रजी अनुवाद केला. विल्यम जोन्स यांची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे इ.स.१७८४ साली गव्हर्नर जनरलच्या पाठींब्याने त्यांनी कलकत्याला 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' ची केलेली स्थापना होय. प्राचीन भारतीय विद्येच्या, वाङ्मयाच्या आणि इतिहासाच्या संशोधनाला प्रोत्साहन देणे ही या संस्थेची मुख्य उद्दिष्ट्ये होती. संशोधनाला प्रोत्साहन देण्याकरिता आणि त्यांच्या प्रसाराकरिता या संस्थेमार्फत चर्चासत्रांचे आयोजित केले जात तसेच हे संशोधनपर लेख प्रकाशित देखील केले जात. या लेखांच्या प्रकाशनासाठी संस्थेमार्फत 'द जर्नल ऑफ द एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालफ या नावाचे एक नियतकालिक देखील सुरु झाले. ही संस्था प्राच्यविद्येच्या संशोधनाचे मुख्य केंद्र म्हणून ओळखली जाऊ लागली आणि या संस्थेसारख्या संस्था इतर प्रांतात सुरु झाल्या. मुंबई येथे

एशियाटिक सोसायटी सारखीच ङ्गलिटररी सोसायटी ऑफ बॉम्बेफ ही संस्था सर जेम्स मॅककिंटोश या मुंबईच्या मुख्य न्यायाधीशांनी इ.स. १८०४ मध्ये स्थापन केली. ही संस्था पुढे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे' या नावाने ओळखली जाऊ लागली.

विल्यम जोन्स यांनी या संस्थेच्या बैठकीत संस्कृत, फारसी आणि प्राचीन युरोपीय भाषा यांचा तौलनिक अध्ययन करून त्यातील सारखेपणा दाखवून या भाषांचे प्राचीन उगम स्थान ही एकच अतिप्राचीन भाषा असावी असा सिद्धांत मांडला. ही मूळभाषा बोलणारे लोक हे एकाच वंशाचे म्हणजे आर्य वंशाचे असावेत आणि काळाच्या ओघात ते भिन्न प्रदेशात विभागले गेले आणि त्यांचे काही गट भारतात तसेच युरोपात आले असावेत असा सिद्धांत त्यांनी मांडला. विल्यम जोन्स यांनी ग्रीक इतिहास आणि प्राचीन भारतीय वाङ्मय यांच्या तौलनिक अभ्यासातून चंद्रगुप्त मौर्य याचा काळ इ.स.पूर्व ३२५ असा निश्चित केला. त्यामुळे भारतीय इतिहासातील कालनिश्चिती करणे सोपे झाले.

**हेन्री कोलब्रूक :** अगदी तरुण असताना कंपनीच्या सेवेत रुजू झालेल्या हेन्री कोलब्रूकने बनारस येथे संस्कृत भाषेचे अध्ययन केले. त्याने विज्ञानेश्वराचे 'मिताक्षर' आणि जीमूतवहनच्या 'दायभाग' या हिंदू कायदेविषयक ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर केले. वेदांचा अभ्यास करून त्याने त्यांच्यावर दीर्घ लेख लिहिला. या लेखात वेदकालीन समाजाचे गौरवशाली प्रस्तुतीकरण केले. त्याने जैन, बौद्ध धर्मांवर स्वतंत्र लेख लिहिले. हेन्री कोलब्रूक यांच्या संस्कृत भाषेच्या गाढ्या अभ्यासामुळे त्यांना मसंस्कृतचा युरोपातील पहिला महान विद्वानफ म्हणून ओळखले जाते.

**होरेस विल्सन :** इ.स.१८०८ मध्ये भारतात आलेला होरेस विल्सन हा व्यवसायाने डॉक्टर होता. त्याने संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करून कालिदासच्या 'मेघदूत' चा इंग्रजी अनुवाद केला. कल्हणच्या ङ्गरजतरंगिनीफ्वर भाष्य करत काश्मीरच्या इतिहासाचा कालानुक्रम निर्धारित केला. 'विष्णुपुराण' या सुप्रसिद्ध पुराणावर संशोधकीय लेख लिहिले. टांकसाळीवर काम केल्याचा अनुभव असलेल्या विल्सनने भारतीय नाणकशास्त्रावर देखील संशोधकीय लेख लिहिले.

**जेम्स प्रिन्सेप :** जेम्स प्रिन्सेप हा ईस्ट इंडिया कंपनीच्या टांकसाळीत अधिकारी म्हणून नियुक्त होता. जेम्स प्रिन्सेपला पुरातत्त्वशास्त्रात आणि उत्खननात रस होता. प्रिन्सेप यांनी एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालच्या संशोधकीय नियतकालिकेचे संपादक म्हणून देखील काम पहिले होते. या दरम्यान भारताच्या विविध भागातून नाणी आणि शिलालेख जेम्स प्रिन्सेप कडे वाचन, भाषांतर आणि प्रकाशनासाठी येत असत. यात बहुतांश मजकूर हा ब्राम्ही आणि खरोष्टी लिपीतील असे, ज्यांचा तोपर्यंत उलगडा झाला नव्हता. नॉर्वेचे संशोधक ख्रिश्चन लेसन यांनी इंडो-ग्रीक राजांच्या नाण्यांच्या आधारे काही ब्राम्ही अक्षरे ओळखली होती. त्यानंतर शिल्लक राहिलेल्या सर्व अक्षरांचा उलगडा जेम्स प्रिन्सेपने मेजर कनिंगहॅमच्या मदतीने पूर्ण केला. इ.स. १८३६-३८ दरम्यान भारताच्या विविध भागातील शिलालेखांचे वाचन करून जेम्स प्रिन्सेपने विविध संशोधकीय लेखांच्या स्वरूपात प्रकाशित केले. भारतातील विविध शिलालेख आणि नाण्यांवरील लेखांवर 'देवानामप्रिय पियदसी' असा एका शासकाचा उल्लेख मिळत असे. जेम्स प्रिन्सेपला हा कोणीतरी

श्रीलंका येथील राजा असावा असे वाटत होते. मात्र पुढे  फिलीप टर्नऑरने श्रीलंकेहून पाठलेल्या पाली ग्रंथावरून ही पदवी मौर्य सम्राट अशोकची असल्याचा जेम्स प्रिन्सेपला उलगडा झाला. या शोधामुळे देशभर विखुरलेले हे शिलालेख सम्राट अशोकचे असल्याचे सिद्ध झाले.

**सर अलेक्झांडर कनिंगहॅम :** ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात इंजिनियरींग विभागात अधिकारी असणाऱ्या अलेक्झांडर कनिंगहॅम यांना  ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीय संशोधनाची प्रचंड आवड होती. सैन्यातील नोकरीमुळे भारतातील विविध ठिकाणी त्यांच्या बदल्या होत असत. या बदल्यांच्या दरम्यान त्यांनी भारतातील अनेक प्राचीन  स्थळांचा दौरा केला. त्यांनी सारनाथ, संकासा आणि सांची येथे पुरातत्त्वीय उत्खनन केले. पुरातत्त्वीय अवशेषांच्या आधारावर बौध्द धर्माचा इतिहास त्यांनी आपल्या 'The Bhilsa Topes'(१८५४) या ग्रंथातून मांडला. त्याचा बरोबर प्राचीन  भारतातील ऐतिहासिक स्थळांची भौगोलिक माहिती देणारा ग्रंथ 'Ancient Geography of India' (१८७१) हा ग्रंथ एखील त्यांनी प्रकाशित केला. तक्षशीला, श्रावस्ती, कौसांबी, वैशाली आणि नालंदा इत्यादी प्राचीन स्थळांची स्थाननिश्चिती करण्याचे श्रेय कनिंगहॅम यांना जाते. सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांच्या पुरातत्त्वीय संशोधनातील ज्ञानामुळे "Archaeological Survey of India' या संस्थेचे  पहिले संचालक म्हणून इ.स. १८७१ सालीत्यांची नेमणूक करण्यात आली.

**मॅक्स मुल्लर :** इंग्रज अभ्यासकांप्रमाणे अनक्वेटील ड्यूपराँ, युजीन बरनॉफ, ऱ्हीस डेव्हिस सारखे इतर युरोपीय राष्ट्रातील अभ्यासक देखील प्राच्यविद्येकडे वळले. या युरोपीय विद्वानांमध्ये जर्मनीच्या मॅक्स मुल्लर यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. मॅक्स मुल्लर हे ऑक्सफोर्ड विद्यापीठात तौलनिक तत्त्वज्ञानाचे अध्यापक होते. संस्कृतचे चांगले ज्ञान असलेल्या मुल्लर यांनी पौर्वात्य जगतातील धर्मांचा तौलनिक अभ्यास केला होता. पूर्वेकडील सुमारे पन्नास धार्मिक ग्रंथांचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला जो "The  Sacred Books of the East' या नावाने प्रसिद्धी पावला. 'आर्य हे बाहेरून भारतात आले' हा सिद्धांत मॅक्स मुल्लर यांनी उचलून धरला.

**पौर्वात्यवादी परंपरेचे मूल्यमापन :** पौर्वात्य जगाविषयीच्या आकर्षणाने आणि कुतूहलामुळे प्रेरित विद्वानाच्या संशोधनामुळे बऱ्याच प्रमाणात अज्ञात असलेल्या भारतीय इतिहासाचा आणि संस्कृतीच्या अभ्यासास गती मिळाली. त्यातून प्राचिन भारताविषयीचे ज्ञान नव्या पिढीला उपलब्ध झाले. प्राचिन भारतीय साहित्याचे आणि तत्वज्ञानाचे इंग्रजीत भाषांतर झाल्यामुळे युरोपीय जगाला भारताचा नव्याने परिचय झाला. युरोपातील सर्वसामान्य समजुती प्रमाणे भारतातील लोक मागासलेले व रानटी नसून प्राचिन भारतीय संस्कृती अतिशय प्रगत होती याची युरोपीय लोकांना जाणीव झाली.

पौर्वात्यवादी परंपरेच्या संशोधनामुळे ब्राम्ही, खरोष्टी सारख्या लिपींचा उलगडा होऊन प्राचिन भारताच्या इतिहास संशोधनाची नवी कवाडे खुली झाली. या संशोधकांनी केलेल्या कालनिश्चितीमुळे घटनांची संगतवार मांडणी करणे शक्य झाले. पुरातत्त्वीय शोधांमुळे प्राचिन इमारती, स्तूप, गुहाशिल्प, चित्रकला यांतील प्राचिन भारतीयांची प्रगती समोर येऊन भारतीय संस्कृतीची संपन्नता जगासमोर आली.

पौर्वात्यवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहास आणि संस्कृती यांचा गौरवशाली भूतकाळ समोर आणल्यामुळे भारतीय अभ्यासकांना देखील प्राचिन भारतीय इतिहास आणि संस्कृतीच्या अभ्यासाची प्रेरणा मिळाली. भारतीय अस्मिता जागरूक होण्यात पौर्वात्यवादी इतिहासलेखनातील भारताचे गौरवीकरण तर थोडे फार कारणीभूत ठरलेच पण त्याच बरोबर भारतीय अस्मिता जागृत झाल्याने अनेक भारतीय प्राच्यविद्या अभ्यासाकडे वळले.

पौर्वात्यवादी इतिहासलेखन परंपरेने जसे काही लाभकार गोष्टी घडल्या तश्याच काही नकारात्मक गोष्टी देखील घडल्या. पौर्वात्यवादी इतिहासलेखन परंपरेतून मांडले गेलेले घाटीते, विचार आणि सिद्धांत इतकी रूढ आणि प्रचलित झाली की भारतीयांना देखील त्यांच्याच नजरेतून इतिहासाकडे पाहावे लागले. वैदिक संस्कृती ही आर्यांची संस्कृती होती, आर्य बाहेरून आले होते आणि आर्य श्रेष्ठ होते अशा सिद्धांकनामुळे आर्य श्रेष्ठत्वाचा दुराभिमान तर वाढलाच त्याच बरोबर द्रविड संस्कृतीला मागास समजण्याची प्रवृत्ती देखील वाढली. या मुळे आर्य विरुद्ध द्रविड अशा संघर्षाची देखील मांडणी केली जाऊ लागली. पौर्वात्यवादी परंपरेने प्राचीन भारतीय ज्ञानाच्या केलेल्या गौरवीकरणामुळे प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभिमानाला दुराभिमानाचे स्वरूप आले.

**(२) साम्राज्यवादी** (Imperialist) **परंपरा :**

साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा आरंभ : भारताच्या प्राचिन इतिहास आणि संस्कृतीचे गौरवीकरण करणारा पौर्वात्यवादी इतिहासलेखन प्रवाह अठराव्या शतकाच्या अखेरीस क्षीण होऊ लागला. अठराव्या शतकाच्या अखेरीस भारताच्या बहुतांश भागात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली होती. संपूर्ण भारतावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून ते दृढमूल करण्याच्या दृष्टीने इंग्रजांच्या साम्राज्यवादी आकांक्षा वाढीस लागल्या. आपली सत्ता दीर्घकाळ राहावी यासाठी भारतीय लोक इंग्रजांची सत्ता बिनविरोध मान्य करतील अशी उपाययोजना करणे इंग्रजांना आवश्यक होते. शस्त्राच्या बळावर अशा प्रकारचे वर्चस्व दीर्घकालिक राहू शकत नाहीत, त्यामुळे भारतीयांवरील इंग्रजांच्या सत्तेला तार्किक आधार देणे गरजेचे होते. हा तात्विक आधार इंग्रजांना भारतीयांच्या तुलनेत श्रेष्ठ ठरवत जेता त्यांना भारतीयांवर सत्ता गाजवण्याचा नैतिक अधिकार असल्याचे ठासून सांगणारा असायला हवा होता. जेरमी बेन्थेमचा 'उपयुक्ततावाद, इव्हेंजेलिकल्स (Evangelicals) अर्थात शुभवर्तमानवादी ख्रिस्ती धर्मसंप्रदायाचा प्रभाव, चार्ल्स डार्विनच्या उत्क्रांतिच्या सिद्धांतावर आधारित 'सामाजिक डार्विनवाद' आणि गौरवर्णाच्या श्रेष्ठत्वाच्या वंशवादी सिद्धांत अशा विभिन्न वैचारिक दृष्टीकोनानी इंग्रजांच्या भारतावरील सत्तेच्या तात्विक आधाराला आकार दिला. साम्राज्यवादाच्या हा तात्विक आधार मुख्यत: पाच गृहीतकांवर आधारलेला होता.

(१) भारतीय समाज हा मागसलेला, अप्रगत, गतिहीन आणि रानटी समाज होता. तसेच येथील संस्था आणि व्यवस्था ह्या कालबाह्य झाल्यामुळे उपयुक्तता आणि बुद्धिप्रामाण्य यांच्या आधारावर भारतात आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

(२) बौद्धिक, शास्त्रीय आणि भौतिक प्रगतीमुळे इंग्लंड हे श्रेष्ठ व प्रगत राष्ट्र बनले आहे. भारतासारख्या मागासलेल्या देशात उपयुक्तावादाच्या निकषावर भारताची व्यवस्था लावणे आवश्यक आहे. भारताचे सत्ताधीश बनलेल्या इंग्रजांनी कायद्याच्या, प्रशासनाच्या आणि पाश्चात्य शिक्षणाच्या आधारे अशी व्यवस्था निर्माण करावयास हवी.

(३) इंग्लंड हे प्रगत आणि सुसंस्कृत राष्ट्र असल्यामुळे भारतासारख्या मागासलेल्या समाजांना सुसंस्कृत करण्याचे आणि त्यांच्या उत्थानाचे कार्य ईश्वराने इंग्रजांवर सोपवली आहे.

(४) भारतीय समाज दुबळा आणि मागास असल्यामुळे प्रगत आणि बलशाली इंग्लंड सोबतच्या संघर्षात इंग्लंडचा विजय होणे हे 'बळी तो कान पिळी' या निसर्ग नियमानुसार योग्यच आहे.

(५) गौरवर्णीय लोक हे प्रगत आणि काळे लोक अप्रगत असतात. त्यामुळे काळ्या लोकांवर राज्य करण्याचा गौरवर्णीयांना फक्त अधिकार नसून त्यांच्यावर ईश्वराने लादलेली नैतिक जबाबदारी आहे.

अशाप्रकारच्या गृहीतकांच्या आधारे भारतीयांना इंग्रजांच्या तुलनेत कनिष्ठ ठरव, इंग्रजांच्या श्रेष्ठत्वाच्या आधारावर त्यांच्या भारतावरील सत्तेला नैतिक अधिष्ठान देण्याचे कार्य साम्राज्यवादी इतिहासलेखनाने केले.

साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या सुरवातीच्या काळात म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पौर्वात्यवाद आणि साम्राज्यवाद यांचा संमिश्र प्रभाव असलेले काही साम्राज्यवादी इतिहासकार होते. यात माऊंटस्ट्युअर्ट एलफिन्स्टन, ग्रांट डफ आणि जेम्स टॉड सारख्या प्रशासकीय इतिहासकारांचा समावेश होतो. या उलट, जेम्स मिल सारखे इतिहासकार अगदी सुरवातीपासूनच साम्राज्यवादी इतिहासलेखन करत होते आणि १८५७ च्या उठावानंतर इतिहासकारांमधील साम्राज्यवादी भावना अधिक तीव्र होत गेल्याचे दिसून येते.

**जेम्स मिल :** लंडन मध्ये ईस्ट इंडिया कंपनीमध्ये पत्रव्यवहार तपासनीस म्हणून काम करणाऱ्या जेम्स मिल याने भारताला प्रत्यक्ष कधीही भेट न देता भारताचा इतिहास लिहिला. कंपनीच्या भारतासंबंधीच्या पत्रव्यवहारावरून जेम्स मिलचा भारता संबधी दृष्टीकोन बनला होता. पूर्वीचे इतिहासकार, ख्रिश्चन मिशनरी यांनी लिहिलेली माहिती इत्यादींच्या आधारे जेम्स मिलने सन १९०६ साली भारताचा इतिहास लिहिण्यास आरंभ केला. त्याने १८२६ पर्यंत एकूण सहा खंडात "History of British India' शीर्षकाचा ग्रंथ प्रकाशित केला. जेम्स मिलच्या या ग्रंथाला ग्रंथाला इंग्लंड मध्ये मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली. भारतावरील ब्रिटीश सत्तेच्या प्रस्थापनेचे तात्विक समर्थन असल्यामुळे आणि भारतासंबंधी विश्वसनीय ग्रंथ असल्यामुळे कंपनीच्या अधिकाऱ्यांसाठी या ग्रंथाचे वाचन आवश्यक मानले गेले. जेम्स मिल याला 'साम्राज्यवादी इतिहास लेखनाचा जनक' आणि त्याच्या ग्रंथाला 'ब्रिटीश साम्राज्यवादाचे बायबल' मानले जाते.

साम्राज्यवादी विचाराने प्रभावित जेम्स मिलने वर उल्लेखल्या गृहीतकांच्या आधारवर भारतीयांच्या मागासलेपणाची ऐतिहासिक मांडणी करत भारतावरील ब्रिटीश सत्तेचे समर्थन केले. जेम्स मिलने भारताच्या

इतिहासाचे कालविभाजन हिंदू काळ, मुस्लिम काळ आणि ब्रिटीश काळ अशी धार्मिक आधारावर केली. यामुळे भारताच्या इतिहासाची धार्मिक आधारे कालविभाजनाची प्रथा पडली आणि यातच भारताच्या जमातवादी इतिहास लेखनाची मुळे सापडतात. जेम्स मिलने आपल्या ग्रंथात प्राचीन भारतीय संस्कृती आणि हिंदूंची निंदानालस्ती केली. हिंदुना मागास ठरवून मुसलमानांना त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठरविले.आणि सहाजिकच ब्रिटीशांना हिंदू आणि मुस्लिमांपेक्षा श्रेष्ठ ठरवले. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या अनेक पिढ्या मिलच्या साम्राज्यवादी विचारसरणीवर, वंशश्रेष्ठत्वाच्या दंभावर पोसल्या गेल्या.

**हेन्री इलियट :** जेम्स मिल याने आपल्या ग्रंथात प्राचीन भारतीय संस्कृती आणि हिंदूंची निंदानालस्ती केली आणि त्याच्या इतिहासाला विकृत स्वरूप देत मुस्लिमांना त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठरविले. जेम्स मिलच्या अगदी उलट चित्र हेन्री इलियट आणि त्याचा सहलेखक जॉन डाऊसन यांनी रंगवले. ईस्ट इंडिया कंपनीत नोकरीस असलेल्या इलियटने फारसी भाषेचा अभ्यास करून मुस्लिम शासनकाळातील इतिहासाच्या ग्रंथांची हस्तलिखिते एकत्र केली आणि त्यांचे भाषांतर केले. इलियटने ही भाषांतरे "History of India as Told by its Own Historians' या शीर्षकाखाली आठ खंडात प्रकाशित केले. या कामत लंडन येथील प्राध्यापक जॉन डाऊसन याने त्याला सहाय्य केले. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याने भारतातील मुस्लिम शासकांना जुलमी, अत्याचारी ठरवले. मुस्लिम शासकांना अक्षम आणि नालायक ठरवत त्यांना कायद्याच्या राज्याची संकल्पना माहित नसल्याचे प्रतिपादन इलियटने केले. त्यामुळे भारताला पहिल्यांदाच न्यायप्रिय नि:पक्षपाती शासक इंग्रजांच्या रुपात लाभले असून भारतात कायद्याचे राज्य निर्माण करण्याची ऐतिहासिक कार्य ब्रिटीश प्रशासन करत आहे असा निष्कर्ष इलियटने काढला. इलियटच्या अशाप्रकारच्या मांडणीमुळे ब्रिटीश नोकरशाहीत आत्मश्रेष्ठत्वाची भावना वाढीस लागली.

**माऊंट स्टयुअर्ट एलफिन्स्टन :** मुंबई प्रांताचा गव्हर्नर म्हणून काम केलेल्या एलफिन्स्टनचा दृष्टीकोन जेम्स मिल पेक्षा थोडा भिन्न होता. प्रत्यक्ष भारतात काम करून मिळालेला अनुभव आणि पौर्वात्यवादी इतिहासकारांच्या ग्रंथांचा अभ्यास केल्यामुळे जेम्स मिलच्या मांडणीशी एलफिन्स्टनचे मतभेद होते. जेम्स मिलचे लिखाण वस्तुनिष्ठ नसून त्याने प्राचीन भारतीयांचे योग्य मूल्यमापन केले नसल्याची टीका एलफिन्स्टनने केली. इंग्लंडला परतल्या नंतर १८४१ साली एलफिन्स्टनने "History of Hindu and Muhammadan India' या शीर्षकाचा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. भारताच्या राजकीय इतिहासाच्या पेक्षा सांस्कृतिक इतिहासावर भर देऊन भारतातील शासन व्यवस्था, समाजव्यवस्था, चालीरीती, धर्म,साहित्य, तत्त्वज्ञान, कला, व्यापार, परदेशी सागरी व्यापार, उद्योग इत्यादींच्या विषयांवर एलफिन्स्टनने लेखन केले. भारतासंबंधी प्रतिकूल दृष्टीकोन न बाळगता सहानभूतीपूर्वक आणि उदारवादी दृष्टीकोनातून भारताचा इतिहास लिहिला असला तरी भारतावरील ब्रिटीश शासनाची आवश्यकता असल्याचे त्याने प्रतिपादन केले.

एलफिन्स्टनच्या हाताखाली काम केलेल्या ग्रांट डफ आणि जेम्स टॉड यांच्या सारख्या अधिकाऱ्यांच्या इतिहासलेखनावर एलफिन्स्टनच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. साताऱ्यामध्ये रेसिडेंट म्हणून काम करणाऱ्या ग्रांट डफने बखर, कैफियती सारखी मराठ्यांच्या इतिहासाची लिखित साधने गोळा करून त्या आधारे

“History of the Marathas’ हा ग्रंथ दोन खंडात लिहून प्रकाशित केला. जेम्स टॉडने “Annals and Antiquities of Rajastan’ या ग्रंथात राजपुतान्याचा इतिहास मुळ साधनाच्या आधारे मांडला. या दोहोंच्या लिखाणात भारतीयांच्याविषयीचा तुच्छतादर्शक दृष्टीकोन दिसत नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विल्यम हंटर, हेन्री मेन, जेम्स स्टीफन्स, जे.टी. व्हीलर, आल्फ्रेड लायल यांच्या सारख्या साम्राज्यवादी इतिहासकारांनी १८५७च्या उठावानंतर भारताच्या इतिहासासंबंधी विभिन्न विषयांवर लेखन करत ब्रिटीश शासकांची भूमिका अधिक कट्टर साम्राज्यवादी बनवली.

**साम्राज्यवादी इतिहासलेखनाचे मूल्यमापन :** भारतावरील ब्रिटीश सत्ता दीर्घकाळासाठी दृढमूल करण्यासाठी ब्रिटीश साम्राज्यवादाचे तात्विक समर्थन करण्याच्या प्रक्रियेतून साम्राज्यवादी इतिहासलेखन परंपरा विकसित झाली. भारतीयांच्या बाबतीत तुच्छतापूर्ण आणि पूर्वग्रहदुषित दृष्टीकोन ठेऊन भारतीय इतिहासाचे हनन करण्यात आले. भारतीयांना स्वशासन करण्यास नालायक ठरवून ब्रिटीशांच्या सत्तेचे समर्थन करण्यात आले.

साम्राज्यवादी इतिहासकारांनी ऐतिहासिक साधनाचा वापर करत आधुनिक पद्धतीने इतिहासलेखन केले. त्यामुळे त्यांनी मांडलेली मते मोठ्याप्रमाणात विश्वसनीय मानली गेली. भारतीयांच्या मागासलेपणाची मांडणीचा प्रभाव नवशिक्षित भारतीयांच्या सुरवातीच्या पिढीवर पडून भारतीय संस्कृतीविषयी न्युनगंडाची भावना त्यांचा मनात निर्माण झाली. साम्राज्यवादी इतिहासकरांनी भारतीयांच्या मध्ये ऐक्याचा अभाव आणि सततचा धार्मिक संघर्ष असल्याची मांडणी  केली. अशाप्रकारच्या मांडणी मुळे हिंदू-मुस्लिम दुहीची बीजे पेरली गेली ज्याची परिणीती अंतिमत: भारताच्या फाळणीत झाली. साम्राज्यवादी इतिहासकारांच्या भारतासंबंधीच्या पूर्वग्रहदुषित मांडणीचा भारतीयांद्वारे प्रतिवाद करण्याचा आरंभ विसाव्या शतकातील राष्ट्रवादी प्रेरणेतून निर्माण झाला.

### (३) केंब्रिज (Cambridge) परंपरा :

**केंब्रिज परंपरेचा आरंभ :** वासाहतिक शासनाद्वारे भारतीयांचे सर्वांगीण शोषण झाल्यामुळे भारतीयांच्यात राष्ट्रवादी भावना निर्माण होऊन त्यातून भारतीय राष्ट्रवाद विरुद्ध ब्रिटीशांचा साम्राज्यवाद असा संघर्ष उभा राहिला अशी मांडणी आधुनिक भारताच्या राष्ट्रवादी इतिहास लेखनात केली गेली होती. मात्र, भारतातील ब्रिटीश शासन हे भारतीयांना उपकार ठरले, ब्रिटीशांच्या एक छत्री अंमलामुळे भारतात केंद्रीकृत शासन स्थापित झाले, स्थानिक प्रशासनात ब्रिटिशांनी भारतीयांना संधी दिली. या ब्रिटिशांनी केलेल्या या दोन बाबींच्या मुळे भारतीयांत राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. भारतीयांचा स्वातंत्र्यलढा हा ब्रिटीशांच्या विरोधातला संघर्ष नसून भारतीय अभिजनांनी स्वत:च्या हितसंबंधांचे रक्षण आणि सत्तेत वाटा मिळवण्यासाठी चालवलेली चळवळ होती. अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य लढ्याची, भारतीय राष्ट्रवादाची आणि भारतीय राजकारणाची पुनर्व्याख्या करणाऱ्या इतिहास लेखन प्रवाहाला ‘केंब्रिज इतिहास लेखन परंपरा’ म्हणून ओळखले जाते. अशा प्रकारची मांडणी करणाऱ्या इतिहासकारांचे लेख आणि ग्रंथ केंब्रिज विद्यापीठाच्या प्रकाशनाद्वारे आणि मॉडर्न एशियन स्टडीज यास संशोधन पत्रिकेत प्रकाशित होत असत, त्यामुळे त्यांना

'केंब्रिज परंपरा' म्हणून ओळखले जाऊ लागले. नव-साम्राज्यवादाचा प्रभाव असलेली ही परंपरा १९६०च्या दशकापासून १९९०च्या दशकापर्यंत प्रभावी होती.

**अनिल सील:** केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनीटी कॉलेज मध्ये प्राध्यापक म्हणून काम केलेले अनिल सील हे केंब्रिज परंपरेचे अत्यंत महत्वाचे इतिहासकार मानले जातात. "The Emergence of Indian Nationalism: Competition and Collaboration in Nineteenth Century' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथात आणि "Imperialism and Nationalism in India' या सील यांनी भारतीय राष्ट्रवाद ही बहुसंख्य भारतीयांच्या हितसंबंधांसाठी चालवली गेलेली चळवळ होती या मांडणीवर प्रश्न चिन्ह उभे करतात. अनिल सील यांच्या मते, आधुनिक भारताची जडणघडण ही ब्रिटीश साम्राज्यवादाच्या प्रभावामुळे झाली. ब्रिटीशांच्या वसाहतीक सत्तेने निर्माण केलेल्या प्रशासकीय-राजकीय चौकटीत भारतीय राष्ट्रवादी चळवळीची वाढ झाली. भारतीयांचे एकूण राजकारण हे छोट्या छोट्या गटांमधील चढाओढीपुरते मर्यादित होते आणि त्यामुळे भारतीय हे विभाजित राहिले. एका मर्यादेपर्यंत ब्रिटिशांनी 'फोडा व झोडा' नीतिचा अवलंब केला असेल. मात्र, ब्रिटीश हे दुफळी माजवणारे राज्य करते होते असे म्हणता येणार नाही. अशा प्रकारचीफ परोपकारी साम्राज्यवादफ दर्शवणारी मांडणी अनिल सील यांनी केली आहे.

**ख्रिस्तोफर बेली :** केंब्रिज विद्यापीठातील जागतिक आणि भारताच्या इतिहासाचे ख्यातनाम प्राध्यापक म्हणून ख्रिस्तोफर बेली हे ओळखले जातात. अलाहबाद शहराचा, त्याच्या परिसराचा, तिथल्या पारंपारिक अभिजन वर्गाचा, मूल्यव्यवस्था आणि चालीरीतींचा बेली यांनी अभ्यास केला. त्यांच्या मते, ब्रिटीश सत्तेमध्ये उदयाला येणारी राजकीय व्यवस्था ही विभिन्न स्थानिक 'अराजकीय' घडामोडींना सामावून घेण्यास सक्षम होती. राजकीय, आर्थिक व धार्मिक हितसंबंधातील सरमिसळ हे तत्कालीन उत्तर भारताचे वैशिष्ट्य असल्याची मांडणी बेली यांनी केली. ख्रिस्तोफर बेली यांचा "Patrons and Politics in Northern India' हा लेख आणि त्यानंतर प्रकाशित झालेला "The Local Roots of Indian Politics' हा ग्रंथ बेलींची मांडणी समजून घेण्यास उपयुक्त ठरतो.

**गॉर्डन जॉन्सन :** केंब्रिज विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या गॉर्डन जॉन्सन यांनी भारतीय राष्ट्रवादी चळवळीतील प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरांतील चढाओढ ही केवळ वैयक्तिक हेवेदाव्यांतून निर्माण झाल्याची मांडणी आपल्या संशोधनातून केली. भारतीय नेतृत्व हे मुलत: स्थानिक मुद्द्यांभोवतीच घुटमळत असत आणि ब्रिटीशांच्या सौजन्यामुळेच ते राष्ट्रीय स्तरावर क्रियाशील झाले, अशी पुस्ती देखील जॉन्सन जोडतात. गॉर्डन जॉन्सन यांचा "Provincial Politics and Indian Nationalism' हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे.

जॉन गॅलाघर, रिचर्ड गॉर्डन, डेव्हिड वाशब्रूक, ख्रिस्तोफर बेकर, बी. आर. टॉमिल्सन आणि ज्युडिथ ब्राऊन यांनी देखील थोड्याफार फरकाने अनिल सील, सी.ए.बेली, गॉर्डन जॉन्सन यांच्या प्रमाणेच भारतीय राष्ट्रावादासंबंधी मांडणी केली.

**केंब्रिज परंपरेचे मूल्यमापन :** ब्रिटीश साम्राज्यवादाची भलावण करणाऱ्या केंब्रिज इतिहासलेखन परंपरेच्या इतिहासकारांवर इतर इतिहासकारांनी बरीच टीका केली आहे. तरीदेखील केंब्रिज परंपरेच्या

इतिहासकारांचे भारताच्या इतिहासलेखनास सकारात्मक योगदान मिळाल्याचे मान्य करावे लागते. केंब्रिज परंपरेच्या इतिहासकारांनी आधुनिक भारताच्या इतिहासासमोर काही नवीन प्रश्न उभे केले. भारतातील बहुजिनसी राजकारणाचा उगम कसा झाला ? स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय राजकीय संघटनांमध्ये संपर्क कसा विकसित झाला? पारंपारिक स्थानिक अभिजानांकडे सत्ता कशी हस्तांतरित झाली? या प्रश्नांच्या सोबतच केंब्रिज परंपरेने संख्यात्मक व परिस्थितीक विश्लेषण, राजकीय समाजशास्त्र आणि राजकीय चरित्रलेखनासारखी अनेक तंत्रे उपलब्ध करून दिली.

केंब्रिज परंपरेच्या इतिहासलेखनाच्या काही मर्यादा देखील दिसून येतात. केंब्रिज परंपरेच्या संशोधन पद्धतीतील समाजवैज्ञानिक धरणांना व्यापक बैठक नव्हती. भारताच्या विशाल बहुविविधतेला एका चळवळीत जोडून घेण्यातील काँग्रेसच्या यशापयशाची चर्चा ते करत नाहीत. केंब्रिज परंपरेतील अपवाद वगळता बहुतांश लेखकांनी भारतीय साधने संशोधनासाठी वापरलीच नाही. त्यामुळे भारतीयांची बाजू त्यांना नीटपाने समजूनच घेता आली नाही. त्या मुळे ठराविक घटनांना लोकांनी काय व का प्रतिसाद दिला हे त्यांना उमगले नाही. त्यांनी आर्थिक स्वार्थ ही राष्ट्रीय चळवळी मागील मुख्य प्रेरणा असल्याचा संकुचित अर्थ लावला. भारतीय राष्ट्रवादी चळवळीला स्वार्थाने प्रेरित ठरवून टाकल्यामुळे केंब्रिज इतिहासकारांच्या लिखाणात नैतिक अहंगंड जाणवतो.

**(ब) राष्ट्रवादी** (Nationalist) **इतिहासलेखन परंपरा**

१९ व्या शतकात वासाहतिक सत्तेखालील भारतात आधुनिक शिक्षण आणि नोकऱ्यांच्या संधींमुळे मध्यमवर्गाचा उदय झाला. या मध्यमवर्गावरील पाश्चात्य वैचारिक प्रभावातून राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली. वासाहतिक इतिहासलेखनात भारताच्या इतिहासाच्या मांडणीला प्रतिक्रिया म्हणून राष्ट्रवादी दृष्टीकोनातून भारतीय इतिहासलेखनाची परंपरा निर्माण झाली. प्राचिन भारत, मध्ययुगीन भारत आणि आधुनिक भारत यांच्या इतिहासाचे राष्ट्रवादी दृष्टीकोनातून विश्लेषण करून त्याला गौरवशाली भूतकाळाच्या रुपात त्याची मांडणी राष्ट्रवादाने प्रेरित भारतीय इतिहासकारांनी केली. या इतिहासलेखन परंपरेला भारतातील 'राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा' म्हटले जाते.

राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरा ही अत्यंत व्यापक होती. एकोणिसाव्या शतकात तिचा उगम होऊन विविध टप्प्यात आणि विविध उप्रवाहांच्या स्वरूपात विसाव्या शतकात प्रभावी बनली. या परंपरेचे प्राचीन भारत, मध्ययुगीन भारत आणि आधुनिक भारत या तीन काळांसंदर्भातील इतिहासलेखनाचे तीन विभाग करता येतात.

**(१) प्राचिन भारत :** साम्राज्यवादी इतिहासकारांनी प्राचीन भारतीय संस्कृतीची निंदानालस्ती केली होती. प्राचीन भारतात कोणत्याही प्रकारच्या संस्था अस्तित्वात नव्हत्या अशा प्रकारची व्हीधाने त्यांनी केली होती. भारताचा प्राचीन काळ हा अप्रगत आणि रानटी असल्याचे या इतिहासकारांचे मत होते. साम्राज्यवादी इतिहासकारांच्या या विधानांचे खंडन प्राचीन भारतासंबंधी इतिहासलेखन करणाऱ्या राष्ट्रवादी इतिहास्कारणी केले.

**काशीप्रसाद जयस्वाल :** व्यवसायाने वकील असलेल्या काशीप्रसाद जयस्वाल हे प्राचीन भारतीय संस्कृतीच्या वारशाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी इतिहास संशोधन आणि इतिहासलेखनाकाडे वळले. संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवून धर्मशास्त्रीय ग्रंथांचा, कोरीव लेखांचा, प्राचीन नाण्यांचा त्यांनी अभ्यास केला. जयस्वाल यांनी "Hindu Polity' आणि "History of India (150-350 AD)' हे दोन मौलिक ग्रंथ लिहिले. साम्राज्यवादी इतिहासकरांनी भारतात प्राचीनकाळी फक्त निरंकुश राज्यसत्ता होती, कोणत्याही प्रकारच्या प्रातिनिधिक संस्था नव्हत्या अशी मांडणी केली होती. या मांडणीला काशीप्रसाद जयस्वाल यांनी सबळ पुराव्यानिशी छेद दिला. त्यांनी वैदिक काळातील सभा व समिती, बौद्ध संघातील लोकशाहीचे तत्त्व, सोळा महाजनपद मधील गणराज्ये इत्यादीं संस्थांचे प्राचीन भारतातील अस्तित्व सिद्ध करून साम्राज्यवादी इतिहासकारांची मांडणी खोडून टाकली. त्यांच्या लिखाणातून त्यांचा प्रखर राष्ट्रवाद आणि प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभिमान दृष्टीस पडतो.

**राधा कुमुद मुखर्जी :** भारतीयांनी कोणतीही भौतिक व शास्त्रीय प्रगती केली नसल्याचे साम्राज्यवादी इतिहासकारांचे मत राधा कुमुद मुखर्जी यांनी आपल्या विविध ग्रंथातून खोडून काढले. "The History of Indian Shipping Maritime Activity from the earliest Times', "Local Self Government in Ancient India', "Ancient Indian Education', "The Fundamental Unity of India' आणि "The Gupta Empire' इत्यादी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि विविधांगी ऐतिहासिक ग्रंथ मुखर्जी यांनी लिहिले. प्राचीन काळापासून मुघल काळापर्यंत भारतीयांच्या नाविक आणि व्यापारिक हालचाली, भारतातील शिक्षणव्यवस्था, विभिन्न भाषांमधील साहित्यांची निर्मिती, भौगोलिक-राजकीय-सांस्कृतिक ऐक्याची चिन्हे यांची माहिती देत मुखर्जी यांनी भारतीय इतिहासाची राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेत बसणारी मांडणी केली.

**डॉ. राङ्कृष्ण भांडारकर :** संस्कृत, प्राकृत आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्राचा त्यांचा सखोल अभ्यास होता. "The Early History of the Deccan' आणि "A Peep into the Early History of India' हे भांडारकर यांचे सुप्रसिद्ध ग्रंथ आहेत. शास्त्रीय इतिहासलेखनपद्धतीचे पुरस्कर्ते असलेल्या भांडारकरांनी आपल्या ग्रंथांत दखखनच्या आणि भारताच्या इतिहासातील राजकीय घडामोडींसोबतच आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचे देखील चिकित्सक विवेचन केले. प्राच्यविद्येतील संशोधनासाठी सुप्रसिद्ध 'भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट' ही संस्था त्यांच्या कार्याचे प्रतिक आहे.

**डॉ. अनंत सदाशिव आळतेकर :** बनारस हिंदू विद्यापीठात आणि पटना विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक असलेल्या आळतेकरांनी शिलालेख, ताम्रपट, पुरावशेष, नाणी यांचा गाढा अभ्यास केला होता. प्राचीन भारत हा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला होता हा समज आळतेकरांनी "Education in Ancient India' या ग्रंथाच्या माध्यमातून खोडून काढला. प्राचीन काळच्या स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करून प्राचीन काळी स्त्रियांना समाजात वरचा दर्जा होता, मात्र मध्ययुगात धार्मिक रूढी आणि कर्मकांड वाढल्यामुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा घसरत गेला असे त्यांनी प्रतिपादन केले. प्राचीन वाङ्मयाचा सर्वांगीण

अभ्यास करून  प्राचीन भारतात विविध राजकीय संस्थांसोबतच राजसत्तेचे विविध सिद्धांत देखील प्रचलित होते पुराव्यानिशी सिद्ध केले.

**(२) मध्ययुगीन भारत :** साम्राज्यवादी इतिहासलेखनातून प्रचलित झालेले मध्ययुगीन भारतातील मुस्लिम शासनाबाबतचे गैरसमज खोडून काढण्याचा प्रयत्न तसेच भारतीयांच्या दृष्टीकोनातून मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिणाऱ्या राष्ट्रवादी इतिहासकारांनी केला.

**डॉ. महंमद हबीब :** सुप्रतिष्ठित ऑक्सफोर्ड विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या महंमद हबीब यांनी अलिगढ विद्यापीठात प्राध्यापकाची नोकरी केली. मध्ययुगीन भारतातील मुस्लीम शासनाचे सखोल, वस्तुनिष्ठ आणि निधर्मी मांडणी करण्याचे श्रेय महंमद हबीब यांना जाते. महंमद गझनीच्या इतिहासाचे संशोधन करून त्याच्या स्वाऱ्या या मुलतः लुटमार आणि सत्तेकरिता झाल्या होत्या आणि त्यामागे धर्माचा आधार नव्हता, असे मत हबीब यांनी मांडले. हबीब यांनी दिल्लीच्या सुलतानशाहीकाळातील समाजाबद्दल संशोधन करून कामगार आणि शेतकरी जाचातून मुक्त झाल्याने त्याकाळी शहरी आणि ग्रामीण  समाजात क्रांति घडून आली आणि त्यामुळेच मंगोल आक्रमणे परतवून लावणे दिल्लीच्या सुलतानांना शक्य झाले, असा सिद्धांतदेखील हबीब यांनी मांडला. महंमद हबीब यांनी मध्ययुगीन भारताकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली आणि राष्ट्रवादाचा पुरस्कार केला हे त्यांचे मोलाचे योगदान होय.

**के. एम. अशरफ :** के. एम. अशरफ हे मध्ययुगीन भारताच्या विशेषतः सुलतानशाहीच्या इतिहासाचे अभ्यासक होते. “Life and Conditions of the People of Hindustan (1200-1500 AD)’ हा त्यांचा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. सुलतानशाहीतील भारतीय समाजजीवनाचा निधर्मी वृत्तीने अभ्यास करणारे इतिहासकार म्हणून अशरफ ख्याती पावले. मुस्लीम राज्यकर्ते आल्यामुळे भारतीयांच्या दैनंदिन जीवनात कोणताही मुलभूत बदल घडून आला नाही. हिंदू आणि मुसलमानांत संघर्ष झाला नसून सांस्कृतिक समन्वय साधला गेला, अशाप्रकारचे विवेचन अशरफ यांनी केले आहे. मुस्लीम शासकांच्या काळात हिंदू-मुस्लीम संघर्ष झाला. मुस्लीम राज्यकर्ते जुलमी/अत्याचारी होते, त्यांनी इस्लाम धर्म प्रजेवर लादण्याचा प्रयत्न केला, अशा इंग्रज लेखकांच्या आरोपात तथ्य नाहीत व हे आरोप दिशाभूल करणारे आहेत, अशी राष्ट्रवादी भूमिका अशरफ यांनी घेतली.

**सर जदुनाथ सरकार :** मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे वस्तुनिष्ठ आणि मूलगामी संशोधनाचे श्रेय सर जदुनाथ सरकार यांना दिले जाते. इंग्रजी भाषेसोबतच संस्कृत, फारसी, पोर्तुगीज, फ्रेंच आणि मराठी भाषेवर सरकार यांचे प्रभुत्व होते. त्यामुळे मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची विभिन्न भाषेतील  ऐतिहासिक  साधनांचे अध्ययन त्यांना करता आले. आपल्या विषयाशी संबंधित प्रदेशाचा प्रत्यक्ष दौरा करून तेथील भौगोलिक स्थितीचा अभ्यास  जदुनाथ सरकार करत असत. प्रदीर्घ संशोधन आणि मनन केल्यानंतर आपल्या ओघवत्या शैलीत ग्रंथ रूपाने मांडत. जदुनाथ सरकार यांनी “History of Aurangzeb’ हा ग्रंथ पाच खंडात आणि “Fall of the Mughal Empire’ हा चार खंडात लिहिला. हे दोन्ही ग्रंथ मध्ययुगीन भारताच्या इतिहास संशोधनात अत्यंत महत्वाचे मानले जातात. जदुनाथ सरकार यांनी “Shivaji and His Times’ आणि

“House of Shivaji’ सारखे मराठा इतिहाससंबंधी ग्रंथ देखील लिहिले. जदुनाथ सरकारांनी आपली मते परखडपणे मांडल्यामुळे काही मंडळी नाराज झाली. मात्र, भारतीय दृष्टीकोनातून मध्ययुगीन भारताचे वस्तुनिष्ठ चित्रण करण्याचा प्रयत्न म्हणून जदुनाथ सरकार यांचे कार्य मोलाचे ठरते.

**(३) आधुनिक भारत :** आधुनिक भारतासंबंधी इतिहासलेखन करणाऱ्या राष्ट्रवादी इतिहासकारांनी ब्रिटीश शासनाने भारताचे केलेले वसाहतवादी शोषण, भारतातील उद्योगांचा ऱ्हास, ग्रामीण भागात वाढणारी दैन्यावस्था, राष्ट्रीय भावनेचा उदय आणि विकास, भारतीय स्वातंत्र्य लढा आणि त्यातील विविध प्रवाह इत्यादी विविध विषयांचे चिकित्सक विवेचन केले.

**डॉ. रमेशचंद्र दत्त :** प्रशासकीय सेवेत अधिकारी असलेल्या रमेशचंद्र दत्त यांनी काही काळ लंडन विद्यापीठात प्राध्यापकी देखील केली. राष्ट्रवादी विचारांच्या रमेशचंद्र दत्त यांनी भारताच्या आर्थिक स्थितीच्या अभ्यासाकडे लक्ष देत “Economic History of India’ हा ग्रंथ लिहिला. भारताचे ब्रिटीश शासक विभिन्न मार्गांनी भारताचे आर्थिक शोषण करत आहेत आणि त्यामुळे भारताचे आर्थिक दारिद्र्य वाढत आहे अशी मांडणी त्यांनी ब्रिटीश पार्लमेंटची कागदपत्रे, शासकीय कागदपत्रे आणि अहवाल यांच्या आधारे केली. ब्रिटीशांनी भारताला इंग्लंडमधील कारखान्यांसाठीचा कच्चा माल उत्पादन करणारी वसाहत बनवले. त्याचप्रमाणे इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या पक्क्या मालाची विक्री करण्यासाठीची हक्काची बाजारपेठ म्हणून भारताकडे पाहिले. ब्रिटीशांच्या वसाहतीक धोरणाचे या दोन मूळ उद्देशांमुळे भारतातील कृषीव्यवस्थेवर आणि पारंपारिक उद्योगावर अत्यंत अनिष्ठ परिणाम झाले. ब्रिटीशांच्या वसाहतवादी धोरणामुळे भारतीयांचे होणारे शोषण त्यांनी उजागर केले. रमेशचंद्र दत्त यांच्या संशोधनाने दादाभाई नौरोजी यांच्या ‘आर्थिक निस्सारण’च्या सिद्धांताची पुष्टी केली. दत्त यांनी मांडलेला ‘अनौद्योगीकीकारण’चा सिद्धांत आज ही भारताच्या आर्थिक इतिहासात एक सशक्त सिद्धांत म्हणून ओळखला जातो. भारताच्या आर्थिक शोषणाची कारणमीमांसा आणि जाणीव करून देणाऱ्या रमेशचंद्र दत्त यांच्या संशोधनाने भारताच्या राष्ट्रवादाला आर्थिक आधार दिला.

**डॉ. ताराचंद (१८८८–१९७३) :** भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवर संशोधन करणाऱ्या दिग्गज इतिहासकारांत डॉ. ताराचंद यांची गणना केली जाते. डॉ. ताराचंद यांचा “History of Indian Freedom Movement’ हा चार खंडातील ग्रंथ अत्यंत गाजला. या ग्रंथात ब्रिटीश सत्ता स्थापन होण्यापूर्वीची भारताची आर्थिक स्थिती, स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था, पारंपारिक उद्योग व व्यापार यांची माहिती देऊन ब्रिटीशांच्या सत्ता स्थापनेनंतर भारतीयांची दुर्दशा ताराचंद यांनी मांडली. भारतातील राष्ट्रीय प्रबोधन, परंपरांचे आणि अस्मितेचे पुनर्जीवन, राष्ट्रीय नेत्यांचे कार्य, विविध जन–आंदोलने यांच्यावर देखील ताराचंद यांनी प्रकाश टाकला. ब्रिटीशांची कुटनीति आणि ‘फोडा आणि झोडा’ चे धोरण हे भारताच्या फाळणीस जबाबदार ठरले अशी त्यांनी मांडणी केली. स्वातंत्र्य चळवळीवरील ताराचंद यांची मांडणी ही राष्ट्रवादाने प्रेरित असल्याचे दिसून येते. डॉ. ताराचंद यांनी “The influence of Islam on Indian Culture’ या त्यांच्या गाजलेल्या ग्रंथात भारतीय संस्कृती ही केवळ हिंदू संस्कृती नसून, हिंदू आणि इस्लामी संस्कृतीच्या समन्वयातून उत्क्रांत झालेली एक संपन्न संस्कृती आहे, अशी मांडणी पुराव्यांच्या आणि तर्कशुद्धतेच्या आधारावर केली. मूळ

ऐतिहासिक साधनाचा चिकित्सकपणे अभ्यास करून तर्कशुद्ध मांडणी करणारा व्यासंगी राष्ट्रवादी इतिहासकार म्हणून डॉ. ताराचंद ओळखले जातात.

**डॉ. रमेशचंद्र मुजुमदार (१८८४–१९८०) :** शास्त्रशुद्ध आणि चिकित्सक इतिहासलेखन पद्धतीचा वापर करून लेखन करणारे इतिहासकार म्हणून डॉ. रमेशचंद्र मुजुमदार सुप्रसिद्ध आहेत. अत्यंत सखोल आणि बहुआयामी संशोधन करून मुजुमदार यांनी प्राचीन भारतीय समाज संस्कृती, भारतीय संस्कृतीचा भारताबाहेरील विस्तार, ब्रिटीश सत्तेची स्थापना आणि विस्तार, भारतीयांची स्वतंत्रता चळवळ अशा विविध विषयांवर लेखन केले. डॉ. मुजुमदार यांनी "Corporate Life in Ancient India', Outline of Ancient Indian History and Civilization', "Ancient India Colonies in the Far East', The Sepoy Mutiny and the Revolt of 1857' आणि "History of the Freedom Movement' इत्यादी शीर्षकांचे विविध ऐतिहासिक काळ आणि विषयांच्या संदर्भात संशोधनपूर्ण ग्रंथ लिहिले. भारतीय विद्या भवन या संस्थेद्वारे प्रकाशित "The History and Culture of the Indian People' या अकरा खंडीय संशोधन प्रकल्पाचे संपादनाचे काम मुजुमदार यांनी केले. डॉ. ताराचंद यांच्या प्रमाणेच मुजुमदार यांनी ब्रिटीशांच्या 'फोडा आणि झोडा' च्या कुटनीतीची भूमिका असल्याचे मान्य केले मात्र त्याच वेळी हिंदू आणि मुसलमान यांच्यात सांस्कृतिक भेद असून त्यांच्या समन्वय झाला नाही अशी मांडणी केली. मुजुमदार यांनी भारताच्या स्वतंत्रता चळवळीत महात्मा गांधींच्या कार्याची दखल घेऊन त्यांचे कौतुक केले. मात्र, धर्म आणि राजकारण यांची गालात केल्याबद्दल गांधींना दोष देखील दिला. ऐतिहासिक वस्तुनिष्ठा जपत चिकित्सकपणे केल्या इतिहासलेखनातून देखील रमेशचंद्र मुजुमदार यांची राष्ट्रवादी भूमिका स्पष्ट दिसून येते.

**राष्ट्रवादी इतिहास लेखनाचे मूल्यमापन :** ब्रिटीश साम्राज्यवादी इतिहासकारांनी भारताच्या इतिहासाचे विकृत चित्रण करून भारताच्या अस्मितेवर घाला घातला. साम्राज्यवादी इतिहासलेखनामुळे भारतीयांच्या मनात भारताच्या भूतकाळाबाबत न्युनगंड निर्माण झाला. राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेच्या इतिहासकारांनी भारताच्या इतिहासाची पुनर्मांडणी करत भारतीयांना या न्युनगंडातून बाहेर काढण्याची महत्वपूर्ण भूमिका निभावली. राष्ट्रवादी इतिहासलेखनाने भारतीयांच्या मनात आपल्या संस्कृतीच्या अभिमानाची आणि आत्मसन्मानाची भावना जागवली.

ब्रिटीशांनी भारताचे केलेले आर्थिक शोषण, त्यांचे 'फोडा आणि झोडा'चे राजकारण इत्यादी बाबींची ऐतिहासिक मांडणी करून राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीयांच्या राष्ट्रवादी भावनेला वैचारिक आधार दिला. फक्त राजकीय इतिहासाचा अभ्यास न करता विविध अंगांनी भारतीय संस्कृती आणि समाज यांच्या विभिन्न पैलूंवर राष्ट्रवादी इतिहासकारांनी संशोधन केले. वि. का. राजवाडे यांच्या सारख्या काही इतिहासकारांनी ऐतिहासिक वस्तू, ऐतिहासिक कागदपत्रे गोळा करण्यात आणि संपादित करण्यात आपले जीवन खर्च केले. या प्रयत्नांतून भारताच्या इतिहासाच्या अध्ययनासाठी आवश्यक ऐतिहासिक साधनांचा ठेवा तयार झाला.

साम्राज्यवादी इतिहासलेखकांच्या मांडणीचे खंडन करत असताना काही वेळा राष्ट्रवादी इतिहासकारांचे वस्तुनिष्ठतेचे भान सुटल्याचे आढळते. काही वेळा अतिरंजित, अतिशयोक्तीपूर्ण आणि अतार्किक विधाने त्यांनी केली. आत्यंतिक राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे यातील काही इतिहासलेखनाला प्रचारकी स्वरूप आले. मुसलीम शासकांच्या विरुद्ध लढणाऱ्या काही ऐतिहासिक व्यक्तींच्या कार्याचा गौरव करताना नकळत त्यांच्या लिखाणामध्ये जमातवाद डोकावू लागला. असे असले तरी राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासाच्या ज्ञानात अत्यंत महत्त्वाचे योगदान दिल्याचे मान्य करावे लागते.

**(क) मार्क्सवादी** (Marxist) **इतिहास लेखन परंपरा**

२०व्या शतकात मार्क्सवादाने विभिन्न ज्ञानशाखांना प्रभावित केले आणि मार्क्सवादी दृष्टिकोनाचा विकास झाला. मानवी इतिहासातील बदलांच्या मुळाशी आर्थिक कारणे असून भौतिक अंतर्विरोधातून मानवी जीवनाचा विकास होत असतो, अशी मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादी मांडणी होती. भारतात मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करण्यास सुरुवात होऊन मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधाराने भारतीय इतिहासाचे आकलन करण्याची करण्याची परंपरा सुरु झाली. या परंपरेलाच भारतातील ङ्गमार्क्सवादी इतिहासलेखन परंपराफ म्हणून ओळखले जाते. मार्क्सवादी इतिहास लेखनाचा आरंभ स्वातंत्र्यपूर्व काळात झाला असला तरी त्यावेळी हा प्रवाह तितकासा प्रभावी नव्हता. श्रीपदा अमृत डांगे यांचे “From Primitive communism to Slavery’ आणि रजनी पाम दत्त यांचा “India Today’ हे सुरवातीच्या काळातील मार्क्सवादी इतिहास ग्रंथ म्हणून ओळखले जातात. मात्र, १९५० नंतरच्या काळात डी. डी. कोसांबी, डॉ. राम शरण शर्मा, डॉ. रोमिला थापर, डॉ. इरफान हबीब, डॉ. बिपीन चंद्र यांनी भरतील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेत मोलाची भर घालून आपल्या विद्वत्तेचा ठसा जागतिक पातळीवर उमटवला.

**(१) डॉ. दामोदर धर्मानंद कोसांबी :** गणित, संख्याशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, नाणकशास्त्र इत्यादी विविध शास्त्रांचा आणि संस्कृत आणि पाली भाषेचा अभ्यास असलेले डी. डी. कोसांबी हे विख्यात मार्क्सवादी इतिहासकार म्हणून ओळखले जातात. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या सुप्रसिद्ध संस्थेचे संचालक म्हणून पद भूषवलेल्या कोसांबी यांनी जवळपास शंभरहून अधिक संशोधकीय लेख प्रकाशित केले. त्यांचे “Introduction to the study of Indian History’ आणि “The Culture and Civilization of Ancient Indian Culture’ हे दोन ग्रंथ भारतीय इतिहासलेखनातील अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणून ओळखले जातात.

डी. डी. कोसांबी यांनी इतिहासाला घटनांची कालबद्ध मांडणी किंवा थोरांचे चरित्र इतक्या स्वरूपाच्या पलीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला डी. डी. कोसांबी यांच्या मते, इतिहास म्हणजे उत्पादन साधने आणि उत्पादन प्रक्रियेतील भिन्न घटकांच्या परस्पर संबंधात झालेल्या परिवर्तनांचा अभ्यास होय. कार्ल मार्क्सच्या इतिहासविषयक प्रमेयाला जसेच्या तसे न स्वीकारता भारतीय इतिहासाच्या अनुषंगाने त्यात बदल करून कोसांबी यांनी इतिहासाची मांडणी केली. मार्क्सच्या आशियायी उत्पादन पद्धतीनुसार भारतीय समाज मुख्यत: ग्रामव्यवस्था ही स्वयंपूर्ण असल्यामुळे स्थितीशील असल्याची मांडणी होती. डी. डी. कोसांबी यांनी याचे

खंडन करत भारतातील ग्रामव्यवस्था स्वयंपूर्ण असली तरी ती गतिहीन, स्थितीशील, अपरिवर्तनीय नव्हती अशी मांडणी केली. कोसांबी यांनी मानववंशशास्त्र आणि पुरातत्वशास्त्र यांची सांगड घालून आपल्या संशोधनाचे सिद्धांकन केले. प्राचीन लिखित साधने आणि पुरातात्विक साधनाचा तौलिक अभ्यास करून, नाण्यांचा अभ्यास करून तत्कालीन समाज, संस्कृती आणि आर्थिक स्थितीवर भाष्य केले. बौद्ध धर्माचा ऱ्हास आणि गीतेचे तत्त्वज्ञान यांची भौतिकवादी मीमांसा कोसांबी यांनी केली. मिथकांचा अभ्यास करून प्राचीन काळाच्या इतिहासासाठी करून मिथकांचा उलगडा करण्याचे कार्य त्यांनी केले. डी. डी. कोसंबी यांनी अशा विभिन्न पद्धतींचा वापर करून केलेले मूलगामी संशोधन भारतीय इतिहासलेखनात पथदर्शक ठरले.

**(२) डॉ. राम शरण शर्मा :** इंग्लंड मध्ये उच्चशिक्षण प्राप्त करणारे आर. एस. शर्मा हे पुढे इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च या संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले. मार्क्सच्या भौतिकवादी सिद्धांताच्या आधारे प्राचीन भारतीय सामाजिक आणि आर्थिक इतिहासाचे चिकित्सकपणे संशोधन करणारे इतिहासकार म्हणून शर्मा प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक ग्रंथ आणि संशोधन लेख प्रकाशित केले. आर. एस. शर्मा यांनी आपल्या "Shudras in Ancient India' ह्या ग्रंथात वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेच्या उगमाची आणि धर्मशास्त्रांनी त्यांना दिलेल्या अभिमान्यातेची भौतिकवादी कारणमीमांसा केली. वर्णव्यवस्थेच्या उगमापासून गुप्तकाळापर्यंत वर्णव्यवस्थेत आणि शूद्रांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थानात झालेल्या बदलांची मांडणी शर्मा यांनी केली. डॉ. राम शरण शर्मा यांनी "Indian Feudalism' या ग्रंथात भारतातील सामंतशाही व्यवस्थेच्या उदयाचे त्यांनी सिद्धांकन केले. भूदानाचे वाढते प्रमाण हे सरंजामशाही व्यवस्थेच्या वाढीचे ऐतिहासिक प्रमाण मानून गुप्तकाळातील नगरांच्या ऱ्हासाला त्यांनी या व्यवस्थेच्या उदयाचे कारण ठरविले. आपल्या "Material Culture and Social Formation in Ancient India' या ग्रंथात प्राचीन भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीमध्ये होणाऱ्या बदलांची भौतिकवादी दृष्टीकोनातून मीमांसा केली. राम शरण शर्मा यांच्या "Urban Decay in India' प्राचीन भारतातील नगरांच्या ऱ्हासाची आणि स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेच्या वाढीचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून कारणमीमांसा करण्यात आली. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या विविध साधनांचे भौतिकवादी दृष्टीकोनातून अर्थ लावून त्यातून भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहासाची उकल करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आर. एस. शर्मा यांनी केले.

**(३) डॉ. रोमिला थापर :** दिल्ली येथील प्रख्यात जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील इतिहासाच्या प्राध्यापिका म्हणून काम केलेल्या रोमिला थापर जगभर ख्याती प्राप्त इतिहासकार आहेत. त्यांचे कित्येक ग्रंथ आणि संशोधकीय लेख के आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या प्रकाशकांकडून प्रसिद्ध होत असतात. "Ashoka and the Decline of the Mauryas' या त्यांच्या लोकप्रिय ग्रंथात थापर यांनी मौर्य सम्राट अशोक याच्या शासनाची आणि धर्मविषयक धोरणाची भौतिकवादी दृष्टीकोनातून चिकित्सा केली. याच ग्रंथात मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासाची भौतिकवादी कारणमीमांसा त्या करतात. रोमिला थापर यांनी "History of India', "Ancient Indian Social History', "From Lineage to State' आणि "Ideology and Interpretation of Early Indian History' इत्यादी ग्रंथातून प्राचीन भारताच्या राजकीय, सामाजिक,

सांस्कृतिक, तंत्रज्ञान इत्यादी विविध पैलूंवर भौतिकवादी दृष्टीकोनातून मांडणी केली. भारतासंबंधीचे इतिहासलेखनाची चिकित्सा करत जनमानसात रुजलेले आर्यांच्या आक्रमणाचे अथवा आर्य वंशाचे सिद्धांत पुराव्यांच्या निकषावर खोडून काढतात. डॉ. रोमिला थापर यांचे लेखन हे मार्क्सवादी विचारसरणी सोबतच त्यांच्या स्वतंत्र आणि सखोल संशोधनाचे, चिकित्सक विवेचनाचे दर्शन घडवते.

**(४) डॉ. इरफान हबीब :** अलिगढ विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केलेले इरफान हबीब हे मध्ययुगीन भारताचे प्रख्यात इतिहासकार आहेत. मध्ययुगीन भारताचा आर्थिक इतिहास हा त्यांचा मुख्य संशोधनाचा विषय आहे. हबीब यांचे अनेक ग्रंथ आणि संशोधकीय लेख प्रकाशित झाले असून मध्ययुगीन भारताच्या इतिहासाच्या संशोधनात ते मुलभूत मानले जातात. मुघल काळातील शेतीव्यवस्थेचा अभ्यास करणारा इरफान हबीब यांचा “Agrarian System in Mughal India’ हा ग्रंथ महत्वपूर्ण आहे. शेतकऱ्यांच्या कडून जास्तीतजास्त करांची वसुली करण्याच्या मुघल सत्तेच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य वाढले. शेतकऱ्यांच्यात असंतोष निर्माण होऊन मोठ्या प्रमाणांत बंडाळी होऊ लागल्या. मुघलकाळातील कृषीव्यवस्थेतील  संकट हे मुघल सत्तेच्या ऱ्हासाचे महत्त्वपूर्ण कारण ठरले. औरंगजेबच्या काळात झालेल्या उठावांच्या मागे धार्मिक अत्याचार हे कारण नसून आर्थिक शोषणामुळे निर्माण झालेला असंतोष हे प्रमुख कारण होते, अशी मांडणी हबीब यांनी केली. “Interpreting Indian History’ या ग्रंथात हबीब यांनी मध्ययुगीन भारताच्या सामाजिक-आर्थिक इतिहासाचे विवेचन केले. मध्ययुगीन भारतातील अर्थव्यवस्था आणि समाजजीवन हे सरंजामीव्यवस्थेहून भिन्न असल्याचा निष्कर्ष त्यांनी मांडला. “Caste and Money in Indian History’ या ग्रंथात जातिव्यवस्थेच्या उदयामागील आर्थिक कारणाचा उहापोह इरफान हबीब यांनी केला. “Cambridge Economic History of India (1200-1750)’ या डॉ. तपन रायचौधरी यांच्या सोबत लिहिलेल्या ग्रंथात इरफान हबीब यांनी मध्ययुगीन भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विभिन्न घटकांचे विस्तृत विवेचन केले आहे. “The Atlas of Mughal Empire’ आणि “Economic Map of India’ या ग्रंथांतून भौगोलिक माहिती सोबतच आर्थिक माहिती देणाऱ्या मध्ययुगीन भारताचे एकूण बत्तीस नकाशे इरफान हबीब यांनी प्रकाशित केले. मार्क्सवादाने दिलेली प्रमेये जशीच्या तशी न स्वीकारता भौतिकवादी दृष्टीकोनातून आणि द्वंद्वात्मक भौतिक विकासाचा सिद्धांताचा स्वतंत्र बुद्धीने वापर करून मानवी समाजाचा इतिहास समोर आणावा अशी मांडणी इरफान हबीब यांनी “Problems of Marxist Historiography’ या ग्रंथात केली आहे. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे जेष्ठ इतिहासकार म्हणून इरफान हबीब जगभर प्रसिद्ध आहेत.

**(५) डॉ. बिपीन चंद्र :** भारतीय राष्ट्रीय चळवळीचे मार्क्सवादी विश्लेषण करणारे महत्वपूर्ण आणि पथदर्शी इतिहासकार म्हणून डॉ. बिपिन चंद्र ओळखले जातात. केंब्रिज इतिहासलेखन परंपरेने प्रतिपादित केलेली भारतीय स्वातंत्र्यता चळवळीशी संबंधित प्रमेयांचे बिपिन चंद्र यांनी खंडन केले. भारतीय स्वतंत्रता चळवळ ही जनसमान्यांची चळवळ होती, त्याला वैचारिक नेतृत्व सुशिक्षित मध्यमवर्गातील नेत्यांनी दिले असले तरी मुलभूत प्रश्न आणि संघर्ष हा जनसामान्यांचाच होता, असे प्रतिपादन बिपिन चंद्र यांनी “India’s Struggle for Independence’ या सुप्रसिद्ध ग्रंथात केली. “The Rise and Growth of Economic

Nationalism' आणि "Nationalism and Colonialism in India' या ग्रंथांमध्ये भारतीय राष्ट्रवादाच्या उदय आणि विकासाचे आर्थिक पैलू, वसाहतिक शासनाचे आर्थिक धोरण आणि भारतीय भांडवलदारांची स्वतंत्र्यता चळवळीतील भूमिका यांचे विश्लेषण बिपिन चंद्र यांनी केले. आपल्या सुप्रसिद्ध ङ्गउेर्मींपरश्रळीा ळप खपवळरफ या ग्रंथात जमातवादाच्या उदयामागील कारणांचा चिकित्सक अभ्यास करून जमातवाद हा ब्रिटीश वसाहतवादाचे अपत्य असल्याची मांडणी त्यांनी केली. मार्क्सवादी दृष्टीकोनातून भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे जनआंदोलन म्हणून अधिक व्यापक स्वरूप उजागर करणारे इतिहासकार म्हणून बिपिन चंद्र ओळखले जातात.

**मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरेचे मूल्यमापन :** भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासलेखनाला नवी दिशा दिली. इतिहासाचा आवाका, मांडणीचे तंत्र, विश्लेषण पद्धती, तार्किक निष्कर्ष अशा अनेक बाबतीत मार्क्सवादी इतिहासलेखन महत्वपूर्ण ठरला. मार्क्सची इतिहासविषयक प्रमेये जशीच्या तशी न स्वीकारता स्वतंत्र बुद्धीने आणि भारतीय परिस्थितीचे सखोल आकलन करून मूळ प्रमेयांत बदल करून अथवा ती पूर्णत: नाकारून भारतीय मार्क्सवादी इतिहासकारांनी भारताच्या इतिहासाची मांडणी केली. पूर्वीच्या इतिहासकारांमध्ये राजकीय इतिहासाचा प्रभाव जास्त होता. मात्र, मार्क्सवादी इतिहास करांनी आर्थिक इतिहासावर भर देत सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात देखील मोलाची भर टाकली. प्राचीन काळापासून आधुनिक काळाच्या इतिहासाचे द्वंद्वात्मक भौतिकवादी पद्धतीने नव्याप्रकारे विश्लेषण करण्याचे कार्य मार्क्सवादी इतिहासकारांनी पार पाडले. मार्क्सवादी इतिहासकारांनी ऐतिहासिक संशोधनात भाषाशास्त्र, समाजशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी ज्ञानशाखांचा वापर करून आपल्या संशोधनास आंतरविद्याशाखीय स्वरूप दिले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न– २**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) साम्राज्यवादी इतिहासलेखनाचा जनक कोणास मानले जाते?

(२) ख्रिस्तोफर बेली यांनी कोणत्या शहराचे अभ्यास केला?

(३) रोमेशचंद्र दत्त यांच्या संशोधनाने ................ यांच्या 'आर्थिक निस्सारण'च्या सिद्धांताची पुष्टी केली.

(४) "Shivaji and His Times' आणि "House of Shivaji' हे ग्रंथ कोणी लिहिले?

(५) "Indian Feudalism' या ग्रंथात भारतातील सामंतशाही व्यवस्थेच्या उदयाचे सिद्धांकन कोणी केले ?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) ग्रांट डफ आणि जेम्स टॉड यांनी .................... च्या हाताखाली काम केले.

(२) राष्ट्रवादी विचारांच्या .................... यांनी भारताच्या आर्थिक स्थितीच्या अभ्यासाकडे लक्ष देत "Economic History of India' हा ग्रंथ लिहिला.

(३) मध्यमवर्गावरील पाश्चात्य वैचारिक प्रभावातून ................. ची भावना वाढीस लागली.

(४) केंब्रिज इतिहासलेखन परंपरेने प्रतिपादित केलेली .................. संबंधित प्रमेयांचे बिपिन चंद्र यांनी खंडन केले.

(५) .............. यांच्या मते, इतिहास म्हणजे उत्पादन साधने आणि उत्पादन प्रक्रियेतील भिन्न घटकांच्या परस्पर संबंधात झालेल्या परिवर्तनांचा अभ्यास होय.

### ४.२.३ भारतीय इतिहासलेखन परंपरा – भाग २ : अब्राम्हणी इतिहासलेखन, स्त्रीवादी, सबल्टर्न (Indian II : Non-Brahmin, Feminist, Subaltern)

**(अ) अब्राम्हणी** (Non- Brahmin) **इतिहासलेखन**

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आधुनिक पद्धतीने इतिहासलेखन सुरु झाले. आरंभी इतिहास लिहिणारे ब्रिटीश प्रशासक आणि अभ्यासक होते. मात्र, १९व्या शतकाच्या मध्यापासून राष्ट्रवादाने प्रभावित भारतीयांनी देखील इतिहासलेखनास सुरुवात केली. राष्ट्रवादी इतिहासकारांमध्ये परंपरागतरित्या शिक्षणाचा अधिकार असलेल्या ब्राम्हण आणि कायस्थ जातीतील इतिहासकारांची संख्या मोठी होती. मात्र, यांच्या व्यतिरिक्त इतर जातींतील व्यक्तींच्याद्वारे इतिहासलेखनास खूपच उशिरा सुरवात झाली. ब्राम्हण आणि तत्सम उच्चजातीय इतिहासकारांच्या लिखाणात तुलनेने खालच्या जातीतील समजलेल्या लोकांचा इतिहास नव्हता. शुद्र, अस्पृश्य अशा जातीतील लोकांच्या हलाखीच्या परिस्थितीची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न उच्चजातीय इतिहासकारांनी केला नाही. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्या विरोधातील असंतोषामुळे अब्राम्हणवादी विचारसरणीचा उद्या झाला. अब्राम्हणी विचारसरणीने इतिहासाची अब्राम्हणी दृष्टीकोनातून चिकित्सा करून इतिहासलेखनास सुरवात केली, यालाच अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरा म्हणून ओळखले जाते.

**ब्राम्हणी आणि अब्राम्हणी इतिहासलेखन व त्यांची भूमिका :** अब्राम्हणी इतिहासलेखन म्हणजे काय ? हे समजून घेण्याआधी ब्राम्हणी इतिहासलेखन म्हणजे काय ? हे समजून घेणे आवश्यक आहे. वरउल्लेख केल्याप्रमाणे भारतात पारंपारिकरित्या ज्ञानाची मक्तेदारी ब्राम्हण आणि तत्सम जातींकडे असल्यामुळे वासाहतिक सत्तेच्या आगमनानंतर आधुनिक शिक्षणात देखील तेच अग्रेसर राहिले. राष्ट्रवादाच्या वाढीसोबत राष्ट्रवादी इतिहासलेखन देखील सुरु झाले. यात उच्चजातीय इतिहासकारांचा भरणा अधिक होता. साम्राज्यवादी इतिहासलेखनाने भारताचा इतिहासाचे नकारात्मक प्रस्तुतीकरण करत असताना ब्रिटीशांना श्रेष्ठ आणि भारतीयांना कनिष्ठ दाखवण्याचा प्रयत्न केला. साम्राज्यवादी इतिहासलेखनाला प्रतिक्रिया म्हणून झालेल्या राष्ट्रवादी इतिहासलेखनात उच्चजातीय इतिहासकारांची संख्या अधिक होती. ब्राम्हणवादी विचारांनी प्रेरित इतिहासकारांनी खालील भूमिका घेऊन इतिहासाचे लेखन केले.

(१) भारताच्या इतिहासाचे गौरवीकरण करण्यासाठी गौरवशाली घटनांचा आणि काळाचा शोध घेणे. मात्र, गौरवीकरणाआड येणाऱ्या घटनांकडे आणि काळाकडे दुर्लक्ष्य करणे अथवा औदासीन्य दाखवणे.

(२) भारतीय इतिहासाच्या भौतिक आणि वैचारिक जडणघडणीस धार्मिक आणि वैचारिक अधिमान्यता प्राप्त करून देणे.

(३) 'आर्य' वंशाचे गौरविकरण करणे. आर्य विरुद्ध अनार्य अशा संघर्षाची मांडणी करून श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व आणि गुणकर्म यांच्या आधारे समाजरचना झाल्याचे मानणे.

(४) जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचे आडमार्गाने समर्थन करणे अथवा त्यांच्या विरोधात तीव्र भूमिका न घेणे.

(५) पितृसत्ताक मुल्ये, पुरुषप्रधान संस्कृती आणि वंशश्रेष्ठत्वाचे गौरवीकरण करणे.

(६) वैदिक आणि ब्राम्हणी संस्कृतीचे गौरवीकरण करणे.

(७) पुराणातील आणि इतिहासातील उच्चजातीय नायक-नायिकांचे गौरवीकरण करणे. त्यांच्या संबधी मिथके रचणे, अवताराच्या आणि युगाच्या संकल्पना मानने.

(८) शुद्र, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या बद्दल लिखाण न करणे अथवा अनुल्लेखाने मारणे.

(९) मुसलमानांविषयी द्वेषपूर्ण लिखाण करणे.

(१०) भारताच्या अवनीतीला मुसलमान आणि ब्रिटीश यांना जबाबदार धरणे.

अशा प्रकारची साधारण चौकाट घेऊन उच्चजातीय ब्राम्हणवादी इतिहासकारांनी साम्राज्यवादी इतिहासलेखनाला पर्याय उभा केला. पण प्राचिन भारतातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता आणि स्त्रियांचा दुय्यमपणा अशा विषमताधिष्ठित समाजरचनेचा, आर्थिक विषमतेचा तपशील दडविण्याचा प्रयत्न ब्राम्हणवादी इतिहासकारांनी केला. ब्रिटीशविरोध आणि ब्राम्हणी धर्माचे पुनरुज्जीवन हे ब्राम्हणी राष्ट्रवादी इतिहासलेखनाचे उद्दिष्ट होते. ब्राम्हणवादी इतिहास लेखकांचा प्रयत्न अस्मितानिर्मितीचा होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर, वि. का. राजवाडे इत्यादी इतिहासकारांचे इतिहासलेखन हे ब्राम्हणी इतिहासलेखन मानले जाते.

मानवी समाजात जसा 'आहे रे' आणि 'नाही रे' अशा दोन वर्गात संघर्ष आहे, तसाच भारतात ब्राम्हणी आणि 'अब्राम्हणी' असा संघर्ष आहे. भारतात जाती-वर्णव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्या वर्चस्वामुळे उच्चजातीय पुरुषांना श्रेष्ठत्व प्राप्त होते आणि खालच्या जातीतील पुरुष आणि स्त्रिया यांना दुय्यम स्थान प्राप्त होते. म्हणजे जाती-वर्णव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्यामुळे श्रेष्ठत्व उपभोगणारा ङ्गब्राम्हणीफ गट आणि यामुळे ब्राम्हणी धारणांना विरोध करणारे शोषित-अंकित जनवादी 'अब्राम्हणी' गट असे दोन गट भारताच्या इतिहासात दिसून येतात. जातीवर्गस्त्रीदास्यांतांचा विचार विचार करणारा, त्यासाठी संघर्ष करणारा आणि तत्त्वज्ञानाची निर्मिती करणारा अब्राम्हणी प्रवाह भारतीय इतिहासात विद्यमान राहिल्याचे शरद पाटील यांचे मत आहे.

'अब्राम्हणी स्त्रीवादाच्या दिशेनेफ या ग्रंथात विद्युत भागवत आणि प्रतिमा परदेशी यांनी अब्राम्हणी दृष्टीकोनातून स्त्रीवादी इतिहासाची मांडणीचे नवे अवकाश स्पष्ट केले. प्रतिमा परदेशी यांच्या मते, ब्राम्हणी

म्हणजे वर्ण-वर्ग-जाती-स्त्रीदास्य यांचे समर्थन करणारी शक्ती होय. तर, अब्राम्हणी म्हणजे वर्ण-वर्ग-जाती-स्त्रीदास्य यांचा अंत करण्यास प्रयत्नशील असलेली शक्ती होय. एखादी व्यक्ती जन्मत:च ब्राम्हणी किंवा अब्राम्हणी ठरू शकत नाही. जन्माने, जातीने ब्राह्मणेतर असलेली व्यक्ती, वृत्तीने अब्राम्हणी असेलच असे नाही. ती ब्राम्हणीदेखील असू शकते. सर्व ब्राम्हण प्रतिगामी किंवा विषमतावादी विचारांचे असतात असे नाही. त्यातील समताधिष्ठीत समाजाचे स्वप्न पाहणारे, त्यासाठी परिवर्तनाच्या लढ्यात सक्रीय सहभाग किंवा परिवर्तनासाठी वैचारिक योगदान देणारे लोक  हे अब्राम्हणीच ठरतात अशी मांडणी प्रतिमा परदेशी यांनी केली.

**अब्राम्हणी इतिहास लेखनाचे स्वरूप :** अब्राम्हणी इतिहासलेखनाची सुरवात महात्मा जोतीबा फुले यांच्या पासून झाली असे मानले जाते. महात्मा फुले यांनी सन १८७३ मध्ये लिहिलेल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात इतिहासविषयक मांडणी केली आहे. महात्मा फुले यांच्या मते, भारताचा इतिहास हा आर्य-अनार्य यांच्या संघर्षाचा आबी ब्राह्मण्य वर्चस्व प्राप्तीचा आहे. बाहेरून आलेल्या आर्यांनी इथल्या मुळच्या लोकांना पराभूत करून त्यांच्यावर असमानता असलेली जातीव्यवस्था थोपविली. आर्यांनी नंतरच्या काळात वर्णव्यवसस्था ईश्वर निर्मित असल्याची मांडणी करून ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांच्या उत्पत्तीची कथा रचली. आर्यांकडून पराभूत झालेल्या इथल्या मुळच्या लोकांना 'शुद्र' ठरवून त्यांच्या पिढ्यानपिढ्या होणाऱ्या शोषणाची व्यवस्था केली. महात्मा फुलेंनी बळीराजा, म्हसोबा, खंडोबा, बिरोबा, ज्योतिबा इत्यादी लोकदेवतांच्या मिथकांचा अर्थ लावला. भारतात आर्यांच्या आक्रमणापुर्वी शेतकऱ्यांचा राजा असलेल्या 'बळी'चे राज्य होते आणि भारताला 'बळीस्थान' म्हणून ओळखले जायचे अशी मांडणी महात्मा फुले यांनी केली. महात्मा फुले यांनी इतिहासाचा अशाप्रकारे लावलेला अन्वयार्थ हा अब्राम्हणी परंपरेचा भाग मानला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विविध ग्रंथातून आणि लेखांतून इतिहासाविषयी भाष्य केले आहे. जातीवर्णव्यवस्थेच्या इतिहासावर भाष्य करणारा 'शुद्र कोण होते ?' हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४६ साली लिहिला. डॉ. आंबेडकरांनी वर्ण आणि जातीच्या उगमाचा शोध घेऊन त्याची रचना कशी आहे या वर भाष्य केले. जातीचे विध्वंसन कसे करावे याची देखील मांडणी आंबेडकर यांच्या लिखाणात दिसून येते. जाती अंतर्गतच होणारे विवाह आणि जातीबाह्य विवाहांवर बंदी हे जातीव्यवस्था टिकण्याचे मुख्य कारण आहे, अशी मांडणी डॉ. आंबेडकर यांनी केली. जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांचा एकत्रित विचार करून स्त्रियांवर घातलेल्या बंधनांचा उलघडा डॉ. आंबेडकर यांनी केला.

महाराष्ट्राच्या इतिहासात ब्राम्हण-अब्राम्हण यांच्यात मोठ्याप्रमाणात राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वाद झाला. याच्या परिणामी मराठा इतिहासलेखनात देखील ब्राम्हण-अब्राम्हणवादाचे पडसाद उमटले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धानंतर मराठा इतिहासासंदर्भात मोठ्या प्रमाणात इतिहास लेखन झाले. सुरवातीला इतिहासलेखन करणाऱ्यांमध्ये ब्राम्हण जातीच्या इतिहासकारांचा भरणा होता. शिवाजी महाराजांच्या संदर्भात इतिहासलेखन करताना शिवाजी महाराजांना 'गोब्राम्हणप्रतिपालक' ठरवून जुलमी मुसलमानाच्या विरोधात लढणारे हिंदूचे संरक्षक ठरविले. शिवाजी महाराजांच्या यशाचे श्रेय त्यांचे गुरु-

मार्गदर्शक-सल्लागार म्हणून रामदास आणि दादोजी कोंडदेव यांना देणारी मांडणी बहुतांश ब्राम्हण जातीच्या इतिहासकारांनी केली. अशाप्रकारची मांडणी सनातनी ब्राम्हण इतिहासकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकर, वि. का. राजवाडे, भास्कर वामन भट आणि शंकर श्रीकृष्ण देव यांनी केली. तसेच उदारवादी ब्राम्हण इतिहासकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महादेव गोविंद रानडे आणि द. बा. पारसनीस यांनी देखील रामदास यांना शिवाजी महाराजांचे गुरु मानले.

शिवाजी महाराजांच्या संदर्भातील या ब्राम्हणी इतिहासलेखनापासून भिन्न असा अब्राम्हणी दृष्टीकोन असलेल्या महात्मा फुले यांनी शिवाजी महाराजांना 'कुळवाडी भूषण' म्हणजेच शेतकऱ्यांचा राजा असे संबोधले. कृष्णराव अर्जुनराव केळुस्कर यांनी सर्वप्रथम शिवाजी महाराजांचे चरित्र लिहून शिवाजी महाराजांचे गुरु 'रामदास व दादोजी कोंडदेव होते' हा दावा फेटाळून लावला. मराठ्यांच्या क्षत्रियत्वाला घेऊन झालेल्या वादामध्ये अब्राम्हणी दृष्टीकोन असलेल्या राजारामशास्त्री भागवत, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि केशवराव सीताराम ठाकरे यांनी वि. का. राजवाडे यांच्याशी वैचारिक वाद घातला.

शरद पाटील यांनी अब्राम्हणी दृष्टीकोनातून भारताच्या इतिहासाची मांडणी करणारे अनेक ग्रंथ लिहिले. शरद पाटील यांचे 'दास - शुद्रांची गुलामगिरी', 'रामायण-महाभारतातील वर्ण संघर्ष', 'जातीव्यवस्थाक सामंती सेवकतत्त्व', 'शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण?' इत्यादी ग्रंथ महत्त्वाचे मानले जातात. प्राचिन भारताच्या इतिहास संशोधनातून टोळ्या, गण, वर्ण समूह यांचे आणि त्या सोबतच पितृसत्ताक जातिव्यवस्थेचे अस्तित्व सिद्ध झाले आहे. प्राचिन वेद, उपनिषदे, पुराणे, स्मृति-श्रुती इत्यादी साहित्यात, भारतात येऊन गेलेल्या परकीय प्रवाशांच्या वृत्तांत आणि भारतीय-परदेशी इतिहासकारांच्या लिखाणात पितृसत्ताक जातीसंस्थेचा सारखा उल्लेख येतो. मात्र, शरद पाटील यांनी भारतात पितृसत्ताक जातीसंस्था उदयास येण्यापूर्वी मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक गण-टोळ्या होत्या अशी मांडणी केली. वेदांमध्ये उल्लेखित आणि वैदिक परंपरामध्ये अशुभ मानली जाणारी 'हरिती' ही स्त्रीसत्ताक गणाची प्रमुख होती, असा शोध शरद पाटील यांनी लावला. मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक गणसमाजांना, टोळ्यांना पराभूत करून पुरुषप्रधानता असलेल्या पितृसत्ताक जातीसमाजाची निर्मिती झाली. शरद पाटील यांच्या मते मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक ते पितृसत्ताक जातीव्यवस्था असे स्थित्यंतर आर्यांच्या आक्रमणास सुरु होते आणि बुद्धकाळानंतर पूर्ण होते. प्राचिन काळाच्या अंतसमयी समंतीव्यवस्था उदयास आली आणि मध्ययुगातील मुस्लीम सत्ताधीशांच्या काळात देखील कायम राहिली. ब्रिटीशांची सत्ता आल्यानंतर बदललेल्या अर्थव्यवस्थेमुळे भारतात वर्ग बनण्याची प्रक्रिया सुरु झाली आणि भारतात पुरुषसत्ताक-जातिवर्ग तयार झाला. हा पुरुषसत्ताक-जातिवर्ग भारतातील कष्टकरी आणि कनिष्ठ जातीच्या पुरुषांवर आणि स्त्रियांवर वर्चस्व गाजवतो आणि त्यांचे शोषण करतो अशी मांडणी शरद पाटील यांनी केली.

१९८० नंतर आ. ह. साळुंखे, उमा चक्रवर्ती, शर्मिला रेगे, विद्युत भागवत, प्रतिमा परदेशी, दिलीप चव्हाण, उमेश बगाडे, रणजित परदेशी, नारायण भोसले, देवेंद्र इंगळे, इत्यादींनी ब्राम्हणी-अब्राम्हणी संकल्पनेच्या आधारे इतिहासलेखन आणि इतिहासमीमांसा केली आहे. ब्राम्हणी आणि अब्राम्हणी या संकल्पना जातीवाचक नसून वृत्तीवाचक आणि सामाजशास्त्रीय आहेत. जातवर्गस्त्रीदास्यातांची भूमिका घेऊन

अब्राम्हणी प्रवाहाने सर्व ज्ञानशाखांच्या, संज्ञा आणि संकल्पनाच्या कक्षा इतिहासक्रमास कशा लागू होतात याचा शोध घेतला.

**अब्राम्हणी इतिहासलेखनाची लक्षणे** : अब्राम्हणी दृष्टीकोनातून इतिहासलेखन करणाऱ्या इतिहासकारांच्या लिखाणात सर्वसाधारणपणे काही समान लक्षणे आणि वैशिष्ट्ये आढळतात. ही लक्षणे आणि वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(१) जातीव्यवस्था ही शोषण करणारी व्यवस्था आहे याचे भान ठेवणे.

(२) स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि शूद्रातिशूद्र यांचे दुय्यम स्थान यांना विलगपणे ना पाहता त्यांच्या परस्पर संबंधांचे भान ठेवणे आणि त्यामागील पितृसत्ताक जातीसंस्थेच्या भूमिकेची चिकित्सा करणे.

(३) स्वातंत्र्य, समता आणि मानवता नाकारणाऱ्या अथवा स्वीकारणाऱ्या रूढी-परंपरा यांचा शोध घेणे.

(४) स्त्रीशूद्रातिशूद्रांचा आणि ब्राम्हणांचा जातिव्यवस्थेशी असलेला संबंध स्पष्ट करणे.

(५) इतिहासाची मांडणी करताना मिथकांचा आणि दंतकथांचा अब्राम्हणी दृष्टीकोनातून अन्वयार्थ लावणे.

(६) मिथके आणि प्रतिकांचा नवा अन्वयार्थ लावून भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक संघर्ष विशद करणे.

**अब्राम्हणी इतिहास परंपरेचे मूल्यमापन :** मुख्यप्रवाही इतिहासलेखानामध्ये जातीव्यवस्थेचा अभ्यास हा एक व्यवस्था म्हणून होत असला तरी त्यामागील वैचारिक शक्तींचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत नव्हते. राष्ट्रवादी इतिहासलेखनाने जातिव्यवस्थेच्या शोषणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न केला. मार्क्सवादी इतिहासलेखनाने जातिव्यवस्थेच्या सखोल विश्लेषणाचा प्रयत्न केला नाही. मुख्यप्रवाही इतिहासलेखन परंपरेच्या या भूमिकांमुळे अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरा उदयास आली. महाराष्ट्रातील ब्राम्हण-ब्राम्हणेतर वादाच्या पृष्ठभूमीवर मराठा इतिहासामध्ये अब्राम्हणी दृष्टीकोनातून लिखाण केले जाऊ लागले. जातिव्यवस्थेचा उगम, मातृसत्ताक-स्त्रीसत्ताक ते पितृसत्ताक जातीसंस्था असे स्थित्यंतर, स्त्रिया, शुद्र, अतिशूद्र, अस्पृश्य यांच्या दयनीय स्थितीची आणि शोषणाची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरेने केला. पितृसत्ताक जातिवर्ग समाजातील शोषक घटकांच्या ऐवजी दुय्यम स्थान दिलेल्या आणि शोषित घटकांच्या म्हणजे स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या दृष्टीकोनातून म्हणजेच 'तळाकडून' इतिहास मांडण्याचा प्रयत्न अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरेने केला.

### (ब) स्त्रीवादी (Feminist) इतिहासलेखन

जगाच्या कोणत्याही इतिहास काळात स्त्रिया या जगाच्या लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या होत्या. प्रागैतिहासिक काळापासून ते आजच्या काळापर्यंत मानवी समाजाच्या विकासात समाजाचा अर्धा भाग असणाऱ्या स्त्रियांची भूमिका महत्त्वाची  हे नाकारता येत नाही. मात्र, जेंव्हा आपण इतिहास ग्रंथांचा आढावा घेतो तेंव्हा आपणास स्त्रियांचा उल्लेख अत्यंत त्रोटक स्वरूपात दिसतो. पारंपारिक आणि मुख्यप्रवाही

इतिहासलेखनातून स्त्रियांना वगळण्यात आले. इतिहास ग्रंथातून स्त्रियांची त्रोटक माहिती आणि अपवादात्मक उल्लेख मिळतात. मात्र, ती सर्व माहिती आणि उल्लेख हे उच्चजातीय आणि उच्चवर्गीय स्त्रियांचे असल्याचे दिसून येते. इतिहासात स्त्रियांचा उल्लेख हा केवळ मोजक्या संख्येतील स्त्रियांच्या वैयक्तिक कर्तबगारीचा आढावा असतो. त्यामुळे स्त्रियांनी सामुहिकरित्या मानवी विकासात निभावलेल्या भूमिकांचा उल्लेख इतिहासात कोठेच होत नव्हता. भारतातील मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनात देखील स्त्रियांचे स्थान दुय्यम होते. स्त्रीवादी चळवळीमुळे इतिहासाकडे पाहण्याचा स्त्रीवादी दृष्टीकोन पुढे आला आणि त्यातूनच भारतात स्त्रीवादी इतिहासलेखन परंपरा उदयास आली. समाजाचा अर्धा भाग असलेल्या पण दुय्यम मानलेल्या स्त्रियांचा इतिहास त्यांच्याच दृष्टीकोनातून मांडणारा 'स्त्रीवादी' इतिहासलेखन प्रवाह हा भारतातील 'तळाकडून इतिहास' परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे स्त्रीवादी इतिहास लेखनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**स्त्रीवाद म्हणजे काय? :** स्त्रीवादी इतिहासलेखनाच आढावा घेण्याआधी 'स्त्रीवाद' म्हणजे काय? हे जाणून घेणे आवश्यक आहे. 'स्त्रीवाद' ही एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे जी स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरते. मानवी समाजात पुरुषांचे वर्चस्व आणि स्त्रियांचे दुय्यमत्व - दास्यत्व अस्तित्वात येण्याची कारणमीमांसा स्त्रीवाद करतो. तसेच हे दुय्यमत्व दास्यत्व नष्ट करण्यासाठी विविध प्रकारच्या चळवळी स्त्रीवादींद्वारे केल्या जातात. फक्त स्त्री-पुरुष समानता इतकेच स्त्रीवादास अभिप्रेत नसून तृतीयपंथीय आणि समलिंगींच्या अधिकारांचा देखील पाठपुरावा स्त्रीवादी करतात. संपूर्ण शोषणमुक्त आणि समताधारित समाजाची निर्मिती करणे हे स्त्रीवादाचे ध्येय आहे. स्त्रीवादी चळवळी द्वारे उभारण्यात आलेले लढे हे मुलत: मानवमुक्तीच्या लढ्यांचे अविभाज्य भाग आहेत.

'स्त्रीवाद' हा ज्याप्रमाणे एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे त्याचप्रमाणे 'स्त्रीवाद' हा समाज, इतिहास, राजकारण, संस्कृती, अर्थव्यवस्था, धर्म, जाती-वर्णव्यवस्था यांच्याकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन देखील आहे. स्त्रीवाद हा एकसाची दृष्टीकोन नसून त्यामध्ये विभिन्न प्रवाह आहेत जे विविध काळात आणि विविध परिस्थितीत उदयास आले. या बहुप्रवाही स्त्रीवादाने जगातील विविध वर्गातील,वंशातील, प्रदेशातील स्त्रीप्रश्नांचे सिद्धांकन अतिशय समृद्ध केले. स्त्रीवादी सिद्धांकनाने पितृसत्ता, लिंगभाव, लैंगिकता इत्यादी संकल्पनांच्या आधारे राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, धर्मव्यवस्था, संस्कृती इत्यादींचे अत्यंत नव्या स्वरूपात विश्लेषण केले.

स्त्री स्वातंत्र्यासाठी आणि स्त्रियांच्या हक्कासाठी लढणाऱ्या विविध स्त्रीवादी चळवळी या काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आकारास आल्या. ज्याप्रमाणे समुद्राच्या लाटांमध्ये 'उसळणे-वाढणे-क्षीण होणे' अशी सतत चालणारी प्रक्रिया होते, त्याचप्रमाणे काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर स्त्रीवादी चळवळींमध्ये देखील उदय, विकास आणि क्षीण होण्याची प्रक्रिया दिसून येते. त्यामुळे स्त्रीवादाचे इतिहासकार स्त्रीवादी चळवळींच्या टप्प्यांचे वर्णन 'स्त्रीवादाच्या लाटा' असे करतात. स्त्रीवादाची पहिली लाट १९व्या आणि २०व्या शतकात विकसित झाली ज्यात स्त्रियांच्या मतदानाचा अधिकार हा केंद्रस्थानी होता. १९६०च्या आणि १९७०च्या दशकात आलेल्या स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेत स्त्रियांसाठी समान कायदेशीर आणि

सामाजिक हक्कांचा मुद्दा महत्त्वाचा होता. स्त्रीवादाची तिसरी लाट १९९०च्या दशकात उदयास आली आणि आज देखील अस्तित्वात आहे. स्त्रीवादाची तिसरी लाट ही तिच्या दुसऱ्या लाटेशी सातत्य राखणारी असून तिच्या उणिवांच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपात उदयास आली.

**भारतातील स्त्रीवादी इतिहासाच्या विकासाचे टप्पे :** भारतामध्ये आधुनिक इतिहास लेखनाची पद्धत १८व्या शतकात आरंभ झाली. वासाहतिक इतिहासलेखनापासून भारतासंबंधी आधुनिक इतिहासलेखनास सुरवात झाली. भारताच्या इतिहासासोबतच भारतीय समाजाच्या इतिहासाबद्दलची मांडणी विविध इतिहासलेखन परंपरांच्या मध्ये केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या संदर्भात देखील काही प्रमाणात ऐतिहासिक मांडणी केली गेली. मात्र, काळाच्या ओघात आणि वैचारिक बदलांच्या प्रभावाने स्त्रियांच्या इतिहासलेखनाचा टप्प्याटप्प्याने विकास होत गेला आणि स्त्रीवादी इतिहासलेखनाची परंपरा उदयास आली.

**(१) पहिला टप्पा: वसाहतवादी आणि राष्ट्रवादी दृष्टीकोनातून स्त्रियांचा इतिहास:** भारतामध्ये आधुनिक इतिहास लेखनाची पद्धत १८व्या शतकात आरंभ झाली. वासाहतिक इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाबद्दल लेखन केले. जेम्स मिल, विल्यम जोन्स इत्यादी इतिहासकारांनी भारतीय स्त्रियांच्या स्थिती विषयी लेखन केले. सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासी प्रथा इत्यादी चालीरीती आणि स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक यांची माहिती वासाहतिक इतिहासलेखन परंपरेतील साम्राज्यवादी इतिहासलेखकांनी दिली. भारतीय स्त्रियांना मिळणारी अमानुष आणि हीन वागणूक अधोरेखीत करून मांडल्याने 'भारतीय लोक हे मागास प्रवृत्तीचे आहेत आणि त्यामुळे ते स्वत:वर राज्य करण्यास लायक नाहीत' या साम्राज्यवादी मांडणीस बळ मिळत असे. अशा प्रकारची मांडणी ब्रिटीशांच्या भारतावरील सत्तेचे समर्थन करण्यासाठी वापरली जात असे.

भारतासंबंधी आकर्षण आणि कुतूहल असलेल्या वासाहतिक इतिहासलेखन परंपरेतील पौर्वात्यवादी इतिहासकारांनी प्राचिन भारतीय संस्कृतीचे उदात्तीकरण करताना भारतातील प्राचिन काळास 'सुवर्णयुग' संबोधले. भारतीय इतिहासचा प्राचिन काळ हा 'सुवर्णयुग' मानल्यामुळे तो भारतीय स्त्रियांसाठी देखील 'सुवर्णयुग' होता अशी मांडणी पौर्वात्यवादी इतिहासकारांनी केली. प्राचिन काळी भारतात स्त्रियांचे स्थान उत्तम होते आणि त्यांच्यावर कोणती ही जाचक परंपरा व बंधने लादलेली नव्हती, याचा दाखला वैदिक काळातील स्त्रियांच्या स्थितीवरून देण्यात आला. वैदिक काळात सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासी प्रथा इत्यादी चालीरीतींचे अस्तित्व नव्हते, असे सांगत पौर्वात्यवादी इतिहासकारांनी स्त्रियांसाठी देखील 'सुवर्णयुग'च असल्याची मांडणी केली.

साम्राज्यवादी इतिहासलेखनाची प्रतिक्रिया म्हणून उदयास आलेल्या राष्ट्रवादी इतिहासलेखनाने पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची तळी उचलत प्राचिन भारतात स्त्रियांची स्थिती किती चांगली होती हे आणखी अधोरेखित करून मांडण्याचा प्रयत्न केला. सुप्रसिद्ध राष्ट्रवादी इतिहासकार अनंत सदाशिव अळतेकर यांनी "The Position of Women in Hindu Civilization From Prehistoric Times to the Present Day' या ग्रंथ १९३८ साली लिहिला. प्रागैतिहासिक काळापासून आजच्या काळापर्यंत हिंदू संस्कृतीतील

स्त्रियांच्या स्थानाविषयी भाष्य या ग्रंथात करण्यात आले होते. पौर्वात्यवादी इतिहासकारांप्रमाणे अळतेकरांनी प्राचिन भारतात स्त्रियांचे जीवन आणि स्थान हे उच्च आणि उत्तम दर्जाचे होते, असे प्रतिपादन केले. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, काशीप्रसाद जयस्वाल, रोमेशचंद्र दत्त, रोमेशचंद्र मुजुमदार या राष्ट्रवादी इतिहासकारांनी देखील अळतेकर यांच्या सारखीच मांडणी करत ङ्गसुवर्णयुगफ सिद्धांताची पाठराखण केली.

सुप्रसिद्ध स्त्रीवादी इतिहासकार उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांनी “Economic and Political Weekly’ या नियतकालीकेत १९८८ मध्ये “In Search of Our Past: A Review of the Limitations and Possibilities of the Historiography of Women in Early India’ हा महत्त्वपूर्ण लेख लिहिला. या लेखात त्यांनी प्राचिन भारतातील स्त्रियांच्या संदर्भातील इतिहासलेखनाची चिकित्सा करून आतापर्यंत झालेल्या संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करत नव्या संशोधनाच्या शक्यता देखील वर्तवल्या. उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांच्या मते:

(१) राष्ट्रवादी चळवळीच्या पृष्टभूमीवर भारतीय म्हणून हिंदू स्त्रीविषयी इतिहासलेखन केल्यामुळे ते राष्ट्रवादी विचारसरणीने प्रेरित होते. स्त्रियांच्या उत्तम दर्जाचे उदात्तीकरण हे साम्राज्यवादी इतिहासकारांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्याच्या हेतूने करण्यात आले.

(२) राष्ट्रवादी इतिहासकारांनी ‘स्त्रियांचे स्थान’ ठरवत असताना जे मापदंड लावले त्या मापदंडातच समस्या होत्या. स्त्रियांना यज्ञ आणि तत्सम कर्मकांडामध्ये स्थान होते कि नव्हते, अशाप्रकारचे क्षुल्लक मापदंड वापरून स्त्रियांचे स्थान उत्तम होते असे ठरविले गेले. याच काळात सामाजिक सुधारणांना सुरुवात झाली होती. सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासी प्रथा या चालीरीतींना समाज सुधारक विरोध करू लागले. राष्ट्रवादी इतिहासकारांनी या चालीरीती केंव्हापासून सुरु झाल्या याचा शोध घेतला. संशोधनानंतर त्यांना असे आढळून आले की, वैदिक काळात या चालीरीती आढळत नाहीत. वैदिक काळात या चालीरीती नव्हत्या म्हणून त्याकाळी स्त्रियांचा दर्जा उच्च होता असा निष्कर्ष या इतिहासकारांनी काढला. मात्र, त्याकाळी या प्रथा नव्हत्या म्हणून स्त्री आणि पुरुष हे दोघे समान दर्जाचे होते, असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे त्याकाळी स्त्रियांचे शोषण होत नव्हते, असे देखील म्हणता येणार नाही.

(३) स्त्रियांवर कडक निर्बंध लादणाऱ्या प्राचिन ग्रंथामधील कायदे व नियमांवर राष्ट्रवादी इतिहासकारांनी सोयीस्कर मौन बाळगले. भारतीय समाजातील ङ्गउच्चवर्णीयफ स्त्रियांचा दाखला देत सर्व स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन केले. उच्चवर्णीय स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन देखील पुरुषसत्ताक दृष्टीकोनातून माता, पत्नी, भगिनी, पुत्री अशा नात्यांच्या गौरविकरणाच्या स्वरुपात केले. भारतातील दासीप्रथा आणि कनिष्ठ वर्णीय स्त्रियांची स्थिती यांच्यावर मौन बाळगले. ‘वैदिक काळात उच्च स्थान असलेल्या स्त्रियांची अवनिती ही मुस्लिमांच्या आक्रमणामुळे झाली’ अशी जमातवादी मांडणी करून मुसलमानांना दोष देण्याचे जमातवादी राजकारण इतिहासकारांनी केले. प्राचिन काळात उच्चवर्णीय पुरुषांनी लिहिलेल्या ग्रंथांचा साधन म्हणून वापर

करत असताना त्यातील वर्णनाचा खरे-खोटेपणा किंवा त्यातील विसंगती यांच्याकडे राष्ट्रवादी इतिहासकारांनी दुर्लक्ष केले.

ज्याप्रमाणे राष्ट्रवादी इतिहासकारांनी साम्राज्यवादी इतिहासकारांना दिलेल्या प्रतिक्रियेपोटी केलेली प्राचिन काळाची 'सुवर्णयुग' म्हणून केलेली चुकीची आणि वरवरची मांडणी कित्येक वर्ष जनमानसात रुजून आहे. त्याचप्रमाणे भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थानाचा चुकीचा आणि वरवरचा इतिहास देखील जनमानसात रुजला आहे.

**(२) दुसरा टप्पा: राष्ट्रनिर्मितीसाठीची स्वातंत्र्योत्तरकाळातील ऐतिहासिक स्त्रीचरित्रे:** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नव्याने उदयास आलेल्या राष्ट्राच्या विकासासाठी आणि राष्ट्रवादी भावनेच्या प्रसारासाठी थोर ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे लिहिण्याचे प्रयत्न झाले. शासकीय आणि वैयक्तिकरित्या लिहिलेल्या या चरित्रांमध्ये अनेक ऐतिहासिक स्त्रियांची चरित्रे देखील लिहिली गेली. राजघराण्यातील कर्तुत्वान स्त्रिया, युद्धप्रसंगी शौर्य गाजवणाऱ्या स्त्रिया इत्यादींची या चरित्रांमध्ये भरमार होती. या स्त्रियांनी पुरुषांचे गुणविशेष मानले गेलेले राजकीय कर्तुत्व आणि युद्धातील शौर्य दाखवल्यामुळेच त्यांची चरित्रे लिहिली गेली. तसेच ज्या स्त्रियांची चरित्रे लिहिली गेली, त्या मुख्यत: उच्च वर्णाच्या, उच्च जातींच्या आणि उच्च वर्गाच्या होत्या आणि सामान्य स्त्रियांना यात कोणतेही स्थान नव्हते. पुरुषसत्ताक दृष्टीकोन असलेल्या इतिहासाच्या चौकटीतच या स्त्रियांचा इतिहास बसवण्याचा प्रयत्न केल्याचे या चरित्रांतून दिसून येते.

**(३) तिसरा टप्पा: स्त्रियांच्या योगदानाचा इतिहास:** भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी मोठ्याप्रमाणात भाग घेतला होता. वसाहतकालीन आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय आणि सामाजिक चळवळीत देखील स्त्रिया सहभाग मोठा होता. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील आणि विविध चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा आणि योगदानाचा इतिहास तिसऱ्या टप्प्यात लिहिण्यात आल्याचे दिसून येते.

**(४) चौथा टप्पा: स्त्रीवादी इतिहास:** स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेपासून जहाल स्त्रीवाद दिसून येऊ लागला. १९६० मध्ये आलेल्या या लाटेमध्ये 'जे जे खाजगी, ते ते राजकीय'अशी घोषणा केली गेली. स्त्रीवादी विचारप्रणालीमुळे सामाजिक शास्त्रांच्या आकलनाच्या मर्यादा रुंदावल्या आणि त्यांना नवे भान आले. आतापर्यंत झालेल्या ज्ञाननिर्मितीची स्त्रीवादी चिकित्सा करण्याची बौद्धिक चळवळ उभी राहिली. सामाजिक शास्त्रांमधील संशोधन पद्धतीला आव्हान देऊन त्यांच्या उणीवा दाखवण्याचे कार्य या चळवळीने केले. त्याच बरोबर सामाजिक शास्त्रातील संशोधनाच्या नव्या पद्धती आणि साधने शोधण्याचा आणि विकसित करण्याचा प्रयत्न केला गेला.

मानवी इतिहासाचा अभ्यास करताना चिकित्सात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग स्त्रीवादी विचारवंतानी केला. ज्ञाननिर्मिती होत असताना समाजातील सत्ताविहीन घटक म्हणजेच स्त्रिया, शेतकरी, आदिवासी, कामगार दलित इत्यादींचे अनुभव आणि ज्ञान हे वगळले जातात. त्याचप्रमाणे इतिहास हा पुरुषकेंद्रित स्वरुपात लिहिला गेल्याने स्त्रिया यातून वगळल्या गेल्या. इतिहास पुरुषकेंद्रित असल्यामुळे आणि इतिहास संशोधनाचा दृष्टीकोन देखील पुरुषकेंद्रित असल्यामुळे मुख्यप्रवाही इतिहासातून पुरुषांचे अनुभव, विचार

आणि कृती यांनाच स्थान मिळाले. स्त्रियांचे अनुभव, विचार आणि कृती यांना वेगळे काढून तपासण्याचा प्रयत्न मुख्यप्रवाही इतिहासाने केला नाही. त्यामुळे स्त्रियांचा इतिहास, स्त्रियांची चरित्रे, स्त्रियांचे योगदान, स्त्रियांची स्थिती यांची मांडणी ही पुरुषकेंद्रित दृष्टीकोनाने आणि पितृसत्ताक व्यवस्थेस रुचेल अशीच केली गेली.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी केल्यास वेगळ्या पद्धतीचे आकलन होईल असे स्त्रीवादी इतिहासकारांना वाटते. ज्ञान हे वस्तुनिष्ठ नसून संशोधकाच्या सामाजिक स्थानानुसार त्याचे ज्ञानाविषयी आणि इतिहासाविषयी आकलन बदलते अशी मांडणी स्त्रीवादी विचारवंतानी केली. यालाच 'भूमिदृष्टी सिद्धांत' (Standpoint Theory) म्हटले जाते. समग्र वास्तवाच्या आकलनासाठी विविध सामाजिक स्थानांवरून झालेले आकलन समजून घ्यायला हवे अशी भूमिका स्त्रीवादी विचारवंतांनी घेतली. स्त्रियांचा इतिहास लिहिताना स्त्रियांचे अनुभव हे केंद्रस्थानी असायला हवेत असा त्यांचा आग्रह आहे. स्त्रीवादी इतिहासाची ही भूमिका 'तळाकडून इतिहास'च्या संकल्पनेशी सुसंगत आहे.

स्त्रीवादी इतिहासकारांनी मुख्यप्रवाही इतिहासलेखनाविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. पारंपारिक किंवा मुख्य प्रवाही इतिहासातून स्त्रियांना का वगळले? स्त्रियांचा उल्लेख त्रोटक व वरवरचे का आले? स्त्रियांविषयीचे विचार विकृत आणि नकारात्मक का होते? लढाया, राजकारण, सार्वजनिक क्षेत्र यानाचा इतिहासात स्थान का देण्यात आले? पुरुष लढाया करत असताना स्त्रिया काय करायच्या? त्याची दाखल इतिहासाने का घेतली नाही? स्त्रिया मुलांना जन्म देतात, त्यांना घडवतात, संस्कृती जपतात, तिचे संवर्धन करतात, अन्ननिर्मिती करतात, शेती-कारखान्यात उत्पादन करतात इत्यादी विषयांना इतिहासात स्थान का मिळाले नाही? असे प्रश्न स्त्रीवादी इतिहासकारांनी उपस्थित केले.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करणारे संशोधन जगभरातील विविध देशांत सुरु झाले.स्त्रीवादी इतिहास लेखनात ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि भारताचा विशेष उल्लेख केला जातो. स्त्रीवादी इतिहासाने भारतीय इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली आहे.

**भारतातील स्त्रीवादी इतिहास :** भारतातील स्त्रीवादी इतिहासलेखनामध्ये प्रागैतिहासिक काळापासून सद्यकाळापर्यंतच्या विषयांवर इतिहासलेखन केले जाते. प्रागैतिहासिक काळात मानव जेंव्हा शिकार आणि अन्नसंग्रह करून जगत होते तेंव्हा देखील स्त्रियांचा शिकार आणि अन्नसंग्रहात मोठा वाटा होता. शेतीचा शोध, मातीची भांडी बनवणे, वस्त्रे बनवणे, अवजारे बनवणे, घरबांधणी, औषधोपचार या क्षेत्रात स्त्रियांनी मोठी कामगिरी केली होती हे स्त्रीवादी इतिहास्कारणी सिद्ध केले. इरावती कर्वे, डी.डी. कोसंबी, शरद पाटील, एच. डी. सांकलिया यांनी त्यांच्या संशोधनात मातृसत्ताक अथवा मातृप्रधान समाजात स्त्रिया पुरुषांच्या वर्चस्वाखाली नव्हत्या तसेच त्या उत्पादन कार्यात महत्त्वाची भूमिका निभावत होत्या अशी मांडणी केली. या काळात स्त्रिया काठीच्या आधारे शेती करत होत्या, भांडी बनवत, बुरुड काम इत्यादी उद्योग करत तसेच धार्मिक पौरोहित्य देखील करत असत. स्त्रियांच्या जननक्षमतेमुळे तत्कालीन मानवी समूहांत त्यांचा मोठा आदर केला जात असे. हे समाज 'मातृपुजक' असत. रा. चिं. ढेरे यांनी 'लज्जागौरी' या ग्रंथात

भारतातील मातृदेवतांच्या उपासनेचा अभ्यास केला. त्यांच्या मते वेदपूर्व काळापासून मातृदेवतांची उपासना होत होती.

शेतीच्या शोधानंतर हळूहळू पितृसत्ताक कुटुंबपद्धती आकारास आली आणि मातृसत्ताक कुटुंबपद्धत क्षीण होत गेली त्या सोबतच स्त्रियांचे स्थान दुय्यम होत गेले अशी मांडणी स्त्रीवादी इतिहासकारांनी केली. भारतात ङ्गब्राम्हणी पितृसत्ताफ्ने स्त्रियांचे स्थान दुय्यम होण्याच्या स्थित्यंतरात मुख्य भूमिका बजावली असे उमा चक्रवर्ती यांचे मत आहे. शेतीसाठी मजूर पुरवठा सतत उपलब्ध रहावा म्हणून वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था आकारास आली. त्यांच्या माध्यमातून बहुसंख्य पुरुषांना नियंत्रित करून शेतीच्या उत्पादनास जुंपता येत असे. स्त्रिया मुलांना जन्म देऊन सतत मजुरांचा पुरवठा करत राहतील म्हणून त्यांच्यावर देखील बंधने आली. त्याच प्रमाणे संपत्तीचा औरस वारस मिळविण्यासाठी आणि जाती-वर्णाचे शुद्धत्व टिकवण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिकतेवर आणि जननक्षमतेवर 'ब्राम्हणी पितृसत्तेने' नियंत्रण आणले. जातीव्यवस्था आणि 'ब्राम्हणी पितृसत्ता' या दोन व्यवस्था परस्पर संबंधी होत्या. या दोन्ही व्यवस्थांचा वापर उच्चजाती व उच्चवर्णातील पुरुषांनी बहुसंख्य पुरुषांचे आणि स्त्रियांचे शोषण करण्यासाठी वर्षानुवर्षे वापरली. 'जात, वर्ग आणि लिंगभाव' हा परीपेक्ष्य वापरून उमा चक्रवर्ती यांनी केलेले संशोधन नवी दिशा देणारे ठरले.

कुमकुम रॉय आणि उपिंदर सिंग यांनी बौद्ध जैन स्तूप, विहार, लेण्या इत्यादी ठिकाणी स्त्रियांनी कोरवून घेतलेल्या लेखांचा अभ्यास केला. तारा भवाळकर, विजया रामस्वामी, इंदुमती शेवडे यांनी जवळपास ७५ संतकवयत्रींचा आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करून स्त्रियांना मोक्ष प्राप्तीसाठी पितृप्रधान समाजाशी कसा संघर्ष करावा लागला याची मांडणी केली. स्त्रियांच्या मौखिक साहित्याचा म्हणजेच जात्यावरील गाणी, वेगवेगळ्या सण-उत्सवात म्हटली जाणारी गाणी, म्हणी, वाक्यप्रचार, मिथक कथा, दंत कथा, लोक कथा इत्यादींच्या मध्ये प्रस्तुत होणाऱ्या स्त्रियांच्या जाणिवांचा अभ्यास स्त्रीवादी इतिहासकारांनी केला. राष्ट्रवादाच्या उदया सोबतच राष्ट्रवादी चर्चाविश्वातून स्त्रियांना नव्याने साचेबद्ध कसे करण्यात आले याचा अभ्यास "Recasting Women : Essays in Colonial History' (1989) या कुमकुम संगारी आणि सुदेश वैद यांच्या द्वारे संपादित ग्रंथात करण्यात आला.

आधुनिक काळात स्त्रियांनी केलेल्या लेखनातून त्यांनी पितृसत्तेशी कसा संघर्ष केला हे दिसून येते. तनिका सरकार, मीरा कोसंबी, विद्युत भागवत यांनी आधुनिक बंगाल आणि महाराष्ट्रात स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याच्या अभ्यासातून स्त्रियांचा पितृसत्तेशी संघर्षाच्या आणि स्त्रियांच्या जाणिवांच्या इतिहासाची मांडणी केली. सुसी थारू आणि के. ललिता यांनी "Women Writing in India : 600 BC to the Present' या द्विखंडीय ग्रंथात प्राचिन काळापासून आजच्या काळापर्यंत भारतातील स्त्रियांनी केलेल्या लिखाणाचा संग्रह १९९१ मध्ये प्रकाशित केला. महाराष्ट्रात 'साहित्यप्रेमी भगिनी मंडळ'ने 'स्त्री-साहित्याचा मागोवा' (२००२) आणि 'भारतीय भाषांतील स्त्रीसाहित्याचा मागोवा' (२००७) असे अनेकखंडीय स्त्रियांच्या लेखनाचा संग्रह असलेले ग्रंथ प्रकाशित केले. 'सर्व स्त्रिया सारख्याच प्रमाणात शोषित असतात' हा भ्रम नाकारून 'स्त्री'हा एकसाची कोटिक्रम नसून जात, वर्ग, प्रदेश, राष्ट्र अनुरूप स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुय्यमत्व भिन्न प्रकारचे असते अशी नवी मांडणी स्त्रीवादी अभ्यासकांनी केली. अमेरिकेत ज्या प्रमाणे काळ्या स्त्रियांच्या स्त्रीवाद हा

गोऱ्या स्त्रियांच्या स्त्रीवादापेक्षा भिन्न स्वरूपात उदयाला आला. तसेच भारतात मुख्यप्रवाही स्त्रीवादा पेक्षा वेगळा दलित स्त्रीवाद उदयास आला. मुख्य प्रवाही स्त्रीवादी चळवळीने आणि दलितमुक्ति आंदोलनाने दलित स्त्रियांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष्य केले या जाणीवेतून दलित स्त्रीवाद पुढे आला. उर्मिला पवार आणि मीनाक्षी मून यांच्या १९८९ मध्ये प्रकाशित 'आम्हीही इतिहास घडवला' या ग्रंथातून बहुजन समाजातील स्त्रियांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न झाला. शर्मिला रेगे, नारायण भोसले, मीना आनंद यांनी दलित स्त्रीवादाबाबत मांडणी केली.

**स्त्रीवादी इतिहासलेखन परंपरेचे मूल्यमापन :** मानवी इतिहासाच्या सर्व ऐतिहासिक काळात समाजाचा निम्मा भाग असलेल्या स्त्रियांचा इतिहास हा मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनाने दुर्लक्षिलेला होता. हा इतिहास स्त्रीवादी इतिहासलेखनाने समोर आणला. स्त्रीवादी इतिहासाने अगदी प्रागैतिहासिक काळापासून आजच्या काळातील स्त्रियांच्या इतिहासाची स्त्रियांच्या दृष्टीकोनातून मांडणी केली. त्यांनी त्या साठी नव्या प्रकारच्या संशोधनपद्धती आणि साधने वापरली. स्त्रियांची मौखिक परंपरा, त्यांची आत्मचरित्रे, त्यांचे आत्मकथने यांचा वापर स्त्रीवादी इतिहासाने केला. जात, वर्ग आणि लिंगभाव यांच्या परीपेक्ष्यातून इतिहासाचा अन्वयार्थ लावायला हवा अशी महत्त्वाची दिशादर्शक मांडणी स्त्रीवादी इतिहासातून समोर आली. जातीव्यवस्था आणि 'ब्राम्हणी पितृसत्ता' यांच्या परस्पर संबंधाची आणि स्त्रियांच्या शोषणाचा संदर्भ लावण्याचा प्रयत्न स्त्रीवादी इतिहासाने केला. दुर्लक्षित असलेल्या स्त्रियांचा इतिहास, स्त्रियांच्या दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्न करणारे स्त्रीवादी इतिहासलेखन भारतातील 'तळाकडून इतिहास' परंपरेतील अत्यंत महत्त्वपूर्ण इतिहासलेखन प्रवाह आहे.

### (क) सबालटर्न (Subaltern) इतिहासलेखन किंवा शोषित-अंकितांचा इतिहास

इ.स.१९८०च्या दशकात उदयाला आलेल्या 'सबालटर्न स्टडीज' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या ज्ञानशाखेतील संशोधक-अभ्यासकांच्या समूहाने भारतीय इतिहासलेखनावर प्रचंड प्रभाव टाकला. त्यांनी वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी इत्यादी तत्कालीन इतिहासलेखनात प्रस्थापित परंपरांची चिकित्सा केली. या इतिहासलेखन परंपरांमधील अभिजन प्रवृत्ती आणि दृष्टीकोन प्रकाशात आणून 'सबालटर्न स्टडीज' च्या इतिहासकारांनी त्यावर टीका केली. अभिजनकेंद्रित इतिहासलेखनाऐवजी समाजतळातून इतिहासलेखन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सबालटर्न स्टडीजच्या इतिहासकारांनी केले. त्यामुळे भारतीय इतिहासलेखन परंपरांचा आणि मुख्यत: तळाकडून इतिहासाचा आढावा घेत असताना 'सबालटर्न स्टडीज'च्या इतिहासलेखनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**'सबालटर्न' म्हणजे कोण? :** 'सबालटर्न स्टडीज'चे प्रवर्तक म्हणून रणजीत गुहा यांना ओळखले जाते. इंग्लंडमधील सुप्रसिद्ध सुसेक्स विद्यापीठात प्रपाठक असणाऱ्या रणजीत गुहा यांनी याच विद्यापीठात 'सबालटर्न स्टडीज ग्रुप'ची स्थापना केली. रणजीत गुहा आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या लेखनामुळे 'सबालटर्न स्टडीज' चा प्रसार होऊन भारताच्या इतिहासलेखनातील महत्त्वाचा प्रवाह म्हणून प्रस्थापित झाला. 'सबालटर्न स्टडीज' च्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत रणजीत गुहा यांनी 'सबालटर्न स्टडीज'ची भूमिका मांडली. त्यात त्यांनी

'सबालटर्न' म्हणजे कोण ?, 'सबालटर्न' ही संकल्पना काय आहे ? याची चर्चा केली आहे. रणजीत गुहा आणि त्यांच्या 'सबालटर्न स्टडीज'च्या सहकाऱ्यांनी 'सबालटर्न' ही संकल्पना इटलीतील कृतीशील मार्क्सवादी विचारवंत अंतोनियो ग्रामची (१८९१-१९३१) यांच्या कडून घेतली. इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाचा संस्थापक सदस्य आणि नेता असलेल्या अंतोनियो ग्रामचीला इटलीच्या हुकुमशाह बेनिटो मुसोलिनी याच्या फॅसिस्ट सरकारने २० वर्षांसाठी तुरुंगवासाची शिक्षा दिली. इ.स. १९२६ पासून जवळपास अकरा वर्षे तुरुंगवास भोगून ग्रामची १९३७ मध्ये तुरुंगातच मरण पावला. या अकरा वर्षाच्या कारावासाच्या काळात ग्रामचीने इतिहास आणि राजकीय सिद्धांकानांवर तीस वह्यांमध्ये जवळपास ३००० पानांमध्ये लेखन केले. ग्रामचीच्या मृत्युनंतर १९५०च्या आसपास ग्रामचीचे लेखन "Prison Notebooks' म्हणून प्रकाशित झाले आणि १९७० नंतर त्याचे इंग्रजी भाषांतर झाले. अंतोनियो ग्रामचीचे "Prison Notebooks' ('प्रिझन नोटबुक्स' म्हणजे 'कारागृहातील वह्या') हे विसाव्या शतकातील मुलभूत लेखन मानले जाते. या लेखनातच ग्रामचीने 'सबालटर्न' ही संकल्पना वापरली होती. 'सबालटर्न'चा शब्दश: अर्थ लष्करी अधिकाऱ्यांतील तळाचा, दुय्यम अथवा निम्नस्तरीय अधिकारी असा आहे. मात्र, अंतोनियो ग्रामचीने आपल्या विश्लेषणात याचा वेगळ्या अर्थाने उपयोग केला. ग्रामचीने 'सबालटर्न' ही संकल्पना "Non Hemogenic' गटांना किंवा वर्गांना लागू केली. "Non Hemogenic' म्हणजे ज्यांना कोणत्याही पद्धतीचे नेतृत्व अथवा धुरीणत्व अथवा अधिकार नसलेले सत्ताविहीन गट किंवा वर्ग होय. त्याच प्रमाणे 'सबालटर्न' ही संकल्पना ही "Subordinated' गटांना किंवा वर्गांसाठी देखील ग्रामचीने वापरली. "Subordinated' म्हणजे 'वर्गभान नसलेले शोषित तसेच अंकित समूहफ होय. वर्गभान नसलेल्या म्हणजे जे लोक शोषित आहेत, ज्यांना दुसऱ्यांच्या वर्चस्वात राहावे लागते आणि ह्या वर्चस्वात राहून देखील आपण अशा पद्धतीने शोषित आहोत / आपले शोषण होतंय / आपल्याला अंकित ठेवले गेले आहे / आपल्याला दुसऱ्याच्या वर्चस्वात राहावे लागते अशी जाणीव नसलेल्या लोकांना "Subordinated' म्हणजे 'शोषित अंकित जन' म्हटले जाते. अंतोनियो ग्रामचीने "Non Hemogenic' म्हणजे धुरीणत्व नसलेल्या आणि "Subordinated' म्हणजे 'शोषित अंकित जन' यांचा 'सबालटर्न' या अर्थाने उल्लेख केला. अर्थात अंतोनियो ग्रामचीने धुरिणत्व नसलेल्या शोषित-अंकित जनांसाठी 'सबालटर्न' ही संकल्पना वापरली.

**भारतात 'सबालटर्न' कोणास म्हणावे ?:** 'सबालटर्न' ही संकल्पना भारतीय समाजाला समजून घेण्यासाठी उपयोगी ठरेल या विचारातून रणजीत गुहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'सबालटर्न स्टडीज' या इतिहासप्रकल्पाच्या माध्यमातून त्याचा स्वीकार केला आणि त्या अनुषंगाने भारतीय स्वरूपात त्याचा अवलंब केला. रणजीत गुहा यांनी 'सबालटर्न स्टडीज' च्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत भारताच्या संदर्भात ङ्गसबालटर्नफ कोणास म्हणावे याचा उहापोह केला. भारताच्या संदर्भात 'सबालटर्न म्हणजे कोण ?' हे ठरवत असताना, त्याची व्याख्या करत असताना 'अभिजन म्हणजे कोण ?' हे देखील स्पष्ट करणे आवश्यक होते. म्हणजेच भारतातील धुरीणत्व असलेले आणि शोषक-वर्चस्वी समाजघटक कोणते ते स्पष्ट होणे गरजेचे होते. रणजीत गुहा यांनी भारतातील धुरीणत्व असलेले आणि शोषक-वर्चस्वी समाजघटकांमध्ये परदेशी आणि भारतीय वर्गसमूहांचा समावेश केला. परदेशी वर्चस्वी गटामध्ये त्यांनी परदेशी भांडवलदार,

गुंतवणूकदार, चहा-कॉफी इत्यादींचे मळेवाले, जमीनदार, मिशनरी इत्यादींचा समावेश केला. रणजीत गुहा यांनी अखिल भारतीय स्वरूपाच्या वर्चस्वी गटामध्ये भारतातील शक्तिशाली सामंतवर्ग, औद्योगिक व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी प्रशासकीय रचनेच्या शिरोभागातील नोकरशाहांचा  वर्ग इत्यादींचा समावेश केला. अखिल भारतीय वर्चस्वी गटाला प्रादेशिक व स्थानिक पातळीवरच्या अंकितांचे काही गट देखील सहाय्यभूत ठरत असत. त्यांचाही समावेश वर्चस्वी /अभिजन गटात करण्यात आला. मात्र, यातील प्रादेशिक अथवा स्थानिक पातळीवरील काही घटक अभिजन आणि अंकित अशा दोन्ही प्रकारचे वर्तन करताना दिसतात. या स्थानिक व प्रादेशिक पातळीवरील घटकांमध्ये गावातले वतनदार, दरिद्री जमीनदार, श्रीमंत व मध्यम शेतकरी यांचा समावेश होतो. भारताच्या संदर्भात अभिजन अथवा वर्चस्वी वर्ग कोणते हे ठरवल्यानंतर भारतातील ङ्गसबालटर्नफ म्हणजे धुरीणत्व नसलेले तसेच शोषित-अंकित समाजगट कोणते हे ठरवले गेले. भारतातील शेतकरी, आदिवासी,  निम्नजाती, दलित, आणि स्त्रिया यांना 'सबालटर्न' मानण्यात आले. भारतातील राजकीय व्यवस्था, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, पितृसत्ता, पुरुषप्रधान व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांच्यामुळे उल्लेखित समाजघटक हे अभिजनांचे शोषित-अंकित बनून राहतात.

**'सबालटर्न स्टडीज'चे खंड आणि त्यांची भूमिका :** भारतीय इतिहासलेखन परंपरांमध्ये वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी इत्यादी पारंपारिक इतिहासलेखन प्रवाहांमध्ये अभिजन म्हणजे समाजातील उच्च स्तरातील प्रवृत्ती प्रबळ होत्या. या इतिहासलेखनांमध्ये अभिजनवादी दृष्टीकोन ठेऊन त्याच्याशी सोयीस्कर अशा तत्वांचा, संकल्पनांचा आणि संशोधन पद्धतींचा अवलंब केला जात असे. मात्र,  इ.स. १९८० च्या दशकापासून सुरु झालेल्या 'सबालटर्न स्टडीज' या इतिहासप्रकल्पाने अभिजनवादी दृष्टीकोन बाजूला नव्या तत्वांचा, संकल्पनांचा आणि पद्धतीशास्त्रांचा अवलंब करून समाजतळाकडून इतिहास लिहिण्यास आरंभ केला. सुरवातीला त्यांनी नव-मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करण्यास सुरवात केली आणि पुढील काळात ते उत्तर-आधुनिकतावादी चौकटीत स्थिरावले. इ.स. १९८२ ते २००५ पर्यंत 'सबालटर्न स्टडीज' चे एकूण बारा खंड प्रकाशित झाले. यातील पहिले दहा खंड ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस या सुप्रतिष्ठित प्रकाशनाने प्रकाशित केले. अकरावा आणि बारावा खंड देखील अनुक्रमे कोलंबिया विद्यापीठ आणि पर्मनेंट ब्लॅक या तितक्याच प्रतिष्ठित प्रकाशनगृहांनी प्रकाशित केला.

'सबालटर्न स्टडीज'च्या खंडांमध्ये विभिन्न पद्धतींचे ज्यांचा एकमेकांशी थेट संबंध नसतो असे विविध लेख प्रकाशित झाले. मात्र, त्यांच्यातील एक समान धागा हा शोषित-अंकित समूहांच्या प्रतिकाराचा असतो. अंतोनियो ग्रामचीच्या 'सबालटर्न' संकल्पनेच्या आधारे वर्ग, जात, वय, लिंग आणि अधिकार या आधारे दुय्यम मानलेल्यांचा यात समावेश होतो. 'सबालटर्न स्टडीज'ने अशारितीने इतिहास लेखनामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या शोषित-अंकित जनांना प्रकाशात आणले. मुघल काळापासून १९७०च्या दशकापर्यंत तसेच जमातवादापासून औद्योगिक कामगारापर्यंतच्या विभिन्न काळातील आणि विभिन्न विषयांवरील संशोधकीय आणि अभ्यासपूर्ण लेख 'सबालटर्न स्टडीज' प्रकाशित झाले. भारतातील शेतकरी, औद्योगिक कामगार आणि आदिवासी यांच्या मधील असंतोष आणि त्या असंतोषातून त्यांनी व्यवस्थेच्या विरोधात केलेला विद्रोह हा 'सबालटर्न' इतिहासलेखनाचा मुख्य विषय होता. सबालटर्न इतिहासकारांच्या मते, शेतकरी कामगार आणि

आदिवासी यांचे विद्रोह हे स्वत:ची स्थिती सुधारण्यासोबतच वसाहतीक अभिजनांचे आपल्याकडे लक्ष ओढून घेण्याचे एक साधन होते. सबालटर्न इतिहासकारांच्या मते पारंपारिक राष्ट्रवादी इतिहासलेखनाने या शोषित-अंकितांच्या विद्रोहाला स्वातंत्र्यचळवळीचा भाग मानून त्याच्या नेतृत्वाचे श्रेय अभिजन वर्गास दिले. त्याचप्रमाणे पारंपारिक मार्क्सवादी इतिहासलेखनाने या शोषित-अंकितांमधील आदिवासी आणि शेतकऱ्यांच्या उठावाकडे दुर्लक्ष केले. याउलट सबालटर्न इतिहासकारांनी शोषित-अंकितांच्या या लढ्यांना स्वायत्त राजकारणाचा दर्जा देऊन त्यामागे शोषित-अंकित जनसमूहांच्या जाणीवा होत्या अशी मांडणी केली. याचे उदाहरण म्हणून शेतकरी बंडाकडे पाहता येते. शेतकरी बंडामध्ये कर्जखते, करार पत्रके जाळणे, सावकारावर हल्ले करणे अशी कृत्ये केल्याचे दिसून येते. यातून त्यांच्या शेतकरी असण्याच्या जाणीवा प्रकट होतात.

**'सबालटर्न स्टडीज'चे संशोधक आणि त्यांचे संशोधन :** आजतागायत 'सबालटर्न स्टडीज'चे एकूण बारा खंड प्रकाशित झाले आहेत. ङ्गसबालटर्न स्टडीजफने भारताच्या इतिहासातील शोषित-अंकित जनांच्या इतिहासाची मांडणी केली. आधुनिक भारतीय इतिहासलेखनामध्ये 'सबालटर्न स्टडीज'चे इतिहास लेखन अत्यंत मूलगामी आणि प्रभावकारी मानले जाते. त्यामुळे 'सबालटर्न स्टडीज'च्या संशोधकांचा आणि त्यांच्या संशोधनाचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

**(१) डेव्हिड आर्नोल्ड :** पूर्वी लंडन विद्यापीठात आणि सध्या वॉर्विक विद्यापीठात प्राध्यापक असणाऱ्या डेव्हिड आर्नोल्ड यांनी तत्कालीन मद्रास प्रेसिडेन्सी (सध्याच्या आंध्र प्रदेशातील) गुडेम आणि रामपा या डोंगराळ प्रदेशातील लोकांच्या १८३९ ते १९२४ इतक्या दीर्घकाळ आणि सतत्याने चाललेय संघर्षाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा लेख 'सबालटर्न स्टडीज'च्या पहिल्या खंडात लिहिला. 'सबालटर्न स्टडीजफच्या तिसऱ्या खंडातील लेखात डेव्हिड आर्नोल्ड यांनी मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये १८७६-७८ दरम्यान पडलेल्या दुष्काळाचा इतिहास लिहिला. भीषण दुष्काळात उदरनिर्वाहासाठी आणि स्वत:ला जागवण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेले प्रयत्न आणि शेतकऱ्यांत निर्माण झालेल्या जाणीवा यांचा अभ्यास या लेखात केला गेला. भारतातील दुष्काळावर झालेल्या प्रचंड लेखनात या अभूतपूर्व संकटांना आपत्तीच्या काळातील मानवी अनुभवांच्या दृष्टीकोनातून पाहीले गेले नाही. तसेच टंचाई आणि दुष्काळाच्या काळातील शेतकऱ्यांचे अनुभव हे राज्याची धोरणे आणि उपाययोजना यांचे लांबलचक विवरण देताना दुर्लक्षित राहिले. अशी मांडणी डेव्हिड आर्नोल्ड यांनी आपल्या लेखात केली आहे.

**(२) ज्ञान पांडे:** एमोरे युनिव्हर्सिटी, अटलांटा-जॉर्जिया, अमेरिका येथे प्राध्यापक असलेल्या ज्ञान(ज्ञानेंद्र) पांडे यांनी १९१९-२२ या काळात तत्कालीन अवध (सध्याचा उत्तर प्रदेश) मध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या बंडांचा आणि त्याचा भारतीय राष्ट्रवादावर झालेल्या परिणामांचा अभ्यास ङ्गसबालटर्न स्टडीजफच्या पहिल्या खंडातील लेखात केला.

**(३) स्टीफन हेनिंनगम :** ऑस्ट्रेलियातील मेलबोर्न विद्यापीठातील इतिहास संशोधक स्टीफन हेनिंनगम यांनी बिहार आणि उत्तर प्रदेश येथील 'चले जाव' आंदोलनाचा अभ्यास केला. 'सबालटर्न स्टडीज'च्या दुसऱ्या खंडातील आपल्या लेखात त्यांनी या भागातील १९४२ चे 'चले जाव' आंदोलन हे दुहेरी आंदोलन

असून त्यात उच्चवर्गीय लोकांचा राष्ट्रवादी उठाव आणि ङ्गसबालटर्नफ लोकांचा विद्रोह हे एकत्रित दिसून येतात.

**(४) अरविंद नारायण दास :** सुप्रसिद्ध अभ्यासक आणि 'बिबिल्यो' या प्रसिद्ध समीक्षा नियतकालिकाचे संस्थापक संपादक यांनी १९४७-७८ याकाळात बिहार मधील शेती व्यवस्थेतील बदलांवरील लेख 'सबालटर्न स्टडीज'च्या दुसऱ्या खंडात लिहिला. १९४७-७८ या काळात बिहारमध्ये झालेल्या शेतीव्यवस्थेतील बदलांचे कारण उच्चवर्गाद्वारे करण्यात आलेल्या जमीन सुधारणा होत्या असे मानने चूक ठरेल अशी मांडणी अरविंद दास यांनी केली. जमीनदारी व्यवस्थेचे उच्चाटन आणि 'भूदान चळवळ' यांच्या माध्यमातून उच्चवर्गाकडून म्हणजेच 'वरून' जमीन सुधारणा राबवल्या गेल्या असे मानले जाते. मात्र अरविंद दास यांच्या मते, या सुधारणा स्वयंस्फूर्तीने राबवल्या गेल्या नसून बिहार मधल्या शेतकऱ्यांच्या असंतोषाला प्रतिक्रिया/प्रतिसाद म्हणून राबवल्या गेल्या. अरविंद दास यांनी अशी मांडणी केली की, स्वामी सहजानंद सरस्वती आणि शक्तिशाली किसान सभा यांनी अनेक वर्षे केलेल्या आंदोलनांमुळे बिहारमध्ये जमीनदारी उच्चाटनासाठी कायदा (१९५०) करण्यात आला. तसेच तेलंगणामध्ये कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सशस्त्र उठावानंतर (१९४६-५१) 'भूदान चळवळ' बिहार मध्ये सुरु झाली. ह्या दोन्ही जमीन सुधारणा या शेतकऱ्यांच्या असंतोषामुळे बिहार मध्ये वर्गसंघर्ष पेटू नये यामुळेच केल्या गेल्या अशी मांडणी अरविंद दास यांनी केली. उच्चवर्गाद्वारे केलेल्या सुधारणांमुळे शेतीव्यवस्थेत बदल झाले अशाप्रकारची कोणतीही कारणमीमांसा करणे हे 'वस्तूला न पकडता त्याच्या सावली मागे धावण्यासारखे' आहे, असे अरविंद दास यांना वाटते.

**(५) दिपेश चक्रवर्ती :** अमेरिकेतली शिकागो विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक असलेल्या दिपेश चक्रवर्ती यांनी १८९०-१९४० या काळात कलकत्यातील (सध्याचे कोलकाता) ज्यूट (ताग) कारखान्यातील कामगारांच्या स्थितीविषयीचा शोधनिबंध 'सबालटर्न स्टडीज'च्या दुसऱ्या खंडात लिहिला. अशाच प्रकारचा १९२०-५० याकाळातील ज्यूट कारखान्यातील कामगारांवरील लेख त्यांनी ङ्गसबालटर्न स्टडीजफच्या तिसऱ्या खंडात देखील लिहिला. आपल्या संशोधनातून दिपेश चक्रवर्ती असे दाखवून देतात की, तत्कालीन कलकत्यातील समाजवादी आणि कम्युनिस्ट नेतृत्वात अभिजनवादी प्रवृत्ती विद्यमान होत्या. समाजवादी आणि कम्युनिस्ट नेते आपल्या नेतृत्वाखालील कामगार संघटनांना स्वत:च्या 'जमीनदारी' असल्याप्रमाणे प्रमाणे वागवत. तसेच कामगारांच्या सोबतचे त्यांचे संबंध हे 'बाबू-कुली' (मालक-गडी) यांच्या संबंधा इतके उतरंडीचे झाले होते.

**(६) शाहीद अमीन :** दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या शाहीद अमीन यांनी 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडात महात्मा गांधींवर लिहिलेल्या लेखात शेतकऱ्यांच्या जाणिवांमध्ये 'महात्मा'चा करिष्मा कशाप्रकारे रुजला होता याचा शोध घेतला. शाहीद अमीन यांना असे आढळून आले की, ङ्गमहात्माफ चा करिष्मा शेतकरी जाणिवांमध्ये रुजण्याचे महत्त्वपूर्ण कारण हे शेतकऱ्यांमध्ये चमत्कारासंबंधी असलेला विश्वास हे होते.

**(७) डेव्हिड हार्डीमन :** इंग्लंडमधील वॉर्विक विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या डेव्हिड हार्डीमन यांनी 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडात दक्षिण गुजरात मधील आदिवासींमधील 'देवी' सुधारणा चळवळीवर शोधनिबंध लिहिला. या संशोधनातून हार्डीमन यांनी तो पर्यंत दुर्लक्षित असलेल्या आदिवासींच्या जाणिवांवर प्रकाश टाकला आणि समाजशास्त्रज्ञांद्वारे अधिक संशोधनाची गरज व्यक्त केली.

**(८) सुमित सरकार :** दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या सुमित सरकार यांनी 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडात १९०५ मधील बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलन आणि १९२१-२२ मधील असहकार-खिलाफत आंदोलन यांच्या मधील जनसामान्यांच्या सहभागावर शोधनिबंध लिहिला. सुमित सरकार यांच्या मते बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलनापेक्षा असहकार-खिलाफत आंदोलनात जनसामान्यांचा उत्साह आणि सहभाग तुलनेने जास्त होता. बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलन हे बंगाल मधील 'भद्र लोक' म्हणजेच हिंदू उच्चजातीय अभिजनांच्या पुरतेच सीमित होते. याउलट असहकार-खिलाफत आंदोलनातील जनसामान्यांचा उत्साह आणि पुढाकार इतका प्रचंड होता की त्यामुळे सावध झालेल्या आंदोलनाच्या नेत्यांनी आंदोलन थांबवण्याचे आवाहन केले, अशी मांडणी सुमित सरकार यांनी केली.

वरील संशोधकांबरोबरच रणजीत गुहा, एरिक स्ट्रोक्स, पार्थ चटर्जी, रामचंद्र गुहा, गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक, कांचा इलैय्या, गौतम भद्रा, ज्ञान प्रकाश इत्यादी संशोधकांनी आदिवासी, दलित, स्त्रिया आणि जनसामान्य इत्यादी शोषित-अंकित समूहांचा इतिहास ङ्गसबालटर्न स्टडीजफच्या माध्यमातून मांडला.

**सबालटर्न इतिहासलेखनाचे मूल्यमापन :** भारतातील पारंपारिक इतिहासलेखन प्रवाहांनी अभिजनवर्गाच्या दृष्टीकोनातून इतिहास लेखन केले. राष्ट्रवादी इतिहास लेखन आणि मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरेने देखील शोषित-अंकित जनसमुदायांच्या इतिहासाकडे दुर्लक्ष केले. अशा परिस्थितीत शोषित-अंकितांच्या दृष्टीकोनातून म्हणजेच 'तळाकडून' इतिहासलेखनाच आरंभ भारतात 'सबालटर्न स्टडीज'च्या म्हणजेच सबालटर्न इतिहासलेखन परंपरेच्या माध्यमातून झाला. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील जनसामन्य लोकांचा सहभाग, या सहभागामागील त्यांच्या जाणीवा-प्रेरणा, त्या मागील त्यांचे स्वत:चे राजकारण-हितसंबंध इत्यादींचा अभ्यास सबालटर्न इतिहासलेखनाने केला. अशाच पद्धतीने आदिवासींचे उठाव आणि शेतकऱ्यांच्या बंड यांचा देखील अभ्यास केला. आदिवासी-शेतकरी यांच्या जाणीवा, उठावामागील कारणे, प्रतिकाराच्या पद्धती इत्यादींचा देखील अभ्यास सबालटर्न इतिहासकारांनी केला. स्त्रियांच्या जाणीवा, पितृसत्ता, स्त्रियांचे शोषण इत्यादी संदर्भातील संशोधनाची देखील सुरवात काही काळानंतर गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक यांच्या लेखापासून झाली. त्याच प्रमाणे दलितांचे शोषण, त्यांच्या जाणीवा, त्यांचा सांस्कृतिक प्रतिरोध यांच्या बाबतच्या संशोधनाचा देखील आरंभ उशिरा का होईना कांचा इलैय्या यांच्या लेखापासून झाला. अशारीतीने सबालटर्न इतिहासलेखनाने पारंपारिक इतिहासलेखनामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या जनसामान्य लोकांच्या, आदिवासींच्या, स्त्रियांच्या, दलितांच्या परीपेक्षातून इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन विकसित केला. अभिजन केंद्रित इतिहासामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या समाज घटकांच्या इतिहासाची मांडणी केल्यामुळे भारताच्या इतिहासाचे एक वेगळे पदर सबालटर्न इतिहासकारांनी उघडून दाखवले. सबालटर्न स्टडीजच्या

नंतरच्या काळातील लेखांमध्ये उत्तर-आधुनिकतावादी दृष्टीकोन प्रभावी ठरू लागला. यातून सामाजिक आर्थिक रचनेत शोषित-अंकित जनाच्या शोषणाच्या कारणांचा आणि त्यांच्या प्रतिकारांचा अर्थ लावण्याऐवजी वर्चस्वी आणि शोषित/अंकित यांच्या संबंधावर भर देण्यात आला. सबालटर्न इतिहास लेखनासाठी काही नव्या प्रकारच्या साधनांचा म्हणजेच मौखिक परंपरा इत्यादींचा वापर सबालटर्न इतिहासकारांनी केला असला तरी मोठ्या प्रमाणत उपलब्ध असलेली आणि सबालटर्न इतिहासकारांनी वापरलेली पुराभिलेखीय साधने ही मूलतः वर्चस्वी वर्गाचीच आहेत. अशा वर्चस्वी वर्गकेंद्रित साधनांच्या आधारे शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिताना मर्यादा येतात. असे असले तरी ङ्गतळाकडून इतिहासफ आणि भाषाशास्त्रीय-मनोविश्लेषण इत्यादी नव्या दृष्टीकोन आणि पद्धतीशास्त्रांचा उपयोग करून सबालटर्न इतिहासलेखन परंपरेने भूतकालीन घटनांचा नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. भारतातील अभिजन केंद्रित इतिहासलेखनाच्या प्रवृत्तीला नाकारून शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिणे आणि शोषित-अंकित जनांच्या दृष्टीकोनातून इतिहासलेखन करण्याच्या 'सबालटर्न स्टडीज'च्या इतिहासकारांची भूमिकेने भारतीय इतिहासलेखन परंपरेत मूलगामी बदल घडवून आणले. अभिजनकेंद्रित असण्याची जी उणीव भारतीय इतिहासलेखन परंपरेत होती ती भरून काढण्याच्या कामी सबालटर्न इतिहासलेखन परंपरेचे योगदान मोठे आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- ३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) छत्रपती शिवाजी महाराजांना 'कुळवाडी भूषण' असे कोणी संबोधले ?

(२) 'दास - शुद्रांची गुलामगिरी' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(३) उमा चक्रवर्ती यांचे मते भारतात स्त्रियांचे स्थान दुय्यम होण्याच्या स्थित्यंतरात कोणी मुख्य भूमिका बजावली ?

(४) शेतकऱ्यांच्या जाणिवांमध्ये रुजलेल्या 'महात्मा'च्या करिष्माचा शोध कोणी घेतला?

(५) 'सबालटर्न स्टडीज'चे प्रवर्तक म्हणून कोणास ओळखले जाते?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) महाराष्ट्रातील ......................... वादाच्या पृष्ठभूमीवर मराठा इतिहासामध्ये अब्राम्हणी दृष्टीकोनातून लिखाण केले जाऊ लागले.

(२) जातीवर्णव्यवस्थेच्या इतिहासावर भाष्य करणारा 'शुद्र कोण होते ?' हा ग्रंथ ............... यांनी लिहिला.

(३) ....................... ही एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे जी स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरते.

(४) भारतातील पारंपारिक इतिहासलेखन प्रवाहांनी ..................च्या दृष्टीकोनातून इतिहासलेखन केले.

(५) अंतोनियो ग्रामचीने धुरिणत्व नसलेल्या शोषित-अंकित जनांसाठी ............ ही संकल्पना वापरली.

## ४.३ सारांश

प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत जगात विविध इतिहासलेखन परंपरा अस्तित्वात होत्या. युरोपात प्रबोधनकाळातील वैचारिक बदलांच्या परिणामस्वरूप इतिहासलेखन पद्धती मध्ये बदल घडून आले. इतिहास हे शास्त्र असून इतिहास संशोधनामध्ये शास्त्रीय पद्धतीचा वापर करून खऱ्या ज्ञानाची प्राप्ती करता येईल असा विचार प्रत्यक्षार्थवादी तत्वज्ञानातून पुढे आला. यातूनच प्रत्यक्षार्थवादी इतिहासलेखन परंपरा आरंभ झाली. पारंपारिक व रूढीवादी दृष्टिकोनांतून इतिहासाकडे न पाहता नव्या व आंतरविद्याशाखीय संशोधन पद्धतींचा वापर करून इतिहास संशोधन करण्याची भूमिका ॲनाल्स इतिहासलेखन परंपरेने मांडली. सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनाचा इतिहास मांडण्याचा पुरस्कार देखील ॲनाल्सपरंपरेने केला. २०व्या शतकात उदयाला आलेल्या ङ्कतळाकडून इतिहासफ परंपरेने कष्टकरी, स्त्रिया, शेतकरी, कामगार या समाजाच्या तळाशी असलेल्या वर्गाचा इतिहास मांडण्याची भूमिका घेतली. तळाकडून इतिहास लेखन परंपरेचा प्रभाव भारतासह विविध देशात पडला.

भारतात आधुनिक पद्धतीने इतिहासलेखनाचीची सुरवात पाश्चात्य अभ्यासकांनी केली. भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर पौर्वात्यवादी, साम्राज्यवादी इत्यादी इतिहासलेखन परंपरा उदयाला आल्या. पौर्वात्य इतिहासलेखन परंपरा ही भारताबाबतच्या कुतूहलमिश्रित आकर्षणामुळे निर्माण झाली. ब्रिटीश सत्ता स्थिर झाल्यानंतर साम्राज्यवादी परंपरेला सुरवात झाली. साम्राज्यवादी परंपरेने भारतीयांच्या संदर्भात पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनातून लेखन करून भारतीयांना मागास ठरवले. भारतीयांना कनिष्ठ ठरवून ब्रिटीशांना श्रेष्ठ ठरवत भारतावरील ब्रिटीश सत्तेचे नैतिक समर्थन केले. विसाव्या शतकाच्या मध्यावर केंब्रिज संप्रदायाने भारतावरील ब्रिटीश सत्तेचे समर्थन करत भारतीय स्वतंत्रता चळवळीतील अंतर्विरोध पुढे आणण्याचा प्रयत्न केला. भारतातील राष्ट्रवादाच्या उदयासोबत राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेचा उदय झाला. साम्राज्यवादी इतिहासलेखनामुळे भारतीयांच्या मनात स्वत:च्या इतिहासासंबंधी निर्माण झालेला न्युनगंड काढून टाकण्याचे काम राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेने केले. या प्रक्रियेत त्यांच्या कडून अतिशयोक्ती अथवा अतिरंजित पणा झाला असला तरी साम्राज्यवादी इतिहासकारांचे बऱ्यापैकी मांडणीचे त्यांनी सप्रमाण खंडन केले. भारतातील मार्क्सवादी इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासाचे भौतिकवादी दृष्टीकोनातून आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला. राजकीय इतिहासाऐवजी आर्थिक इतिहासावर भर देऊन भारतीय इतिहासाचे सिद्धांकन करण्यावर मार्क्सवादी इतिहासकरांचा भर होता.

मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनामध्ये अभिजन वर्गाच्याच इतिहासावर भर दिल्याचे दिसून येते. शोषितांच्या बाजूने उभ्या असलेल्या मार्क्सवादी इतिहासलेखनाने आर्थिक इतिहासावर भर देण्याच्या

नादात सर्वसामान्य लोकांच्या इतिहासाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे जगभरातील कामगार, शेतकरी, आदिवासी, स्त्रिया इत्यादी समाज घटकांचा इतिहास दुर्लक्षित राहिला. २०व्या शतकात उदयाला आलेल्या 'तळाकडून इतिहासा'च्या दृष्टीकोनामुळे या दुर्लक्षित समाज घटकांच्या अभ्यासास सुरुवात झाली. तळातून इतिहासामुळे समाजाच्या तळाशी असलेल्या समाज घटकांची मानवी उत्क्रांतीतील भूमिका तर समोर आलीच पण त्याच बरोबर त्यांच्या शोषणाची आणि त्या शोषणा विरुद्ध त्यांनी केलेल्या प्रतिकाराचा इतिहास देखील समोर आला. भारतात तळाकडून इतिहासाचे अब्राम्हणी, सबालटर्न आणि स्त्रीवादी असे तीन मुख्य प्रवाह उदयास आले. अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरा ही इतिहासात ब्राम्हणी आणि अब्राम्हणी अशा दोन विचारांचा सतत संघर्ष सुरु आहे असे मानते. शुद्र, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या शोषणास आणि दुय्यमपणास जातीव्यवस्था आणि पितृसत्ता जबाबदार आहे असे अब्राम्हणी दृष्टीकोन मानतो. शिवाजी महाराजांच्या इतिहासाला घेऊन देखील ब्राम्हणी आणि अब्राम्हणी इतिहासलेखन परंपरांचा वाद झाल्याचे दिसून येते. अब्राम्हणी इतिहासलेखनाने प्राचीन भारताच्या इतिहासाचा अन्वयार्थ लावून पितृसत्ताक जातीसंस्थाच्या उदयावर गंभीर भाष्य केले आहे. वसाहतिक इतिहासलेखन आणि राष्ट्रवादी इतिहासलेखनाने आधुनिक भारताचा आणि भारताच्या स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास लिहिताना शेतकऱ्यांचे उठाव आदिवासींचे बंड यांच्याकडे दुर्लक्ष्य केले होते. अंतोनियो ग्रामची याच्या 'सबालटर्न'संकल्पनेचा वापर करून भारतातील शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न 'सबालटर्न इतिहासलेखन' परंपरेने केला. अभिजन वर्गाशिवाय इतर जे समाजघटक जे शोषित आणि अंकित होते त्यांची इतिहासातील भूमिका कशाप्रकारची होती याचे विश्लेषण 'सबालटर्न इतिहासलेखन' परंपरेने केले. समाजाचा निम्मा भाग असलेल्या स्त्रियांच्या इतिहासाकडे जवळपास सर्व इतिहासलेखन प्रवाहांनी दुर्लक्ष केले होते. स्त्रीवादाच्या उदयाबरोबर टप्प्याटप्प्यांनी भारतातील स्त्रीवादी इतिहासाचा विकास होत गेला. स्त्रीवादी इतिहासकारांनी प्राचीन भारताच्या इतिहासाचा अन्वयार्थ लावून स्त्रियांना दुय्यमत्व देणाऱ्या जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्या घनिष्ट संबंधाची मांडणी केली. आधुनिक काळात राष्ट्रवादाच्या उदया बरोबर स्त्रियांना नव्याने साचेबद्ध करण्याची प्रक्रिया राबवली गेली याचा उलघडा स्त्रीवादी इतिहासकारांनी केला. अब्राम्हणी, सबालटर्न आणि स्त्रीवादी या तीनही इतिहासलेखन परंपरामध्ये स्त्रिया, दलित, आदिवासी, कामगार, शेतकरी इत्यादी समाजाच्या तळातील शोषित घटकांचा इतिहास त्यांच्या दृष्टीकोनात मांडण्याचा प्रयत्न केला. या तीन इतिहासलेखन परंपरांच्या माध्यमातून भारतात 'तळाकडून इतिहासा'ची परंपरा अस्तित्वात आल्याचे दिसून येते.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**भारतविद्या :** प्राचीन भारताचा अभ्यास

**मार्क्सवाद :** कार्ल मार्क्स या जर्मन विचारवंताचे तत्वज्ञान

**अनौद्योगीकीकरण :** उद्योगांचा ऱ्हास होणे

**सबालटर्न :** धुरीणत्व (वर्चस्व) नसलेले तसेच शोषित-अंकित समाजगट

**सुवर्णयुग :** सर्व क्षेत्रात भरभराट असलेला काळ

**पितृसत्ता :** कुटुंबामध्ये किंवा सत्तेमध्ये सर्वात वयस्कर पुरुष हा कुटुंब किंवा सत्ता प्रमुख असतो.

**मातृसत्ता :** कुटुंबामध्ये किंवा सत्तेमध्ये सर्वात वयस्कर स्त्री ही कुटुंब किंवा सत्ता प्रमुख असते.

**पुरुषसत्ताक :** पुरुषांचे वर्चस्व असलेली व्यवस्था

**स्त्रीसत्ताक :** स्त्रियांचे वर्चस्व असलेली व्यवस्था

**स्त्रीवाद :** स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरणारी सामाजिक-राजकीय विचारप्रणाली

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- १

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) लिओपाल्ड रैंके (२) प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञान

(३) आंतरविद्याशाखीय व सर्वंकष इतिहास लेखन (४) फर्नांद ब्रादेल

(५) हॉवर्ड झिन

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) ऑगस्त कॉम्त (२) ॲनाल्स (३) हरबंस मुखिया (४) वर्गीय आणि वांशिक

(५) ई. पी. थॉम्पसन

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- २

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) जेम्स मिल (२) अलाहबाद (३) दादाभाई नौरोजी (४) जदुनाथ सरकार

(५) आर.एस. शर्मा

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) माऊंट स्टयुअर्ट एलफिन्स्टन (२) रोमेशचंद्र दत्त

(३) राष्ट्रवादाची (४) भारतीय स्वातंत्र्यता चळवळीशी

(५) डी. डी. कोसंबी

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- ३

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) महात्मा जोतीबा फुले (२) शरद पाटील (३) ब्राम्हणी पितृसत्ता (४) शाहीद अमीन

(५) रणजित गुहा

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) ब्राम्हण-ब्राम्हणेतर (२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (३) स्त्रीवाद

(४) अभिजनांच्या (५) सबालटर्न

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

(१) प्रत्यक्षज्ञानवादी सिद्धांत स्पष्ट करून इतिहासललेखनावरील त्याच्या परिणामांची चर्चा करा.

(२) ॲनाल्स इतिहासलेखन परंपरेचे योगदान स्पष्ट करा.

(३) वसाहतवादी इतिहास लेखनाच्या भूमिकेचे विश्लेषण करा.

(४) राष्ट्रवादी इतिहास लेखनाचे मूल्यमापन करा.

(५) सबालटर्न इतिहासलेखन परंपरेची चिकित्सा करा.

ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

(१) ऑगस्त कॉम्त

(२) तळाकडून इतिहासाची संकल्पना

(३) मार्क्सवादी इतिहासलेखन

(४) अब्राम्हणी इतिहासलेखन

(५) स्त्रीवादी इतिहासलेखन

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

Shaikh Ali, B, “History : its Theory and Method’, Manohar Paublication, Delhi, 1979

Sreedharan, E.,”A Textbook of Historiography, 500 B.C. to A.D. 2000', Orient Blackswan, 2004

कोठेकर शांता, ‘इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान’, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २०११

सरदेसाई, बी., एन., ‘इतिहासलेखनपद्धती’, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००४

गायकवाड आर. डी., सरदेसाई बी.एन., हनमाने व्ही. एन., ‘इतिहासलेखनशास्त्र’, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६

देव, प्रभाकर, ‘इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा’, ब्रेनटॉनिक प्रकाशन, नाशिक, २००७

वांबूरकर, जास्वंदी, ‘इतिहासातील नवे प्रवाह’, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१४

इतिहासलेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड-१, लोकवाङ्मय गृह, २०१०

❑❑❑